12-09-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SKK/ 12:00

09-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-1

SKK/ MHM/ SBT/ 12:00

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

**कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करण्यासंबंधात.**

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, काल झालेल्या कामकाज सल्लागार समितीचा अहवाल मला सादर करण्यास आपण परवानगी द्यावी.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर लगेचच कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करण्यास मी परवानगी देतो.

-

**पृ.शी.व मु.शी.** : तोंडी उत्तरे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 5 आणि प्रश्न क्रमांक 95 हे प्रश्न एकाच विषयाशी संबंधित असल्यामुळे ते दोन्ही प्रश्न एकत्र चर्चेला घ्यावेत,अशी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

-

**वरीष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत**

**(1) * 9268 श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. वसंतराव काळे , श्री. नतिकोद्दीन खतिब : तारांकित प्रश्न क्रमांक 5584 ला दिनांक 12 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक 14 सप्टेंबर, 2000 रोजी एका याचिकेमध्ये (सन 2000 ची याचिका क्रमांक 4346) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे,

(2) निर्णय झाला असल्यास केव्हा व आदेशाचे स्वरुप काय आहे,

(3) अद्याप निर्णय झाला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.9268 (पुढे चालू...

**प्रा. वसंत पुरके** : (1) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेला निकाल व मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय यामध्ये विसंगती होऊ नये म्हणून या प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा प्रश्न सभागृहामध्ये सातव्यांदा चर्चेला येत आहे. दु:खाने सांगावेसे वाटते की, 12 जुलै 2005 रोजी जे उत्तर दिले त्याही वेळी आणि आपल्या दालनामध्ये 28 जुलै 2005 रोजी चर्चा झाली, त्याहीवेळी हेच शेवटच्या पॅरेग्राफमधील उत्तर दिलेले आहे. आजही तेच उत्तर या प्रश्नाला दिलेले आहे. कोर्टामध्ये उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक 94346,दिनांक 14 सप्टेंबर 2000 ला 20 शिक्षकांना विना अनुदानित सेवा ही वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी अशाप्रकारचा निर्णय दिला. एवढेच नाही तर याशिवाय रिट पिटिशन क्रमांक 7026, 7027, 7028, 7029, 7030, 7032, 7036 याद्वारे अशा पाच शिक्षकांना पुन्हा हाच बेनिफीट कोर्टाने दिला. आता असे उत्तर दिलेले आहे की, "या प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल". यापूर्वी एक महिन्यात निर्णय घेऊ अशापध्दतीचे देखील उत्तर आलेले होते. सभापती महोदय, आमचे असे म्हणणे आहे की, आपल्या दालनामध्ये आपण निर्देश दिल्याप्रमाणे 22-7-2005 ला चर्चा झाली,त्यावेळेस मा.मत्री महोदय आणि त्यांचे सहकारी आणि आम्ही प्रतिनिधीही त्या ठिकाणी होतो. त्यावेळेस देखील चर्चा झाली. याला अडीच-तीन महिने होऊन गेले. आता उत्तर असे आहे की, विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. विधी व न्याय विभागाचा सल्ला घ्यायचा असेल तर आपल्या विभागाची आवश्यकता आहे काय, आपला विभाग निर्णय काही घेणार आहे की नाही ? की विधी व न्याय आणि वित्त विभागाकडेच हे काम ढकलणार अहात ? माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, केवळ वरिष्ठ श्रेणीसाठी नाही तर सर्व प्रयोजनासाठी -मग सिनियॉरिटी असेल, पेन्शन, गॅज्युएटी आणि इतर सर्वांसाठी असावी. यासाठी 4 कोटी रुपयाचा खर्च लागेल असे आपण म्हणता. सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्याबाबतीत संबंधित ग्राम विकास विभागाने एक महिन्याच्या आत, यापेक्षा जास्त निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील निर्णय घेतला.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.9268 (पुढे चालू...

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे: माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आता आम्हाला विचारायला लावू नका, आमची फजिती करु नका, आपलीही फजिती करु नका. बाहेर आमच्याबद्दल आणि तुमच्याबद्दल जे काही वातावरण निर्माण झालेले आहे, हे थोडे सांभाळून एक महिन्याच्या आत हा निर्णय घेतला जाईल काय ? कोर्टाचा निर्णय आहे. कोर्टाचा अवमान करु नका. एक महिन्याच्या आत यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल काय ?

श्री.वसंत पुरके : माननीय सभापती महोदय, एखादा प्रश्न सभागृहामध्ये कितीवेळा चर्चेला यावा, याला मर्यादा असणे स्वाभाविक आहे. म्हणून आपल्याला आणि सन्माननीय सदस्यांनाही विनंती केली होती की, हा प्रश्न त्वरित निकालात निघावा म्हणून आपण स्वत: मध्यस्थी करुन, माननीय मुख्यमंत्र्यांसोबत एक बैठक बोलवावी. परंतु ती बैठक आयोजित केली नाही. परंतु विधानभवनामध्ये जी बैठक झाली होती. मी पुन्हा विनंती करतो की, या संदर्भात खात्याची भूमिका अत्यंत सकारात्मक आहे. परंतु वित्त विभागाने आणि कॅबिनेटने स्वीकृत न केल्यामुळे हा प्रश्न प्रलंबित राहिला. पुन्हा विनंती करतो की, माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठक बोलाविण्याचे निश्चित प्रयत्न केले जातील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपल्या सौजन्याचा गैरफायदा घेतला जातो हे काही बरोबर नाही. एक गोष्ट अशी आहे की, मुळामध्ये हायकोर्टाने निर्णय दिला की, तुमचा शासन निर्णय बरोबर आहे, त्याप्रमाणे अंमलबजावणी करा. शासन निर्णय जो आहे, तो बीनचूक आहे. त्यामध्ये विना अनुदानाची सेवा धरु नका,असे कोठेही म्हटलेले नाही. त्यामुळे ती धरा व त्याची अंमलबजावणी करा असे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात म्हटलेले आहे. हा धोरणात्मक निर्णय आहे हे शासनाने अनेकदा सभागृहात मान्य केलेले आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र.9268....

प्रा. बी. टी. देशमुख...

हायकोर्टाच्या निर्णयावर याच सभागृहात शुक्रवार, दिनांक 11 जून, 2004 ला प्रश्न क्रमांक 36739 ला आपण उत्तर दिले आहे. ते उत्तर असे आहे की, "वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानीत शाळातील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दि.24 सप्टेंबर, 2000 रोजी एका याचिकेमध्ये सन 2000 ची याचिका क्रमांक 4346 हे खरे आहे काय? त्याला शासनाने दिलेले उत्तर एका शब्दाचे आहे. "होय". आता येथे कौतुक काय चालू आहे? उच्च न्यायालयाने दिलेल्या निकाल व मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय यामध्ये विसंगती होऊ नये म्हणून या प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल." त्यानंतर पुन्हा हायकोर्टाने निर्णय दिला. विधी व न्याय विभागाची शासनाला पंचाईत झालेली आहे. त्यांचा सल्ला घ्यावा लागला म्हणून हायकोर्टाचा दि.3-9-2004 चा निर्णय आहे. पुन्हा हायकोर्टाने म्हटले आहे की, एकदा आम्ही सांगितले पुन्हा सांगतो की, हे बरोबर नाही. सभापती महोदय, हे शासन कसे काय चालेत हेच मला कळत नाही. पुन्हा मंत्रिमहोदय, अध्यक्षांना विनंती करीत आहेत. अध्यक्षांना विनंती करण्यापेक्षा मुख्यमंत्र्यांना आणि मंत्रिमंडळाला सांगण्याची आपली कॉन्स्टिटयुशनल डयुटी आहे. हा हायकोर्टाचा निर्णय आहे. हे अत्यंत अशोभनीय आहे. दुर्दैवाने येथे एकदा त्यांच्यापैकी कोणी तरी उद्‌गार काढले होते की, मग आता हायकोर्टात जाऊन निर्णय घ्या. आम्ही त्या सात लोकांना सांगितले. म्हणून शासनाने नाही म्हणून सांगावे आम्ही त्या सर्व लोकांच्या सभा घेऊन हायकोर्टात चला असे सांगतो. मग तुमचा उपयोग काय राहिला ? जरा विचार करा, ही अशोभनीय गोष्ट आहे.

**सभापती** :प्रश्न विचारा.

प्रा. बी. टी. देशमुख : हायकोर्टाने दिलेला निर्णय धोरणात्मक आहे असे म्हटल्यानंतर अंमलबजावणीचा आदेश काढला नाही, तो एक महिन्यात काढणार काय ? असा प्रश्न आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यापूर्वीही कॅबिनेटला सादर केलेल्या प्रस्तावानुसार पुन्हा आम्ही हा प्रस्ताव कॅबिनेटसमोर नेऊ आणि सकारात्मक निर्णय घेऊ.

..2..

ता. प्र.क्र.9268....

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या विषयावर सभागृहात जेव्हा चर्चा झाली होती त्यावेळी मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याला आपण उत्तर दिले होते आणि ॲडव्हेकेट जनरलचे ओपिनियन घेण्याबद्दल देखील सभागृहात मांडले होते. यावेळी हायकोर्टाने या विषयाबद्दलचा निर्णय दिलेला आहे. हा निर्णय सरकारवर बंधनकारक आहे असे मंत्रिमहोदयांनी मान्य केले होते. हायकोर्टाने दिलेला निर्णय जेव्हा सरकारवर बंधनकारक आहे आणि ते सरकार पाळत नसेल तर कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होतो. या ठिकाणी ख-या अर्थाने शिक्षण मंत्र्यांनी आणि शिक्षण सचिवांनी कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट केलेला आहे. शासनाची अडचण काय आहे? वित्त विभाग ऐकत नाही. पण सरकार एकच असते. मंत्रिमहोदय सभागृहात सांगत आहेत की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांना भेटा, अर्थ मंत्री ऐकत नाही किंवा वित्त विभाग ऐकत नाही. हा आमचा प्रश्न नाही.. आमच्या दृष्टीने शासन ही एकच एनटिटी आहे. आणि या विषयात हायकोर्टाने निर्णय दिल्या नंतर देखील त्याचे पालन केले नाही त्यावर ॲडव्होकेट जनरलचे ओपिनियन घेण्याचेही आम्ही मान्य केले होते.सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण यामध्ये हस्तक्षेप केला पाहिजे. लोकशाहीच्या चार विंग आहेत. 1) लेजिस्लेटिव्ह विंग आहे. 2) न्यायालय 3) प्रेस 4) आपली एक्झिक्युटिव्ह विंग म्हणजे ब्युराक्रसी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेप्रमाणे प्रत्येकाच्या मर्यादा आणि हक्क ठरलेले आहेत. परंतु ज्यावेळी एखाद्या विंगमध्ये विशेषत: लेजिस्लेस्टिव्ह विंगमध्ये दुस-या विंगचा अपमान होत असेल तर त्यावेळी या सभागृहाचे प्रमुख आपण आहात. अशा वैधानिक मुद्यावर आपण अनेक वेळा या सभागृहामध्ये आपले मत दिलेले आहे. यासंदर्भात कन्टेम्प्ट ऑफ कोर्टची क्लिअरकट केस आहे. हायकोर्टाचा निर्णय सुस्पष्ट आहे. हायकोर्टाचा निर्णय सरकारवर बंधनकारक आहे. सरकारने बंधनकारक निर्णयाचे पालन केले नाही हे सिध्द होत आहे. त्यामुळे कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट झालेले आहे. आता प्रा. बी. टी. देशमुख साहेब, श्री. डायगव्हाणे साहेब आम्ही सर्व आमदार मिळून आम्ही यांच्या विरुध्द कन्टेंन्टमध्ये ॲप्लिकंट बनून हाय कोर्टात न्याय मागायला जायचे काय ? आणि मला असे वाटते की, तसा न्याय मागणे उचित होणार नाही. कारण आम्ही या सभागृहाचे सदस्य आहोत. या --------------------





ता. प्र.क्र.9268....

श्री. नितीन गडकरी....

सभागृहामध्ये जेव्हा कायद्याची अवहेलना होत असेल, नियमाप्रमाणे कामकाज होत नसेल, हायकोर्टाचा अवमान सरकारकडून किंवा कोणाही व्यक्तीकडून होणार असेल तर अशा वेळी हस्तक्षेप करण्याचा अधिकार आपल्याला आहे. आणि म्हणून माझी आपणाला विनंती आहे. पाहिजे तर आपण आज हा प्रश्न रोखून धरा. आणि उद्या उत्तर द्या. तेव्हा सभापती महोदय, आता आपण यावर रुलिंग दिले पाहिजे.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( तारांकित प्रश्न क्र. 9268.......) सुरु. ( श्री. नितीन गडकरी .....

आपला हा अधिकार आहे. आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात, आपण बस म्हटल्यानंतर मंत्री तसेच सदस्य देखील खाली बसतात. म्हणून आमच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची जबाबदारी लोकशाहीने आपल्यावर टाकलेली आहे, ती कृपया आपण करावी. कारण तीन तीन वेळा तेच नाणं घासणे हे बरोबर नाही. मंत्री महोदयांची देखील काही तरी व्यक्तिगत अडचण आहे असे मला वाटते. परंतु असे चित्र सभागृहाच्या बाहेर उभे राहणे योग्य नाही. यामध्ये कोर्टाचा अवमान होत असल्याचे दिसून येते. म्हणून हे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य होणार नाही. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, वास्तविक यामध्ये लिगल ओपिनियन घेण्याची जरुरी नाही. कारण त्यांनी मान्य केले आहे की, हायकोर्टाचा निर्णय बंधनकारक आहे. म्हणून या निर्णयाची जशीच्या तशी अंमलबजावणी शासनाने हे अधिवेशन संपण्यापूर्वी करावी असे आदेश आपण द्यावेत, अशी आमची विनंती आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, यापूर्वी जो निर्णय कोर्टाने दिला होता त्यावेळी 20 शिक्षकांना त्या निर्णयाचा फायदा मिळाला, त्यानंतर चार वर्षांनी पुन्हा 7 शिक्षकांना न्याय मिळाला. परंतु आता विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याची गरज शासनाला का भासली हे मला समजत नाही. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा, अशी आमची विनंती आहे. ज्याप्रमाणे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न मागील वेळी उपस्थित झाला असता सभापतींनी आदेश दिल्यानंतर एक महिन्याच्या आत सरकारने निर्णय घेतला होता त्याचप्रमाणे आज देखील आपण या प्रश्नामध्ये हस्तक्षेप करावा आणि हा प्रश्न राखून ठेवावा.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या हरकतीच्या मुद्दयावर बोलतांना मी दोन मुद्दयांसंबंधी माहिती देऊ इच्छितो. एक म्हणजे धोरणात्मक निर्णय या सभागृहात मंत्री महोदयांनी मान्य केला आणि दुसरे म्हणजे सभागृहात एकदा सहजपणे एक मंत्री उभे राहिले आणि याच प्रश्नावर चर्चा करतांना मागे एकदा असे म्हणाले होते की, हाय कोर्टाने दिलेला निर्णय हा फायनल थोडाच आहे, आपण सुप्रिम कोर्टामध्ये जाऊ. हे आजही सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. यानंतर सभागृहात बराच वेळ या प्रश्नावर गोंधळ झाला होता एवढेच नव्हे तर त्यावेळी सभागृहाची बैठक देखील स्थगित करण्यात आली होती. आपण स्वत: यासंदर्भातील कागदपत्रे पाहिली.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ...... ( तारांकित प्रश्न क्र. 9268....... सुरु.

त्यावेळी आपण काय सांगितले ते मी वाचून दाखवितो. It is a statement on fact. आपण त्यावेळी म्हणाला होता की, "मी एवढेच सांगेन की, सन 2000 सालामध्ये उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यानंतरच्या काळात अपिल झालेले नाही त्यामुळे अपिलाची मुदत सुध्दा संपलेली आहे." किती लाजिरवाणी गोष्ट आहे ही ? म्हणून मी या मताशी सहमत आहे की, हा प्रश्न राखून ठेवावा. त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा आणि त्यानंतरच हा प्रश्न चर्चेसाठी घेण्यात यावा. कारण माननीय मंत्री महोदय यामध्ये काहीही करु शकत नाही. ते दुर्बल आहेत.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : माननीय मंत्री महोदयांची इच्छा सुध्दा नाही.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हा माझ्यावर एक प्रकारे हेत्वारोप आहे. कारण काही करु शकत नाही अशी परिस्थिती असती तर 243 कोटी रुपये दिले नसते.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी जे बोललो ते पुन्हा रिपीट करतो आणि त्यात जर तसे आढळून आले तर आपणच ठरवावे की हा हेत्वारोप आहे की कसे. मी असे म्हणालो की, हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास दुर्देवाने आपल्याला अपयश आलेले आहे, आणि हा हेत्वारोप नाही. तरीही आपल्या म्हणण्यानुसार हा हेत्वारोप असेल तर मी माननीय सभापतींसमोर नतमस्तक होईन, आपले ऐकण्याचे कारण नाही. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा अशी मी विनंती करतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्या मुद्दयाशी मी सहमत आहे. आपले हे कायदेमंडळ आहे आणि जे कायदे या ठिकाणी केले जातात त्यांची अंमलबजावणी या कायदेमंडळातच होत नसेल तर ही वाईट गोष्ट आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 9268.....**

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

यासंदर्भात शासनाचा निर्णय झालेला आहे, हायकोर्टाने सुध्दा तो उचित ठरविला. या निर्णयाला हायकोर्टाने मान्यता दिलेली आहे. आता याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु इतर कारणे सांगून विलंब लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही बाब कायदे मंडळाला शोभा देणारी आहे असे मला वाटत नाही. आपण या प्रश्नाच्या संदर्भात निर्णय दिलेला आहे, शासनाने देखील निर्णय घेतलेला आहे तसेच उच्च न्यायालयाने सुध्दा याला संमती दिलेली आहे. आता निर्णयाची अंमलबजावणी करावयाची असतांना माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर किंवा इतर मंत्र्यांबरोबर बैठक घेण्याचे काही कारणच नाही. त्यामुळे जो निर्णय दिलेला आहे त्याच्या संदर्भात त्वरीत अंमलबजावणी करुन निर्णय लागू करयात येईल अशी घोषणा मा. मंत्रीमहोदयांनी सभागृहात करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये हा प्रश्न मीच उपस्थित केला होता व या प्रश्नावर त्यावेळी खूप चर्चा देखील झाली होती तसेच या प्रश्नावर प्रचंड गदारोळ होऊन सभागृहाचे कामकाज तहकूब देखील झाले होते. तसेच यासंदर्भातील मुद्दा सभापती महोदय आपल्याला देखील पटला होता. मा. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, हा प्रश्न सभागृहात 6-7 वेळा आलेला आहे, प्रश्नाला देखील मर्यादा असतात. परंतु जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत हा प्रश्न या सभागृहात वारंवार येतच राहणार आहे. महाराष्ट्रातील शिक्षकांचा हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात न्यायालयाने देखील निर्णय दिलेला आहे त्यामध्ये हायकोर्टाने म्हटले आहे की, शासनाने या प्रश्नाच्या संदर्भात जो आदेश काढलेला आहे तो चूकीचा आहे. विना अनुदानीत सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राहय धरावी असा हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. तसेच यासंदर्भात शासनाने अपील सुध्दा केलेले नाही. सभापती महोदय, आपण या प्रश्नाच्या संदर्भात हस्तक्षेप केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही अशी आमची सर्वांची भावना झालेली आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आता हा प्रश्न आपण सोडवावा व आम्हाला न्याय मिळवून द्यावा. मध्यंतरी शासनाने सांगितले की, जे शिक्षक कोर्टात गेले त्यांच्यासाठी आम्ही हा निर्णय घेतलेला आहे व तो निर्णय मंत्रीमंडळाने मंजूर केलेला आहे. आता महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी कोर्टात

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 9268.....**

श्री. रामनाथ मोते.......

परत रिटपिटीशन दाखल करायचे का अशा प्रकारचा गंभीर प्रश्न यामुळे निर्माण होईल. त्यामुळे यासंदर्भात आपण निर्णय द्यावा व हा जो अनेक वर्षापासून प्रलंबित प्रश्न आहे तो आपण सोडवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मला सभागृहाच्या भावनांची तसेच वस्तुस्थितीची जाणीव आहे. त्यामुळे मी आपल्याला ग्वाही देतो की, मार्च महिन्या पर्यंत हा प्रश्न निश्चितपणे सोडविला जाईल.

प्रा. श्री. बी.टी.देशमुख : माननीय सभापती महोदय, ज्यावेळेस एखादा प्रश्न राखून ठेवला जातो त्यावेळेस खरे म्हणजे ती संबंधित मंत्रीमहोदयांसाठी सवलत असते. या प्रश्नाच्या संदर्भात एक महिन्याच्या आत आदेश काढले जातील असे माननीय मंत्रीमहोदयांनी येथे सांगावे. मा. सभापती महोदय, आपण माननीय मंत्रीमहोदयांना आदेश द्यावेत, हायकोर्टाच्या निर्णया प्रमाणे एक महिन्याच्या आत आदेश काढले जातील काय? यासंदर्भात मा. मंत्रीमहोदय, हो म्हणत नसतील तर या देशाच्या घटनेला, हायकोर्टाला आपण संरक्षण द्यावे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हायकोर्टाचा अवमान झालेला नाही. विधी व न्याय विभागाचे आमच्याकडे ओपिनियन आहे. परंतु सभागृहाची भावना आहे आणि वस्तुस्थिती लक्षात घेऊन 31मार्च महिन्या पर्यंत हा प्रश्न निश्चितपणे सोडविला जाईल. तसेच माननीय सभापती महोदय, आपण या प्रश्नाच्या संदर्भात पुढाकार घेऊन आम्हाला निर्देश द्यावेत आम्ही ते मान्य करु. या प्रश्नाच्या संदर्भात आपण जो काही निर्णय घाल तो आम्हाला मान्य राहील.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, 31 मार्चच्या आता हा प्रश्न आम्ही सोडवू.

(गोंधळ)

**सभापती** : आता मी रुलिंग देत आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपा करून खाली बसावे. सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. या पूर्वी या विषयावर 2-3 वेळा चर्चा होऊनसुध्दा दुर्देवाने प्रश्नाची उकल होऊ शकलेली नाही, अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, बी.टी.देशमुख, जोगेंद्र कवाडे, रामनाथ मोते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, घटनेप्रमाणे उच्च न्यायालयाने, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे राज्य सरकारवर बंधनकारक असते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केलेले नाही, हे मागच्या वेळी देखील सांगितले आहे. आजही तीच परिस्थिती आहे. सरकारला या बाबतीत अन्य कोणता कायदेशीर सल्ला घ्यायचा असेल तो त्यांनी घ्यावा. परंतु, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णत: अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा मी शासनाला निदेश देतो.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सेवानिवृत्त राष्ट्रीय सुदृढता दलाच्या कर्मचाऱ्यांना केंद्रीय संघटक विद्यालयातील शिक्षकाप्रमाणे वेतनश्रेणी मिळणेबाबत**

**(२) * १०३४५ श्री. जगदिश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे :**
सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेवानिवृत्त राष्ट्रीय सुदृढता दलाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर, १९७६ पासून या राज्य शासनाने आपल्या सेवेत सामावून घेतले व त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनुसार वेतनश्रेणी देण्याचे मान्य केले होते, हे खरे काय,
(२) असल्यास, ती न दिल्यामुळे दिनांक २ डिसेंबर, १९८५ रोजी न्यायालयातर्फे न्याय मिळवून केंद्रिय संघटन विद्यालयातील शिक्षकाप्रमाणे वेतनश्रेणी देण्याचे आदेश १९८६ साली निर्गमित केले, हे खरे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक ४ ऑगस्ट, १९८८ रोजी आदेश काढून सर्व राज्यांना पाठविला परंतु महाराष्ट्र शासनाने हा आदेश पाळला नाही व दिनांक १९ एप्रिल, १९८६ प्रमाणेच वेतन निश्चिती केली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाचे आदेश असल्यानंतरही राज्य शासन शैक्षणिक पात्रतेनुसार वेतन निश्चिती न करण्याचे कारणे काय आहेत?

**प्रा वसंत पुरके** : (१) होय.
(२) केंद्र शासनाने राष्ट्रीय सुदृढता दल निदेशक पदाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबतचे आदेश दिनांक १९ मे, १९८६ व ४ ऑगस्ट, १९८८ रोजी निर्गमित केले आहेत, हे खरे आहे.
(३) केंद्र शासनाच्या उपरोक्त आदेशानुसार सर्व रासुद निदेशकांच्या वेतनश्रेण्यांमध्ये आवश्यक ती सुधारणा करुन, त्याप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न भाग ३ ला दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने प्रश्न उद्भवत नाही.

----------

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, गेल्या कित्येक वर्षापासून हा विषय सातत्याने रेंगाळत पडलेला आहे. वेगवेगळ्या माध्यमातून राष्ट्रीय सुदृढता दलाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी या प्रश्नाकडे सन्माननीय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधलेले आहे. जवळ जवळ 1200 राष्ट्रीय सुदृढता दलाच्या कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न आहे. परंतु, त्यांच्या प्रश्नाला शिक्षण विभागाकडून कोणत्याही प्रकारची दाद मिळत नाही. या प्रकरणी केंद्र शासनाचा आदेश आहे की, शेक्षणिक पात्रतेनुसार राष्ट्रीय सुदृढता दलाच्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तथापि ती अद्यापि लागू करण्यात आलेले नाही. तसेच त्यांचे भोळे व बडकस आयोगाप्रमाणे निवृत्त वेतन निश्चित करणे आवश्यक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10345...

श्री.जगदीश गुप्ता....

होते, ते देखील करण्यात आलेले नाही. हा प्रश्न कित्येक वर्षापासून प्रलंबित आहे. तेव्हा सदर प्रश्न लक्षात घेता राष्ट्रीय सुदृढता दलाच्या कर्मचाऱ्यांना केंद्रीय संघटक विद्यालयातील शिक्षकाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे का ? असल्यास, यासंबंधीचा निर्णय शासन किती कालावधीत घेणार आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, विविध कारणास्तव या प्रश्नासंबंधी निर्णय घेण्यात आला नव्हता. जवळ जवळ 1233 राष्ट्रीय सुदृढता दलाचे कर्मचारी आहेत. ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधीचा प्रश्न आहे. दोन वेतन आयोगामधील फरकातील वेतनाच्या संदर्भात निर्णय प्रलंबित असल्यामुळे निवृत्त वेतनातील फरक देणे थकित होते. सन 1986 साली 383 पदे होती. या संदर्भातील त्रुटी होती ती पूर्ण केलेली नाही. तथापि, येत्या दोन महिन्यामध्ये ही सर्व प्रकरणे निकालात काढण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदर योजना दिनांक 31.10.1976 पर्यंत केंद्र शासनाच्या अखत्यारित होती. दिनांक 1 नोव्हेंबर 1976 पासून केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित झाली. सदर योजना राज्य शासनाकडे हस्तांतरित होत असताना केंद्र शासनाशी राज्य शासनाने करार केला होता. या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनसुार वेतनश्रेणी देण्याबाबत केंद्र शासनाने आदेश दिला होता. यासंबंधी केंद्राचा स्पष्ट आदेश होता आणि त्याप्रमाणे करार देखील झाला होता. तेव्हा केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे वेतनश्रेणी मिळणे आवश्यक असताना देखील महाराष्ट्र शासनाकडे सदर योजना हस्तांतरित झाल्यानंतर राष्ट्रीय सुदृढता दलाच्या कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी बंद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.ओटवणेकर....... 12:25

ता.प्र.क्र.10345....

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, हे वेतन बंद झाल्यामुळे कर्नाटक राज्यातील कर्मचारी कोर्टात गेले. त्यांना कोर्टात न्याय मिळाला. तेव्हा केंद्र सरकारच्या ह्युमन रिर्सोसेस डेव्हलपमेंट ॲन्ड वेल्फेअरने न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सर्व राज्यांना पुनर्वेतन निश्चिती करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे सर्व राज्य हे आदेश पाळत आहेत परंतु महाराष्ट्र राज्य हे आदेश पाळत नाही. त्यामुळे जवळपास 1200 कर्मचाऱ्यांना या वेतनश्रेणीसाठी रखडत रहावे लागले आहे. त्यांची वेतनश्रेणी निश्चित करुन देखील त्यांना ती देण्यात आलेली नाही. या कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला आहे. त्यातील अनेक कर्मचारी निवृत्त झालेले आहेत तर काही कर्मचाऱ्यांचा मृत्यु झालेला आहे. त्यांच्या कुटुंबाला मदत मिळालेली नाही. आपण येथे सांगता वेतन निश्चिती केली आहे. पण आपण ती देत नाही. 1986 पासून हा प्रश्न प्रलंबित आहे. जवळपास 20 वर्षे झाली अजून हा प्रश्न रेंगाळत आहे. आम्ही हा प्रश्न उपस्थित केला नसता तर आपण दोन महिन्यांचा कालावधी सुध्दा घेतला नसता. तेव्हा या कर्मचाऱ्यांना एक महिन्याच्या आत सुधारित वेतनश्रेणी मिळणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : वेतन निश्चिती करताना शैक्षणिक अटींच्या काही तांत्रिक त्रुट्या राहिल्या होत्या. म्हणून थोडा वेळ झालेला आहे. 274 प्रकरणे दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येतील. वेतननिश्चिती पूर्ण करण्यात आलेली आहे. फक्त ते प्रमाणित व्हायचे आहे. हे काम दोन महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या संदर्भात एक गोष्ट स्पष्ट सांगतो की, ही केंद्र सरकारची योजना आहे. हे कर्मचारी राज्यसरकारकडे ट्रान्सफर करताना काही ॲग्रीमेंट झाली त्यावेळी केंद्र सरकारने सांगितले होते की, सारा भार आम्ही सहन करणार आहोत. ही डाईंग केडर आहे. या लोकांना आपल्याकडे एका विशिष्ट करारनाम्यानुसार हँडओव्हर केले. आपण उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, 4 ऑगस्ट 1988 रोजी केंद्र सरकारने आदेश दिले आणि त्याची अंमलबजावणी आपण केली. एम.पी.एस.सी. सिनियर इन्स्पेक्टर केडर II ला कोणता स्केल देत आहात ? यासंबंधी आपण अनुकूल उत्तर देत आहात. केंद्र सरकारने 1988 मध्ये परिपत्रक काढून अमूक अमूक स्केल त्यांना द्या असे सांगितलेले आहे. त्याची अंमलबजावणी करुन त्यांचे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10345....

प्रा.बी.टी.देशमुख.....

वेतन किंवा निवृत्ती वेतन निश्चित केले पाहिजे. आपल्यावर वित्तीय भार काही नाही. ही कार्यवाही आपण दोन महिन्यांत पूर्ण कराल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, छोट्या छोट्या तांत्रिक चुका होत्या. मराठी व हिंदी परिषदेचा थोडा भाग होता. वेतन निश्चितीमध्ये काही तांत्रिक त्रुट्या होत्या. काही ठिकाणी वेतनवाढीचा दिनांक चुकीचा होता. या संदर्भात दोन महिन्यांत कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, दिनांक 1.1.1986 पासून चौथा वेतन आयोग लागू झ ाला. त्यावेळी शैक्षणिक पात्रतेनुसार रुपये 1400-2600, 1600-2900 देय असलेली वेतनश्रेणी न देता क्रीडा सहाय्यक, क्रीडा संचालक, पुणे यांनी 1200-2040 व 1400-2600 ही वेतनश्रेणी दिली. तुमच्या म्हणण्याप्रमाणे ही त्रुटी आहे. आता सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेले आहेत. पिटीशन क्रमांक 12335/85/30.12.85 या पिटीशनवर केंद्र सरकार आणि इतर राज्य सुप्रीम कोर्टात हरले. त्यानंतर सर्व राज्यांनी त्या निर्णयाची अंमलबजावणी केलेली आहे. सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय तुम्हाला बंधनकारक आहे. बडकस आणि भोळे आयोगाने सुचविलेली वेतनश्रेणी आणि सहाय्यक क्रीडा संचालकांनी जी चूक केली ती दुरुस्त करुन नवीन वेतनश्रेणी लागू करुन दोन महिन्यांत ही कार्यवाही पूर्ण करणार आहात असा अर्थ मी काढलेला आहे तो बरोबर आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या डारेक्शनप्रमाणे वेतनश्रेणी मान्य केलेल्या आहेत फक्त काही तांत्रिक त्रुट्या राहिलेल्या आहेत. हे सर्व दोन महिन्यांत करण्यात येईल.

---------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील कायम विनाअनुदानित संस्थांना अनुदान देण्याबाबत**

**(३) * ९२७७ श्री. रामनाथ मोते , डॉ. अशोक मोडक , श्रीमती संजीवनी रायकर :** सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील मराठी माध्यमाच्या कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या शाळांना अनुदान देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १८ ऑक्टोबर २००५ रोजी दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) सन २००४-२००५ अखेर मान्यता दिलेल्या आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील कायम विनाअनुदानित मराठी माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या किती आहे,

(३) या संस्थांना अनुदान देण्याबाबतच्या प्रस्तावासंबंधी निर्णय झाला आहे काय,

(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, सदर संस्थांना अनुदान देण्याबाबत किती कालावधीत शासन निर्णय घेणार आहे काय ?

**प्रा. वसंत पुरके** : (१) दिनांक १८ ऑक्टोंबर, २००५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या जनजाती सल्लागार समितीच्या ४३ व्या बैठकीत आदिवासी भागातील कायम विनाअनुदानित प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांना पाच वर्षानंतर अनुदान देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणावा असा निर्णय घेण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५)

वरील निर्णयाच्या अनुषंगाने माहिती संकलनाची कार्यवाही सुरु असून परिपूर्ण माहितीसह धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सध्या महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्र एका दृष्टचक्रामध्ये सापडलेले आहे. अनुदानित शाळा बंद करुन, शासनाने प्रथम विनाअनुदानित आणि त्यानंतर कायम विनाअनुदानित धोरण मान्य केले आहे. औद्योगिक संस्था किंवा अन्य संस्थांच्या बाबतीत मग त्या बी.एड., डी.एड., इंजिनिअरिंग किंवा मेडिकल कॉलेजेस असोत त्या विनाअनुदान किंवा कायम विनाअनुदानित केल्यातर ते समजू शकतो. परंतु ज्या ठिकाणी खऱ्या अर्थाने शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे त्या ठिकाणी कायम विनाअनुदानित धोरण मान्य करुन त्या धोरणास शासनाने मान्यता दिली आहे. शहरी भागामध्ये समजू शकतो की, त्या भागात पालकांच्या सहकार्याने, त्या चालू शकतील, परंतु त्या पालकांच्या पूर्णत: 100 टक्के सहकार्याने नव्हेत. ग्रामीण, डोंगराळ, आदिवासी भागांतील पालकांना खाण्यास मिळत नाही, परिणामी ते आपल्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

ता.प्र.क्र.9277....

पाल्यांना शिक्षण देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून आर्थिक मदतीची अपेक्षा करणे शक्य नाही. त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा केली तर ती मदत सुध्दा मिळणार नाही. आदिवासी भागातील शाळा कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर चालू शकत नाहीत. महाराष्ट्र शासनाने आदिवासी उपयोजनेंतर्गत विनाअनुदानित शाळा दिलेल्या आहेत. मध्यंतरी मा.मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, आम्ही यासंदर्भात विचार करु. मी या निमित्ताने मा.मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्रातील कायमस्वरुपी विनाअनुदानित शाळांचे धोरण बदलून, त्यांना विनाअनुदानित करुन अनुदान देण्यासंदर्भात किती दिवसात निर्णय घेणार आहात ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी या प्रश्नाच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, ट्रायबल ॲडव्हायझरी कमिटीच्या माध्यमातून आदिवासी आमदार महोदयांनी आदिवासी क्षेत्रामध्ये संस्थाचालक कायमस्वरुपी विनाअनुदानित शाळा चालवू शकत नाही असे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणलेले आहे. त्यांनी आदिवासी क्षेत्रात अनुदान तत्व लागू करावे अशी मागणी केली आणि तसा धोरणात्मक निर्णय झाला आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये जेवढया शाळा आहेत त्यांना अनुदानावर आणण्यासंदर्भात मान्य करण्यात आले आहे. परंतु त्या नेमक्या कोणत्या शाळा आहेत हा मुख्य प्रश्न आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांना अनुदान देताना, आदिवासी मुले किती असावीत, ती 50 टक्के असावीत की असू नये यासंदर्भात जे नियम घालून दिले आहेत ते तपासून, निश्चितपणाने कार्यवाही केली जाईल.

प्रा.फोजीया खान : सभापति महोदय, संविधान के 86 वे संशोधन द्वारा इस देश के 6 से 14 साल के बच्चों को शिक्षा का मूलभूत अधिकार प्रदान किया गया है. इसके साथ ही साथ संविधान के मार्गदर्शक सिध्दांत के अनुसार अब 6 से 14 साल के बच्चों को मुफ्त एवं अनिवार्य शिक्षा प्रदान की जाएगी. इस उद्देश्य को पूरा करने के लिए सरकार ने कई योजनाएं बनाई हैं, जैसे सर्व शिक्षा अभियान, प्रौढ़ शिक्षा अभियान इत्यादि. लेकिन इस के बावजूद आज भी कई बच्चें शिक्षा से वंचित है. गडचिरोली जिले में 60 प्रतिशत बच्चे निरक्षर है. इसलिए मैं यह पूछना चाहती हूं कि क्या कायम बिना अनुदान का तत्व असंवैधानिक नहीं है ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.... 12:30

ता.प्र.क्र.9277....

प्रा.फौजीया खान .......

मेरा दूसरा सवाल यह है कि माननीय मुख्यमंत्री जी ने पांच साल पहले आदिवासी विभाग में अनुदान के सिलसिले में प्रस्ताव मंगवाए थे. मैं समझती हूं कि इन सब पॉलिसी में एक कन्फ्यूजन है. राष्ट्रपति जी ने जैसे विजन 2020 कार्यक्रम देश के सामने रखा है इसी प्रकार का एक कालबध्द कार्यक्रम राज्य सरकार द्वारा बनाया जाना चाहिए. जिसके तहत सारे बच्चों को मुफ्त एवं अनिवार्य शिक्षा प्राप्त हो सके. इस कार्यक्रम के लिए 6 प्रतिशत बजट का प्रावधान होना चाहिए. क्या राज्य सरकार इस प्रकार का विजन डाक्यूमेंट बनाएगी ?

यानंतर श्री गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..9277....

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदय, कायम विना अनुदान तत्वावर कोणी शाळा घ्यावी अशी कोणावरही सक्ती केलेली नाही. परंतु अनेक लोकांनी आम्हाला तसे ॲफिडेव्हीट करुन दिलेले आहे.तरीसुध्दा आदिवासी उप योजना क्षेत्रात असलेल्या शाळां कायम विना अनुदानित तत्वावर असू नयेत म्हणून परावा ट्रायबल ॲडव्हायझरी कमिटीमध्ये सर्व आदिवासी आमदारांनी विनंती केली होती. या शाळांना अनुदान देण्याचे तत्व शासनाने मान्य केलेले आहे.तेव्हा आदिवासी उपयोजना शाळातील या सर्व शाळांना अनुदान देण्याचे धोरण स्वीकारल्या नंतर सर्व शाळांची छाननी करुन त्यां सर्व शाळांना अनुदान देण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारलेली आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या प्रश्नाचे उत्तर पाहिल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, हे सरकार न्यायालयाचे आदेश मानावयास तयार नाही. दुस-या प्रश्नाचे उत्तर पाहिल्यानंतर असे ध्यान्यात येते की केन्द्र सरकारने दिलेले आदेश धाब्यावर बसवत आहे..

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी जर उत्तर काळजीपूर्वक ऐकले तर त्यांच्या असे लक्षात येईल की, केन्द्र सरकारच्या निदेशाप्रमाणे वेतनश्रेणी निश्चित केलेल्या आहेत.

डॉ.अशोक मोडक : तीनही प्रश्नातून सरकारी कार्यशैली लक्षात येत आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांनी तिस-या प्रश्नाच्या बाबतीत उपप्रश्न विचारावा.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मी तिस-या प्रश्नाच्या बाबतीत उपप्रश्न विचारात आहे. विनाअनुदान तत्वावरील शाळा किती आहेत आणि अनुदान तत्वावरील शाळा किती आहेत याचा हिशोब शासनाकडे नाही. त्याची संख्या शासनाकडे नाही.मी जो शेवटचा प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे सुध्दा गोलमाल उत्तर देण्यात आलेले आहे.किती काळात विना अनुदान तत्वावरील शाळांना आपण अनुदान देणार आहात ? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे केव्हा मिळणार आहेत ? त्या प्रश्नांची उत्तरे काय मिळणार आहेत हा प्रश्न तर वेगळाच आहे. परंतु विना अनुदान तत्वावरील शाळा किती आहेत आणि त्यांना न्याय केव्हा देण्यात येणार आहे या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी स्पेसिफिक डेड लाईन सांगावी.

प्रा वसंत पुरके : संपूर्ण राज्यात अनुदानित शाळा किती आहेत विना अनुदानित शाळा किती आहेत आणि कायम विना अनुदानित शाळांची संख्या किती आहे याची आकडेवारी सन्माननीय





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9277 प्रा.वसंत पुरके ...

सदस्यांना निश्चित देऊ परंतु आदिवासी उप योजना क्षेत्रात कायम विना अनुदानित शाळांची संख्या किती आहे याची मी आपल्याला माहिती देतो. 2000-2001 810, 2001-2002 मध्ये 77, 2002-2003 मध्ये 74,2003-2004 मध्ये 777,2004-2005 मध्ये 680,2005-2006 मध्ये 156 अशा मिळून 2 हजार 567 शाळा आदिवासी उप योजना क्षेत्रात कायम विनाअनुदानित आहेत त्यापैकी 601 शाळा काही भारतीय भाषेतील आहेत.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रात ज्या शाळा चालविल्या जातात त्या शाळांच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की," काही शाळा चालकांनी ॲफेडेव्हीट केलेले आहे".परतु नाईलाजाने त्यांना ते करावे लागले आहे.आदिवासी उपयोजना क्षेत्रातील त्या शाळांना पाच वर्षानंतर 20 टक्के, 40 टक्के अशा प्रकारे अनुदान न देता त्या शाळांना 100 टक्के अनुदान एकदम दिले जाणार आहे काय ?.आदिवासी उपयोजना क्षेत्रात ज्या प्रमाणे शाळा चालतात त्याप्रमाणे दूर्गम भागामध्ये सुध्दा शाळा चालतात. उदाहरणार्थ पोलादपूर जवळ गोळेगणोर नावाचे एक गाव असून त्या शाळांमध्ये मुलांना होडीमधून जावे लागते. त्या पंचक्रोशीमध्ये दुसरी शाळा नाही. तेव्हा अशा प्रकारे दुर्गम भागातील शाळांनासुध्दा आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रातील शाळांप्रमाणे अनुदान दिले जाणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, आदिवासी उप योजना क्षेत्रातील सर्व शाळां पाचव्या वर्षी 100 टक्के अनुदानावर याव्यात हे तत्व आपण स्वीकारलेले आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही ते उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

( उत्तर दिले नाही )

श्री.वसंतराव खोटरे : पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटलेले आहे की, " दिनांक 18 ऑक्टोबर 2005 रोजी माननीय मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या जनजाती सल्लागार समितीच्या 43 व्या बैठकीत आदिवासी भागातील कायम विनाअनुदानित प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांना पाच वर्षानंतर अनुदान देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी

3...



VTG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.बोर्डे 12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणावा असा निर्णय घेण्यात आला आहे. " या बाबतीत माझे असे मत आहे की,महाराष्ट्रातील अनेक खेडी अशी आहेत की, तेथील शेतकरी, शेतमजूर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे त्याची परिस्थिती कशी असते याची जाण आपणाला आहे. अनेक दलित वस्त्या आहेत आणि त्या दलित वस्त्यांमध्ये ज्या वस्ती शाळा आहेत त्या शाळां विना अनुदान तत्वावर चालतात. तेव्हा या कायम विनाअनुदान तत्वावरील शाळांनासुध्दा 100 टक्के अनुदान देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी स्वतंत्र प्रश्न विचारावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्य सातत्याने हा प्रश्न विचारत आहेत की, या बाबतीची पूर्तता करण्यासाठी माननीय मंत्रिमहोदयांनी निश्चित कालावधी सांगावा. शासनाकडे या शाळाची संख्या किती आहे याची माहिती शासनाकडे आलेली आहे तेव्हा ही उपायोजना करण्यासाठी निश्चित किती कालावधी लागणार आहे यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे.

प्रा.वसंत पुरके : टी.एस.पी आणि ओ.टी.एस.पी. मधील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची संख्या मी सांगितली आहे. परंतु त्यांना अनुदान देण्याकरता वेळ लागणार आहे तेव्हा लवकरात लवकर छाननी करुन त्याची माहिती सन्माननीय सदस्यांना देऊ.

डॉ.दीपक सावंत : मंत्रिमहोदयांनी माझ्या प्रश्नाचे स्पेसिफिक उत्तर द्यावे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9277 ...

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व शाळांना अनुदान द्यायचे झाले तरी त्यासाठी त्या शाळांत 50 टक्के आदिवासी मुले असली पाहिजे हा नियम आहे आणि ते पाहूनच आपल्याला ही कारवाई करावी लागणार आहे आणि म्हणून त्यासाठी वेळ लागणार आहे.

काही सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, मंत्री महोदय नेमके उत्तर देत नाहीत ...

**सभापती** : मंत्र्यांनी कोणते उत्तर दिले पाहिजे हे मी त्यांना सांगणे बरोबर होणार नाही.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, आपण या ठिकाणी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विनाअनुदानित प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांना अनुदान देण्याचे मान्य केले आहे परंतु सध्या एस.टी. कॅटेगरीतील डी.एड. शिक्षक मिळत नाहीत, त्यांची कमतरता असते आणि त्यामुळे त्यांचा बॅकलॉग देखील भरून काढता येऊ शकत नाही. त्यामुळे जी काही डी.एड. कॉलेजेस आहेत त्यांनाही आपण अनुदान देणार का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विषयी स्वतंत्र प्रश्न विचारल्यास त्यावर उत्तर देता येईल.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, आदिवासी भागातील शाळां अनुदान तत्त्वावर आणण्याबाबत सर्व सभागृह सहमत आहे. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती रायकर यांनी दुर्गम भागातील शाळांबाबत प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर अजून आलेले नाही, पण त्याचबरोबर जे कायम दुष्काळी तालुके आहेत त्यांच्या बाबतीतदेखील सरकार असा विचार करणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रश्न आपल्यासमोर चर्चेला आहे तो मर्यादित श्आहे आणि त्यासंबंधात मी उत्तर दिलेले आहे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, शासनाने ज्यावेळेस या शाळा जाहीर केल्या तेव्हा या शाळा कायम विनाअनुदान तत्त्वावरच देण्याचे शासनाचे धोरण होते. आता आदिवासी क्षेत्रातील अशा शाळांना अनुदान मिळाले पाहिजे असे सर्वांचेच मत आहे. परंतु त्या काळामध्ये त्या शाळा विना अनुदानित म्हणूनच दिलेल्या आहेत. एका एका वेळेस 20-20 शाळांना तेव्हा मंजुरी दिलेली आहे. तेव्हा आता या शाळा अनुदान तत्त्वावर आणताना त्यातील गुणात्मक दर्जा देखील आपण

..... आय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रघुवंशी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 9277 ...

पाहिला पाहिजे. जेथे एक खोली देखील नाही तेथे देखील शाळा मंजूर झालेली आहे. तेव्हा आदिवासी क्षेत्रामध्ये अनुदानावर शाळा आणताना त्यांच्या गुणात्मक दर्जाचा विचार करून त्याचा एक मास्टर प्लॅन तयार करून नंतरच त्या अनुदानावर आणण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

प्रा. वसंत पुरके : होय. यासाठी महाराष्ट्रात सेट सुद्धा लावण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रघुवंशी यांनी जो प्रश्न विचारला तोच मी देखील विचारणार होतो. तो प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. अनेक आश्रमशाळा अशा आहेत की, तेथील भ्रष्टाचारामुळे त्या बंद कराव्या लागल्या आहेत वा त्यांचेवर कारवाई करावी लागली आहे. तेव्हा तेथील आदिवासी मुलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला पाहिजे असे आपण म्हणतो पण प्रत्यक्षात तसे होत नाही. म्हणूनच एका बाजूला आपण कारवाई करतो. दुर्गम भागामध्ये, आदिवासी भागामध्ये शाळा काढायची मग अनुदान मिळाले नाही तरी चालेल, नंतर त्यासाठी प्रयत्न करता येतील अशी धारणा ठेवूनही अनेकांनी शाळा काढल्या आहेत. आणि आता त्या सगळ्यांनाच अनुदान मिळणार आहे. परंतु प्रत्यक्षात तेथे नियमाप्रमाणे पुरेसे शिक्षक आहेत काय ? तेथे इतर सोयी-सुविधा आहेत काय आणि त्यातून आदिवासी मुलांना फायदा मिळतो आहे काय हे पाहणेही आवश्यक आहे. तर अनुदान देताना या गोष्टी पाहणे देखील तितकेच आवश्यक आहे. तसे आपण करणार आहात का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, अशा प्रकारे केवळ अनुदानाच्या प्रलोभनासाठी शाळा काढल्याअसतील तर निश्चितपणे त्यांची तपासणी करून, त्यांचा गुणात्मक दर्जा पाहिल्यानंतर त्याबाबत कारवाई करू.

****

...... आय 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खोट्या व बनावट शिधा पत्रिकांना आळा बसविण्यासाठी फोटोसह संगणीकृत शिधापत्रिका देण्याचा निर्णय**

*** 10452 श्री. प्रतापराव सोनवणे, श्री. नितीन गडकरी, श्री.मधुकर चव्हाण, श्री. प्रकाश शेंडगे , श्री. शांताराम करमळकर , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक 6036 ला दिनांक 12 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) खोट्या व बनावट शिधापत्रिकांना आळा घालण्यासाठी शिधापत्रिकांचे संगणकीकरण करण्यासाठी नियुक्त केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(2) त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच खोट्या व बनावट शिधापत्रिकांचे वाढते धक्कादायक प्रमाण लक्षात घेता सदर प्रकरणी लवकरात लवकर उपाययोजना व्हावी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. बाबा सिद्दीकी, श्री. सुनिल तटकरे यांच्याकरिता** : (1) प्रकल्प अंमलबजावणी समितीने शिधापत्रिकांच्या संगणकीकरणासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करुन प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रत्यक्ष कामकाज सुरु झाल्यावर कामाचे संनियंत्रणसुध्दा त्यांचेकडूनच करुन घेण्याचे प्रस्तावित केले होते.
(2) व (3) शिधापत्रिका संगणकीकरणासाठी दिनांक 5.8.2005 च्या शासन निर्णयान्वये कार्यगट स्थापन करण्यात आला असून याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 29.10.2001 व दिनांक 20.8.2003 च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात येत आहे. तसेच, शिधापत्रिका संगणकीकृत करण्याचा पथदर्शी प्रकल्प सोलापूर शहरात राबविण्यात येत आहे व सदर पथदर्शी प्रकल्पाचा आढावा घेतल्यानंतर सदर प्रकल्प राज्यातील उर्वरीत भागात राबविण्यात येईल.

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, राज्यात बोगस रेशनकार्डांचे पेव फुटलेले आहे. यातील अत्यंत चिंताजनक बाब म्हणजे या बोगस शिधापत्रिकांमुळे राज्यात परप्रांतीयांची, विशेष करून बांगला देशीयांची संख्या वाढते आहे. दुसऱ्या बाजूला स्वस्त धान्य दुकानांतील धान्य साठा शिधापत्रिका धारकाना वाटप न करता परस्पर बाहेर विकला जातो आणि या सर्व बाबतीत शासनाने अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे आणि प्रशासनाने रेशन दुकानदार आणि पुरवठादार यांच्याशी हातमिळवणी केल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. याचा परिणाम म्हणून विशेषत: सोलापूर शहरामध्ये प्रत्यक्ष लोकसंख्येपेक्षा अधिक रेशनकार्डे वाटली गेली आहेत. म्हणूनच या बाबतीत फोटोसह

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सोनवणे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.10452 ..

संगणकीकृत शिधापत्रिका यदेण्याचा उपक्रम सुचविण्यात आला होता आणि त्याबाबत 29 ऑक्टोबर 2001 चा शासन निर्णय आहे. परंतु आता 2006 साल उजाडत आहे पण अजून यासाठी प्रकल्प सल्लागारांची नेमणूक शासनाने केलेली नाही. ...

( यानंतर श्री.सरफरे .... जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 10452...

श्री. प्रतापराव सोनवणे...

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, शासनाची या बोगस रेशनकार्ड समस्येला पायबंद घालण्याची खरोखर इच्छाशक्ती आहे की नाही? असेल तर सोलापूर जिल्हयात फोटोसह संगणीकृत शिधापत्रिका देण्याचा प्रकल्प सुरु केला आहे तो संपूर्ण महाराष्ट्रभर तातडीने राबविला जाईल काय?

श्री. बाबा सिद्दीकी :सोलापुर शहर के लिए 6 दिसम्बर को टेंडर नोटिस दी जा चुकी है. सोलापुर का यह प्रोजेक्ट एक तरह का पायलट प्रोजेक्ट होगा. इस प्रोजेक्ट का आढ़ावा लेने के बाद यह प्रोजेक्ट राज्य के शेष क्षेत्र में लागू किया जाएगा. प्रकल्प व्यवस्थापन सलाहकार की नियुक्ती करने के लिए 10 कंपनियों की पहचान हो गई है. इसके लिए ओपन टेंडर की पध्दति अपनायी जाएगी. सोलापुर शहर में इस प्रोजेक्ट को अमल में लाने के बाद जो अनुभव मिलेगा, उसके आधार पर अन्य क्षेत्रों का भी विचार किया जाएगा. दूसरी बात यह है कि, बोगस राशन कार्ड का पता लगाने का काम चालू है. महानगरपालिका क्षेत्र में 31 दिसम्बर तक फॉर्म भरने कर देने का काम चालू रहेगा और नगरपालिका क्षेत्र में यह काम 1 फरवरी तक चालू रहेगा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. रेशनकार्डवर मिळणाऱ्या केरोसिनचा मोठया प्रमाणात गैरवापर, दुरुपयोग करण्यात येतो. विशेषत: नंदूरबार व धुळे जिल्हयामध्ये केरोसिनचा गैरवापर करणाऱ्या रॅकेटचा शोध लागला आहे. त्या गैरप्रकाराला आळा बसावा यासाठी दोन-चार शिष्टमंडळे येऊन मंत्रिमहोदयांना भेटली आहेत. परंतु शासनाचे हे अन्न व नागरीपुरवठा खाते विकाऊ झाले आहे. नंदूरबारचे जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. वसावे यांनी जिल्हयातील गरीब लोकांना दिल्या जाणाऱ्या धान्याचे पिठ करुन ते गुजरातला पाठविले आहे. तेव्हा या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहात की नाही?

श्री. बाबा सिद्दीकी : माननीय सदस्यांना याकरिता वेगळा प्रश्न विचारावा लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2

ता.प्र.क्र. 10452...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी याठिकाणी ज्या व्यथा व भावना व्यक्त केल्या आहेत त्याच्याशी मी सहमत आहे. महाराष्ट्राच्या जिल्हया जिल्हयामध्ये या प्रकारचे घोटाळे होऊन ते मंत्रालयापर्यंत येऊन पोहोचले आहेत. मंत्रिमहोदयांनी सोलापूर जिल्हयामध्ये शिधापत्रिका वाटप करण्याबाबत आधुनिक तंत्रज्ञान वापरले आहे. खरे तर त्याच्या पलिकडे जाऊन सांगू इच्छितो की,आपण प्रत्येक रेशनिंगच्या दुकानदाराकडे एक लहानसा पी.सी. दिला व तो इंटरनेटला जोडला तर तुमच्या एकाच कार्यालयामधील पी.सी. मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील रेशनकार्ड वाटप नोंदणी करता येईल. त्यावर मंत्रालयाचे नियंत्रण राहील. असे केले तर त्याला फार खर्च येणार नाही. त्यामुळे रेशनकार्ड घेण्यासाठी जी कार्यपध्दती अवलंबावी लागते ती सुरळीत होईल व गैरप्रकार थांबेल.परंतु कधी कधी आपली व्यवस्था देखील संशय निर्माण करणारी ठरते. तुमची कोअर कमिटी किंवा प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट या तमाशाची गरज काय? बोगस रेशन कार्डच्या आधारावर आजही पासपोर्ट घेऊन लोक परदेशात गेले आहेत. त्यामधून राष्ट्रीय धोका निर्माण झाला आहे. तेव्हा हे आधुनिकीकरण प्रायोगिक तत्वावर न करता ताबडतोब एक वर्षाच्या आत संपूर्णपणे संगणकीकृत करण्यासंबंधी निर्णय घेणे आवश्यक आहे, तसे करणार काय? त्याची निश्चित कालमर्यादा काय रहाणार आहे?

श्री. बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, मैं यह बताना चाहता हूं कि आंध्र प्रदेश, तामिलनाडु एवं केरल में संगणीकरण का प्रयास किया गया था लेकिन यह प्रयास वहां फेल हो चुका है. इसलिए हम प्रिकॉशन ले रहे हैं. इसकी गंभीरता को समझते हुए ही हमने प्रकल्प व्यवस्थापन सलाहकार की नियुक्ति करने का निर्णय लिया है. राज्य शासन सोलापुर शहर का अनुभव देखने के बाद इस काम को एक सही दिशा देना चाहती है.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:50

ता.प्र.क्र.10452 . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भातील सिरिअसनेस काय आहे हे मंत्री महोदयांच्या लक्षात आलेले दिसत नाही. आपण कशासाठी हे सर्व सांगत आहात ? पायलट प्रोजेक्टची गरज काय आहे ? याठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे, त्यावरुनच तुमची कार्यक्षमता दिसून येत आहे. येथे 2 व 3 च्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 29-10-2001 व दिनांक 20-8-2003 च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात येत आहे." माझे प्रश्न असे आहेत की, अजूनही पायलट प्रोजेक्ट करण्यात आलेला नाही का ? दुसरा प्रश्न असा आहे की, यामधून आपली अकार्यक्षमता दिसत नाही का ? माननीय मंत्री महोदयांनी माझ्या एकेका प्रश्नाची उत्तरे द्यावीत. गोलमाल-गोलमाल करु नये.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्यांनी एकेक प्रश्न विचारावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना कशासाठी संरक्षण पाहिजे ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एकेक प्रश्न विचारावा. मी सर्व प्रश्नांची उत्तरे देतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत, तेवढे पूरे झाले.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. तसेच यांनाही मंत्रीमंडळामध्ये एकच वर्षे ठेवावे, तीन वर्षे ठेऊ नका. त्यांना मात्र मंत्रीमंडळात तीन वर्षे रहावयास पाहिजे. मूळ मुद्दा असा आहे की, सोलापूरला पायल प्रोजेक्ट कशासाठी पाहिजे ? तुमच्या आमदार,खासदारांनी मानखूर्दूला किंवा इतर ठिकाणी बोगस रेकॉर्ड कार्ड दिलेले आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मूळ प्रश्न असा आहे की, खोटया आणि बनावट शिधापत्रिकेवर नियंत्रण आणण्यासाठी आपण त्वरित काय कारवाई करणार आहात ?

. . . .के-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10452 . . . .

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैं बोगस राशन कार्ड के बारे में पहले ही जवाब दे चुका हूं. इस संबंध में हमारा एक अभियान चालू है. महानगरपालिका और कलेक्टर क्षेत्र में यह काम 31 दिसम्बर तक चालू रहेगा और दूसरे क्षेत्र में 1 फरवरी तक चालू रहेगा. राशन कार्ड के लिए फॉर्म भरने का काम चालू है. इस तारीख के बाद भी यह काम जो अधिकृत राशन कार्ड धारक है, उनके लिए चालू रहेगा. इस कार्यवाही से यह पता चलता है कि शासन बोगस राशन कार्ड के मामले में कितना गंभीर है.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण एका गंभीर प्रश्नावर येथे चर्चा करीत आहोत. याठिकाणी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 29-10-2001 व दिनांक 20-8-2003 च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात येत आहे." 2001 आणि 2003 यामध्ये दोन वर्षाचा काळ गेला आहे आणि आता 2005 हे वर्ष सुरु आहे आणि पायलट प्रोजेक्टला सुरुवात होत आहे यातून शासनाची उदासिनता स्पष्टपणे दिसत आहे. सोलापूर शहरामध्ये पायलट प्रोजेक्ट घेतलेला आहे, तो किती दिवसात पूर्ण होईल ? आणि त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हे कामकाज पूर्ण करण्यासाठी साधारणपणे किती कालावधी लागेल ? याचे कारण असे की, महाराष्ट्रात 2007 च्या सुरुवातीला जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणूका होणार आहेत. जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये बोगस रेशन कार्डाचा वापर करुन मतदान होत असते आणि हे प्रकार रोखण्यासाठी याचा फायदा होणार आहे. तेव्हा हे सर्व काम किती दिवसात पूर्ण करणार आहात ? याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैं पहले भी बता चुका हूं कि सोलापुर में हमने एक पायलट प्रोजेक्ट लिया है, इसका अनुभव लेकर हम पूरे राज्य में यह कार्यक्रम लेने वाले हैं. सोलापुर के इस प्रोजेक्ट के लिए 6 तारीख को टेंडर नोटिस जारी किया गया है. इसके बाद प्रकल्प व्यवस्थापन सलाहकार की सलाह के अनुसार काम किया जाएगा. इस काम में प्रिकॉशन ले रहे है, क्योंकि बहुत से राज्य में संगणकीकरण का प्रोजेक्ट फेल हो चुका है.

...3



APR/MHM/SBT 12:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हे काम कधी पूर्ण होणार आहे ते सांगा.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्याबाबत सांगावयाचे तर गेली चार-पाच वर्षे या प्रकल्पाची छाननी करण्यासाठी विलंब झाला आहे हे आम्हाला निश्चितपणे मान्य आहे. मोठया प्रमाणावर बोगस रेशन कार्ड आहेत. सध्या यासंदर्भात शोध मोहीम सुरु केली आहे. महाराष्ट्रातील रेशन कार्डच्या संदर्भातील मोहीम डिसेंबर 2006 पूर्वी पूर्ण होईल असे मी याठिकाणी आपल्याला सर्वांना आश्वासित करतो.

**सभापतीस्थानी - मा.उपसभापती**

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10452 (पुढे चालू.....

**उपसभापती** : सन्माननीय श्री.तटकरे साहेब आज आपला वाढदिवस आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बोगस रेशन कार्डाच्या संबंधाने या सदनामध्ये यापूर्वी चर्चा झालेली आहे. आता प्रायोगिक तत्वावर नव्याने कार्ड देण्यात येणार आहेत. ही योजना यशस्वी होईल की नाही, हे गुलदस्त्यात आहे. रेशनिंग खाते सुधारावे अशी इच्छा दिसत नाही. बोगस रेशन कार्ड बंद व्हावीत, या संदर्भाने खूप वेळा येथे चर्चा झालेली आहे. त्या अनुषंगाने आपल्याकडून काही प्रयत्न झालेले नाहीत. नव्याने फॉर्म फोटो लावून भरुन घेण्यात येत आहेत, हे काम 31 डिसेंबरपर्यन्त चालणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, असे काय घडले की, नव्याने रेशन कार्ड द्यावी लागत आहेत ? कशासाठी आणि किती संख्येने आपण नवीन रेशनकार्ड देत आहात ? माझा प्रश्न असा आहे की, प्रत्येक रेशनिंग ऑफीसच्या बाहेर दलाल असतात, त्या दलालाच्या माध्यमातून 500 रुपये घेऊन तात्पुरते रेशनकार्ड म्हणून बोगस रेशनकार्ड दिली जातात. याबाबत सन्माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे, ते त्या भागामध्ये काम करतात. यामुळे बोगस मतदार करण्याचे काम सुरु केले जाते. आपण हे जाणता, त्याबाबतीत आपण जाणकार आहात. जाणकार आहात, हे मी एवढयासाठी म्हणतो की, या सगळ्या गोष्टींची आपल्याला माहिती आहे. त्या ठिकाणचे दलाल बंद करण्याच्या दृष्टीने कोणती योजना आतापर्यन्त आखलेली आहे ? भविष्यकाळामध्ये नवीन रेशनकार्ड देताना यासाठी कोणते निकष लावणार आहात ? जी बोगस कार्डे दिली गेलेली आहेत, त्यांच्याबाबतीत आता नव्याने फोटो लावून फॉर्म भरुन घेताना काही प्रश्न निर्माण होणार आहेत काय ? याचा खुलासा करावा.

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैंने पहले ही बताया है कि फॉर्म भरने की प्रक्रिया शुरु हो गई है. इस पध्दति में जो सही (अधिकृत ) राशन कार्ड धारक होगा वही फॉर्म भरेगा. जो सही आदमी नहीं होगा वह नहीं भरेगा. इसमें यह बात समझ में आ जाएगी. कुछ लोग आलसी होने की वजह से फॉर्म नहीं भरते, कुछ लोग घर छोड़कर दूसरी जगह चले जाते हैं और कुछ लोगों का देहांत हो जाने के बाद भी राशन कार्ड पर नाम रहता है, उनके परिवार वाले उनका नाम नहीं निकालते हैं. हमें इन सब बातों की जानकारी है. अगर आपके पास कोई स्पेसिफिक जानकारी हो तो आप हमें बताए, शासन उसके बारे में सख़्त कार्रवाई करेगा.दूसरी बात यह है कि शासन ऐसे किसी दलाल और भ्रष्ट अधिकारियों को नहीं बख़्शेगा.

असुधारित प्रत /प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ MHM/ D/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 12:55

ता.प्र.क्र.10452 (पुढे चालू.....

**उपसभापती** : आता सभागृहातील कामकाज दूरदर्शनवरुन प्रक्षेपित होत असल्याने सन्माननीय सदस्यांचे प्रश्नाच्या माध्यमातून बोलणे लांबत चालले आहे, कृपया सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेवावे.

श्रीमती फौजीया खान : सभापति महोदय, प्रायोगिक तत्व पर सोलापुर शहर में राशन कार्ड संगणकीकृत करने का पथदर्शी प्रकल्प चालू किया जा रहा है. मैं इस संबंध में माननीय मंत्री जी को एक सुझाव देना चाहती हूं कि, जैसा कि आपको मालूम है कि जाति प्रमाणपत्र के संबंध में कई बार दिक्कत हो जाती है, इसलिए सुविधा की दृष्टि से राशन कार्ड के फॉर्म में जाति का भी एक कॉलम रखा जाए ताकि पूरे परिवार को उसका लाभ मिल सके.

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही बाब तपासून घेण्यात येईल.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MHM/ SBT/ RJW/ 13:00

ता.प्र.क्र.10452...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी या सभागृहाला अत्यंत चांगली माहिती दिलेली आहे. त्यांनी सांगितले की, शिधापत्रिकांचे संगणकीकरण करण्याचा प्रयोग आंध्र आणि चेन्नईमध्ये फेल झालेला आहे. आंध्र आणि चेन्नईमध्ये हा प्रयोग कशामुळे फेल झाला याचा कृपया मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री. बाबा सिद्यीकी :सभापती महोदय, यासंबंधीची संपूर्ण माहिती घेऊन मी ती सभागृहाला देतो

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा अतिशय स्पेसिफिक प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदारदादांनी सुध्दा तो प्रश्न या ठिकाणी विचारलेला आहे. नवीन रेशनकार्ड देण्याची गरज काय ? असे ते म्हणाले. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, नवीन रेशनकार्ड देण्याचे निकष काय आहेत? दुसरा प्रश्न मी यापूर्वी सुध्दा याठिकाणी उपस्थित केला होता तो असा की, एकदा रेशनकार्डचा शेवटचा नंबर जाहीर करावा. त्यातनंतर कोणतेही रेशनकार्ड त्या निकषाशिवाय दिले जाणार नाही, याची खबरदारी शासन घेणार आहे काय?

श्री. बाबा सिद्यीकी : सभापती महोदय,ही बाब तपासून पाहण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारला आहे तो खरा आहे. सरपोतदार साहेबांनी सांगितल्याप्रमाणे बोगस रेशनकार्ड दिल्याच्या घटना लक्षात आलेल्या आहेत. संगणकीय रेशनकार्ड देण्यामागे या सर्व गोष्टीला पायबंद घालण्याचा महत्वाचा उद्देश आहे. याची अंमलबजावणी करण्यास कदाचित थोडासा उशीर होईल. पण एकदा ती शेवटची तारीख ठरली की, किती बोगस रेशनकार्ड होतील याची स्पष्टपणे माहिती उपलब्ध होईल. ज्यांनी ज्यांनी रेशनकार्डची मागणी केलेली आहे त्यांची सगळी माहिती संगणकावर उपलब्ध होईल. शेवटच्या तारखेनंतर नवीन रेशनकार्ड कुटुंबातील नाव बदलण्यासाठी आले असतील त्याच्या खेरीज नवीन रेशनकार्डला परवानगी देत असतांना मोठया प्रमाणावर खबरदारी घेतली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10452....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इतर राज्यामध्ये संगणकीकरणाचा प्रयोग अयशस्वी झाला असे असतांना सोलापूर जिल्हयात आपण हा प्रयोग प्रायोगिक तत्वावर करीत आहोत. हा प्रयोग सोलापूर जिल्हयात अयशस्वी झाला तर बोगस रेशनकार्ड रोकण्यासाठी इतर काही उपाययोजना करण्यासंबंधी काही विचार केलेला आहे काय?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, बोगस रेशनकार्ड शोधमोहीम सुरु आहे. सोलापूरला हा प्रयोग केल्यानंतर असे लक्षात आलेले आहे की, 30 टक्क्याच्या आसपास फॉर्म पुन्हा भरुन येऊ शकलेले नाहीत, तेच याबाबतीतील पहिले यश आहे. राज्यमंत्र्यांनी माहिती दिल्या प्रमाणे अन्य राज्यात हा प्रयोग अयशस्वी झाला आहे. त्यामुळे त्यासंदर्भातील सगळी दखल यामध्ये निश्चितपणाने घेत आहोत. मला विश्वास वाटतो की, सोलापूरचा संगणकीकरणाचा प्रयोग निश्चितपणाने यशस्वी होईल. सभापती महोदय, मी माननीय नितीन गडकरी आणि या सभागृहाला सांगू इचिछतो की, दि.31 डिसेंबर, 2006 पूर्वी राज्यभरातील रेशनकार्डचे संगणकीकरण निश्चितपणाने पूर्ण होईल.

**उपसभापती** :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

**पृ.शी./मु.शी.**:प्रश्नोत्तराच्या तासात अधिकाधिक प्रश्न घेण्याबाबत.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासात अधिकाधिक प्रश्न घेण्यात यावेत अशी माझी सूचना आहे.

**उपसभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये एका प्रश्नासाठी पाच ते दहा मिनिटे इतका वेळ द्यावा जेणेकरुन जास्तीत जास्त प्रश्न चर्चेला येतील असा मुद्दा तुम्ही उपस्थित करु शकता. यानंतर पुढील कामकाज घेण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

डॉ. सुनील देशमुख ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो. कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक 8 डिसेंबर, 2005 रोजी भरलेल्या बैठकीत सोमवार, दिनांक 12 डिसेंबर ते गुरुवार, दिनांक 15 डिसेंबर, 2005 पर्यंतचा विधान परिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

**डिसेंबर**,**2005**

| | |
|---|---|
| सोमवार, दिनांक 12 | 1) शासकीय विधेयके. |
| | 2) अल्पकालीन चर्चा |
| मंगळवार, दिनांक 13 | 1) सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस) |
| | 2) शासकीय विधेयके |
| | 3) अल्पकालीन चर्चा. |
| बुधवार,दिनांक 14 | 1) सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) |
| | 2) शासकीय विधेयके. |
| | 3) अल्पकालीन चर्चा. |
| गुरुवार, दिनांक 15 | 1) सन 2005-2006 चे पुरवणी विनियोजन विधेयक. |
| | 2) सन 1997-98 च्या अतिरिक्त मागण्यांवर चर्चा. |
| | 3) शासकीय विधेयके. |
| | 4) महाराष्ट्र ( अधिक खर्च ) विनियोजन विधेयक. |
| | 5) अल्पकालीन चर्चा. |

**उपसभापती** :कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

डॉ. सुनील देशमुख : अधक्ष महाराज, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (पणन मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2004-05 चा 47 वा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2004-05 चा 47 वा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------------

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (पणन मंत्री ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा कृषी विद्यापीठाचे सन 2000-01 या वर्षाचे वार्षिक लेख आणि लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : मराठवाडा कृषी विद्यापीठाचे सन 2000-01 या वर्षाचे वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----------------

**पृ.शी./मु.शी.**: अहवाल सभागृहासमोर ठेवणे.

श्रीमती सुधा जोशी (सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करते.

महोदय, हा अहवाल सादर करीत असतांना काही महत्वाच्या बाबींच्या संदर्भात मी प्रकर्षाने उल्लेख करु इच्छिते. राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाअंतर्गत असलेल्या नाशिक येथील महाराष्ट्र इंजिनिअरींग रिसर्च इन्स्टीटयुट (मेरी) या संस्थेची स्थापना करण्यामागचा शासनाचा उद्देश कितपत सफल झाला आहे, सदर संस्थेवर दरवर्षी किती खर्च करण्यात येतो, संस्थेत कोणते संशोधन करण्यात येते ? इत्यादिबाबत छाननी करण्याचा निर्णय समितीने घेतलेला आहे. राज्यातील विविध प्रकल्पांद्वारे मोठया प्रमाणात फ्लाय ॲश निर्माण होतो. त्या फ्लाय ॲशचा साठा पर्यावरणीयदृष्टया धोकादायक असतो. सदर फ्लाय ॲशचा बांधकामामध्ये वापर करण्याबाबत संशोधन होऊन राज्यातील तीन सिंचन प्रकल्पांच्या बांधकामात वापर करण्यात येतो. नेहमीच्या पध्दतीने बनविण्यात येणारे कॉंक्रीट आणि फ्लाय ॲशचा वापर करुन बनविलेले कॉंक्रीट यामध्ये मजबुतीच्या दृष्टीने काहीही फरक नसतो. राज्यातील विविध प्रकल्पांमध्ये निर्माण होणारी मोठया प्रमाणावर फ्लाय ॲश सिंचन प्रकल्पांप्रमाणेच रस्त्यांच्या बांधकामाबरोबर सदर संस्थेने संशोधन करुन वापरात आणावी असेही समितीने आपल्या अहवालात म्हटले आहे. (......2

महोदय, त्यानंतर पुणे जिल्हयातील कुकडी प्रकल्पाअंतर्गत माणिकडोह हे 11 टीएमसी क्षमतेचे धरण बांधल्यापासून एकदाही पूर्ण भरलेले नाही. परंतु डिंबे धरणात मात्र अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. हे पाहता दोन्ही धरणांचे संकल्पचित्र योग्यरित्या तयार झालेले नाही, असे समितीला आढळून आले. त्यामुळे डिंबे धरणातील अतिरिक्त पाणी बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात आणण्याबाबत शासनाने प्रकल्प अहवाल तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्याची शिफारस समितीने केलेली आहे. राज्याच्या जवळपास 15 प्रकल्पांमध्ये गेल्या पाच वर्षात 50 टक्क्यापेक्षा कमी पाण्याचा साठा झाला आहे. सदर प्रकल्पांचे अहवाल व्यवस्थितरित्या तयार करण्यात आलेले नाहीत. यासंदर्भात संशोधन करण्याबाबत शासनाने सांगितलेले आहे आणि या संस्थेमध्ये जो प्रशासकीय खर्च होतो तो कमी करुन संशोधनाच्या कार्यावर भर द्यावा असेही अहवालात म्हटले आहे, तसेच रिक्त पदे भरण्याबाबतची शिफारस समितीने केलेली आहे. एवढे बोलून व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

**उपसभापती** : अंदाज समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

09-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) O-1

SGJ/ D/ RJW/ (पूर्वी श्री. खर्चे ) 13:10

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्रीमती निलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, याच अधिवेशन काळात शासनाला एका महत्वाच्या मुद्यासंबंधी निर्देश द्यावेत म्हणून मी या ठिकाणी औचित्याच्या मुद्याद्वारे आपले लक्ष वेधू इच्छिते. आपल्याला कल्पना आहे की, गेल्या वर्षी सातारा जिल्हयातील मांढर देवीच्या यात्रेमध्ये पौष पोर्णिमेच्या दिवशी झालेल्या चेंगराचेंगरीत 350 भाविक मृत्यूमुखी पडले होते. या अपघाताच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होती, व असे प्रकार पुढील काळात होऊ नये म्हणून त्यासाठी चार उपाययोजना देखील करण्यात आल्या होत्या. भाविकांच्या जाण्या-येण्याचे मार्ग वेगवेगळे करावेत, शॅार्टसर्कीट होऊ नयेत या दृष्टीकोनातून दक्षता घेतली जावी, त्याच बरोबर लाऊड स्पिकर मोठया आवाजात सुरु असेल तर भाविकांना सूचना मिळू शकत नाही व या गडावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अद्यापही करण्यात आलेली नाही. आता येणा-या जानेवारी महिन्यात पौष पोर्णिमेच्या दिवशी सातारा जिल्हयातील मांढर देवीची यात्रा आहे. त्यावेळी सुध्दा या ठिकाणी लक्षावधी भाविक देवीच्या दर्शनासाठी येणार आहेत. मागच्या अधिवेशनात आम्हाला शासनाकडून आश्वासन देण्यात आले होते की, तीर्थक्षेत्र विकासासाठी एक स्वतंत्र खाते तयार करुन त्यासाठी स्वतंत्र मंत्र्यांची नेमणूक केली जाईल. सातारा जिल्हयातच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी लाखोंच्या संख्येने भाविक जमतात अशा सर्व ठिकाणी जमलेल्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून निरनिराळया दक्षता घेतल्या जातील. मांढर देवीच्या यात्रेमध्ये जे 350 भाविक मृत्यूमुखी पडले होते त्यांना राज्यशासनाने नुकसान भरपाई दिलेली आहे तसेच केंद्रसरकार सुध्दा एक लाख रुपये नुकसान भरपाई देईल असे घोषित केले होते. परंतु अद्यापही केंद्रशासनाने या यात्रेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या भाविकांच्या कुटुंबियाना एक लाख रुपये नुकसान भरपाई दिलेली नाही. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर राजन कोचर समितीचा अहवाल येणे जरी बाकी असले तरी तातडीची उपाययोजना करण्यासाठी अजून थांबावे लागावे अशी परिस्थिती नाही. म्हणून हे अधिवेशन संपण्याच्या आत मांढर देवीच्या ठिकाणी जी दुर्घटना घडली होती त्या घटनेची पुनरावृत्ती इतरत्र कोठेही घडू नये यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत याबद्दलची माहिती सभागृहाला होण्याच्या दृष्टीकोनानतून आपण शासनाला निर्णय द्यावेत अशी मी विनंती करते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मांढरदेवीच्या यात्रेसाठी मोठया प्रमाणात भाविक दर्शनासाठी जात असतात तसेच या ठिकाणच्या अपघाताबद्दल शासनाला कल्पना आहे. मागच्या महिन्यात मी देखील मांढर देवीच्या दर्शनासाठी गेलो होतो. त्या ठिकाणी रस्त्याचीच नव्हेतर पिण्याच्या पाण्याची देखील व्यवस्था होणे आवश्यक आहे. त्यामुळे यादृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही सुरु करावी अशा प्रकारचे मी निर्देश देत आहे. येत्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात म्हणजेच मांढरदेवी यात्रेच्या 15 दिवस अगोदर मी, माननीय मंत्री महोदय व अधिका-यांसमवेत पाहणी करणार आहे. त्यामुळे मांढरदेवीच्या यात्रेसंदर्भात ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत त्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ करावा असे मी निर्देश देत आहे.

श्री. सुनील तटकरे : होय.

----------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील मुरुड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. डी.वाय.जाधव यांना काल ॲन्टी करप्शनने लाच घेतांना पकडले आहे. महोदय, गंभीर बाब अशी आहे की, रायगड जिल्हयामध्ये गेल्या आठवडयामध्ये पंचायती राज समिती आली होती. पंचायत राज समितीच्या खर्चासाठी श्री. जाधव पैसे गोळा करीत आहे अशी तक्रार पशुधन पर्यवेक्षकांनी केल्यामुळे ॲन्टी करप्शनने ही कार्यवाही केलेली आहे.

**उपसभापती** : आपण आपल्या औचित्याच्या मुद्यामध्ये कृपया पंचायत राज समितीचा उल्लेख करु नये.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हा या सभागृहाच्या सदस्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. आम्ही सुध्दा पंचायत राज समितीचे सदस्य आहोत. पंचायत राज समितीच्या नावाखाली पैसे गोळा केल्यामुळे त्या ठिकाणी वेगळे वातावरण तयार झालेले आहे. यासंदर्भातील तक्रार मी अध्यक्षांकडे अधिवेशन सुरु होण्याच्या अगोदर केली होती. अजून सुध्दा त्या ठिकाणी पंचायत राज समितीच्या नावाखाली पैसे गोळा केले जात आहेत ही फार गंभीर बाब आहे. या सर्व प्रकारामुळे या सभागृहाची प्रतिष्ठा तसेच आमदार म्हणून समाजामध्ये वावरतांना आम्हाला लाज वाटते. मुरुडचे गटविकास अधिकारी यांना अटक करण्यात आलेली आहे त्यामुळे यासंदर्भात नेमकी काय वस्तुस्थिती आहे याबाबतचे निवेदन अधिवेशन संपण्याच्या अगोदर शासनातर्फे व्हावे अशी मागणी औचित्याच्या मुद्याद्वारे मी करीत आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : अधिवेशन संपण्यापूर्वी या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून सभागृहाला माहिती सादर करावी असे मी शासनाला निदेश देत आहे.

....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व इतर यांनी "कुर्ला मुंबई येथील जैन धर्मियांच्या पवित्र मंदिरात जाणारा पूर्वापार रस्ता मिळकतीच्या मालकांनी भिंत बांधून अडविल्यामुळे लाखो भाविकांचा जाण्या-येण्याचा मार्ग बंद होणे, यामुळे भाविकात पसरलेले असंतोषाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या संबंधी शासनाने निवेदन करावे.

श्री.सुनील तटकरे : होय.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व इतर यांनी "दिनांक 8 डिसेंबर 2005 रोजी नाशिक येथील शासकीय रूग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आलेल्या 39 रूग्णांना चुकीचे औषध दिल्यामुळे त्यांची प्रकृती खालावल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, यावर शासनाने निवेदन करावे.

श्री.सुनील तटकरे : होय.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "बाळापूर तालुक्याचे तत्कालीन गट विकास अधिकारी श्री.बी.डी.जाधव यांच्याविरूध्द अनेक तक्रारी असून देखील अद्यापही चौकशी सुरू न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयासंबंधी शासनाने निवेदन करावे.

श्री.सुनील तटकरे : होय.

**उपसभापती** : माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर यांनी "नागपूर महानगरपालिकेची गेल्या सात महिन्यांपासून सभा न होणे, तसेच तेथे अनेक गैरप्रकार सुरू असल्यामुळे महानगरपालिका बरखास्त करण्याची आलेली पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या संबंधी शासनाने निवेदन करावे.

श्री.सुनील तटकरे : होय.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर यांनी "नवी मुंबई महानगरपालिकेची सेक्टर 19 मधील ओम होऊसिंग कंपनीला विकलेल्या इमारतींची पूर्ण रक्कम मिळालेली नसतानाही इमारती ताब्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयासंबंधी शासनाने निवेदन करावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेक्टर 9 मध्ये 60 कोटी किंमतीच्या दोन इमारती आहेत. 16 कोटी रुपये नवी मुंबई महानगरपालिकेने घेतले आहेत. 40 कोटी रुपये येण्याच्या आतच त्यांनी त्या इमारती ताब्यात घेऊन तोडून टाकलेल्या आहेत. यात 40 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. तेव्हा आपल्याला कळकळची विनंती आहे की,यासंबंधी आपण शासनाला मंगळवारी निवेदन करण्यास निदेश द्यावेत.

**उपसभापती** : या विषयावर शासनाने मंगळवारी निवेदन करावे.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले तालुक्यातील किणी ते कागल या मार्गाची झालेली दुरावस्था.

**मु.शी.**: कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले तालुक्यातील किणी ते कागल या मार्गाची झालेली दुरावस्था यासंबंधी श्री.कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी "कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले तालुक्यातील किणी ते कागल या मार्गाची झालेली दुरावस्था" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मंत्रिमहोयांना असे विचारू इच्छितो की,.....

**उपसभापती** : मी सन्माननीय सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, नियम 93 च्या निवेदनावर प्रश्नोत्तरे घेण्यात येणार नाहीत असा निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये झालेला आहे. नियम 93 च्या निवेदनावर प्रश्नोत्तरे घेण्यास मान्यता मिळालेली नसल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यास अनुमती कशी काय देऊ शकतो ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 च्या निवेदनाच्या प्रश्नोत्तरासंबंधी ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी सुरूवातीला प्रश्नोत्तरे घेण्यात येऊ नये असे सांगण्यात आले होते. परंतु, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी व आम्ही अशी सूचना केली की, ज्या सन्माननीय सदस्यांच्या सूचनेवरील निवेदन पटलावर ठेवण्यात येईल त्यांना 1-2 प्रश्न विचारण्याची अनुमती द्यावी. त्याप्रमाणे आपण सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी प्रश्न विचारण्यास अनुमती द्यावी.

**उपसभापती** : सन्माननीय श्री.फुंडकर साहेबांनी येथे विषय काढल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. कामकाज सल्लागर समितीमध्ये सदर विषयावर चर्चा झाली त्यावेळी मी असे म्हटले होते की, ज्या सन्माननीय सदस्यांच्या नियम 93 च्या सूचनेवर शासनातर्फे निवेदन करण्यात येईल त्यावेळी त्या सन्माननीय सदस्याला 1-2 प्रश्न विचारण्यास अनुमती देण्यात यावी. तेव्हा विधान सभेमध्ये निवेदनावर प्रश्नोत्तरे होत नाहीत, त्यामुळे आपल्या सभागृहासुध्दा निवेदनावर प्रश्नोत्तरे घेण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले. नियम 93 च्या सूचनेवर प्रश्नोत्तर घ्यायची किंवा नाहीत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या सभागृहासंबंधी ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी असे ठरले की, विधान सभेत काहीही ठरलेले असले तरी वरच्या सभागृहामध्ये ज्याची सूचना असेल त्याला किमान 1 किंवा 2 प्रश्न विचारण्यास अनुमती द्यावी.

...6...

**उप सभापती** : यासंबंधी आपण माननीय सभापतींची परवानगी घेऊ या. त्यासाठी माझी काहीही हरकत नाही. यासंबंधी मला माननीय सभापती महोदयांची अनुमती घ्यावी लागेल. कामकाज सल्लागार समितीमध्ये 93 च्या निवेदनावर प्रश्नोत्तर घ्यायची नाहीत असे ठरले आहे. त्यामुळे मी पुढे कसा काय जाऊ शकतो ?

श्री.पांडुरंग फुंडकर : निवेदन जसेच्या तसे रेकॉडवर जाईल. त्यामुळे ज्या सन्माननीय सदस्यांच्या सूचनेमुळे शासनाने निवेदन केलेले आहे, त्यांनाच फक्त 1-2 प्रश्न विचारण्यास अनुमती दिली पाहिजे, अशी चर्चा कामकाज सल्लागार समितीमध्ये झाली होती.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, त्यावेळी मी असा उल्लेख केला होता की, या सभागृहाची जी पंरपरा आहे ती पाळली पाहिजे. इतर ठिकाणी प्रश्न विचारले जात नाहीत हे मला मान्य आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी फक्त आजच्या दिवसाकरिता ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना दिली होती त्यांनाच फक्त एक प्रश्न विचारण्यास परवानगी देत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाली होती हे मला मान्य आहे. स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर विधानसभा सभागृहात प्रश्न विचारले जात नाहीत तेव्हा विधानपरिषद सभागृहामध्येही प्रश्न विचारु नयेत असे सुचविण्यात आले होते. जरी विधानसभा सभागृहात काहीही होत असले तरी विधानपरिषद सभागृहामध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे त्यांना किमान एक किंवा दोन प्रश्न विचारण्यास परवानगी दिली पाहिजे अशी सूचना मी आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी केली होती.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये जरी असे ठरले असले तरी मी एका बैठकीला हजर होतो. त्यावेळी जी चर्चा झाली होती त्या चर्चेमध्ये विधानसभा सभागृहातील संख्या आणि या सभागृहातील संख्या लक्षात घेतली होती. आपण नुकतीच घडलेली आणि महत्वपूर्ण बाब असेल तर आपण ती सूचना ॲडमीट करतो. निवेदनावर चर्चा करावयाची नाही अशी प्रथा सुरु झाली तर त्या विषयाला न्याय मिळणार नाही. तसेच अधिकाऱ्यांना हे माहीत झाले तर त्या निवेदनाची अवस्था अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी जशी सर्व लक्षवेधीसंबंधी निवेदने येतात त्या गठ्ठया प्रमाणे होईल. जरी आपण आजच्या दिवसाकरिता सूचना देणाऱ्या सदस्यांना एक प्रश्न विचारण्यास परवानगी दिली असली तरी निवेदनावर सदस्यांस आणखी प्रश्न विचारण्यासाठी माननीय सभापतींकडून परवानगी घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : मी याठिकाणी सांगू इच्छितो की, नियम 93 च्या सूचनेवर शासनास निवेदन करण्यास सांगितल्यानंतर शासनाने दोन दिवसांत निवेदन करावे. मी आता सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवानी यांना एक प्रश्न विचारण्यास परवानगी देत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: किणी ते कागल रस्ता पूर्ण झालेला नसताना टोल वसुल होत असल्याबाबत

**मु.शी.**: किणी ते कागल रस्ता पूर्ण झालेला नसताना टोल वसुल होत असल्याबाबत श्री.कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रविशेठ पाटील ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.कन्हैयालाल गिडवानी यांनी किणी ते कागल रस्ता पूर्ण झालेला नसताना टोल वसुल होत असल्याबाबत नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवानी : सभापती महोदय, कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील किणी ते कागल हा रस्ता पूर्ण झालेला नसताना देखील त्याठिकाणी टोल आकारला जात आहे म्हणून तेथील लोकांनी आंदोलन देखील केले होते. तेव्हा रस्ता पूर्ण झाल्याशिवाय टोल आकारण्यात येणार नाही अशा सूचना मंत्रिमहोदय देणार आहे काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, किणी ते कागल हा 133 कि.मी.चा रस्ता असून 125 कि.मी.च्या रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. फक्त 8 कि.मी.रस्त्याचे काम भूसंपादनामुळे आणि आर.ओ.बी.मुळे राहिले आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पवन एक्सप्रेसमध्ये एका महिलेवर झालेला बलात्कार.

**मु.शी.**: पवन एक्सप्रेसमध्ये एका महिलेवर झालेला बलात्कार याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी " पवन एक्सप्रेसमध्ये एका महिलेवर झालेला बलात्कार" याबाबत नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

..5.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एका अश्राप महिलेवर चालत्या ट्रेनमध्ये बलात्कार झाला. नाशिक ते कल्याण या अंतराची आपणास कल्पना आहे. ते गुंड ठिकठिकाणी पैसे गोळा करीत होते असे निवेदनात म्हटलेले आहे. गाडीत हत्यारी पोलीस असतात. हे सर्व घडत असताना हत्यारी पोलीस काय करीत होते ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ....

माझ्या माहितीनुसार प्रकाश जाधव हा पोलीस आहे. त्यामुळे आपण या ठिकाणी सांगावे की त्याचा नेमका व्यवसाय काय आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, इगतपुरी येथे पवन एक्सप्रेसमधील डबा क्र.एस-5 मध्ये जो निंदनीय प्रकार झालेला आहे त्यातील मुख्य आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. तसेच डबा क्र.एस-7 मध्ये काही तरुणांनी गोंधळ घालून, प्रवाशांकडून पैसे हिसकावून घेतले, त्यातील चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. या लाईनवर एकाच दिवशी लुबाडण्याच्या सहा घटना घडलेल्या आहेत. त्यातील 19 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, नाशिक ते कल्याण अंतराच्या दरम्यान त्या ठिकाणी पोलीस होते की, नाही याबाबत मला उत्तर मिळालेले नाही. तसेच हत्यारी पोलीसांबाबत देखील मला मंत्रिमहोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या गाडीमध्ये जी.आर.पी. चे दोन पोलीस होते. ज्या डब्यामध्ये ही घटना घडली त्यावेळी ते उपस्थित नव्हते. परंतु त्यानंतर त्याच पोलिसांनी आरोपींना अटक केलेली आहे.

**उपसभापती** : हा जो प्रश्न आहे तो महाराष्ट्रासाठी मोठा कलंक आहे. या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याची गंभीर दखल शासनाने घ्यावी. लांब पल्ल्याच्या ज्या ट्रेन आहेत त्या ट्रेनच्या प्रत्येक डब्यात एक शस्त्रधारी पोलीस ठेवण्याचा बंदोबस्त करावा अशाप्रकारच्या सूचना मी देत आहे.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून मोठया प्रमाणावर शुल्क वसूल करणे.

**मु.शी.**: मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून मोठया प्रमाणावर शुल्क वसूल करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.अशोक मोडक वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.अशोक मोडक यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून मोठया प्रमाणावर शुल्क वसूल करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 13:25

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्कामध्ये सवलत लागू केली आहे. परंतु शासनाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून जादा शुल्क वसूल केले जात आहे. असे अनेक प्रकार निरनिराळया महाविद्यालयामध्ये घडलेले आहेत आणि त्याबाबतची नांवे सुध्दा मी सांगितलेली आहेत.

दिनांक 13 मे रोजीच्या परिपत्रकान्वये अनुदानित संस्थेमध्ये कोणत्या प्रकारचे शुल्क घ्यावे हे ठरवून दिलेले असताना सुध्दा उल्हासनगर येथील सी.एच.एम. कॉलेजमध्ये कोटयावधी रुपयांचे अतिरिक्त शुल्क मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून घेतलेले आहे हे आपण निवेदनामध्ये मान्य केले आहे. या निवेदनाच्या माध्यमातून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून जे जादा शुल्क कॉलेजने वसूल केलेले आहे ते किती दिवसात परत करण्यासंदर्भात आपण आदेश देणार आहात ? मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून किती शुल्क घ्यावयाचे हे निश्चित केलेले असताना सुध्दा अतिरिक्त शुल्क घेऊन विद्यार्थ्यांची पिळवणूक करणाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात ? तसेच अतिरिक्त घेतलेली फी विद्यार्थ्यांना किती दिवसात परत करणार आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिनांक 1 नोव्हेंबर, 2003 रोजी समाजकल्याण विभागाच्या जी.आर.मध्ये कन्क्ल्यूजन आहे, म्हणून त्या विभागाने दिनांक 27 जून, 2005 रोजी नवीन जी.आर. काढलेला आहे. आपण दिलेल्या माहितीनुसार दोन्हीही संस्थांकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. उल्हासनगर येथील सी.एच.एम.कॉलेजने मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त घेतलेले शुल्क परत केलेले आहे तसेच महर्षि दयानंद महाविद्यालय, परेल, मुंबई या कॉलेजने कळविले आहे की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त घेतलेली रक्कम सात दिवसांच्या आत परत करणार आहोत.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जे.जे.रुग्णालयाच्या ग्रॅट मेडिकल कॉलेजमध्ये मराठी आणि बिहारी विद्यार्थी डॉक्टरांमध्ये झालेले भांडण.

**मु.शी.**: जे.जे.रुग्णालयाच्या ग्रॅट मेडिकल कॉलेजमध्ये मराठी आणि बिहारी विद्यार्थी डॉक्टरांमध्ये झालेले भांडण यासबंधी सर्वश्री डॉ.दीपक सावंत, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय सन्माननीय सदस्य सर्वश्री डॉ.दीपक सावंत, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, यांनी "जे.जे.रुग्णालयाच्या ग्रॅट मेडिकल कॉलेजमध्ये मराठी आणि बिहारी विद्यार्थी डॉक्टरांमध्ये झालेले भांडण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या निवेदनामध्ये अनेक त्रुटी असल्या तरी मी मंत्रिमहोदयांना एकच प्रश्न विचारु इच्छितो. बिहारी आणि मराठी विद्यार्थ्यांमध्ये जो वाद झाला तो जे.जे.रुग्णालयाच्या कॉलेजमध्ये कायमस्वरुपी होत असतो. कोर्टाने निर्णय दिला आहे की, त्या विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशनमध्ये हजेरी लावावी.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

तो निर्णय मागे घेण्याच्या बाबतीत तसेच पोलीस स्टेशनमध्ये हजेरी लावण्याचा जो निर्णय झालेला आहे त्याबाबतीत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? या विद्यार्थ्याचे फिंगर प्रिन्टस पोलीस स्टेशनमध्ये घेतले गेल्यामुळे भविष्यात जर या विद्यार्थ्यांना परदेशात जावयाचे असेल तर त्यांना पासपोर्ट मिळण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. तेव्हा हा निर्णय बदलण्यात यावा त्याचबरोबर तेथील वॉर्डनची बदली करण्यात येणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय,मुंबई येथील ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजमध्ये जी घटना घडली आहे तशा प्रकारची लहान सहान घटना प्रत्येक कॉलेजमध्ये घडत असते.अर्थात त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. परंतु या घटनेला एका वृत्तपत्राने जास्तीची प्रसिध्दी दिली त्यामुळे त्या ठिकाणी टेन्शन निर्माण झाले होते. मराठी भाषिक विद्यार्थी आणि इतर भाषिक विद्यार्थी असा वाद आता तेथे राहिलेला नाही. दोन्ही गटाच्या विद्यार्थ्यानी डीनकडे येऊन माफी मागितलेली आहे त्याचबरोबर त्यांना असेही सागितलेले आहे की, " येथून पुढच्या काळात आम्ही भांडण करणार नाही. जो प्रकार घडला आहे त्याबाबतीत तुम्ही आम्हाला मदत करावी ." आमचासुध्दा तोच प्रयत्न आहे.मी उद्या मुंबईला गेल्यानंतर त्यांना भेटणार आहे तसेच या केसेस विथ ड्रॉ करण्याचा प्रयत्न करणार आहे. वॉर्डनची चौकशी सुरु आहे आणि त्या चौकशीमध्ये जर ते दोषी आढळून आले तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

**उपसभापती** :यानंतर नियम 93 चे पाचवे निवेदन घेण्यात येईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, अगोदरच्या निवेदनावर मला प्रश्न विचारावयाचा आहे.त्या नियम 93 च्या सूचनेवर माझे सुध्दा नाव आहे.

**उपसभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये जे ठरलेले आहे त्याच्या पलीकडे मी जाणार नाही.

श्री.अनंत तरे : मला एक प्रश्न विचारु द्यावा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, तुमच्या आणि माझ्या मताप्रमाणे सभागृहाचे कामकाज करता येत नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये जे ठरलेले आहे त्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज करावे लागते. मला देखील कोणी तरी विचारणारे आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : वर्तमानपत्र सविस्तर वाचून त्यातील विषयाचा अभ्यास करुन आम्ही नियम 93 अन्वये सूचना देत असतो. त्यामुळे त्या संदर्भात मला उपप्रश्न विचारु द्यावा.

**उपसभापती** :एका नियम 93 च्या सूचनेवर जर चार पाच सन्माननीय सदस्यांची नावे असतील तर प्रत्येक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारता येणार नाही. यानंतर पुढचे नियम 93 चे निवेदन घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : विना अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयात शासकीय कोटयातून शिक्षण घेण्या-या मागासवर्गीय विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क शासनाकडून न मिळणे

मु.शी : विना अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयात शासकीय कोटयातून शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क शासनाकडून न मिळण्याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील,शरद पाटील,अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुरुपसिंग नाईक ( भटक्या विमुक्त जाती जमाती कल्याण मंत्री) :अध्यक्ष महोदय, श्री. जयंत प्र.पाटील,प्रा. शरद पाटील,श्री. अनंत तरे यांनी " विना अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयात शासकीय कोटयातून शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क शासनाकडून न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस:कृपया सोबत येथे जोडलेले निवेदन छापावे )

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, दिनांक 31 डिसेंबर 2005 पर्यन्त विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी शासन घेणार आहे काय ?

श्री.सुरुपसिंग नाईक : होय.अशा विद्यार्थ्यांना कॉलेजमधून काढले जाणार नाही व त्यांच्या शिष्यवृत्तीची प्रतिपूर्ती केली जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात निर्माण झालेली अनधिकृत बांधकामे

मु.शी : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात निर्माण झालेल्या

अनधिकृत बांधकामामुळे नागरी सुविधांवर झालेला परिणाम यासंबधी
श्री. जितेन्द्र आव्हाड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, प्रा.फौजिया खान,सर्वश्री
वसंतराव चव्हाण,जगन्नाथ शेवाळे,सदाशिवराव पोळ डॉ.वसंत पवार
श्रीमती मंदा म्हात्र,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जितेन्द्र आव्हाड ( विधान सभेने निवडलेले ) :अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.:

" ठाणे महापालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत मोठया प्रमाणात सुरु असलेली अनधिकृत बांधकामे, या अनधिकृत बांधकामामध्ये वास्तव्यास असलेल्या लक्षावधी रहिवाश्यांमुळे प्रशासकीय सोयीसुविधा पुरविण्यास येत असलेल्या अडचणी, सर्वसामान्य तसेच मध्यमवर्गीयांची फसवणूक करुन विकासक सदर अनधिकृत इमारतींमध्ये सदनिका विक्री करत असल्याचा धक्कादायक प्रकार, या अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई करण्यास महापालिका प्रशासनास येत असलेले अपयश, वर्तकनगर, किसननगर, सावरकरनगर, करवालीनगर, चरई यापासून कळवा, खारेगाव परिसरांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणात सुरु असल्याची धक्कादायक माहिती, या अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करण्याची सेवाभावी संस्थांनी नोव्हेंबर, 2005 तसेच अलिकडील काळात वेळोवेळी केलेली मागणी, याप्रकरणी कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील करदात्या नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष संताप तसेच चिडीची व असुरक्षिततेची भावना, महापालिकेचे कर्मचारी कळवा येथील विक्रांत टॉवर या अनधिकृत इमारतींवर कारवाई करण्यासाठी गेले असता इमारतीतील रहिवाशांनी स्वत:ला जाळून घेऊन आत्महत्या केल्याची दिनांक 5 नोव्हेंबर, 2005 रोजी घडलेली दुर्घटना व पुढील काळात अशा प्रकारच्या दुर्घटना होण्याची शक्यता लक्षात घेता, अशा अनधिकृत बांधकामांवर त्वरीत कारवाई होणेसंदर्भात कार्यक्रमाची आखणी करुन अंमलबजावणी करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज. लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळेमी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन
( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



श्री.जितेन्द्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गेल्या 20 वर्षात जवळजवळ 20 हजार कोटी रुपयांची अनधिकृत बांधकामे उभी राहिलेली आहेत. उत्हासनगर येथे अनधृिकृत बांधकामे तोडण्याचा निर्णय घेतल्यावर जो प्रसंग निर्माण झाला आहे त्यामुळे सर्वांचे डोळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उघडण्याची वेळ आता आलेली आहे.  या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांनी जे निवेदन केलेले आहे ते असत्य आणि दिशाभूल करणारे आहे. अर्थात त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना एवढेच विचारावयाचे आहे की, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात 20 हजार कोटी रुपयांची अनधिकृत बांधकामे झाल्यानंतर त्या इमारतीमध्ये अनेक रहिवासी रहावयास गेले आहेत. या सर्व इमारती 20 वर्षापूर्वीच्या जुन्या इमारती आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकामे तोडणा-या विभागात जे कर्मचारी आहेत ते वर्षानुवर्षे त्या विभागातच काम करतात त्यामुळे त्यांचे व्हेस्टेड इंटरेस्ट डेव्हलप झालेले आहेत. तेव्हा या भागातील सगळी अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी एखादी समिती नेमण्यात येऊन ही अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे काय ? या इमारतीमध्ये जवळजवळ 20 लाख नागरिक राहतात .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

दुसरे म्हणजे ही अनधिकृत बांधकामे ज्या गतीने होत आहेत, वाढत आहेत की 2 ग 2 च्या ठिकाणी 9-9 इमारतींचे काम चालू आहे. तेव्हा या संबंधात ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले आहे त्यांची चौकशी करून त्यांचेवर कारवाई होणे आवश्यक आहेच पण त्याबरोबरच हा अतिक्रमण विरोधी विभाग सांभाळण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याची आवश्यकता आहे तर शासन त्यादृष्टीने अधिकारी नेमून यंत्रणा उभी करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, ठाणे जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये, विशेष करून उल्हासनगर भागामध्ये आणि सर्वच महापालिका क्षेत्रामध्ये अनधिकृत इमारतींची वा बांधकामांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे. त्यामुळे अशा अनधिकृत इमारतींमध्ये काही ठिकाणी 100 टक्के अनधिकृत बांधकाम वा इमारत आहे तर काही ठिकाणी एखादा मजला अनधिकृतपणे बांधला गेला आहे तर काही ठिकाणी अनधिकृत असे बांधकाम केले गेलेले आहे. थोडक्यात यामध्ये अनधिकृत बांधकामामध्ये त्या सगळ्याच गोष्टी येतात. परंतु या सगळ्या गोष्टी अनधिकृत व्याख्येमध्ये येत असताना सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे त्याप्रमाणे या ठिकाणी जी काही यंत्रणा आज अस्तित्वात आहे, त्यापेक्षा एक वेगळी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. कारण आज तेथे सहाय्यक आयुक्त किंवा वॉर्ड ऑफिसर असतात त्यांना इतरही कामे खूप असतात आणि म्हणून त्यांचेकडून या अनधिकृत बांधकामाबाबत प्रभावी असे काम होऊ शकत नाही. तेव्हा हे अनधिकृत बांधकाम थांबावे, ते होण्याला आळा बसावा यासाठी एक वेगळी यंत्रणा उभी करण्याच्या दृष्टीने शासन दोन महिन्यामध्ये ठोस असा निर्णय घेईल इतकेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे, त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ही सगळी अनधिकृत बांधकामे वा इमारती नियमित करणे तसे आवश्यक आहे. परंतु आपण पाहिले आहे की, हायकोर्टामध्ये उल्हासनगरच्या केसेस चालू आहेत आणि काल देखील हायकोर्टाचा एकच स्टॅण्ड आहे की, एमआरटीपीच्या दृष्टीकोनातून जे काही अनधिकृत इमारत वा बांधकाम असेल तर ते तोडले गेले पाहिजे. तेव्हा अशी परिस्थिती असताना आपण दुसऱ्या बाजूला ही अनधिकृत बांधकामे नियमित करावयाचे म्हटले तर अगोदर त्या दृष्टीने काम करता येईल किंवा काय याचा विचार होणे आवश्यक आहे. किती हद्दीपर्यंत आपल्याला हे करता येऊ शकेल हे पाहिले गेले पाहिजे. त्या दृष्टीने यू.डी.(1)कडे हे काम येते आहे म्हणून दोन

..... टी 2 ..

श्री. टोपे .....

महिन्यात यू.डी.(1) संबंधीच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करून, या अनधिकृत इमारती वा बांधकामांपैकी काही बांधकामे वा इमारती आपल्याला नियमित करता येतील किंवा काय या दृष्टीने पाहणी आणि विचार करून अहवाल सादर करण्यास सांगण्यात येईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांनी एक अत्यंत गंभीर आणि महत्त्वाचा प्रश्न या लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून येथे उपस्थित केलेला आहे. हा उल्हासनगर संबंधीचा प्रश्न असला तरी ही परिस्थिती ठाणे शहरामध्ये देखील येऊ शकते. म्हणूनच हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. आज तेथे असंख्य अनधिकृत इमारती उभ्या रहात आहेत आणि त्यामध्ये अनेक लोक रहावयास देखील जात आहेत वा गेलेले आहेत आणि नंतर मग महापालिकेचे अधिकारी तेथे अनधिकृत बांधकाम म्हणून कारवाई करण्यास जातात. या निवेदनामध्ये जी काही माहिती दिलेली आहे ती पूर्णत: असत्य अशीच आहे. यातील पृष्ठ 2 वर विक्रांत टॉवर संबंधातील कारवाईची माहिती दिली आहे ती पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की, याबाबत नोटीस केव्हा दिली आहे तर 12.7.2005 ला ही नोटीस दिली आहे. सभापती महोदय, ही 7 मजली इमारत काही एका महिन्यामध्ये उभी राहिलेली नाही. ही पूर्ण इमारत उभी राहीपर्यंत त्या इमारतीला कोणतीही नोटीस महापालिकेकडून देण्यात आलेली नव्हती आणि इमारत पूर्ण झाल्यानंतर त्यामध्ये लोक रहावयास गेल्यानंतर ही नोटीस दिली गेली आहे. सभापती महोदय, या इमारतीचे ठिकाणी अगोदर जे गरीब लोक रहात होते त्यांनी आपले पैसे खर्च करून ही इमारत बांधली. तेथील लोकांनी, नागरिकांनी माझ्याकडे त्याबाबत निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, तेथील श्री. सुनील जाधव आणि मंगल शिरसाठ यांनी 20 लाख रूपयांची मागणी केली होती त्यापैकी 16 लाख रूपये त्यांना मिळाले पण केवळ 4 लाख रूपये द्यायचे होते त्यावेळी बाजूच्या लोकांनी तक्रार केली आणि त्यांनी साडेसात लाख रूपये घेतले तरी लोक तेथे रहावयास गेले. आणि आता भर दिवाळीमध्ये महापालिकेचे अधिकारी तेथे गेले आणि ही इमारत अनधिकृत आहे आणि ती तोडण्याची कारवाई आम्हाला करावी लागणार आहे असे सांगितले. तेव्हा आता दिवाळीमध्ये तरी आपण ती तोडू नका, अन्यथा आम्ही स्वत:ला पेटवून घेऊ. पण त्यांचे म्हणणे कोणी ऐकले नाही त्यामुळे त्या लोकांनी स्वत:ला पेटवून घेतले पण ....

( यानंतर श्री. सरफरे ...यू 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

कोणत्याही अधिकाऱ्यांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला नाही. त्याठिकाणी त्यांनी स्वत:ला पेटविले त्यामध्ये दोघांचा मृत्यू झाला व एका व्यक्तीने तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारली त्यामध्ये त्याचे हात-पाय तुटले. अशाप्रकारे त्या इमारतीविरुध्द कारवाई करण्याचे सत्र सुरु आहे. मी आपणाकडे माझ्याकडील माहिती पाठवितो. मुंब्रा, कळवा व खारेगाव या भागामध्ये असंख्य इमारती उभ्या राहिल्या. संपूर्ण ठाणे शहरामध्ये अशा इमारती कशा उभ्या रहातात, त्यांवर कारवाई कां होत नाही? त्या इमारतीचे बिल्डर दर मजला निहाय अधिकाऱ्यांना पैसे देतात, एका मजल्याच्या एक स्लॅबला एक लाख रुपये देतात अशाप्रकारचा भ्रष्टाचार सुरु आहे. तेव्हा प्रश्न असा आहे की, ही इमारत एका दिवसात उभी राहिलेली नाही, आपण एक महिन्यात कारवाई केली. त्या इमारतीमध्ये लोक रहाण्यासाठी गेले त्यांना भर दिवाळीमध्ये घराबाहेर काढण्यात आले. त्याबाबतचे त्यांनी दिलेले प्रतिज्ञापत्र याठिकाणी माझ्याकडे आहे. तेव्हा त्या अधिकाऱ्यांची आपण अँटीकरप्शन ब्यूरोमार्फत चौकशी करणार काय?

तसेच, संपूर्ण ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये गेल्या पाच वर्षामध्ये अशाप्रकारची किती अनधिकृत बांधकामे झाली? त्यांची आपण चौकशी करणार काय? जी अनधिकृत बांधकामे झाली त्यांची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय? "विक्रांत टॉवर" ही कोणत्याही रिझर्व्हेशनमध्ये आलेली इमारत नाही. ही इमारत मालक व भाडेकरुंनी मिळून स्वत:च्या मालकीची इमारत उभी केली आहे. त्याबाबतची चौकशी करुन ती रेगुलराईज करण्यासंबंधीची कारवाई होईपर्यंत त्या इमारतीविरुध्द असलेली कारवाई आपण थांबविणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी मोठे भाषण करुन प्रश्न विचारला आहे. त्यामध्ये त्यांनी एक-दोन स्पेसिफिक प्रश्न उपस्थित केले आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, ज्यावेळी प्लिंथ कंस्ट्रक्शनचे काम सुरु होते त्यावेळी त्याठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने 12.7.2005 ला स्टॉप वर्कची नोटीस देण्यात आली होती.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, दि.12.7.2005 ला इमारतीचे प्लिंथ कंस्ट्रक्शन झाले नाही. ही इमारत सात मजली आहे. त्यामुळे याठिकाणी दिशाभूल करणारी माहिती दिली आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : मला प्राप्त झालेल्या माहितीनुसार मागील महिन्यात ही इमारत बांधून पूर्ण झाली. दि.12.7.2005 ला नोटीस दिल्यानंतर त्याठिकाणी असलेले तथाकथित टेनंट किंवा खोटे टेनंट असतील ते दोन वेळा कोर्टामध्ये गेले. व कोर्टामध्ये जाऊन त्यांनी जैसे थे मिळविण्याचा प्रयत्न केला. स्टेथस्को मिळविल्यामुळे महानगरपालिकेला पुढील कारवाई करता आली नाही. तिसऱ्यांदा स्टे मिळविण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित लोक कोर्टामध्ये गेले त्यावेळी मात्र त्यांचा स्टे व्हेकेट करण्यात आला. आणि म्हणून कमिशनर आणि त्यांचे पथक 29.10.2005 ला पोलीस बंदोबस्तासह त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी त्याठिकाणी तातडीने गेले . आणि माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी दुर्दैवी घटना घडली. परंतु ही इमारत 100 टक्के बेकायदेशीर, अनधिकृत आहे ही वस्तुस्थिती आहे. त्या इमारतीच्या कोणत्याही ले-आऊटला किंवा बिल्डींगच्या प्लॅनला मंजूरी घेतलेली नाही. अशाप्रकारची कोणतीही परवानगी नसतांना बांधकाम करण्यात आले ते कायद्याने तोडणे हे कोर्टाला व शासनाला अपेक्षित आहे. माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, काही अनधिकृत इमारती अधिकृत करता येतील कां?त्यासाठी जरुर समिती नेमली गेली पाहिजे. कारण फक्त खालपासून वरपर्यंत 100 टक्के अनधिकृत असलेल्या मजल्यांना अधिकृत करण्यासाठी कायदा करणे शक्य होईल असे मला वाटत नाही. परंतु छोटी-मोठी बांधकामे रेगुलराईज करण्यासाठी समितीच्या माध्यमातून दुरुस्ती आणता येईल. माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांचे म्हणणे असे की, काही अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला असेल किंवा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केला असेलतर त्यांची जरुर आयुक्तांच्या माध्यमातून चौकशी केली जाईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/RJW पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:45

**उपसभापती** : मला सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावेत.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, हा विषय फार गंभीर आहे. एका बाजूला माननीय मंत्री महोदयांकडून प्राप्त झालेले निवेदन आणि दुसऱ्या बाजूला संबंधित व्यक्तीने सादर केलेले ॲफीडेव्हीट यामध्ये कमालीची विसंगती आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "अनधिकृत इमारतीवर पोलीस बंदोबस्तासह कारवाई केली असता तेथे बांधकाम तोडण्यास श्री.शिवा महादेव आदत व त्यांच्या तीनचार साथीदारांनी विरोध केला."तेच श्री.शिवा महादेव आदत 50 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहून देतात की, ठाणे महानगरपालिकेच्या उप आयुक्तांनी 20 लाख रुपये घेतले आणि एका अर्थाने आम्हाला आश्वासनच दिले की, आम्ही तुम्हाला काहीही करणार नाही, तुम्ही तेथे खुशाल रहावे. पण याबाबतीत निवेदनामध्ये उल्लेखच नाही. कदाचित ही माहिती आता नव्याने आली असेल. तेव्हा हे सर्व प्रकार थांबवावयाचे असतील तर नव्याने मिळालेल्या माहितीच्या आधारे हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन खुलासा करणार आहे का ? याठिकाणी आपण दिलेले निवेदन आणि उपलब्ध झालेले ॲफीडेव्हीट यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. आपण निवेदनामध्ये सर्व दोष विकासकावर आणि तेथील भाडेकरुंवर थोपविलेला आहे. पण ॲफीडेव्हीट असे सांगते की, ठाणे महानगरपालिकेच्या उप आयुक्तांनी 20 लाख रुपये घेऊन आम्हाला रहाण्यास सांगितले आहे. ही सर्व विसंगती लक्षात घेऊन आणि यामध्ये होणारे गैरप्रकार थांबविण्याच्या हेतूने माननीय मंत्री महोदय अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहात निवेदन करतील का ? तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी इतका हा विषय महत्वाचा आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पैसे देणाराही तेवढाच दोषी आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ही इमारत 100 टक्के अनधिकृत आहे. तरी सुध्दा तेथील वॉर्ड ऑफीसरला, एक्झ ीक्युटीव्ह ऑफीसरला पैसे दिले असतील तर ते देणारे देखील खरे म्हणजे दोषी आहेत.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कुणालाही पाठीशी घालू नये. महानगरपालिकेच्या ज्या उप आयुक्तांकडे सर्व बांधकामे कशी कायदेशीररित्या होतील हे पाहण्याचे अधिकार आहेत आणि तेच जर 20 लाख रुपये घेत असतील तर त्यांना आणि जो आगतिक माणूस आहे त्याला, अशा दोघांनाही आपण एकाच मापाने मोजत आहात का ?

. . . .व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पैसे देणारे लोक सुध्दा शेवटी जर अनधिकृत गोष्टीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून काही करीत असतील तर ते योग्य नाही. याठिकाणी ॲफीडेव्हीटमध्ये म्हटल्याप्रमाणे घडले असेल तर तेच गृहीत धरावयाचे आहे. त्यामुळे यासर्व गोष्टी घडल्या असतील तर याबाबतीत कमिशनरच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल आणि संबंधितांनी पैसे घेतले आहेत का ? जरी पैसे घेतले असले तरी ही इमारत अनधिकृतच आहे यादृष्टीकोनातून त्यावर कायदेशीर कारवाई करावी लागेल. याठिकाणी दिलेल्या ॲफीडेव्हीटच्या माध्यमातून या सर्व गोष्टींची जरुर चौकशी करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, गेल्या काही वर्षापासून ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये अवैध आणि अनधिकृत बांधकामे उभी राहीली आहेत आणि ही बात महानगरपालिकेच्या लक्षात आली नाही का ? महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी आणि बिल्डर यांचे साटेलोटे असल्यामुळेच अशा प्रकारचे प्रकार घडत असतात. त्यामुळे अशा बिल्डर्स्वर शासनाने कठोर कारवाई करावी. तसेच अनधिकृत बांधकामांना आणि तेथे राहणाऱ्या लोकांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने सहानुभूतीपूर्वक विचार करावा. मात्र बिल्डर आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृत बांधकामे होत असल्यामुळे शासन त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका घेणार आहे का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी मघाशीच या प्रकरणाच्या बाबतीत सांगितले आहे की, जे नवीन ॲफीडेव्हीट सादर केलेले आहे, त्याअनुषंगाने कमिशनर यांच्या माध्यमातून निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि दोषी असतील तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये मी देखील रहातो. ठाणे महानगरपालिकेचा मी बराच काळ म्हणजे जवळजवळ 12 वर्षे सदस्य होतो आणि महापौर देखील होतो. ठाणे महानगरपालिकेतील या सगळया प्रकरणांची मला संपूर्ण खडान्खडा माहीत आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी जे प्रकरण उपस्थित केलेले आहे, त्या संदर्भात मी आपल्याला थोडी माहिती आणि काही निर्देशही देऊ इच्छितो. जो काही प्रकार त्या ठिकाणी घडला त्याचे वर्णन केले गेलेले आहे. हा पर्टिक्युलर एका इमारतीच्याबाबत स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. शहरामध्ये अनधिकृत बांधकामे होऊ नयेत, या मताचे आम्ही पहिल्यापासून आहोत. मी ठाण्याचा महापौर असतांना मुंब्रा येथील अनधिकृत बांधकामे अधिकृत करावी अशाप्रकारचा प्रस्ताव बऱ्याच मंडळींनी आणण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अनधिकृत बांधकामांना आपण अशाप्रकारे ठरावाद्वरे अधिकृत करण्याचा पायंडा पाडला तर मला वाटते, महापालिका प्रशासन आणि शासन यांची आवश्यकताच उरणार नाही. त्यामुळे माझ्याकडे जो प्रस्ताव आला होता तो मी विषय पत्रिकेवर कधीही घेतला नाही आणि आजतागायत अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव ठाणे महापालिकेच्या कोणत्याही महापौरांनी तो विषय विषयपत्रिकेवर आणला नाही. कारण या संदर्भाने शासनाने घालून दिलेले नियम हे सर्वांनी पाळलेच पाहिजेत. या ठिकाणी पर्टिक्युलरली खरोखरच अनधिकृत बांधकामे थांबविण्याचा आपला इंटरेस्ट असेल तर या एका प्रश्नाच्या बाबतीत मुद्दाम मला सांगावेसे वाटते की, या संदर्भाने तीन अधिकाऱ्यांवर आरोप केलेले आहेत. अनधिकृत बांधकामे तोडण्याच्याबाबतीत त्या खात्यामध्ये जे कोण अधिकारी आहेत ते किती काळ काम करत आहे, हा महत्वाचा मुद्दा आहे. संगनमत कधी होते, ही इतकी अनधिकृत बांधकामे का वाढतात ? याचे हे एक कारण आहे. अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात 12-5-2005 जर यांना नोटीस दिली होती, तर तीन महिन्याच्या आत सात मजल्याची त्या ठिकाणी इमारत उभी रहाते, याचा अर्थ निश्चितपणे महापालिकेतील संबंधित वॉर्डातील अधिकाऱ्यांचा याला आशीर्वाद आहे. कमिशनर ऑफीसमध्ये ते अधिकारी बसलेले असतात. परंतु त्या प्रभागावर नियंत्रण ठेवणारे जे कर्मचारी आहेत, ते काय करत होते? हा महत्वाचा मुद्दा आहे. मी या ठिकाणी कोणाची नावे घेत नाही परंतु जी नावे या ठिकाणी आलेली आहेत, त्याबाबतीत मुद्दाम ऊहापोह करावा लागेल. केवळ कमिशनरमार्फत याची चौकशी करु असे सांगून काही होणार नाही. मी तर असे म्हणेन की, या सगळया प्रकाराची आपण लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी, तरच या प्रश्नाला न्याय मिळेल. कारण शेवटी असे आहे की, या सगळ्या भ्रष्टाचाराची चौकशी ही ऑथरटी म्हणून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

**उपसभापती** (पुढे सुरु....

फक्त ॲन्टी करप्शन विभाग करु शकते. समजा, यामधील कोणताही अधिकारी त्यावेळी त्या ठिकाणच्या पदावर काम करत नसेल तर त्याच्यावरही अन्याय होता कामा नये. म्हणून या ठिकाणी पहिली गोष्ट अशी की, ताबडतोब ठाणे महानपालिकेच्या आयुक्तांना आजच्या आज आदेश द्यावेत की, वर्षानुवर्ष त्या ठिकाणी जी मंडळी काम करतात, त्यांनी या सदर्भात काय केले ? त्याचा जाब विचारावा आणि आजच्या आज त्या ठिकाणच्या मंडळींच्या तातडीने बदल्या कराव्यात, ते जर जबाबदार असतील तर त्यांना ताबडतोब सस्पेंड करावे. परंतु या सगळ्या भ्रष्टाचाराची चौकशी ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फतच व्हावी, अशाप्रकारची स्पष्ट सूचना मी आपल्याला करतो. एवढेच नव्हे तर त्या ठिकाणी जे बराच काळ काम करतात आणि ज्यांनी ज्यांनी यामध्ये संगनमत केलेले आहे... उद्या वाटल्यास, अधिकृत बैठक मी माझ्या चेंबरमध्ये बोलावितो. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाडे तसेच या लक्षवेधी सूचनेवर ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आहेत, जे जे गट नेते आहेत त्यांना देखील बोलावू. मंत्री महोदय आपण आयुक्तांना बोलवावे. हवे तर पुढच्या आठवड्यामध्ये बुधवारी बोलवावे. त्यांना बोलाविण्यापूर्वी मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्यांचा ताबडतोब अंमल करावा, अशाप्रकारचे निर्देश मंत्री महोदयांना मी देतो.

श्री.राजेश टोपे : आपले निर्देश मान्य आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : ही जी लक्षवेधी या ठिकाणी आलेली आहे ती महत्वाची आहे. ठाणे शहरामध्ये आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम वर्षानुवर्षे केले जाते आणि त्याकडे दुर्लक्ष केले जाते. ही समस्या ठाणे जिल्ह्यात आहे. आज उल्हासनगरमध्ये जवळजवळ 825 इमारतींच्याबाबतीत हायकोर्टाने सांगून देखील आणि पोलीस संरक्षण महानगरपालिकेला देऊ केले असतानादेखील काही कारवाई केली जात नाही. त्या ठिकाणी भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, मला सन्माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, येऊर या ठिकाणी जे आदिवासींच्या जमिनीवर अनधिकृत बंगले बांधलेले आहेत....

श्री.अनंत तरे : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : त्या ठिकाणी बंगले बांधलेले आहेत...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना आपण बोलू द्यावे.

....(अथळा)....

यानंतर कु.थोरात.....

अस्धारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ RJW/ D/ प्रथम श्री. किल्लेदार... 13:55

( गोंधळ )

**उपसभापती** :श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना बोलू द्यावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, युती शासनाच्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी अनधिकृत बंगल्यांना स्थगिती दिली होती. माझी माहिती अशी आहे की, तेथे 150 बंगले होते ते आज 250 पेक्षा जास्त बंगले झालेले आहेत.

( गोंधळ )

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : आपल्याला सोईचे असते तेवढे तिकडे होणार नाही. आपल्याला सोईचे असते म्हणून आपण त्या ठिकाणी दुर्लक्ष करुन चालणार नाही. सभापती महोदय, शहरामध्ये अनधिकृत बांधकाम होत असतांना त्या ठिकाणी अनधिकृत बंगले बांधलेले आहेत. 150 ते 200 बंगले बांधलेले आहेत. त्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ? याचे उत्तर द्यावे.

**उपसभापती** :या अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात गुरुवारी या ठिकाणी जेव्हा चर्चा होईल तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णींना बोलावण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदय, आदिवासींच्या जमिनी लाटून हे अनधिकृत बांधकाम केलेले आहे. ..

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माननीय श्री. शदर पवार मुख्यमंत्री असतांना त्या विभागाचे मंत्री माननीय श्री. गणेश नाईक यांनी स्थगिती दिलेली आहे. आणि ती स्थगिती तशीच चालू आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : त्याठिकाणी आणखी 100 अनधिकृत बंगल्यांचे बांधकाम वाढलेले आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात आपण सभागृहात अतिशय तडफेने चांगला निर्णय दिलेला आहे त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. तसेच मुंबईच्या अनधिकृत प्रश्नाच्या बाबतीतही आपण एवढेच तडफेने लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

**उपसभापती** :श्री. जितेंद आव्हाड यांनी मघांशी विनंती केली की, ही अनधिकृत बांधकामे थोपवायला ॲडिशनल कलेक्टरच्या दर्जाचा अधिकारी नेमावा. आता राज्यात इतक्या मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत आहेत की, यासाठी एक वेगळा मंत्री नेमायची पाळी येईल.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई शहर उपनगरात भटक्या कुत्र्यांची संख्या आणि त्यांच्यामुळे होणारे अपघात.

**मु. शी** : मुंबई शहर उपनगरात भटक्या कुत्र्यांची संख्या आणि त्यांच्यामुळे होणारे अपघात.यासंबंधी श्री.मुझफ्फर हुसेन वि.प.स. यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. मुझफ्फर हुसेन ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□े □ियम 101 अ□्वये पुढील तातडीच्या व सार्वज□ि□ महत्वाच्या बाबी□डे स□्मा□□ीय नगर विकास मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी □िवेद□ □रावे, अशी वि□ंती □रतो.

" मुंबई शहर उपनगरात भटक्या कुत्र्यांची संख्या आणि त्यांच्यामुळे होणारे अपघात यांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत असणे, तसेच महानगरपालिका व नगरपालिका यांचेकडून भटक्या कुत्र्यांवर कोणतीही नसबंदी प्रक्रिया करण्यात येत नसल्याचे दिसून येणे, शहरातील भटके कुत्रे कमी करण्याऐवजी श्वानदंशावर इंजेक्शनवर पैसे आकारुन पालिका जनतेवर भार टाकत असणे, सन 1993 सालापर्यन्त भटक्या कुत्र्यांना पकडून ठार मारीत असत परंतू अशा प्रकारची कारवाई करण्याचे बंद केलेले असल्यामुळे कुत्र्यांच्या संख्येत व अपघातात मोठया प्रमाणात वाढ होणे, त्यापासून तसेच श्वानदंशावरील लसींचा तुटवडा असल्याने शहरातील नागरिकांना जीव मुठीत धरुन जगावे लागणे, परिणामी नागरिकांमध्ये शासनाबाबत पसरलेला असंतोष व भितीची भावना, शासनाने भटक्याकुत्र्यांच्या जाचक त्रासापासून नागरिकांना मुक्त करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या □िवेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते □िवेद□ आपल्या अ□ुमती□े सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : □िवेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

□िवेद□

( प्रेस : येथे सोबतचे □िवेद□ छापावे. )

.... 3 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद :सभापती महोदय,भटक्या कुत्र्यांचा प्रश्न संपूर्ण मुंबई व उपनगरात तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अतिशय मोठया प्रमाणात वाढत आहे. एकटया मुंबई शहरामध्ये आज भटक्या कुत्र्यांची संख्या साधारण 10 लाख पर्यंत पोहचलेली आहे. या ठिकाणी जे निवेदन देण्यात आलेले आहे त्यामध्ये शासनाने उल्लेख केलेला आहे की, 2005 साली आतापर्यंत 6792 कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आलेले आहे. आणि 2004 मध्ये 7852 कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आलेले आहे. सभापती महोदय, 1994 साली उच्च न्यायालयाने आदेश दिला की, भटक्या कुत्र्यांना मारता येणार नाही. 1993 सालापर्यंत मुंबई शरामध्ये एकटी महाहनगरपालिका 40,000 कुत्र्यांना मारत होती. आणि आज त्या ठिकाणी स्टरलायझेन फक्त 7 ते 8 हजार कुत्र्यांचे करण्यात येत आहे. उर्वरित महाराष्ट्रातील कोणत्या महानगरपालिका,जिल्हा परिषद व नगरपरिषदेमध्ये स्टरलायझेशन करण्यात येत आहे, याची माहिती शासनाकडे उपलब्ध नाही. याचे ऊदाहरण असे की, 30 सप्टेंबर 2005 ला राज्य शासनाला पत्र लिहून कुत्रे चावण्याच्या घटना किती घडलेल्या आहेत आणि दर वर्षी स्टरलायझेशन किती होत आहे याची माहिती मी स्वत: शासनाला पत्र लिहून मागितली होती. पण यासंबंधीची माहिती राज्य सरकार मला आतापर्यंत देऊ शकलेले नाही. कुत्रे चावण्याचा प्रकार एकटया मुंबईत नाही तर संपूर्ण राज्यभर वाढलेला आहे. मग ती झोपडपट्टी असेल,शहरी भाग असेल, खेळाचे मैदान असेल, शाळा असेल, रात्री रस्त्यावरुन येणा-या जाणा-या लोकांचा प्रश्न असेल त्या सगळया ठिकाणी अतिशय भयंकर असे प्रकार घडत आहेत. मागच्या महिन्यात कोल्हापूरमध्ये एका झोपडीत शिरुन लहान मुलीला भटक्या कुत्र्यांने खाल्ले आहे. अशीच घटना देवनार आणि मुंबई या ठिकाणी घडलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, ऑगस्ट 2000 साली या प्रश्नावर या सभागृहात श्री. शिशीर शिंदे यांनी चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी सभापती महोदयांनी शासनाला अशी सूचना केली होती की, न्यायालय आणि कोर्टाचा निर्णय होईल त्या वेळी होईल पण तोपर्यंत शासनाने या भटक्या कुत्र्यांना पकडून कोंडून ठेवावे.

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

यानंतर श्री. खर्चे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवूधी सूचना क्र. 1 ...... पुढे सुरु. ) श्री. मुजफ्फर हुसैन ....

अशी कार्यवाही करणे आवश्यक होते ती केलेली आहे काय ? त्याचबरोबर उच्च न्यायालयाचे आदेश या भटक्या कुत्र्यांना मारण्यासंबंधीचे होते, पकडण्याबाबत नाहीत. म्हणून शासनाने यासंदर्भात एक धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे, त्यासाठी विविध प्रकारच्या योजना आखल्या पाहिजेत आणि आदेश काढले पाहिजेत की, या भटक्या कुत्र्यांना पकडून संपूर्ण राज्यभर त्यांच्यासाठी कोंडवाडे तयार करावेत. कारण संपूर्ण राज्यात या भटक्या कुत्र्यांपासून जो त्रास होत आहे त्याचे चित्र न्यायालयासमोर उपस्थित करणे आवश्यक आहे. कारण भटक्या कुत्र्यांच्या चावण्याच्या केसेस राज्यात हजारोच्या संख्येत आहेत, अशी सर्व परिस्थिती न्यायालयासमोर उभी केली पाहिजे. तोपर्यंत हे कोंडवाडे तयार करावेत. त्याचबरोबर निर्बिजीकरण आणि लसीकरणाचे जे काम सध्या चालू आहे ते प्रमाण अतिशय कमी आहे, ते वाढण्यासाठी काहीतरी टारगेट ठरविणे आवश्यक आहे, ते शासन ठरविणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर जर मला सविस्तरपणे देण्याची संधी दिली तर कदाचित पुन्हा या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची गरज पडणार नाही. ही वस्तुस्थिती अशी आहे की, सन 1993 सालापर्यंत बीएमसी ॲक्टमध्येच तरतूद होती की कुत्रे पकडून त्यांना मारावे. परंतु सन 1993 सालानंतर दिल्ली उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यावेळेपासून यावर बंधन आले आहे. कारण त्या निर्णयामध्ये प्रिव्हेंशन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमल्स ॲक्ट हा कायदा सन 1960 सालापासूनच अस्तित्वात आहे परंतु त्याची अंमलबजावणी तेवढी प्रभावीपणे होत नव्हती, असे म्हटले आहे. म्हणून दिल्ली उच्च न्यायालयाने हा सेंट्रलाईज्ड निर्णय दिला त्यानुसार आपल्या विभागाला देखील तसे कळविले व आपण तसे आदेश निर्गमित केले. त्यासंदर्भात बीएमसी उच्च न्यायालयात गेली, उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर पुढे सुप्रिम कोर्टात गेली, सुप्रिम कोर्टाने देखील हायकोर्टालाच ही केस रेफरबॅक केली आणि पुन्हा हायकोर्टामध्ये ती केस गेली. त्यानुसार आता या कायदयाखाली कुत्री मारायची नाहीत हे सत्य आहे. यावर आता एकच इलाज आहे आणि तो म्हणजे त्यांचे लसीकरण आणि निर्बिजीकरण करणे, याशिवाय दुसरा कुठलाही इलाज नाही. परंतु हे लसीकरण आणि निर्बिजीकरणाचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे हेच सन्माननीय सदस्य श्री. मुजफ्फर हुसैन यांना

2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .......

अपेक्षित आहे. याच सभागृहात मागे एकदा डॉ. दीपक सावंत यांनी प्रदीर्घ अशी चर्चा घडवून आणली होती, त्यावेळी शासनाच्या वतीने मी आश्वासन दिले होते की, हे अधिवेशन संपण्यापूर्वीच याबाबत एक बैठक घेऊ. त्यादृष्टीने सर्व एनजीओंना बरोबर घेऊन एक बैठक घेतली होती. त्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली होती. एवढेच नव्हे तर त्यानंतर मुंबईतील माझ्या दालनातच या एनजीओंशी, महापालिकेच्या आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी यांनाही बरोबर घेऊन एक बैठक पुन्हा घेतली आणि शासनाच्या वतीने अत्यंत कडक शब्दात आदेश देण्यात आले होते की, कुठल्याही परिस्थितीत टारगेटेड प्रोग्राम तयार करावा जेणेकरुन या भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरणाचे प्रमाण वाढले पाहिजे. या कामासाठी नंबर ऑफ एनजीओज फक्त 9 च आहेत, त्यांची संख्याही वाढली पाहिजे, त्या कामासाठी वाहनांची व्यवस्था पुरेशा प्रमाणात वाढविली पाहिजे, यासाठी लागणारी सर्व यंत्रणा जी आवश्यक आहे त्यातही वाढ झाली पाहिजे, तसेच या कामासाठी बीएमसीमध्ये जे 3 कोटीचे बजेट ठेवण्यात येते त्यामध्येही वाढ करावी अशा सर्व गोष्टी सविस्तरपणे दोन तास चर्चा करुन ठरविण्यात आल्या, तसे प्रेझेंटेशन देखील त्यावेळी दाखविण्यात आले होते. या सर्व गोष्टींच्या माध्यमातून आणि शासनाने कडक आदेश देऊन देखील पाहिजे तेवढी समाधानकारक परिस्थिती बीएमसीच्या वतीने पाहण्यास मिळाली नाही. म्हणून मला वाटते की या कामावर अधिक चांगले मॉनेटरींग व प्रभावीपणे काम करावयाचे असेल तर या कुत्र्यांची श्वानगणना करावी लागेल पण ती अद्याप झालेली नाही. कारण कुणी 5 लाख, कुणी 10 लाख तर कुणी 20 लाख या कुत्र्यांची संख्या असल्याचे सांगते. ही गणना मुंबईच्या हद्दीपर्यंत प्रथम करणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : सभागृहासमोर ज्या ज्या वेळी हा विषय येतो त्यावेळी या भटक्या कुत्र्यांची संख्या एकदम कमी होते.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ......

सभापती महोदय, श्वानांची गणना होण्याची आवश्यकता होती त्याच बरोबर मुंबई महानगर पालिकेने यासंदर्भात अद्यापही कालबध्द कार्यक्रम तयार केलेला नाही ही दुर्दैवाची बाब आहे. त्यामुळे सभागृहाच्या आणि शासनाच्या वतीने त्यांना कडक शब्दात सूचना करु इच्छितो की, कोठल्याही परिस्थितीत श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणाच्या संदर्भात मुंबई महानगर पालिकेने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. त्याच बरोबर नियंत्रणाचे काम बरोबर चालू आहे की, नाही हे पाहण्याच्या दृष्टिकोनातून शासन दर महिन्याला कमिशनर लेव्हलवर बैठक होण्याची आवश्यकता आहे. हा विषय केवळ महानगर पालिकेच्या लेव्हलवर न राहता आमच्या प्रधान सचिवांनी देखील त्रैमासिक आढावा घेण्याची आवश्यकता आहे अशा सर्व सूचना देण्याच्या दृष्टिकोनातून शासन कार्यवाही करेल आणि एक वर्षाच्या आत नियंत्रण आणण्याच्या दृष्टिकोनातून .शासन गांभीर्याने काम करेल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी विस्तृत उत्तर दिलेले आहे. अशाच पध्दतीचे उत्तर मंत्रीमहोदयांनी माझ्या बिलाच्या वेळीही दिलेले होते. परंतु भटक्या कुत्र्याच्या संदर्भात आपण ज्यावेळी मिटिंग बोलविता त्यावेळी 1 वाजता मिटिंग असेल तर आम्हाला सकाळी 10.00 वाजता सांगण्यात येते तो आपल्या सिस्टीम मधील लॅक्यूना आहे. त्यामुळे मिटिंगच्या संदर्भात सदस्यांना अगोदरच माहिती दिली गेली पाहिजे. ही मिटिंग प्रधान सचिवांनी बोलावण्यापेक्षा माननीय मंत्रीमहोदयांनी बोलावली पाहिजे. माझा मुद्दा एवढाच आहे की, आपल्या 4 गोष्टीचे मॉनेटरींग केले पाहिजे ते आपण करणार आहात काय? निर्बीजीकरणासाठी पशुवैद्यकीय डॉक्टरांची संख्या अपुरी आहे हे खरे आहे का? तसेच ही कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण काय करणार आहात? जे पिसाळलेले कुत्रे असतात ते लोकांना चावल्यामुळे लोक मृत्युमुखी पडतात त्यासाठी आपण काय करणार आहात? तसेच विभाग वार केंद्र तयार करुन त्यामध्ये 3-3 महिन्यांनी आढावा घेतला जाणार आहे काय? याला विश्वासार्हता काय? कुत्र्यांच्या संदर्भात मुंबई महानगर पालिका आणि राज्यशासन मिळून काही फंड उपलब्ध करुन देणार आहे काय?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : पशुवैद्येकीय डॉक्टरांची संख्या कमी आहे असे या ठिकाणी सांगितले गेलें आहे. त्यामुळे यासंदर्भात एक मोठा कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. या कामावर अधिक फोकस करुन अधिक चांगले काम होण्याची आवश्यकता आहे. पशुवैद्यकीय डॉक्टरांची संख्या कमी असेल तर पशुवैद्यकीय डॉक्टरांची संख्या वाढविण्यासाठी शासन निश्चित प्रयत्न करेल. परिणामकारक कालबध्द कार्यक्रमाच्या दृष्टिकोनातून ज्या ज्या यंत्रणेची आवश्यकता असते त्यामध्ये मग डॉक्टरांची यंत्रणा असो किंवा इतर यंत्रणा असो ते उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासन निश्चितपणे प्रयत्न करेल. ॲन्टी रॅबीजच्या लसीकरणाची व्यवस्था 16 रुग्णालयामध्ये, तसेच जेवढया डिस्पेंसरीज आहेत त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने मोफत दिले जातात. या ठिकाणी वेळेत उपाययोजना केली जात असल्यामुळे पिसाळलेले कुत्रे चावल्यामुळे मरणा-यांची संख्या निश्चित कमी होते. विभागीय केंद्राच्या संदर्भात सचिव पातळीवर किंवा कमिशनर पातळीवर जो आढावा घेणार आहोत त्यामध्ये आपण मांडलेल्या सूचना सांगाव्यात. आपण अशा प्रकारे सूचना मांडल्या तर विभागीय केंद्र सुरु करण्याच्या संदर्भात कार्यवाही होईल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

त्याच बरोबर अकौंटीबिलिटीचा प्रश्न देखील येथे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. त्यासंबंधीची मी असे सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेमध्ये डॉग विंग आहे. त्यामुळे अकौंटीबिलिटी ही मुंबई महानगरपालिकेला लागू आहे.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, माणसे जगवायला आपल्याकडे पैसे नाहीत, तर मग कुत्र्यांसाठी कशाला पैसे मागत आहात.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य मुजफ्फर हुसेन यांनी भटक्या कुत्र्यांसबंधीचा अतिशय महत्त्वाचा मुद्दा लक्षवेधीच्या माध्यमातून सभागृहासमोर मांडला आहे. त्यासाठी मी त्यांना धन्यवाद देतो. रॅबिज हा भयानक रोग असतो. हा रोग ज्याला जडतो, ती व्यक्ती पाणी पित नाही. इतका भयानक रोग आहे. प्रीव्हेन्शनल ऑफ क्रुलेटी टू ॲनिमल्स ॲक्टने कुत्र्यांना मारण्यावर बंधन घातले आहे. कुत्रे वाचविण्यासाठी मनुष्यजातीवर अन्याय करीत आहोत. म्हणून माझ ाा पहिला प्रश्न असा आहे की, हायकोर्टाच्या निर्णया विरूध्द सर्वोच्च न्यायालयामध्ये शासन रिट पिटीशन दाखल करणार आहे का ? ॲन्टी रॅबिजचे व्हॅक्सिन आहे. हे व्हॅक्सिन सर्वत्र उपलब्ध असले पाहिजे असा नियम आहे. महाराष्ट्रातील सर्व भागांतील दवाखान्यामध्ये व्हॅक्सिन उपलब्ध होण्यासंबंधी मंत्रिमहोदय संबंधित विभागाच्या मंत्र्यांशी चर्चा करून ॲन्टी रॅबिज व्हॅक्सिन महाराष्ट्रातील सर्व भागात उपलब्ध करून देण्याची सोय करणार आहेत का ? सध्या जे व्हॅक्सिन उपलब्ध आहे ते घेण्यास फार त्रासदायक आहे. आठ वेळा व्हॅक्सिजन घ्यावे लागते. ॲन्टी रॅबिजचे एक इन्जेक्शन 10 c.c.चे असते. त्यामुळे लहान मुले ते घेण्यास घाबरतात. आता बाजारात अत्यंत चांगले असे 1-2 डोसेसचे व्हॅक्सिजन उपलब्ध आहे. हे व्हॅक्सिन शासन आरोग्य विभागाच्या मार्फत राज्यातील सर्व शासकीय दवाखानांमध्ये उपलब्ध करून देणार आहे का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने BMC चा ॲक्ट रेफर बॅक केलेला आहे. केंद्र सरकारचा जो कायदा आहे, तो त्यांनी सर्व देशभर लागू केला आहे. त्यामुळे आपल्याला परत सुप्रीम कोर्टाकडे जाता येणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 1960 च्या मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यात कुत्रे मारण्याची तरतूद होती, तर केंद्राचा देखील 1960 चा कायदा आहे. तेव्हा हा कायदा व्हॉयलेशन करीत नव्हता का ? 33 वर्ष कुत्रे मारले जात होते, तेव्हा कायद्याचे व्हॉयलेशन होत नव्हते का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पूर्वी दोन्ही कायदे अस्तित्वात होते. परंतु, मुंबई महानगरपालिकाचा जो कायदा होता तो सर्वोच्च न्यायालयाने सेट असाईड केला व देश भर केंद्राचा कायदा लागू केला. त्यामुळे कोर्टाचा विषय आता शिल्लक राहिलेला नाही. केंद्राचा जो कायदा आहे तो सर्व नगरपालिका व महानगर पालिका यांनासुध्दा लागू आहे. त्यामुळे कुत्रे मारता येत नाहीत, त्यांचे फक्त निर्बिजीकरण करता येते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापती स्थानी श्रीमती कांता नलावडे )**

श्री.राजेश टोपे...........

महानगरपालिकेत देखील याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात अंमलबजावणी होईल या दृष्टीकोनातून काही नवीन धोरण आणि परिणामकारक कृती करण्याची आवश्यकता आहे त्याबाबत जरुर विचार केला जाईल. ॲन्टी रॅबिज व्हॅक्सीन शासकीय दवाखान्यात ठेवले जातील.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदया, भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट इतका वाढला आहे की, कोणत्या गल्लीतून किती कुत्रे बाहेर येतील हे सांगता येत नाही. तसेच आपल्याकडे भूतदया दाखविणारी माणसेदेखील कमी नाहीत. मी जुहूला राहते. माझ्या घराजवळ नेहमी एक गाडी येते आणि त्या गाडीतील व्यक्ती तेथील कुत्र्यांना अन्न घालते. या संदर्भात मी पोलीस स्टेशन आणि महानगरपालिकेला कळविल्यावर त्यांचेवर फक्त जुजबी कारवाई झाली. मी त्या गाडीचा नंबर देखील दिला होता. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आपण त्या व्यक्तीविरुध्द कडक कारवाई करणार आहात काय ? वेळप्रसंगी कायदा करुन अशी कारवाई करता आली तर ती कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच आपण निवेदनामध्ये श्वानदंशग्रस्त रुग्णांची जी संख्या दिलेली आहे ती संख्या पाहून मन घाबरते. या संख्येपैकी किती रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी त्यांच्या घराजवळ एक व्यक्ती नेहमी कुत्र्यांना अन्न घालते असे सांगितले. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, आपल्याला जर श्वान पाळावयाचे असेल तर त्यासाठी परवाना घ्यावा लागतो. ज्यांनी परवाना घेतला नसेल त्यांनी श्वान पाळल्यास त्यांना महानगरपालिकेच्या ॲक्टप्रमाणे प्रिव्हेनशन करता येऊ शकते. आपण जर पोलिसात तक्रार केली असेल तर त्या विरुध्द निश्चित कारवाई केली जाईल. रॅबीज या रोगामुळे दरवर्षी किमान 11 ते 12 व्यक्ती मृत्युमुखी पडतात. ॲन्टी रॅबीज व्हॅक्सीन सर्व रुग्णालयामध्ये मोफत देण्यात आलेली आहेत. त्या औषधाची किंमत 261 रुपये आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए.अझीज : सभापती महोदया, ॲन्टी रॅबीज व्हॅक्सीन जिल्ह्याच्या हॉस्पीटलमध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ठेवण्यात आल्याचे मंत्रिमहोदयांनी सांगितले. मला मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे की, हे औषध रेफ्रिजरेटरमध्ये ठेवावे लागते आणि जिल्हा रुग्णालयात आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात रेफ्रिजरेटर नसतो. ॲन्टी रॅबीज व्हॅक्सीनचे इंजेक्शन पोटात घ्यावे लागते आणि ही जुनी पध्दत आहे. परंतु आता जे नवीन पध्दतीचे इन्ट्रा-मॅस्क्युलर व्हॅक्सीन बाजारात आलेले आहे ते फक्त तीन दिवस घ्यावे लागते. हे औषध शासन दवाखान्यात उपलब्ध करुन देणार आहे काय ? दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, कुत्र्यापासून फक्त रॅबिजच होतो असे नव्हे तर हायड्रेटेड नावाचा गंभीर आजार देखील होतो. हा आजार डोक्यात गेल्यानंतर भयानक वेदना होतात.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज....

आज जरी कुत्रा चावला असला तरी 10 किंवा 15 वर्षानंतर हा आजार होतो, त्यामुळे यासंदर्भात मा.मंत्रिमहोदय काय करणार आहेत ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, हेल्थ डिपार्टमेंटकडून प्राथमिक आरोग्य केंद्रावर रेफ्रिजरेटरची व्यवस्था करण्यात आलेली आहे. उप-केंद्रांवर जर रेफ्रिजरेटर नसेल तर त्या ठिकाणी असुविधा होत आहे हे मी मान्य करतो. व्हॅक्सीनच्या संदर्भात ज्या ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता असतील त्याबाबत सूचना देता येतील. हे खरे आहे की, रेबिज प्रतिबंधक लस पोटात देण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे त्रास कमी होतो.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी निरनिराळ्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांवरुन असे दिसते की, भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात शासन गंभीर नाही. या ठिकाणी जेवढे प्रश्न विचारण्यात आले आहेत त्याची उत्तरे माuuh; मंत्री महोदयांनी व्यवस्थित दिलेली नाहीत. केवळ स्टेरिलायझेशनचे टार्गेट निश्चित करण्याव्यतिरिक्त त्यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही. मी त्यांना स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देण्यासाठी राज्य शासन याचिका दाखल करणार आहे काय ? परंतु त्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. अशा प्रकारची याचिका दाखल करण्यापर्यंत शासन भटकी कुत्रे ठेवण्यासाठी केवळ मुंबईतच नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्रात कोंडवाडा सुरु करणार आहे काय ? माझ्या याही प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले नाही. केवळ इंजेक्शन्सच्या संदर्भात उत्तरे दिले जात असल्यामुळे सभागृहाचा वेळ वाया जात आहे. अतिशय महत्वाचा आणि गंभीर असा हा विषय आहे, याकडे शासनाने नीट लक्ष देऊन, उत्तर द्यावे आणि जे उत्तर येईल त्या उत्तराची अंमलबजावणी होण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांना मी सांगू इच्छितो की, प्रत्येक प्रश्नाचे पॉईंट टू पॉईंट उत्तर देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. दोन-दोन तास अभ्यास केल्यानंतरच मी या ठिकाणी बोलत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी बोलताना जबाबदारीने बोलले पाहिजे. मी त्यांना सांगू इच्छितो की, मी निरनिराळया प्रश्नाच्या अनुषंगाने तीन वेळा कोर्टाच्या संदर्भात उल्लेख केला आहे. केस प्रूव्ह झाली की, लसीकरण आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

09-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) CC-2

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.... 14:20

श्री.राजेश टोपे....

निर्बीजीकरण करण्याशिवाय पर्याय नाही. केस एस्टॅब्लिश झाली आहे. रुल पक्का झाला आहे की, कुत्रा मारणे कायद्याने गुन्हा असल्यामुळे कुत्रा मारण्याचे काम करता येणार नाही. सुप्रीम कोर्टाने केस एस्टॅब्लिश केल्यामुळे आता पुन्हा कोणत्या कोर्टात जावयाचे हे मला माहीत नाही.

मला वाटते कोंडवाडा हा विषय चर्चा करुन सोडविण्याची आवश्यकता आहे. सध्या हे काम एन.जी.ओ. ना दिलेले आहे. कुत्रे पकडून आणल्यानंतर त्यांनी नगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या निर्बीजीकरण केंद्रापर्यंत आणणे आवश्यक आहे. कोंडवाडयातील पाणी, वीज यासाठी येणारा खर्च हा महानगरपालिकेने करावयाचा असतो. कुत्रे कोंडवाडयात दोन दिवस ठेवण्याचे काम महानगरपालिकेचे असते. कुत्र्यांचे निर्बीजीकरण झाल्यानंतर ज्या ठिकाणावरुन ती कुत्रे पकडून आणली होती पुन्हा त्याच ठिकाणी पोहचवून देण्याचे काम हे महानगरपालिकेनेच करावयाचे असते. यासाठी केंद्र सरकारकडून महानगरपालिकांना पैसा मिळतो. महानगरपालिकेचे बजेट आणि केंद्र सरकारच्या पैशांतून हे काम केले जात आहे. याबाबत अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत आहे की, नाही हे पाहण्यासाठी महापालिका आयुक्तांच्या पातळीवर दरमहिन्याला आणि प्रधान सचिवांच्या पातळीवर तीन महिन्यांनी आढावा बैठक घेण्यात येईल. जे धोरण ठरवू त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिकोनातून शासन गंभीर आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, माननीय मत्रिमहोदयांनी जे सांगितलेले आहे ते बरोबर आहे. सुप्रीम कोर्टात आपल्याला जावे लागेल आणि सुप्रीम कोर्टात जाण्याचा रस्ता बंद झाला आहे माझी माननीय मंत्रिमहोदयांना आपल्या मार्फत अशी विनंती आहे की, या ॲक्टमध्ये आपण काही सुधारणा सुचवू शकतो काय ? किंवा सॉलिसीटर जनरल किंवा ॲडव्होकेट जनरल यांचे मत आपण घेऊ शकतो काय ? हा प्रश्न मनुष्याच्या जीवनाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. ज्याप्रमाणे कुत्रे जगले पाहिजेत त्याचप्रमाणे माणसेसुध्दा जगली पाहिजेत. केन्द्र सरकारच्या पातळीवर किंवा सॉलिसीटर वा ॲडव्होकेट जनरल यांच्या पातळीवर चर्चा करुन प्रिव्हेन्शन ऑफ ॲनिमल क्रुएलिटी ॲक्टला लोकसभेमध्ये सुधारणा आणता येईल काय याचा शासन विचार करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सजेशन फॉर ॲक्शन

श्री.विलासराव शिंदे :भटक्या कुत्र्याचे निर्बिर्जीकरण करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे त्या व्यतिरिक्त महाराष्ट्रामध्ये काही नगरपालिका कुत्र्यांना पकडते आणि अन्य शहरात नेऊन सोडते तेंव्हा त्याबाबतीत शासन कोणते धोरण स्वीकारणार आहे. निर्बिजीकरण करण्यासाठी कुत्र्यांना पकडावे लागते तेव्हा त्याच कुत्र्यांना राखीव जंगलामध्ये नेऊन सोडण्याच्या बाबतीत शासन काही निर्णय घेणार आहे काय ? त्या कुत्र्याना न मारता जंगलामध्ये सोडण्यासारख्या काही वेगळया उपाययोजना शासन स्वीकारणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :कुत्र्यांची संख्या वाढू नये हा महत्वाचा मुद्दा असल्यामुळे निर्बिजीकरण करणे हा महत्वाचा विषय आहे त्याचबरोबर कुत्रे चावल्यानंतर त्या माणसाला रॅबिज होऊ नये म्हणून लसीकरण करणे हा महत्वाचा विषय आहे. अशा प्रकारे निर्बिजीकरण आणि लसीकरण हे दोन महत्वाचे विषय आहेत. ते न करता कुत्र्यांना कोठेही सोडण्यात काही अर्थ राहणार नाही म्हणून तसे करणे हा शासनासमोर प्राधान्यांचा विषय असून त्याप्रमाणे केल्यानंतर कुत्र्यांना कोठेही सोडले तरी काही हरकत नाही.

डॉ.एन.पी.हिराणी :माझ्या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही. ॲन्टी रॅबिज व्हॅक्सीन काही ठिकाणी उपलब्ध असते परंतु बाराही महिने सरकारी दवाखान्यात वा नगरपालिकेच्या दवाखान्यात प्राथमिक आरोग्य केन्द्रात ते उपलब्ध नसते. कुत्रे चावल्यामुळे एखाद्या व्यक्तीला हा रोग झाला की त्यातून त्याचा मृत्यू होतो. त्या व्यक्तीला परमेश्वरसुध्दा वाचवू शकत नाही. ॲन्टी रॅबिज व्हॅक्सीन

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी...

हे अत्यंत महत्वाचे आहे तेव्हा ते सगळीकडे बाराही महिने उपलब्ध व्हावे यासाठी आरोग्य विभागाच्या अधिका-यांची बैठक बोलावून व त्यांच्याबरोबर चर्चा करुन माननीय मंत्रीमहोदय यासाठी प्रयत्न करणार आहेत काय ? त्याचबरोबर माननीय मंत्रिमहोदयांनी सागितले की ,याकरता एन्ट्रा मस्कुलर व्हॅक्सीनसुध्दा मार्केटमध्ये उपलब्ध आहे. परंतु ते व्हॅक्सीन महाग आहे.सर्वसामान्य नागरिकांना हे व्हॅक्सीन घेंणे परवडत नाही त्यामुळे हे व्हॅक्सीन शासनातर्फे विकत घेऊन नगरपालिका,सरकारी दवाखाना आणि प्रायमरी हेल्थ सेन्टरमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : होय

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोल्हापूर येथील  दोन व्यापा-यांना पोलिसांनी संगनमताने केलेली अटक

मु.शी : कोल्हापूर येथील दोन व्यापा-यांना पोलिसांनी संगनमाने केलेली अटक  या बाबत सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी,मधुकर सरपोतदार, अनंत तरे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (विधानसभेने निवडलेले) :अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"दिनांक ४ सप्टेंबर, २००५ रोजी श्री.संजय गिडवाणी यांना साखर विक्री गैरव्यवहार प्रकरणी जयसिंगपूर जिल्हा कोल्हापूर पोलिसांनी  केलेली अटक,दिनांक ५ सप्टेंबर, २००५ रोजी श्री.प्रविण बलदवा या खाजगी व्यापा-याशी संगनमत करुन पोलीस अधिकारी श्री. पाटील व इतर कर्मचा-यांनी या गुन्हयांशी दुरान्वयाने कोणताही संबंध नसलेल्या श्री. दीपक  व श्री. राजू गिडवाणी यांना बेकायदेशिरपणे अटक करुन त्यांना धमक्या देवून व दहशत पसरवून त्यांच्याकडून रुपये ३ लाख ७५ हजार इतक्या रक्कमेची केलेली वसुली, त्यामुळे या अधिका-यांना व त्याच्या सहका-यांना शासनाने तात्काळ सेवेतून निलंबित करावे अशी करण्यात येत असलेली मागणी, मूळ खाजगी तक्रार क्र.२/२००५ संदर्भात श्री.प्रविण बलदवा यांनी पोलिसांच्या साक्षीने प्रथम दिनांक ५ सप्टेंबर, २००५ रोजी जयसिंगपूर न्यायालयात प्रतिज्ञापत्र केलेले असताना पुन्हा त्यांच्याशी संगनमत असलेल्या पोलिसांच्या दबावाखाली येऊन वेगळी भूमिका घेऊन विरुध्द बाजू मांडून पोलीसात खोटी तक्रार दाखल करणा-या श्री. बलदवा यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ सप्टेंबर, २००५, दिनांक १४ सप्टेंबर, २००५, व दिनांक २७ सप्टेंबर, २००५ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना कळवून सुध्दा अद्याप त्याबाबत कोणतीही कारवाई झालेली नसणे, परिणामी पसरलेला असंतोष व याबाबत शासनाने तातडीने केलेली अथवा करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्याना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



- निवेदनानतर -

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय या लक्षवेधी सूचनेसंबंधी जे निवेदन देण्यात आलेले आहे त्यामध्ये माननीय मंत्रिमहोदयाना काही बदल करावयाचा आहे काय ? पोलिसाच्या वेषात खंडणी कशी वसूल केली जाते यासंबंधी सगळे पुरावे देण्यात आलेले आहेत. काल प्रश्न आला होता आणि त्यावेळी जे उत्तर देण्यात आले होते त्या उत्तरामध्ये आणि आजच्या निवेदनामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना काही बदल करावयाचा आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : नाही.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी :सभापती महोदय, गुन्हयाशी काहीही सबंध नसतांना घरामध्ये घुसून काही तरी कारण देऊन सकाळी 6.30 वाजता माझ्या पुतण्यांना सांगली पोलीस स्टेशनला काहीही न कळविता कोल्हापूर जिल्हयातील पोलिसांनी घरातून उचलून नेले आणि पैसे दिले नाही तर गोळया मारु तसेच बाजारातून धिंड काढू असे सांगितले होते. गिडवाणी कुटुंबियांचे बाहेर फलक लावू असे पोलीस उपनिरीक्षक बोलले आहेत. गेल्या पाच दिवसापासून या व्यापा-याकडून जोपर्यन्त पैसे वसूल होत नाहीत तोपर्यन्त त्यांना सोडणार नाही असे त्यांनी सांगितले व त्यांना सकाळी 6.30 पासून संध्याकाळी 7.30 पर्यन्त पोलीस स्टेशनमध्ये बसवले होते. त्यांच्याकडून पैसे वसूल केलयानंतर त्यांनी या मुलांना सोडून दिले. कागदावर जरी त्यांना अटक केलेली दिसत नसली तरी बेकायदेशीरपणे त्यांना पोलीस उचलून घेऊन गेले आणि त्यांच्याकडून पैसे वसूल केले होते.

नंतर श्री.सुंबरे

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिडवानी ...

सभापती महोदयृ कालच मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचेशी स्वत: बोललो आहे. त्यांनी अतिरिक्त मुख्य सचिवांना या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेशही दिलेले आहेत. आपण आता आज या लक्षवेधी सुचनेवर जे उत्तर म्हणून निवेदन दिलेले आहे ते म्हणूनच मी फेकून देणार आहे, ते मी वाचूनही पाहू इच्छित नाही. काल मला जे उत्तर दिले आहे ते असे आहे की, प्रस्तुत प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये पीएसआय श्री.के.एन.पाटील हे दोषी आढळून आल्याने त्यांची बदली करण्यात आलेली आहे आणि त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. म्हणजे हे खंडणी वसूल करतात, त्यांचे हप्ते यांच्यापर्यंत पोहोचतात किंवा काय असा संशय यातून येतो आहे. सभापती महोदया, मी या विधीमंडळाचा एक सदस्य म्हणून आहे आणि माझ्या कुटुंबियांवरच अशा प्रकारचा अन्याय होतो आहे. माझे कुटुंबिय कोठे दोषी असतील तर जरूर आपण त्यांचेवर कायद्यानुसार कारवाई करावी, माझी त्याला हरकत नाही. परंतु आता हा पोलीस अधिकारी चौकशीमध्ये दोषी आढळून आलेला आहे तर त्याबाबतचा चौकशी अहवाल दोन दिवसात आम्हाला देणार का ? कारण या पोलीस अधिकाऱ्यावर तो दोषी आढळून आल्याने शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असे उत्तर मला काल देण्यात आलेले आहे. तेव्हा त्यांना प्रथम निलंबि आपण करणार काय ? तसेच त्याच्या सोबत जे पोलीस शिपाई होते त्यांचेवर देखील आपण निलंबन कारवाई करायला पाहिजे. तेव्हा त्यांना आपण निलंबित करणार काय आणि चौकशीचा अहवाल सभागृहासमोर दोन दिवसात ठेवणार का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, या केसची पार्श्वभूमी थोडी समजून घेतली पाहिजे. कोठल्याही आमदाराच्या घरामध्ये अशा प्रकारे कोणा पोलीस अधिकाऱ्याने जावे असे आम्हालाही वाटत नाही. परंतु यातील श्री.संजय गिडवानी याने एका व्यापाऱ्याकडून त्याला साखर देतो म्हणून सांगून पावणेचार लाख रूपये घेतले होते पण साखर दिली नाही म्हणून त्या व्यापाऱ्याने पोलीसामध्ये तक्रार केली. परंतु यामध्ये पोलीस टाळाटाळ करीत आहेत अशी त्याची समजून इ ााल्याने तो कोर्टामध्ये गेला आणि कोर्टाचा आदेश घेऊन पोलीस त्यांच्या घरी अटक करण्यासाठी गेले होते. त्यापूर्वी सांगली पोलीस ठाण्यामध्ये नोंद न करता विश्रामबाग पोलीस ठाण्यामध्ये नोंद करून गेले आहेत. सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांचे मलाही पत्र आले होते.ञ आणि म्हणूनच या सगळ्याच प्रकरणामध्ये चौकशी करावी म्हणून एसडीओ इचलकरंजी

...... इइ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

यांना सांगितले. सभापती महोदया, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकडून काही गुन्हा घडला तर त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्याबाबत तपास आपण करतो. त्याप्रमाणे येथे आपण केले आहे आणि त्या तपासामध्ये व्यत्यय नको म्हणून त्या अधिकाऱ्याची बदली केली आहे. आता या तपासामध्ये कोर्टाच्या आदेशाप्रमाणे, आदेशाचे पालन करावयाचे म्हणून त्यांनी कारवाई केली आहे का हे पाहिले जाईल. म्हणूनच आता या सगळ्या केसची चौकशी आय.जी. यांनी करून त्याचा अहवाल 15 दिवसात द्यावा असे त्यांना सांगण्यात येईल आणि यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांना मोकळे सोडले जाणार नाही इतकेच मी या बाबत सांगू इच्छितो तसेच या चौकशीचा अहवाल जो काही येईल तो सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल.

श्री. कन्हैयालाल गिडवानी : सभापती महोदया, काल मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना स्वत: भेटलो होतो. कारण ज्या दिवशी ही घटना घडली तेव्हाच मी मागणी केली होती की, प्रथमत: संबंधित पोलीस अधिकाऱ्याला आपण तात्पुरते निलंबित करावे जेणे करून या प्रकरणी चौकशी करणे सुलभ होईल. उपमुख्यमंत्र्यांनी स्वत: कालच्या उत्तरात मला लिहिले आहे की, प्रस्तुत प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये पीएसआय श्री.के.एन.पाटील हे दोषी आढळल्यामुळे त्यांची बदली करण्यात आलेली आहे आणि ..

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, त्यांचा दोष इतकाच होता की, ते हवालदारांना बरोबर घेऊन गेले होते तेव्हा ते रितसर पोलीस ठाण्यामध्ये नोंद करून गेले होते, मात्र त्यांना तसे जाण्याची आवश्यकता होती का ? याबाबतीत कोर्टाचे तसे आदेश होते काय ? वगैरे बाबतीत चौकशी होणे आवश्यक आहे. म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत आपण या प्रकरणी चौकशी करणार आहोत आणि यामध्ये दोषी आढळतील त्याप्रमाणे कारवाई आपण करू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( श्री.सरफरे .... एफएफ 1 ..

श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी : सभापती महोदया,माझ्या दोन मागण्या आहेत. एक म्हणजे चौकशी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला पाहिजे. कारण मी गेली 20 वर्षे सामाजिक क्षेत्रामध्ये काम करीत असल्यामुळे मी अब्रूला घाबरणारा माणूस आहे, इतर कुणालाही मी घाबरीत नाही. त्याठिकाणी टी.व्ही. च्या कॅमेरेवाल्यांना पोलीस बोलावून फोटा काढतात व माझे नाव बदनाम करतात. असे असतांना आपण कुणाला पाठीशी घालीत आहात? दिनांक 5.9.2005 ला ते तुमच्या ताब्यात होते. दिनांक 5.9.2005 पी.सी. घेण्यात आली व ती पी.सी. नंतर वाढवून घेण्यासाठी पोलीसांनी कार्यवाही कां केली नाही? कारण त्या दिवशी टेबलवर पैसे घ्यायचे होते. पोलीस स्टेशनमध्ये अगोदर 3 लाख 50 हजार आणि नंतर 25 हजार रुपये असे एकूण 3 लाख 75 हजार रुपये देण्यात आले. माझी याबाबत खात्री असल्याशिवाय मी सभागृहामध्ये असे आरोप कधीही करणार नाही. हा आजचा विषय नाहीतर गेल्या तीन महिन्यापूर्वीचा विषय आहे. मी स्वत: ही घटना घडल्याबरोबर फोनवर आपणाबरोबर बोललो व दोन वेळा आपणास भेटलो. व याबाबतची संपूर्ण माहिती दिलेली आहे. संजय गिडवाणी यांचेवर आपण कोणती कारवाई करावयाची असेल ती करावी. कारण यामध्ये माझ्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. मी यासंबंधी नंतर माहिती घेतली. माझ्या घरामध्ये माझा धाकटा भाऊ रहातो त्याच्याकडे सकाळी साडे सहा वाजता पैसे वसूल करण्यासाठी गेले. आपल्याला जर नोंद करावयाची असेल तर सांगली पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तेथील पोलीस अधिकाऱ्यांना आपल्याला बरोबर घ्यावे लागते. त्यांनी त्या ठिकाणी पंचनामा करावयाचा असतो, तो पंचनामा त्यांनी केला नाही. कारण त्यांना पैसे काढायचे होते, दहशत निर्माण करुन पैसे काढायचे होते. आणि त्यांना घरुन घेऊन नंतर पोलीस स्टेशनमध्ये नोंद केली. तेव्हा नोंद केल्यानंतर हा सर्व प्रकार झाला आहे. तेव्हा आपण त्यांना निलंबित करण्याचे आज आदेश द्या. तेव्हा याबाबतीत आपण श्री. के.एन.पाटील व श्री. ओगल मोगले या दोघांना निलंबित केले पाहिजे.कारण ते दोषी असल्याचे आपण तारांकित प्रश्नाच्या उत्तरात स्वत: कबूल केले आहे. तेव्हा आपण त्या दोघांना निलंबित करुन व या प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन चौकशी अहवाल हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहासमोर ठेवावा अशी विनंती करतो.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदया, हे अधिवेशन संपण्यापूर्वी आय.जी.मार्फत चौकशी अहवाल मागविला जाईल. आणि चौकशी करुन जर ते दोषी सापडले तर त्यांना निलंबित काय त्यापेक्षा कठोर शिक्षा करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, जी माहिती देण्यात आली आहे त्याप्रमाणे पोलिसांची वर्तणूक आहे. कोर्टाने आपल्याला असे सांगितले आहे की, संबंधित आरोपींच्या घरी जाऊन पैसे वसूल करा व नंतर प्रतिबंधात्मक कारवाई करा? माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे त्या मुलाला पोलीस स्टेशनमध्ये संपूर्ण दिवस बसवून ठेवले. त्याला बसवून ठेवल्यानंतर त्याच्याकडून पैसे वसूल केल्यानंतर पुढील कारवाई झाली. तसे कोर्टाचे आदेश आहेत काय? दुसरा प्रश्न असा की, जी माणसे आरोपी म्हणून पकडली जातात त्यांच्याकडून पूर्ण चौकशी न करता त्याच्यावर कारवाई करणे उचित आहे काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदया, एकतर या घटनेची चौकशी करावयास सांगितली असल्यामुळे त्यासंबंधी अगोदर मत व्यक्त करुन मी उत्तर दिले तर त्याचा चौकशीवर परिणाम होईल. याठिकाणी 3 लाख 75 हजार रुपये या बलदवा व्यापाऱ्याचे संजय गिडवाणी यांच्या खात्यावर साखरेपोटी जमा झाले आहेत. परंतु साखर दिली नाही म्हणून त्याने तक्रार केली. त्या तक्रारीची दखल घेतली नाही म्हणून त्याने कोर्टामध्ये अर्ज केला. अर्ज करण्यात आल्यानंतर फसवणुकीच्या गुन्हयाची नोंद करण्याचे आदेश कोर्टाकडून मिळविण्यात आले. आरोपीला अटक करण्यात आली, पैसे कुठे आहेत? त्यांनी जी नावे सांगितली त्यांच्यासाठी पोलीस घरापर्यंत पोहोचले. अशापध्दतीने आतापर्यंतचा तपास असा आहे. यामध्ये दोष इतकाच आहे की, एक हवालदाराकडे तपास अधिकारी असतांना हवालदाराने इतके जबाबदार लोक आहेत व मी छोटा अधिकारी आहे आणि कोर्टाचे आदेश आहेत अशापध्दतीची भावना व्यक्त केल्यावर जर त्या पोलीस स्टेशनमधील कुणी अधिकारी गेले असतील तर या संपूर्ण घटनेची चौकशी झाली पाहिजे, ती होण्याची आवश्यक आहे. म्हणून मी अधिवेशन संपण्यापूर्वी चौकशी अहवाल मागितला जाइल असे सांगितले आहे. अन्यथा आपली जर अपेक्षा असेल की, आमदारांच्या घरी चौकशी करण्यास पोलीसांना पाठवायचे नाही आणि चौकशी न करता पोलीसांना सस्पेंड करायचे.अशी जर भावना असेल तर आपण तसे सांगा.

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. कोर्ट अशा प्रकारणात आदेश देते की, सदर गुन्हा जर दाखल करुन घेतला नसेल तर तो गुन्हा दाखल करुन घ्या. तेवढयापुरतेच कोर्टाचे आदेश असतात, त्यापुढे कोर्टाचे आदेश कधीही नसतात. या कोर्टाच्या आदेशान्वये ज्यांना अटक झाली आहे. त्यांना नंतर पोलीस कस्टडी घेऊन त्यांची चौकशी केली. या चौकशीच्या निमित्ताने म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणास्तव ज्या लोकांना चौकशीसाठी घेऊन गेले होते, त्यांना आजतागायत अटक केलेली नाही. त्यांना असेच सोडून दिलेले आहे. कोणत्याही अशा प्रकारच्या केसेसमध्ये ज्यावेळी कोर्ट गुन्हा दाखल करण्याचे आदेश देते, त्यावेळेला ज्यांना अटक झालेली आहे. ज्यांची पोलीस चौकशी चालू आहे. त्यांच्याकडून माहिती घेऊन जे दुसरे आरोपी कोर्टात किंवा पोलीस स्टेशनला नेले जातात, त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल करावा लागतो. या सगळया प्रकरणात असे दिसते की, याठिकाणी कोर्टाच्या आदेशाचा फायदा घेऊन पोलिसांनी वसूलीचे काम केलेले आहे आणि अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये पोलीस वसूलीची कामे करतात हे केवळ आजचेच नाही तर अशी असंख्य उदाहरणे आहेत. सर्वसाधारण माणसाच्या बाबतीत सांगावयाचे तर अशा प्रकारे जर कोणी अपहार केला असेल तर पोलीस सांगतात की, हे सिव्हील मॅटर आहे, ते तुमचे तुम्ही पाहून घ्यावे. हे क्रिमिनल मॅटर होऊ शकत नाही. पण वसुलीची प्रकरणे जेव्हा स्पेसिफीक अशा पध्दतीने केली जातात, तेव्हा मॅजिस्ट्रेटच्या ऑर्डर्स् घेतल्या जातात आणि पोलिसांच्या वसुलीची ही एक मोडस ऑपरेंडी झालेली आहे. या प्रकरणात हेच दिसते की, कोर्टाचे स्पेसिफीक आदेश नसताना, फक्त फसवणुकीचा गुन्हा दाखल करा किंवा योग्य असेल तो गुन्हा दाखल करा अशा प्रकारचे कोर्टाचे आदेश असतात. या प्रकरणामध्ये असे दिसते की, याठिकाणी ज्यापध्दतीने त्यांना नेले आहे आणि पैसे वसूल झाल्यावर सोडून दिले आहे. त्यामुळे प्रायमाफेसी हे अधिकारी दोषी असल्याचे दिसत आहे. म्हणून त्यांना तात्काळ निलंबित करावे आणि त्यानंतर याची चौकशी करावी अशी मी विनंती आपल्याला करीत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, 420 चा गुन्हा दाखल करावा अशा पध्दतीचे आदेश कोर्टातून आले. आरोपीला अटक करण्यात आली. 3 लाख 75 हजार रुपये कुठे आहेत याची पोलिसांनी विचारणा केल्यानंतर जी नावे सांगितली, तेथपर्यंत पोलीस पोहोचले आहेत हे एकंदरीत रेकॉर्ड पाहिल्यावर दिसत आहे. यामध्ये कोर्टाने आदेश दिल्यानंतर, तपास करताना यात पैशाचा जो अपहार झालेला आहे, तो जप्त करणे हा पोलिसांच्या डयुटीचा भाग होता आणि तेथे

. . . .2 जी-2

श्री.आर.आर.पाटील . . .

पोहोचणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. तरीसुध्दा माझ्याकडे तक्रार आल्यानंतर ज्या संबंधित इन्व्हेस्टीगेशन ऑफीसरची ही जबाबदारी होती, त्यानेच हे काम करावयास हवे होते. पण अतिरिक्त पोलीस बल मागविले. तसे अतिरिक्त पोलीस बल नेहमीच मागविले जाते. एखाद्या ठिकाणी धाड टाकावयाची असेल, कोणाला अटक करावयाची असेल तर आणखी सहाय्य घेतले जाते. मी या प्रकरणात अधिक भाष्य करु नये असे मला वाटते. म्हणून अधिवेशन संपण्यापूर्वी मी आय.जीं.कडून रिपोर्ट मागवेन. अधिकाऱ्यांची कारवाई एक्सेस असेल, त्यांनी जादा गरजेपेक्षा अधिक कारवाई केल्याचे आढळून आले तर त्याबाबतीत मी कारवाई करण्याचा शब्द दिला आहे. आता हे प्रकरण येथे थांबवावे एवढेच मला वाटते. जर चौकशी न करता कोणाला सस्पेंड करावे किंवा निलंबित करावे असे दिलेले आदेश कोर्टात टिकत नाहीत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, मी माननीय मंत्री महोदयांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. कालच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये या विषयाच्या संदर्भात जी उत्तरे देण्यात आली आहेत. मी तेवढयापुरताच संदर्भ असलेला प्रश्न वाचून दाखवितो. याठिकाणी चौथ्या क्रमांकाच्या प्रश्नामध्ये असे म्हटलेले आहे की, "असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ? असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?" या प्रश्नाला शासनाने असे उत्तर दिले की, "प्रस्तुत प्रकरणी केलेल्या चौकशीत श्री.के.एन.पाटील, पोलीस उपनिरीक्षक हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांची बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे." असे आपण कालच उत्तर दिलेले आहे. म्हणून प्रश्न निर्माण होतात. तसेच दुसऱ्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीकरता आरोपींचे भाऊ दीपक व राजू गिडवाणी यांना पोलीस ठाण्यात बोलावून, त्यांच्या वकिलांसमोर चौकशी करुन त्यांना सोडून दिले. त्यांना अटक केली नाही." म्हणून सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी देखील असे नमूद केले की, त्यांना अटक करावसयास हवी होती, त्यांच्यावर गुन्हा दाखल करावयास हवा होता. पण काहीही केले नाही. त्यांना बसवून ठेवले. वकिलासमोर चौकशी केली आणि त्यांना सोडून दिले. याचा अर्थच असा आणि सकृतदर्शनी सरळसरळ असे दिसते की,पोलिसांनी त्या माणसाशी हातमिळवणी करुन पैसे वसुलीचे काम केले, न पेक्षा आपण त्या अधिकाऱ्याची बदली केली नसती.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु...

पोलीस सुपरिंटेंड त्या ठिकाणी फक्त गेले, एवढया कारणासाठी त्यांची बदली करण्यासाठी फार मोठे कारण आहे,असे वाटत नाही. तुम्ही वारंवार सांगता की, ते फक्त हवालदाराबरोबर अनधिकृतपणे गेले, हे योग्य नाही, म्हणून त्यांची बदली करणे योग्य नाही.

**तालिका सभापती** (श्रीमती कांता नलावडे ) : आपण प्रश्न विचारावा.

श्री.अरविंद सावंत : म्हणून माझी विनंती आहे की, दोन्ही गोष्टी यामध्ये आहेत. एका बाजूला आपण गुन्हा दाखल करत नाही, त्यांना सोडूनही देत नाही आणि दुसऱ्या बाजूला त्यांना त्रासही देत आहात, तरी देखील चौकशी करुन बदली करता. यावरुन असे दिसते की, या दोन्ही अधिकाऱ्यांचा यामध्ये हात आहे, म्हणून त्यांना तातडीने निलंबित करुन चौकशी करावी ही विनंती.

ॲड.अनिल परब : 420 अन्वये गुन्हा दाखल केला असेल आणि मुद्देमाल जप्त करण्यासाठी श्री.राजीव गिडवाणी आणि दीपक गिडवाणीपर्यन्त आरोपींपर्यन्त पोलीस पोहोचले. त्यांच्याकडून पैसे मिळाल्यानंतर त्यांच्या विरुध्द कोणताही गुन्हा न नोंदविता त्यांना सोडून दिले. ज्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला जातो ते देखील आरोपी असतात. त्यांच्याकडून पैसे आलेले असतील तर आजपर्यन्त त्यांना अटक का केली नाही ? त्यांना कोणत्या कारणाने सोडून दिले ? म्हणून अतिशय स्पष्ट दिसते की, फक्त पैसे वसूल करण्यासाठी त्यांना आतापर्यन्त घेऊन गेले होते. जसे त्यांच्याकडून पैसे वसूल झाले. पुढे कोर्टामध्ये जे काही म्हणणे असेल ते येईलच. परंतु प्रथमदर्शनी असे दिसते की, पैसे वसूल झालेले आहेत. म्हणून तात्काळ मागणी करतो की, पहिल्यांदा त्या दोन अधिकाऱ्यांना निलंबित करावे. त्या अधिकाऱ्यांना निलंबित केल्याशिवाय ही चौकशी व्यवस्थित होणार नाही. कारण ज्या पध्दतीने धमकावून पैसे वसूल केलेले आहेत, तशाचपध्दतीने बाकीच्या साक्षीदारांना धमकावून पोलीस ही चौकशी दाबतील. जे अधिकारी चौकशीला जातात ते तळापर्यन्तच्या सगळयांच्या साक्षी घेतात, असा आतापर्यन्तचा इतिहास नाही. कशा पध्दतीने हे प्रकरण दडपले जाईल याची मला पूर्ण माहिती आहे. हे प्रकरण दडपले जाऊ नये, अशी गृह विभागाची इच्छा असेल तर अगोदर संबंधितांवर निलंबनाची कारवाई करावी, त्यानंतरच चौकशी करावी,अशी माझी मागणी आहे.

श्री.आर.आर.पाटील : गृह विभागावर हेत्वारोप करण्याची काहीही आवश्यकता नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : हे वसूल केलेले पैसे डिपॉझिट केलेले आहेत काय ? कोर्टाचे प्रोसिजर पूर्ण केली नाही तर आपण पुढे कसे जाणार ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ RJW/ D/

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदया, नियमाप्रमाणे काम झालेले आहे. येथे एकच प्रश्न उपस्थित झालेला आहे की, सन्माननीय आमदारांच्या नातेवाईकांच्या घरामध्ये जाणे आणि त्यांना पोलीस स्टेशनला बोलाविणे..हाच तर गुन्हा आहे. (अडथळा).. पोलिसांचा हा गुन्हा असेल तर येथून पुढे पोलीस जे काम करतील, त्याबाबतीत त्यांना सस्पेंड केले तर दुसऱ्या प्रांतातून पोलीस आणून राज्य चालवावे लागेल.

ॲड.अनिल परब : आमदारांच्या घरामध्ये जाऊन चौकशी करण्यास हरकत नाही...

श्री.आर.आर.पाटील : एका लोकप्रतिनिधींनी याची निपक्षपातीपणाने चौकशी व्हावी म्हणून मागणी केली. चौकशीमध्ये पोलीस अधिकारी तेथेच ठेवले तर साक्षीपुरावे देण्यासाठी कोणी पुढे येत नाहीत. चौकशीमध्ये कोणताही व्यत्यय येऊ नये, म्हणून त्यांची बदली करुन तातडीने चौकशी करावी, अशापध्दतीच्या सूचना मीच दिलेल्या होत्या. सभापती महोदया, मी सांगितले की, सगळीच यंत्रणा काही बिघडलेली नाही. आय.जी. लेव्हलचे अधिकारी या घटनेचा तपास करतील, चौकशी करतील. अधिवेशन संपण्यापूर्वी मी सदनाला अहवाल देखील देईन. केवळ घरच्या लोकांना बोलाविले, म्हणून अधिकाऱ्याना सस्पेंड करायला लागलो तर महाराष्ट्रात नियमावली करावी लागेल की, कोणत्याही आमदाराला चौकशीसाठी बोलवायचे नाही, कोणत्याही आमदाराच्या नातेवाईकाला बोलवायचे नाही. कोर्टाने आदेश दिले नसते तर 3 लाख 75 हजार रुपये खात्यावर जमा झाले नसते. स्वत:होऊन पोलीस कोठेही गेले नव्हते. ते कोर्टाच्या आदेशामुळे गेले.

ॲड.अनिल परब : आमदारांच्या घरामध्ये पोलीस गेले म्हणून त्यांची बदली करणे योग्य नाही. सुपारी घेऊन अशाप्रकारचे काम करण्याची पोलिसांची मोडस ऑपरेंटी आहे.

श्री.आर.आर.पाटील : सुपारी घेऊन अशाप्रकारची गोष्ट घडल्याचे निष्पन्न झाले असेल तर त्यांना निलंबितच काय तर सेवेतून बडतर्फ करायचे असेल तर तेही केले जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : हरकतीच्या मुद्याला उत्तर आलेले नाही.

**तालिका सभापती** (श्रीमती कांता नलावडे) : हरकतीच्या मुद्याला धरुनच मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

...(अडथळा)...

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ 14:50

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, या ठिकाणी आम्ही आता जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता त्या सदंर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. कोर्टाचा आदेश आला की, अमूक माणसाने पैसे घेतले आहेत. त्यांची थकबाकी आहे. आणि त्यांने पैसे परत भरलेले नाहीत. म्हणून तुम्ही जाऊन या माणसाची चौकशी करा आणि हे पैसे रिकव्हर करा, असा कोर्टाचा ओदश आहे असे मी गृहीत धरतो. तो कोर्टाचा आदेश आम्ही बघितलेला नाही. तो मंत्रिमहोदयांनी बघावा आणि सदनालाही तो बघायला मिळाला तर चांगली गोष्ट आहे.माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, आरोपीच्या घरी जाणे यात काही चूक नाही. काही आरोप असेल तर त्या आरोपीला उचलून पोलीस स्टेशनला नेणे त्याला आमची काही हरकत नाही.

श्री. आर.आर.पाटील : आरोपात नाव निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी घरी जाणे ही नुसती चूकच नही तर महाचूक आहे..........

श्री. मधुकर सरपोतदार :मंत्रीमाहोदय, आपण असे काय बोलत आहात?आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

( काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, कुठले जरी आदेश आले तरी आमदारांच्या घरी जाता उपयोगाचे नाही असे आदेश काढण्यात येतील. सभापती महोदय, आमदारांनी आणि आमदारांच्या नातेवाईकांनी काही केले तरी पोलिसांनी त्याची चौकशी करावयाची नाही. पोलिसांच्या ज्युरीसडिक्शनमध्ये आमदार नाहीत......

( काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

ॲड. अनिल परब :आरोप असेल तर पोलीस कोणाच्याही घरी जाऊ शकतात. कायदेशीर दोष आढळून आला तर त्यांच्यावर किती दिवसात कारवाई अपेक्षित आहे हे मंत्रिमहोदयांनी सांगावे ?

श्री. आर.आर. पाटील : आय.जी. या गोष्टीची चौकशी करतील आणि अधिवेशन संपण्यापूर्वी मला अहवाल पाठवतील. जर कोणाचा थोडासा जरी दोष आढळून आला तरी कारवाई केली जाईल.

..2..

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया,मी आक्षेप घेतलेला नाही. माझे साधे दोन प्रश्न होते. त्याची उत्तरे आली नाहीत म्हणून मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. ही साधी केस आहे. फार मोठी कॉम्प्लीकेटेड केस आहे, असे मी मानत नाही. कोर्टाचा आदेश आहे म्हणून तो आदेश घेऊन पोलीस श्री.गिडवाणींच्या घरी गेले. त्यांना बोलावून आणले, पोलीसस्टेशनला नेले आणि त्यांना सांगण्यात आले की, तुमच्यावर असाअसा आरोप आहे,तर मी समजू शकतो. कोर्टाचा आदेश आहे म्हणून गुन्हा दाखल करावयास पाहिजे. मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 420 चा गुन्हा दाखल केलेला आहे. चांगली गोष्ट आहे. त्यांना ॲरेस्ट करा आणि कोर्टामध्ये तो प्रोडयुस करा. जर पैसे वसूल करावयाचे असतील तर कोर्टाच्या आदेशाने ते पैसे वसूल होतात. आणि जर पैसे वसूल झाले असतील तर ते पैसे कोर्टामध्ये डिपॉझिट करावे लागतात आणि त्यासंदर्भातील निर्णय कोर्ट घेते. आरोपीला सोडून देण्याचा अधिकार पोलिसांना नाही, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. आर.आर.पाटील : श्री. संजय गिडवाणींना ॲरेस्ट करण्यात आले होते. श्री. सरपोतदारसाहेब आपण माझे म्हणणे समजून घ्यावे. त्या आरोपीला 3 लाख 75 हजार रुपये कुठे आहेत असे विचारण्यात आल्यानंतर त्यांनी ज्या आरोपींची नावे सांगितली त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावण्यात आले. त्यांनी आमच्याकडे पैसे देण्यात आले नाहीत असे म्हटल्यानंतर त्यांना जाण्यास सांगितले. आरोपीने ही नांवे दिली नसती आणि त्या आरोपीकडे एका व्यापा-याचे 3 लाख 75 हजार रुपये गेले नसते तर इन्व्हेस्टिगेशन करण्याचा प्रश्नच नव्हता. एका व्यापा-याचे 3 लाख 75 हजार रुपये या श्री. संजय गिडवाणींकडे जमा झाले. ते पैसे कुठे आहेत या गोष्टीचा तपास करतांना त्या आरोपीने जी नांवे सांगितली त्यांना चौकशीसाठी बोलावले...

ॲड. अनिल परब : पैसे वसूल झाले असतील तर ते कोर्टात डायरेक्ट गेले पाहिजेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 3 लाख 75 हजार रुपये गेले कुठे ? ते पैसे कोर्टात भरले काय? पोलीस स्टेशनमध्ये जमा झाले काय? त्या पैशाचे काय झाले ?ज्यांनी ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यांना हे माहीत असेल

श्री.कुन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदया, माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी कोर्टाचा उल्लेख या ठिकाणी केला. 5 तारखेला सकाळी ज्यांचा गुन्हयाशी संबंध नाही त्या दोन मुलांना पोलीस स्टेशनला आणले, पैसे वसूल केले आणि त्याच दिवशी कोर्टात ॲफिडेव्हिट झालेले आहे. त्या दिवशी पेसी होती. कोर्टात जे ॲफिडेव्हिट झालेले ते मी या ठिकाणी वाचून दाखवितो.

यानंतर श्री. खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ......

"महाराष्ट्र सरकार विरुध्द संजय गिडवाणी यात मुळ फिर्यादी प्रविण मेघराज बदलवातर्फे ॲफिडेव्हीट केले की, सदर कामी वर नमूद आरोपी विरुध्द मी मे. जे.एम.एफ.सी. जयसिंगपूर यांचे कोर्टात प्रायव्हेट कम्प्लेंट क्र. 2/2005 दाखल केलेली आहे. मी व्यवसायाने व्यापारी असून माझा बरेच व्यापाऱ्यांशी व्यवसायाच्या निमित्ताने संबंध येत असतो. संजय गुलाब गिडवाणी हे पुर्वीपासून माझ्या चांगल्या परिचयाचे असून माझे व त्यांचे गेल्या बऱ्याच वर्षांपासून मित्रत्वाचे व व्यापारी संबंध आहेत. तसेच आमच्यामध्ये बऱ्याच वेळा साखर खरेदी विक्रीचे व्यवहार झालेले आहे. तसेच बऱ्याच वेळा व्यवहाराशी संबंधित आर्थिक देवाण-घेवाण झालेली आहे. सदरची फिर्याद ही आमच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या गैरसमजुतीतून दाखल केली गेली होती. परंतु सर्व व्यवहाराचा तपशिलवार आढावा घेतल्यानंतर माझे संजय गिडवाणी यांच्याबाबतचे व्यवहारातून निर्माण झालेले सर्व गैरसमज दूर झाले असून आजमितीला संजय गुलाब गिडवाणी हे मजला काही एक देणे घेणे लागत नाहीत. संजय गिडवाणी व माझे आज अखेरचे सर्व आर्थिक व व्यापारी व्यवहार व्यवस्थितपणे पूर्ण झालेले असून माझे व त्यांचेमध्ये कोणत्याही प्रकारचे देणे-घेणे राहिलेले नाही. पुर्वीपासून आमचे व्यापारी व मैत्रीचे चांगले संबंध असलेमुळे व भविष्यातील सदरचे संबंध असेच असावेत अशी आमच्या दोघांची इच्छा असल्याने मी संजय गिडवाणी यांचेविरुध्द गैर समजुतीतून दाखल केलेली फिर्याद काढून घेत आहे. फिर्यादित नमूद केलेल्या घटना हया केवळ व्यवहारातील गैरसमजामुळे झाल्या असून त्यामुळे मला सदरच्या फिर्यादीमध्ये कोणतेही स्वारस्य राहिलेले नाही. ज्यावेळी कोर्टात पी.सी. होता त्याच दिवशी हे झालेले आहे, त्या दिवशी पी.सी.ची मुदत वाढवून घ्यावयाची होती ती घेतली नाही. वरील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून तो खोटा निघाल्यास होणाऱ्या परिणामास मी जबाबदार राहीन."असे या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे आणि कोर्टात हे ॲफिडेव्हीट झालेले आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, आता माझ्याकडे असलेले ॲफिडेव्हीट मी वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, मी एक व्यापारी असून संजय गुलाब गिडवाणी, रा. सांगली यांच्याकडून साखर खरेदी करण्यासाठी रक्कम रु. 2.05 लाख रुपये दिले होते. त्याने मला साखर न देता माझी फसवणूक केली आहे. म्हणून मी मा. जयसिंगपूर कोर्टात त्यांचेविरुध्द केस दाखल केली आहे. त्याचा गुन्हयाचा तपास योग्य व चांगल्या प्रकारे चालला असतांना संजय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ........

गिडवाणी यांचे चुलते आमदार कन्हैयालाल गिडवाणी यांनी याला दूरवर कोठे तरी लपवून ठेवले व संजय गिडवाणी यांचा व माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. तो कोणी माझा नातेवाईक नाही. बलदेवाचे आणि माझे भांडण होते ही गोष्ट खरी आहे, तो पोलिसांकडे आला, पोलिसांनी त्याला सांगितले की, हे सिव्हील मॅटर आहे, तुमचे तुम्ही वसुलीचे बघा. त्यानंतर तो माणूस, बलदेव कोर्टात गेला, कोर्टाचे 156 प्रमाणे 420 दाखल करण्याचे आदेश घेऊन आला. फसवणूक, फसवणुकीची रक्कम ही चौकशी करीत असतांना ते घरापर्यंत पोहचले, स्वाभाविक नसेल दोष, मी मान्य करीत नाही तरीही एका आरोपीने सांगितल्यानंतर जो आरोपी आहे, नातेवाईक आहेत, त्यांच्या घरच्या माणसांना बोलाविले म्हणून मी सुध्दा माझ्याकडे नाराजीची भावना व्यक्त केली.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : महोदया, नाराजी वगैरे काही नाही. त्या संजय गिडवाणीचे काय करायचे ते करा. पण ज्या दोन मुलांना त्या घटनेशी संबंध नाही, त्यांना आठ तास पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले आणि तुमच्या गांडीत गोळी घालीन असे वर्तन त्यांच्याशी पोलिसांनी केले.

श्री. आर.आर.पाटील : महोदया, संजय गिडवाणीने पोलिसांना सांगितले की, हे पैसे गिडवाणी कुटुंबियांकडे ठेवले आहेत, त्यांच्या भाऊबंदकीतला आहे आणि बलदेवाने कोर्टात ॲफिडेव्हीट करुन दिले, कोर्टाचे आदेश आणले आणि बलदेवा नंतर म्हणतो की, माझी कुठलीही तक्रार नाही. असे करुन जर त्याने कोर्टाची व शासनाची फसवणूक केली असे आढळून आले तर बलदेवावरही गुन्हा दाखल करण्यात येईल.

---------

**<u>लक्षवूधी सूचना क्र. 4 बाबत.</u>**

**तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे)** : कार्यक्रम पत्रिकेवर लक्षवेधी सूचना क्र. 4, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांची दाखविलेली आहे. त्या खात्याच्या माननीय मंत्री महोदयांनी पत्र देऊन ही लक्षवेधी पुढे ढकलण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार ही लक्षवेधी सूचना क्र. 4 नंतर घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : महोदया, ही लक्षवेधी पुढे ढकलली तरी हरकत नाही परंतु ती अतिरिक्त म्हणून समजण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

(यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेखाच्या सूचना**

**पृ.शी.**: अतिवृष्टीमुळे कोकणातील नुकसान झालेल्या शेतक-यांना शासकीय मदत मिळण्याबाबत.
**मु.शी.**: अतिवृष्टीमुळे कोकणातील नुकसान झालेल्या शेतक-यांना शासकीय मदत मिळण्याबाबत मा. सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे)** : सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

एका बाजूला विदर्भातील शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करीत आहेत तर दुस-या बाजूला त्याच काळात म्हणजे जुलै महिन्यात कोकणात अतिवृष्टी झाली व त्यामुळे कोकणातील असंख्य शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले. एवढे नुकसान झाल्यानंतर ज्या पध्दतीने हा प्रश्न पुढे यावयास पाहिजे होता, कोकणातील शेतक-यांना मदत करावयास पाहिजे होती परंतु शासनाने कोकणातील शेतक-यांना कोणत्याही प्रकारची मदत केलेली नाही. परंतु एवढे खरे आहे की, विदर्भातील शेतक-यांनी जशा आत्महत्या केल्या तशा कोकणातील शेतक-यांनी केलेल्या नाहीत. कोकणातील शेतक-यांकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. शासनाच्या कृषी आयुक्तालयाने जमा केलेल्या माहितीनुसार रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि सिंधुदुर्ग या चार जिल्हयामधल्या एकूण 15915 गावांमध्ये पावसाने थैमान घातले. त्याचा फटका कोकणातल्या साडेसोळा लाख शेतक-यांना बसलेला आहे. दुर्गम भागातले पाडे-वस्त्यावरील अल्पभूधारक शेतकरी, आदिवासी-कातकरी यांना शासकीय यंत्रणेने मदत नाकारली आहे. कारण या ठिकाणी शेतजमिनीच्या नोंदी नाहीत. या ठिकाणच्या मच्छीमारांचे अपरिमित नुकसान झालेले आहे. कडे-कपारी कोसळून उध्वस्त झालेली घरे बांधून देण्याची कामे अजून अपूर्ण आहेत. ग्रामीण भागात हजारो लोक तात्पुरत्या घरांमध्ये रहात आहेत. पुरामध्ये जमिनीच वाहून गेल्याने शेतांच्या हद्दी पुसल्या गेल्या आहेत. एकेका माडासाठी आयुष्यभर कोर्टकचे-या करणा-या कोकणी माणसाच्या दृष्टीने ही समस्या अत्यंत किचकट आहे. यामुळे बांधाबांधावर वादविवाद होऊ शकतात

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

तसेच जमीन अस्तित्वात असल्याचा पुरावा नसल्याने शासकीय व्यवहारात अडथळे येऊ शकतात. विशेषत: आदिवासींच्या बाबतीत हा प्रश्न बिकट आहे. कारण इतकी वर्षे चालत आलेल्या परंपरेनुसार जमिनी कसल्या जात होत्या त्यानुसार मालकी हक्क ठरले होते. आता हे हक्क सिध्द करणे अवघड झाले आहे. कोकणातील एकूण लोकसंख्येपैकी साडेअकरा टक्के लोक आदिवासी आहेत. प्रामुख्याने त्यांची वस्ती असलेल्या पेण, रोहा, माणगाव, कर्जत, सुधागड, डहाणू आणि मुरबाड या तालुकयांना अतिवृष्टीचा जबर फटका बसला आहे. त्यामुळे या शेतक-यांना मदत देण्याची आवश्यकता आहे. कोकणातील शेतीचे जे नुकसान झाले त्याचे पंचनामे झाले आहेत. रायगड जिल्हयात पुरग्रस्त गावे 1,606 असून पूरग्रस्तांची संख्या 79,912 एवढी आहे व यातील 50 टक्के नुकसानग्रस्त शेती 32,946 हेक्टर एवढी आहे. रत्नागिरी जिल्हयात पुरग्रस्त गावे 924 असून पूरग्रस्तांची संख्या 18,400 एवढी आहे व यातील 50 टक्के नुकसानग्रस्त शेती 3,320 हेक्टर एवढी आहे. ठाणे जिल्हयात पुरग्रस्त गावे 1,700 असून पुरग्रस्तांची संख्या 85,175 एवढी आहे व यातील 50 टक्के नुकसानग्रस्त शेती 26327 हेक्टर एवढी आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात पूरग्रस्त गावे 115 असून पूरग्रस्तांची संख्या 3111 एवढी आहे व यातील 50 टक्के नुकसानग्रस्त शेती 707 हेक्टर एवढी आहे. त्यामुळे मी विशेष उल्लेखाद्वारे सरकारकडे मागणी करीत आहे की, कोकणातील अतिवृष्टीमुळे शेतजमिनी, घरे, गुरे-ढोरे, पिके आदींच्या नुकसानीची पाहणी पंचनामे आणि सर्वेक्षण या कामामध्ये चुका झालेल्या आहेत. शासकीय सर्वेक्षणाविषयी लोकांमध्ये शंका आहेत. त्यामुळे गावपातळीवर बारकाईने सर्वेक्षण होण्याची गरज आहे. नाहीतर गरजूऐवजी इतरच फायदा लाटण्याची शक्यता अधिक आहे. जसे मुंबईमध्ये खालच्या मजल्यावरील घराचे नुकसान झालेले असतांना चवथ्या मजल्यावरील माणसांनीच त्याचा फायदा घेतला तसा प्रकार कोकणात होऊ नये यासाठी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तातडीची मदत पोचवतांना भ्रष्टाचार झाल्याची उदाहरणे अनेक आहेत. नद्या, नाले, ओढे तसेच समुद्राचे पाणी घुसून येथील शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. अतिवृष्टीमुळे कोकणातील शेतीचे सर्व बांध फुटले आहेत. त्यामुळे आपली जमीन कोठून सुरु होते हे समजत नसल्यामुळे मोठया प्रमाणात वाद निर्माण होत आहेत. विदर्भातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या म्हणून त्यांना नुकसान भरपाई

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ......

दिली जाते परंतु कोकणातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या नाहीत म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे योग्य होणार नाही. त्यामुळे शासकीय मदत मिळविण्यासाठी कोकणातील शेतक-यांना आत्महत्या करावयास लावू नका. सहा महिने उलटून गेले तरी कोकणातील शेतक-यांना अजून पर्यंत कोणत्याही प्रकारची मदत मिळालेली नाही त्यामुळे कोकणातील शेतक-यांना त्वरीत मदत उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

-------------

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी मा.उपासभापती)**

**पृ.शी.**: श्री.तुकाराम मारुती तेरदाळकर,रा.कोल्हापूर यांनी बनावट जातीच्या दाखल्याच्या आधारे लढविलेली कोल्हापूर महानगरपालिकेची निवडणूक.

**मु.शी.**: श्री.तुकाराम मारुती तेरदाळकर,रा.कोल्हापूर यांनी बनावट जातीच्या दाखल्याच्या आधारे लढविलेली कोल्हापूर महानगरपालिकेची निवडणूक यासंबंधी माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

श्री.तुकाराम मारुती तेरदाळकर रा.विचारेमाळ, कोल्हापूर यांनी मागासवर्गीय जातीच्या बनावट दाखल्याच्या आधारे कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणूक लढवून शासनाची व जनतेची फसवणूक केलेली आहे, हे निदर्शनास येऊनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. म्हणून या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधत आहे.

उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.6 यांनी दिनांक 13.10.2003 रोजी श्री.तुकाराम मारुती तेरदाळकर यांना ग्रामविकास अधिकारी करवीर यांच्या दाखल्याच्या आधारे व श्री.तुकाराम मारुती तेरदाळकर यांच्या कुमारभवन कडगाव, ता.भूदरगड, जिल्हा कोल्हापूर यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावरून ते अनुसूचित जातीतील महार जातीचा असल्यासंबंधीचा दाखला दिलेला आहे व त्या आधारे कोल्हापूर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक लढविली. श्री.तेरदाळकर यांनी बनावट जातीचा दाखला घेतला असल्याबद्दल ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील...

जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे एका नागरिकाने दिनांक 5.1.2004 रोजी तक्रार केली असता जिल्हाधिकारी साहेब यांनी तक्रारदाराने दिलेल्या कागदपत्राची छाननी करून श्री.तेरदाळकर यांनी बनावट कागदपत्र तयार करून सादर केल्याचे हे प्रकरण पुढील कार्यवाहीकरिता अध्यक्ष, जात पडताळणी पुणे यांच्याकडे दिनांक 27 जानेवारी 2005 रोजी पाठविले. याबाबत जात पडताळणी समितीने आज पर्यंत कोणताही निर्णय दिलेला नाही. दरम्यान श्री.तेरदाळकर या व्यक्तीने 1995 साली स्वत:चे प्रतिज्ञापत्र व कोरगाव हायस्कूल कोल्हापूर या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला यांच्या आधारे अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्र.12 मधून कोल्हापूर महानगरपालिकेची निवडणूक लढविली व निवडून आल्यानंतर श्री.तेरदाळकर यांनी ज्या कोरगाव हायस्कूल कोल्हापूर या विद्यालयाचा शाळा सोडण्याचा दाखला जोडला होता त्या विद्यालयात ते कधीच शिकत नव्हेत. श्री.तेरदाळकर यांनी आपला जातीचा दावा जात पडताळणी समितीपुढे सादर करताना कर्नाटकातील जातीचे दाखले पुरावे म्हणून जोडलेले आहेत. अशा तऱ्हेने तीन वेगवेगळे जातीचे दाखले सादर करून अनुसूचित जातीचा असल्याचा आभास निर्माण करणाऱ्या श्री.तेरदाळकर यांच्यावर कारवाई करण्यात यावी व त्याची कागदपत्रे तपासून न बघता जातीचे दाखले देणारे अधिकारी व बनावट जातीच्या दाखल्याच्या चौकशीत दिरंगाई करणाऱ्या जातपडताळणी समितीची त्वरित चौकशी करावी ही विनंती.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील खाजगी प्राथमिक शाळेतील दिनांक 5 नोव्हेंबर 1997 पूर्वी सेवेत असलेल्या अप्रशिक्षित शिक्षकांना पत्राद्वारे डी.एड.करून त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय.

**मु.शी.**: राज्यातील खाजगी प्राथमिक शाळेतील दिनांक 5 नोव्हेंबर 1997 पूर्वी सेवेत असलेल्या अप्रशिक्षित शिक्षकांना पत्राद्वारे डी.एड.करून त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय या संबंधी माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सार्वजनिकदृष्टया महत्त्वाच्या असलेल्या पुढील विषयावर मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शालेय शिक्षण मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधू इच्छिते.

महाराष्ट्रातील खाजगी प्राथमिक शाळेतील दिनांक 5 नोव्हेंबर 1997 पूर्वीपासून सेवेत असलेल्या अप्रशिक्षित शिक्षकांना पत्राद्वारे डी.एड.करून त्यांच्या सेवा नियमित करण्याचा शासन निर्णय झालेला असणे, त्यानुसार अप्रशिक्षित शिक्षकांनी डी.एड.चे फॉर्म भरणे, परिषद पुणे यांनी डी.एड.साठी त्यांची रितसर निवड करणे, दरम्यान पोस्टल डी.एड.प्रवेश प्रक्रियेत काही जिल्हयात अनियमितता झाली असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्याने चौकशी करण्यासाठी दिनांक 27.3.2003 रोजी श्री.सु.बा.जगताप यांची चौकशी अधिंकारी म्हणून नियुक्ती होणे, या चौकशीत बाजू मांडण्याची संधी न देणे, मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या आदेशाचेही उल्लंघन करण्यात येणे, चौकशीमध्ये अनेक त्रुटी असणे, या संदर्भात मराठवाडा खाजगी प्राथमिक शिक्षक कृती समितीने विविध मार्गांनी केलेला पाठपुरावा, परंतु, याबाबत कुठलीही कार्यवाही न होणे, याबाबत तातडीने कार्यवाही होण्याची गरज.

....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापती स्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

**पृ.शी.**: रायगड जिल्ह्यातील व्यावसायिकांना घरगुती दराने विद्युत पुरवठा करण्याबाबत.

**मु.शी.**: रायगड जिल्ह्यातील व्यावसायिकांना घरगुती दराने विद्युत पुरवठा करण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील, यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" अलिबाग तालुक्यात खारेपाटामध्ये भातशेती, भाजीपाला इत्यादी पिकांवर शेतकरी आपली उपजीविका करीत आहेत. तर अलिबागच्या पश्चिम किनारपट्टीतील लोक हे नारळ-सुपारी भाजीपाला या प्रमुख बाबींवर आपली उपजीविका करतात. अलिकडे सुपारीच्या उत्पादनावर फार मोठ्या प्रमाणात रोगांचा प्रादूर्भाव होतो व त्यामुळे जवळ जवळ संपूर्ण पीकच नष्ट होत असल्याने सुपारी बागायतदार संकटात सापडले आहेत. अशा परिस्थीत तेथील तरुणवर्ग टुरीझमचा व्यवसाय करण्यासाठी पुढे येत आहे. त्याकरिता येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी निवासी गाळे बांधले जात आहेत. परंतु या निवासी गाळ्यांना पुरविण्यात येणा-या वीज पुरवठ्यावर वीज मंडळाकडून कमर्शिअल मीटर म्हणून गणना करुन त्यानुसार कमर्शिअल मीटर बसविण्याची सक्ती संबंधित व्यावसायिकांवर केली जात आहे. एम.आय.डी.सी.च्या म्हणण्यानुसार हा कमर्शिअल व्यवयास होत नाही.

आक्षी, नागाव, रेवदंडा, सासवने, किहिम, मांडवा आदी ठिकाणच्या समुद्र किना-यावर पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन येथील गरीब व गरजू व्यावयासिकांना उत्तेजन मिळण्यासाठी पर्यटकांसाठी करण्यात येणाऱ्या निवासी गाळ्यांवर घरगुती वापराच्या दराने वीज मंडळाने वीज बिलांची आकारणी करावी याकरिता मी विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

-------------

..2..

**पृ.शी.**: दगडखाणींच्या जमिनीवर कुळांची नावे लावल्याबाबत..

**मु.शी.**: दगडखाणींच्या जमिनीवर कुळांची नावे लावल्याबाबत माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जितेंद्र आव्हाड ( नामनियुक्त ) : मी सार्वजनिक महत्वाच्या अत्यंत गंभीर विषया संबंधी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे. सभापती महोदया, ठाणे येथील नागलाबंदर,भाईंदरपाडा, घोडबंदर रोड परिसरामध्ये सर्व्हे नं. 208 नवीन-4 या कोट्यावधी रुपये किंमतीच्या सुमारे 100 एकर जमिनीवर गेल्या 50 वर्षापासून अनेक दगडखाणी कार्यरत आहेत. असे असतानाही या दगडखाणीच्या जमिनीवर कुळांची नावे लावण्याचा धक्कादायक निर्णय ठाणे येथील महसूल विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या संगनमताने घेतलेला असून या संशयास्पद प्रकरणी कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाला असल्याची शक्यता आहे. महसूल विभागातील अधिकाऱ्यांची परिसरातील जमिनधानकांच्या संदर्भातील भूमिका नेहमीच अन्यायकारक असल्याने या सर्वच गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची नितांत आवश्यकता आहे अशी मी मागणी करीत आहे.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: प्रसुती रजा वाढविण्या बाबत

**मु.शी.**: प्रसुती रजा वाढविण्या बाबत सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

महिलांना प्रसुतीसाठी 3 महिन्यांची रजा मिळते. जर एखाद्या महिलेला जुळी मुले झाली तर तिलाही 3 महिन्यांचीच रजा मिळते. जुळी मुले जन्मत: साधारणपणे कमी वजनाची, अशक्त असतात. त्यांना सांभाळणे, त्यांची देखभाल करणे हे अतिशय कठीण काम असते. ती जर दोन वेळा प्रसुती झाली तर तिला 3-3 महिने रजा मिळते. तेव्हा माझी विनंती आहे की, "खास बाब" म्हणून जुळ्या मुलांच्या मातेला 6 महिने प्रसुती रजा द्यावी. दत्तक मातेला सुध्दा आपण 3 महिने बालसंगोपन रजा देऊ केली आहे. तद्‌वत बालसंगोपनासाठी ही रजा देणे शक्य आहे. एखाद्या महिलेला जुळी मुले झाली तर त्यांचा सांभाळ करण्यासाठी "खास बाब" म्हणून 6 महिने प्रसुती रजा देण्यात यावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.13 ते 3.30 पर्यंत मध्यंतर )

--------

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( **मध्यंतरानंतर** )

**अशासकीय विधेयके**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती, श्रीमती सुधा जोशी )**

**पृ.शी.**: रोजगार हमी ( सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XXIII OF 2004.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.)

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE HINDU MARRIAGE ACT, 1955 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक-7, हिंदू विवाह अधिनियम, 1955 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

महोदया, या विधेयकामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात काळाची गरज लक्षात घेऊन, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. हिंदू विवाह अधिनियम 1955 यात सुधारणा करण्याची आजच्या बदलत्या परिस्थितीत अपरिहार्यता निर्माण झालेली आहे. "विवाह" म्हणजे दोन भिन्न विचारसरणी भिन्न वातावरणात, दोन वेगळया घरात वाढलेल्या जिवनास एकत्र आणणारी बाब आहे. त्यातूनच घर, समाज, संस्कृती, राज्य आणि पर्यायाने देश बनत असतो. या हिंदू विवाह अधिनियमात काळानुसार बदल करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. दरवर्षी 1 डिसेंबर रोजी एड्स दिन साजरा केला जातो, त्यानुसार यावर्षी 1 डिसेंबर रोजी एड्स दिनानिमित्त देशभर आणि राज्यभर निरनिराळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. एड्स जनजागृतीसाठी महाराष्ट्र शासनाने जनतेला एड्स होऊ नये, जनतेला या रोगाची माहिती होऊन एड्सचे प्रमाण कमी व्हावे यासंदर्भात निरनिराळे कार्यक्रम आयोजित केले होते आणि आजही करीत आहे. या एड्समुळे आज अनेक संसार उध्वस्त झालेले आहेत. एड्स झालेल्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आपल्या देशामध्ये तर एड्ससारख्या प्राणघातक रोगाने थैमान घातले आहे. त्यामुळेच विवाहपूर्व एड्स चाचणी होणे गरजेचे आहे. या रोगाचे थैमान पाहता विवाहपूर्व एड्स चाचणी केली जावी असे मला वाटते.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे....

महोदय, आज भोगवादी वृत्तीमुळे "तेरी भी चुप और मेरी भी चुप" ही वृत्ती बळावू लागली आहे. या वृत्तीमुळे या एड्स रोगाचा प्रसार आपल्या प्रिय पत्नीपर्यंत पोहोचत आहे. "जियेंगे साथ और मरेंगे साथ" चा आधार घेत, त्याचा विपरित परिणाम त्यांच्या मुलांवर आणि पर्यायाने त्यांच्या कुटुंबावर होत आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..

आज घडीला लग्न जमवितांना जन्म पत्रिकेत 36 गुण मिळतात की नाही किंवा मंगळ, शनी वक्रस्थानी आहे काय हे पाहिले जाते. मुलाला वा मुलीला आठवा गुरु आहे, मंगळ, शनी आहे म्हणून लग्ने मोडली जातात. परंतु दुर्देवाने वर/वधू एच.आय.व्ही.बाधित नाहीत याची खात्री केली जात नाही. ही दुर्देवाची गोष्ट आहे. मुलगा फॉरिन रिटर्न आहे काय या पेक्षा मुलगा निरोगी आहे का हे पाहणे आज गरजेचे होऊन बसले आहे. दोन जीवांच्या संसाराला दृष्ट लागू नये म्हणून विवाहपूर्व रक्त तपासणी सक्तीची करणे आवश्यक आहे. आज राज्यात अशी परिस्थिती आहे की, हजारो विवाह होतात त्यात कितीजण एच.आय.व्ही. बाधित आहेत याची माहिती नसते. काही महाभाग ही बाब लपवून ठेवतात त्यामुळे एका निरपराध व्यक्तींचा बळी जातो. सभापती महोदया, एडस विषयक परिस्थिती किती भयानक आहे हे मी आपल्याला सांगू इच्छिते..

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

सन 1986 मध्ये मुंबई शहरामध्ये पहिला रुग्ण आढळून आला होता तेव्हा पासून आजतागायत या रोगाची लागण किती मोठया प्रमाणात आहे हे पुढील आकडेवारीवरुन दिसून येईल.

2004-2005 साली अती जोखमी गटामध्ये 3 लाख 33 हजार 580 व्यक्ती बाधित आहेत. दोन चाचण्यांवरुन एच.आय.व्ही. बाधित 25 हजार 882 आहेत. गेल्या वर्षीचे एच.आय.व्ही. बाधित प्रमाण 7.8 टक्के असून एडस रुग्ण 5 हजार 296 होते त्या पैकी 426 रुग्ण मरण पावले आहेत. एच.आय.व्ही. रिॲक्टीव्ह रक्ताचे 5745 नमुने घेण्यात आले होते. राज्यामध्ये 269 रक्त पेढया आहेत. त्यापैकी 250 कार्यरत आहेत. राज्यात ऐच्छिक सल्ला व रक्त तपासणी केन्द्रे 57 आहेत त्यापैकी 25 जिल्हा रुग्णालयात, 11 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात, 11 उप जिल्हा रुग्णालयात,10 महानगरपालिका रुग्णालयात आहेत. एच.आय.व्ही. बाधित आईकडून मुलाला होणारा संसर्ग प्रतिबंध आणि उपचार करण्यासाठी राज्यात 55 केन्द्रे स्थापन केली असून आता नवीन 16 केन्द्रे सुरु होणार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या 10 कोटी 25 लाख एवढी आहे लोकसंख्येच्या तुलनेने ही संख्या फारच कमी आहे. रक्त पेढयांचे प्रमाण तीन पटीने वाढविण्याची गरज आहे. मी अतिशय जबाबदारीने सभागृहात माहिती सांगू इच्छिते की,शासनाने वेळोवेळी दिलेल्या माहिती प्रमाणे 80 केन्द्रात एच.आय.व्ही.ची चिकित्सा होत असते. राज्यात 33 रुग्णालयात

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

माता काळजी विभाग आहे. जिल्हा केन्द्र शाळांमध्ये याबाबत कोणतीही उपाययोजना उपलब्ध नाही. एच.आय.व्ही. नियंत्रणाखाली केन्द्र शासनाने जागतिक बॅकेच्या सहाय्याने काही निधी राज्याला उपलब्ध करुन दिला आहे. तो पुढील प्रमाणे आहे.2002-2003 मध्ये राज्यात दहा हजार कोटी रुपये एच.आय.व्ही. रोगाच्या नियंत्रणासाठी खर्च झाले होते.तसेच 2003-2004 मध्ये दहा हजार कोटी रुपये खर्च झाले होते. 2004-2005 मध्ये दहा हजार कोटी रुपये खर्च झाले होते.मुंबई शहराची लोकसंख्या जवळजवळ पावणे दोन कोटी असून त्याकरिता फक्त पाच कोटी रुपये जागतिक बॅन्केच्या सहाय्याने एच.आय.व्ही. या भयानक रोगाच्या नियंत्रणासाठी उपलब्ध करुन दिले जातात रुग्णांच्या मानाने ही रक्कम तुटपुंजी असून त्याही पेक्षा मोठी रक्कम उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.तेव्हा शासनाने ही रक्कम वाढवून द्यावी अशी मी या निमित्ताने विनंती करते.

सभापती महोदय, "दैनिक सकाळ" या वृत्तपत्रामध्ये एक बातमी आली होती. भाऊ आणि बहिण यां दोघांनाही एडस् झाला असल्याची बातमी या वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर आली होती आणि ती वाचल्यावर मला आश्चर्याचा धक्का बसला होता. भाऊ बहिणींना हा एडस कसा होऊ शकतो? असा विचार माझ्या मनात आला होता.संपूर्ण बातमी वाचल्यानंतर असे लक्षात आले की, ही दोघेहीजण बॅडमिन्टन खेळावयास जात होती आणि खेळून झाल्यावर ती एका भेळवाल्याकडून भेळ घेत होती.ही भेळ बनवितांना तो भेळवाला कांदा कापत होता तेव्हा त्याचे बोट सुरीने कापले जावयाचे.त्यातून या दोघांना एडस् झाला होता. एका उच्च सुशिक्षित व ससंस्कृत कुटुंबातील भाऊ बहिणींला प्रथम ताप आला असता प्राथमिक उपाययोजना करुनही ताप जात नसल्याने आई वडिलांनी डॉक्टरांकडे जाऊन त्यांची रक्त तपासणी केली असता त्या चाचणीत त्यांना एडस् झाल्याचे निदर्शनास आले होते..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

ज्यावेळेस त्या मुलांच्या आईवडिलांना ही गोष्ट कळली तेव्हा त्यांना धक्काच बसला. पण तोपर्यंत ते दोन्ही बहीण-भाऊ मृत्यूच्या दारामध्ये गेलेले होते. नंतर त्या मुलांच्या आई-वडिलांनी हे कसे झाले याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, ही मुले कोणाच्या संगतीमध्ये होती, वगैरे माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांना अशी माहिती मिळाली की, ते दोघेही ज्या ठिकाणी बॅडमिंटन खेळण्यासाठी म्हणून जात होते आणि तेथून परत येताना एका भेळवाल्याकडे भेळ खात असत. आणि त्या भेळवाल्याकडे भेळ खाल्यामुळे त्यांना एडस् झाला ....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी या ठिकाणी इंटरप्शन करून सांगू इच्छितो की, अशा प्रकारे भेळ खाल्यामुळे एडस् होत नाही. ...

श्रीमती मंदा म्हात्रे : मला असे सांगावयाचे आहे की, तो भेळवाला भेळ करताना कांदा कापायचा आणि कांदा कापताना त्याचे बोट दोन तीन वेळा कापले होते आणि त्याचे रक्त लागलेली भेळ या दोघांनी खाल्ली होती आणि त्यातून त्यांना एडस् झाला होता. ... सभापती महोदय, ही सगळी माहिती 'दैनिक सकाळ' या वृत्तपत्रातून आलेली आहे ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी पुन्हा एकदा सांगतो आणि या ठिकाणी सन्माननीय मंत्री डॉ.गावित हे देखील उपस्थित आहेत, तेही याबाबत माहीतगार आहेत. फ्रॅक्शन ऑफ द सेकंड हा वायरस जीवंत असतो आणि तो आपल्या शरीरातील कोणत्याही प्रकारचा डिस्चार्ज म्हणजे स्त्राव असतो त्यातून दुसऱ्या माणसाच्या स्त्रावामध्ये जातो आणि त्यातून एडस् होत असतो.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी हे सारे वर्तमानपत्रातील बातमीवरून येथे सांगते आहे की, अशा अशा गोष्टींमुळे देखील एडस् सारखे गंभीर रोग होऊ शकतात. अनेकदा हॉटेलमध्ये जे कर्मचारी ठेवले जातात ते कमी पैशामध्ये ठेवले जातात आणि त्यांची आरोग्याची काळजी देखील घेतली जात नाही तसेच ते कर्मचारी तेथे कपबशा धुण्यापासून भाजी कापण्यापर्यंतची कामे करीत असतात आणि ती कामे करीत असता अशा प्रकारे छोटासा अपघात होऊन त्यातून या अशा रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो हे मला येथे सांगावयाचे आहे. थोडक्यात, एडस् हा रोग केवळ लैंगिक संबंधातूनच होतो असे नाही.

( **सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती कांता नलावडे** )

.... पीपी 2 ..

श्रीमती म्हात्रे ....

सभापती महोदय, आपल्या बाजूच्या गोव्या सारख्या छोट्या राज्याने देखील या संबंधात एक कायदा केला आहे. त्यांनी दूरदृष्टी ठेवून एक महत्त्वपूर्ण असा निर्णय घेतला की, लग्नापूर्वी रक्तगट चाचणी होणे सक्तीचे आहे. भावी पिढी निरोगी रहावी यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला आहे आणि कायदा केला आहे. आपले महाराष्ट्र तर पुरोगामी विचारांचे राज्य असून या राज्यामध्ये आतापर्यंत असे अनेक निर्णय घेतले गेलेले आहेत. उदा. सतीचा कायदा या राज्यामध्ये प्रथमत: करण्यात आला. इतकेच नाही तर बालविवाह रोखण्याचाही कायदा आपण केला आहे. नुकतेच माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी डान्सबार बंदीचा कायदा केला. जेणे करून तरूण पिढी अशा बारस् मध्ये जाऊन अनैतिक मार्गाला लागत होती, त्यातून अनैतिक संबंध वाढत होते ते सारे बंद करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तसेच सन्माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी देखील दोन मुले असतील त्यांना पाणी बंदी करण्यात यावी असाही निर्णय या राज्यात घेतला गेलेला आहे. त्या प्रमाणेच एडस् बंद होण्यासाठी प्रत्येक तरूण-तरूणींची लग्नापूर्वी रक्त चाचणी होणे गरजेचे आहे असा कायदा आपण करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपण या सभागृहामध्ये दुष्काळावर अनेकदा चर्चा करतो त्यावेळी सदस्य आपापल्या जिल्ह्यातील व्यथा येथे सांगत असतात. या दुष्काळावर मात करण्यासाठी आपण मध्यंतरी कृत्रिम पावसाचा प्रयोग देखील करून पाहिला पण निसर्गावर आपण मात करू शकलो नाही. 150 वर्षापूर्वी महात्मा फुले यांनी पाणी अडवा आणि पाणी जिरवा असे सांगितले होते आणि हे सांगण्यामध्ये त्यांची दूरदृष्टी होती पण त्या काळात त्याचा फारसा उपयोग झाला नाही. पण आज त्याचे महत्त्व आपल्याला कळून चुकले आहे. त्याचप्रमाणे आज आपण या एडस् रोखण्याच्या दृष्टीने काही पावले दूरदृष्टी ठेवून उचलली नाहीत तर पुढील पिढी नष्ट होण्याच्या मार्गावर असेल हे मला येथे सांगावयाचे आहे.

( यानंतर श्री.सरफरे .... क्यूक्यू 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

09-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )QQ 1

DGS/ D/ RJW/ 15:45

श्रीमती मंदा म्हात्रे...

आज आपण अशाप्रकारची दूरदृष्टी ठेवली नाहीतर पुढील पिढी सुध्दा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी "पाणी अडवा पाणी जिरवा" असे सांगितले होते. परंतु त्यावेळी तशी दूरदृष्टी ठेवली नाही.आणि म्हणून आज दूरदृष्टी ठेवून निर्णय घेण्यात आला तर आपण पुढील पिढीला खरोखरच त्यामधून वाचवू शकतो. सभापती महोदय, आज देशामध्ये त्सुनामीची लाट मोठया प्रमाणात आली. त्यामध्ये अनेक लोकांचे संसार उध्वस्त झाले, घरे वाहून गेली, अनेक कुटुंबेच्या कुटुंबे बेघर झाली. त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये महापूर आला. त्या महापूराला सामोरे जातांना अनेक लोक स्वत:ची घरे हरवून बसली. त्यांच्यापर्यंत मदतीचा हात पोहोचला नाही. सांगण्याचा उद्देश असा की, ही लाट आली तर आपण त्याबाबत उपाय योजना करु शकतो. महापूर आला तर त्यांच्यासाठी मदतीचा हात देऊन त्यांचा वाचविण्याचा प्रयत्न करु शकतो. परंतु राज्यात एड्‌सची त्सुनामी लाट येत आहे तिला वेळीच पायबंद घातला गेला नाहीतर भविष्यात पुढील पिढी आपल्याला माफ करणार नाही असे मला सांगावेसे वाटते. राज्यामध्ये 100 लोकांमध्ये 18 टक्के लोकांना एच.आय.व्ही. ची लागण झाली आहे, त्यामध्ये महिलांचे प्रमाण 10 टक्के आहे. देहव्यापार करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण 60 टक्के आहे,आईकडून मुलाला एच.आय.व्ही. झालेले प्रमाण 2 टक्के आहे. मुंबई ही आपली देशाची आर्थिक राजधानी असून त्या ठिकाणी प्रत्येक तासाला 11 लोकांना एड्‌सचा संसर्ग होतो इतकी भयानक वास्तवता आहे. ऑपरेशन करण्यापूर्वी इंजेक्शन देण्यासाठी वापरण्यात आलेल्या सुईमुळे एड्‌स झालेल्या रुग्णांचे प्रमाण 4 टक्के आहे. राज्यामध्ये 31 सप्टेंबर 2004 मध्ये केलेल्या प्रहरी सर्व्हेक्षणात असे आढळून आले आहे की, गरोदर स्त्रियांमध्ये एड्‌सचे प्रमाण 1.33 टक्के आहे. ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येत नाही. रक्त तपासणी करणाऱ्या सक्षम प्रयोगशाळा शहरातच काय पण ग्रामीण भागातही उपलब्ध नाहीत. क्षय रोग्यांमध्येही एड्‌सचे प्रमाण 11 टक्के आहे, यासाठीही कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. सभापती महोदय, एड्‌सबाधित असलेल्या मुली अल्पवयातच गर्भवती असल्याची धक्कादायक वस्तुस्थिती आढळून आली आहे. त्याचे दुष्परिणाम जन्म देणाऱ्या बाळावर होतात. मुंबईत वेश्या व्यवसाय करणाऱ्यांमध्ये 54.4टक्के अल्पवयीन मुली एड्‌सबाधित असून गर्भवती मुलींचे प्रमाण 22.3 टक्के आहे. मुंबईत वेश्या व्यवसाय करणाऱ्या एकूण महिलांमध्ये एड्‌सबाधित असलेल्यांचे प्रमाण 44.76 टक्के आहे. यामधील 1.13 टक्के महिला गर्भवती आहेत. शारिरीक संबंध ठेवलेल्या 14.78 टक्के महिलांना, 28 टक्के महिलांना दुसऱ्यांसोबत अंमली पदार्थाचे सेवन केल्यामुळे 9.3 टक्के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

महिलांना समलैंगिक संबंध ठेवल्यामुळे तर 0.65 टक्के महिलांना रक्तदानाच्या प्रक्रियेत एड्सची लागण झालेली आहे. एड्सला प्रभावीपणे आळा घालण्यासाठी विवाहपूर्व रक्त चाचणी हा प्रभावी मार्ग ठरु शकतो. गोव्या सारख्या छोटया राज्यात विवाहपूर्व रक्तचाचणी सक्तीची करण्याचा विचार तेथील राज्य सरकारने केल्यानंतर या निर्णयाला तेथे मोठा प्रतिसाद मिळाला. गोव्यासारखे छोटे राज्य हे करु शकते तर महाराष्ट्रासारखे पुरोगामी आणि पुढारलेले राज्य का करु शकत नाही हा खरा प्रश्न आहे. एच.आय.व्ही. किंवा गुप्त रोग हा कमी वयाच्या मुलीशी लग्न केल्यास होतो हा गैरसमज आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. त्याचप्रमाणे असुरक्षित संबंध, एच.आय.व्ही.ग्रस्त आई गरोदर असेल तर, रक्त दोषीकरण हे मुख्यत: रक्त पेढयातून दिले जाते. हे रक्त सरकारी इस्पितळातून तपासणी करुन प्रमाणित केले जाते. परंतु कित्येक वेळा यांची तपासणी पूर्णपणे केली जात नाही. आपणास माहीत आहे की, परदेशामध्ये मशीनचे बटन दाबल्यानंतर मोफत कंडोम मिळते. त्याच्याही पुढे जाऊन आपण फ्री कंडोम वाटप टेलिफोन बॉक्सप्रमाणे म्हणजेच मशीनचे बटन दाबल्यानंतर कंडोम मिळेल अशाप्रकारची व्यवस्था झाली पाहिजे. रेड लाईट एरियामध्ये ही योजना मुंबई सारख्या भागामध्ये कार्यान्वित केल्यास या रोगास काही प्रमाणात आळा ठरु शकेल. दूषित सूया वापरल्यामुळे म्हणजेच ड्रग्ज, कोकेन, चरस इत्यादीं अंमली पदार्थांचा वापर करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सूयांमधूनही एड्स होतो. साधारणपणे एका व्यक्तीला जर एड्सची लागण झाली असेल तर या सूईच्या वापरातून अनेक लोकांमध्ये हा रोग पसरु शकतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/RJW/D पूर्वी श्री.सरफरे . . . 15:50

श्रीमती मंदा म्हात्रे . . . .

त्याकडेही आपल्या लोकांनी थोडे लक्ष देणे गरजेचे आहे. लैंगिक शिक्षणाच्या बाबतीत सांगावयाचे तर स्त्रियांमध्ये 18 व्या वर्षी आणि पुरुषांमध्ये 20 व्या वर्षी सेक्स निर्माण होतो. पण त्यांना योग्य ते शिक्षण मिळत नाही. यासाठी शाळेत व महाविद्यालयांमध्येही एडस्‌चा प्रचार मोठया प्रमाणात केला पाहिजे.तसेच लग्न करताना अनेक प्रकारची माहिती घेणे आवश्यक आहे म्हणजे रक्त तपासणी प्रमाणपत्र दाखविल्याशिवाय लग्नपत्रिका छापणाऱ्यांनी पत्रिका छापू नयेत. जे कोणी रक्त तपासणी प्रमाणपत्र दाखविणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. तसेच हे प्रमाणपत्र नसेल तर ब्राम्हणांनी देखील लग्न लावू नये. नाहीतर ते देखील तितकेच दोषी असतील. त्याचप्रमाणे प्रमाणपत्र नसेल तर हॉलचे वाटपही करु नये, ब्राम्हणाने मुहूर्त सांगू नयेत, कॅटरर्स्‌ने कॉन्ट्रॅक्ट घेऊ नये अशा प्रकारच्या सुधारणा करणे गरजेचे आहे. 18 ते 20 वर्षाच्या आतील मुला-मुलींची लग्ने लावू नयेत अशी बालविवाह कायद्यात तरतूद आहे. त्याप्रमाणे ही बाब देखील कायद्यामध्ये अंतर्भूत केली पाहिजे. जेणेकरुन आपल्याला एडस्‌बाबतीत आळा घालता येईल. खाजगी ब्लड बँकांवर शासनाचे नियंत्रण नसते. त्यामुळे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या रक्तामध्ये एच.आय.व्ही. आहे किंवा नाही याबाबत खात्री नसते. पण जर रक्ताची चाचणी घेतल्यावर आपल्याला याबाबतीत समजते. अगोदर ही माहिती सांगितली जात नाही हे धातक आहे. याबाबतीत शासनाचे नियंत्रण असावे असे मी सुचवू इच्छिते. सभापती महोदय, आपला जो हिंदू विवाह कायदा आहे, त्यामध्ये या विषयाच्या अनुषंगाने सुधारणा घडवून आणली आणि ते विधेयक संमत करण्यात आले तर फार बरे होईल आणि पुढच्या पिढीचे प्राण वाचतील. एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----

. . . .2 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, हिंदु विवाह अधिनियम 1955 या राज्यामध्ये लागू असताना यात आणखी सुधारणा करण्यासाठी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी अशासकीय विधेयक मांडलेले आहे आणि या विधेयकामध्ये समाजाचे स्वास्थ्य बिघडविणाऱ्या एका गहन विषय मांडलेला आहे. एडस्ग्रस्त,एच.आय.व्ही.पॉझिटीव्ह व्यक्ती आपला आजार लपवून चक्क लग्न करते आणि मग आपल्या जीवनसाथीला एडस्सारख्या भयानक रोगाची भेट देते. यामुळे संपूर्ण कुटुंब उध्वस्त होते आणि हा अतिशय गंभीर गुन्हा आहे. एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करणारा हा गुन्हा आहे. यासाठी अत्यंत कडक कायदा करण्याची आवश्यकता आहे. यासाठी विवाहपूर्व रक्त तपासणीबाबत सक्ती करण्यात यावी असे या विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये म्हटलेले आहे. अशा प्रकारच्या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणे हे आवश्यक आहे. थ्रील म्हणून स्त्री संभोग करताना पुष्कळ तरुण आढळतात. तसेच चंगळवादी संस्कृतीमुळे अनैतिक संबंधामध्ये आजची तरुण पिढी म्हणजे तरुण आणि तरुणीसुध्दा गुरफटलेल्या आहेत. भोगवादी प्रवृत्तीमुळे "तेरी भी चूप, मेरी भी चूप" म्हणून हा एडस्सारखा भयानग रोग दुसऱ्यापासून लपवून ठेवतात. त्यामुळे आपल्या पत्नीकडे आणि क्वचित आपल्या पतीकडे सुध्दा या रोगाला हस्तांतरीत करीत असतात. पूर्वी एक गोष्ट होती की, रेड लाईट एरिया शहराच्या ठरविक भागामध्येच असे. तो एरिया मर्यादित होता. इच्छा असली तरी त्या वस्तीत जाण्यासाठी पुरुषांना लाज वाटत असे. समाजाचे दडपण असावयाचे. पण हल्ली मात्र लेडीज बार, मसाज पार्लर, हेल्थ क्लबच्या नावाखाली अनैतिक व्यवसाय गल्लीबोळात पसरलेला आहे. सध्या काही दिवसापासून मला त्या मुली दिसलेल्या नाहीत. पण एस.व्ही.रोडवर विलेपार्ले पश्चिमेला, जुहूला अगदी 7.45 ते 8.00 वाजल्या पासून अनेक मुली गिऱ्हाईकांची वाट पहात उभ्या असल्याचे मी पाहिले आहे. कारण एस.व्ही.रोड वरुन जुहूकडे जाण्याकरता माझा हा रोजचा रस्ता आहे आणि त्यामुळे या मुली तेथे उभ्या असल्याचे मी पाहिले आहे. परंतु या रोडपासून हाकेच्या अंतरावर जुहू पोलीस स्टेशन आहे. त्या भागात अनेक शाळा-कॉलेजेस् आहेत.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

श्रीमती सुधा जोशी (पुढे सुरु...

सर्रास वेश्याव्यवसाय चालतो. पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली तर हा व्यवसाय चालत नाही ना ? अशी शंका यावी इतपत त्या ठिकाणचा व्यवसाय चाललेला आहे, असे मी बघितलेले आहे. पण गेल्या काही दिवसात त्या ठिकाणी मला मुली दिसल्या नाहीत. त्या यापुढे कधी दिसतात काय,त्यांचा छुपा कारभार चाललेला आहे काय, हे बघण्याची आवश्यकता आहे. एडस्‌चा फैलाव व्हायला अशाप्राकरचा वेश्याव्यवसाय देखील कारणीभूत आहे. विवाहविषयक कायदे हे विविध धर्मामध्ये पर्सनल लॉ खाली येत असले तरी विवाह करण्यास योग्य असणे हे निकोप शरीरावर अवलंबून असते. खास करुन, एडस् नसल्याची खात्री होते, अशाच विवाहाला परवानगी मिळावी. मग ते दांपत्य कोणत्याही धर्माचे असावे. एडस् नसल्याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय या लग्नाला लग्नच मानता कामा नये, ते लग्न नोंदलेही जाता कामा नये. तसेच एडस् हा धर्म-जात , गरीब-श्रीमंत असा भेदभाव करत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी गोव्याच्या संदर्भाते उदाहरण सांगितले. श्री.मनोहर पर्रिकर हे गोव्याचे मुख्यमंत्री असताना, त्यांनी विवाहपूर्व रक्त चाचणी सक्तीची करण्याचा विचार विधानसभेत घोषित केला. त्यावेळचे विधनसभेचे अध्यक्ष श्री.प्रतापसिंह राणे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते श्री. विलफ्रेड डिसुझा यांनी त्यास पाठिंबा दिला, त्याचबरोबर सर्वच पक्षांनी एकमुखी पाठिंबा दिलेला होता, हे लक्षात घेण्याजोगे आहे. कायद्यामुळे संपूर्ण एडस् नष्ट होणार नाही, पण त्याला आळा घालण्यासाठी हा प्रभावी उपाय आहे, निश्चित महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यांनी तर हिंदू विवाह अधिनिययमन 1955 मध्ये अवश्य सुधारणा करावी. विवाह शर्तीमध्ये कोणताही पक्ष वधु किंवा वर एडग्रस्त नसावेत,याची खात्री करुन घ्यावी. ही शर्त ह्या कायद्यामध्ये असलीच पाहिजे. विवाहपूर्व रक्त तपासणी सक्तीची असावी, असाही क्लॉज या कायद्यामध्ये असावा.शासनाने आणावा आज अतिशय महत्वपूर्ण संवेदनशील गहन विषयाला सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताईंनी हात घातलेला आहे. निश्चितपणे पुढे अशाप्रकारचा सर्वंकष असा कायदा आणावा, एवढे बोलून या बिलाला मनापासून पाठिंबा देते. धन्यवाद.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ RJW/ D/

डॉ.दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 7, हिंदू विवाह महाराष्ट्र सुधारणा विधेयक हे सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी आणल्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. गेल्या दोन-तीन अधिवेशनापूर्वी मी देखील अशाचप्रकारचा प्रयत्न केलेला होता. पण शासनाने त्याला ठोकळेबाज उत्तर देऊन त्या विधेयकाला बाहेरचा रस्ता दाखविला. त्याला केराची टोपली दाखविली, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

सभापती महोदया, हा विषय इतका गंभीर आणि महत्वाचा आहे की,राज्यात वाढणारी एडस् रुग्णांची संख्या पहाता, याबद्दल चिंता वाटते. आपल्याला एडस् आहे हे कळल्यानंतर त्या व्यक्तीच्या मनामध्ये निर्माण होणारी असुरक्षिततेच्या भावनेमुळे एडस्चा आजार लपविला जातो. वास्तविक आपल्याला अनेक आजार असतात, पण आपण ते आजार लपविण्याचा प्रयत्न करत नाही. आपल्याकडे एडस्च्या आजाराकडे सोशल स्टीग्मा म्हणून पाहिले जाते. सामाजिक कलंकित आहोत, अशाप्रकारची अपराधित्वाची भावना निर्माण होते आणि हा आजार लपविला जातो. बऱ्याचवेळा आपल्याला एडस् झाला म्हणून दुसऱ्याला देखील व्हावा, अशाप्रकारची भावना पहायला मिळालेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी प्रश्न उपस्थत केलेला आहे की विवाहपूर्व एडस्ची चाचणी होणे आवश्यक आहे. तशी होणे नक्कीच आवश्यक आहे. ज्यावेळी दोन शरीराचे, मनांचे मिलन होते, ती दोन शरीरे मनाने आणि शारिरीकदृष्ट्या निकोप असणे आवश्यक असते, तरच पुढची पिढी निकोप होते. आज एडस्ची संख्या पाहिली तर साधारणपणे शहत या संस्थेने एडस्च्या संदर्भात परिक्षण केले, त्यानुसार एडसग्रस्तांची संख्या साधरणपणे 10160 इतकी आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**श्रीमती सुधा जोशी (तालिका सभापती** ):सभगृहाच्या कामकाजाची वेळ 4.00 वाजेपर्यंत होती ती वाढवावी लागणार आहे. सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

डॉ. दीपक सावंत :मला वाटते This is a tip of the iceberg. तो रिपोर्ट "सेहत" या संस्थेचा आहे. तो माझा नाही. आपण महाराष्ट्र आरोग्य आणि आरोग्य सेवा एक वास्तव हा शासनानेच प्रदर्शीत केलेला अहवाल आहे,तो आमचा अहवाल नाही. श्री. रवि दुग्गल, श्री. टी.आर.दिलीप, श्री. प्रशांत रेमस या लोकांनी तो अहवाल महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने तयार केलेला आहे. ऑगस्ट 1986 ते ऑक्टोबर,2001 या कालावधीतील ती आकडेवारी आहे. त्यानंतर या संख्येमध्ये वाढ झालेली असेल. ही जी संख्या आहे This is a tip of the iceberg. असे मी म्हटले होते.. यामध्ये आपल्याला खरोखरच खोलात जावयाचे असेल तर एड्स झालेल्या रुग्णांची संख्या कितीतरी अधिक आहे. म्हणजे नोन केसेस ऑफ एड्स. जे लोक विंडो पिरिअडमध्ये असतील. म्हणजे रुग्णाची टेस्ट केल्या नंतर त्याला एड्स आहे की नाही हे कळत नाही, अशा विंडो पिरिअडमधील लोकांची संख्या किती तरी अधिक आहे. पीसीआरच्या माध्यमातूनच आपल्याला ती टेस्ट करता येते आणि सर्वसाधारण हॉस्पिटलमध्ये ती टेस्ट महागडी असल्यामुळे उपलब्ध नसते. गोवा या राज्याने यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे, असे म्हटलेले जाते पण तो निर्णय अद्याप इम्प्लिमेंट झालेला नाही, ही शोकांतिका आहे. महाराष्ट्र राज्य हे एक प्रगत राज्य आहे आणि या महाराष्ट्र राज्याला सार्वजनिक आरोग्य खात्याला एक तरुण,तडफदार राज्यमंत्री लाभलेले आहेत. सार्वजनिक आरोग्याच्या मंत्रिमहोदया देखील महिला आहेत. या महिला मंत्रिमहोदयांनी पुढाकार घेतला पाहिजे. कारण यामध्ये नेहमी स्त्री हे लक्ष ठरते. जी एखादी स्त्री असते तिचा काही संबंध नसतो. तिच्या नव-याला एड्स झालेला असतो. किंवा विहाहापूर्वी त्या तरुणाला एड्स झालेला असतो म्हणून लग्नानंतर तिला हनीमूनची गिफ्ट म्हणून तो एड्स मिळतो. हे अतिशय वाईट आणि घृणास्पद आहे. आपण म्हणतो महिलांना 33 टक्के आरक्षण दिले पाहिजे. याबाबतीत
महिलांना आरक्षण कां दिले जात नाही? असा माझा प्रश्न आहे. ज्या प्रमाणे महिलांचे रक्त तपासले पाहिजे वधूचे रक्त तपासले पाहिजे. तसेच वराचे देखील रक्त तपासले पाहिजे. जन्म कुंडली पाहण्यापेक्षा, ती मॅच करण्यापेक्षा जसे आपण रक्तगट तपासतो "ओ" निगेटिव्हच्या महिला आहेत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

की नाही हे पाहतो, तशाच प्रकारे एड्सची चचणी विवाहापूर्वी करणे अत्यंत आवश्यक आहे. नाही तर हा एड्सचा भस्मासूर तुमच्या माझ्या डोक्यावर हात ठेवून या महाराष्ट्राला एड्स ग्रस्ताची लागण होईल आणि पुढची पिढी एड्सग्रस्त होईल, अशी माझ्या मनात भिती आहे. मंत्रिमहोदयांनी याबाबतीत सर्वंकष विचार करुन प्रेस्टिजचा इश्यू न करता, अशासकीय विधेयक आहे म्हणून त्याला वाटाण्याच्या अक्षता न लावता अशा प्रकारचा कायदा आम्ही या सदनात आणू आणि तो सर्वानुमते पास करु अशा प्रकारचे ठोस आश्वासन मला मंत्रिमहोदयांकडून हवे आहे. एका महिलेने हिंदू विवाह (सुधारणा) विधेयक आणलेले आहे. तेव्हा शासनाने याचा विचार करावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदया, सार्वजनिक आरोग्य राज्य मंत्री सांगत आहेत की, हा माझा विषय नाही. मग या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहेत?

डॉ. दीपक सावंत : एड्सचा प्रश्न सार्वजनिक आरोग्यामध्ये येत नाही काय? आपल्या खात्यामध्ये काय येते याची मंत्रिमहोदयांना माहिती नाही काय?

**तालिका सभापती** : आरोग्य राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत ते या प्रश्नाचे उत्तर देणार आहेत काय? सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे माननीय मंत्रिमहोदय, उत्तर देणार नाहीत असे आपल्याला कोणी सांगितले ?

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदया, सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना बोलावले तर बरे होईल.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : माननीय मंत्री महोदयांनी खरे तर सभागृहात उभे राहून सभापतींना उद्देशून हा विषय आमच्या विभागाच्या अखत्यारित येत नाही असे जोपर्यंत सांगितलेले नाही, तोपर्यंत असे समजण्यात येते की, हा विषय आरोग्य विभागाचा आहे आणि माननीय आरोग्य मंत्री सभागृहात बसून चर्चा ऐकत आहेत व उत्तर देखील देणार आहेत. म्हणून मी पुन्हा माननीय राज्यमंत्र्यांना विचारते की, आपण या अशासकीय विधेयकाचे उत्तर देणार काय ?

श्री. दयानंद मस्के : महोदया, हिंदु विवाह या विषयावरील अशासकीय विधेयक असल्यामुळे तो विषय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित येतो की नाही यबाबत शंका येते. कारण हिंदु विवाहासंबंधीचे विधेयक आहे व त्यात चर्चा एड्स रोगासंबंधीची होत आहे, म्हणून शंका येते.

**तालिका सभापती** : हिंदू विवाहासंबंधीचे विधेयक जरी असले तरी ते सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित असल्यामुळे माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांनी या विधेयकाला उत्तर द्यावे.

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापती महोदया, माननीय मंत्री महोदय जर या विधेयकाला उत्तर कोणता विभाग देणार या संभ्रमात असतील तर....

**तालिका सभापती** : त्यांनी आपापसात जर म्हटले असेल की हा विषय माझा नाही, त्या चर्चेशी आपला संबंध नाही. परंतु या विधेयकावरील चर्चेला सार्वजनिक विभागाच्या वतीनेच उत्तर देण्यात येईल असे शासनाकडून सांगण्यात आले आहे तसेच मंत्री महोदय देखील उत्तर देण्यास तयार आहेत, म्हणून हा मुद्दा पुन्हा आता उपस्थित करु नये अशी माझी विनंती आहे.

श्री. रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री) : महोदया, एड्स या विषयाचा सर्वच विभागांशी संबंध येतो. तसेच हे विधेयक मुळात म्हणजे हिंदू विवाह कायदयाशी संबंधित आहे. या विधेयकावरील चर्चेमध्ये एड्सबाबत जी चर्चा झाली त्यासंबंधीचे उत्तर देण्यास मी तयार आहे.

**तालिका सभापती** : हे विधेयक सार्वजनिक आरोग्य विभागाला पाठविले होते, त्या विभागाने अन्य कुठल्याही विभागाकडे ते ट्रान्सफर केलेले नाही म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागानेच त्याचे उत्तर द्यावे.

श्री. रणजित कांबळे : ठीक आहे, आमच्या विभागाच्या वतीने उत्तर देण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : महोदया, आपण या विधेयकाच्या माध्यमातून हिंदू विवाह कायदयामध्ये दुरुस्ती करण्याची मागणी करीत आहोत. हा विषय जर सार्वजनिक आरोग्य विभागाचा असेल तर मुळ कायदयात दुरुस्तीची आपण मागणी करीत आहोत त्यादृष्टीने संबंधित मंत्री या ठिकाणी जर उपस्थित असतील तर त्यांनी खात्री करुन घ्यावी की, हा विषय नक्की कोणत्या विभागाचा आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : हे जे विधेयक आहे ते सार्वजनिक विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे. त्या विभागातर्फे या विधेयकाला उत्तर मिळावे अशा प्रकारची माहिती त्यांच्याकडून आलेली आहे. तसेच त्यांनी अन्य कोठल्याही विभागाकडे हे विधेयक हस्तांतरीत केलेले नाही. त्यामुळे या ठिकाणी जो विषय चालला आहे तो सार्वजनिक विभागाच्या अंतर्गत येईल. जेव्हा कायद्यामध्ये रुपांतर करण्याची वेळ येईल तेव्हा आपण बघू.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, विवाह पध्दती म्हणजे विधी व न्याय विभागाचा संबंध येतो. तसेच एडस्चा विषय आरोग्य खात्याशी संबंधित असल्यामुळे आरोग्य खात्याचा सुध्दा या बिलाशी संबंध येतो. म्हणून या विधेयकाच्या संदर्भात दोन्हीही खात्याच्या मंत्र्यांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे असे माझे म्हणणे आहे.

**तालिका सभापती** : शासनाने हे विधेयक आरोग्य खात्याकडे पाठविलेले आहे त्यामुळे हे विधेयक आरोग्य खात्याच्या अंतर्गत येऊन आता त्या विषयावर त्या दृष्टीने विचार होईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मी आपल्या निर्णयाला आव्हान देत नाही. परंतु संबंधित विभागाने चुकीने ही बील पाठविले असेल तर ती चूक पुन्हा चालूच ठेवायची का? सन्माननीय सदस्या मंदाताई म्हात्रे यांनी जे विधेयक मांडले आहे ते कायद्यामध्ये बदल करण्यासाठी मांडले आहे. कायद्याने विवाह होण्यापूर्वी अशा त-हेची तपासणी करुन घेणे बंधनकारक करावे. एडस् कोणाला झाला, न झाला याच्याशी काय संबंध आहे? हा विषय कायदे मंत्र्यांशी देखील संबंधित आहे कारण कायद्यामध्ये या विधेयकान्वये बदल करावयाचा आहे. सचिवांनी हे विधेयक दुस-याच खात्याकडे पाठविले असेल तर ती सचिवांची चूक आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, सार्वजनिक जबाबदारी म्हणून कोठलाही मंत्री कोठल्याही विभागासाठी आपल्या परवानगीने उत्तर देऊ शकतो. मंत्र्यांना मिळालेला हा संसदीय अधिकार आहे. त्यामुळे या अधिकारात संबंधित मंत्री उत्तर देऊ शकतील.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: आत्महत्या केलेल्या शेतक-यांसाठी शासनाने घोषित केलेले पॅकेज.**

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री ) : सभापती महोदया, मी एक निवेदन करण्यासाठी आपली अनुमती मागतो आहे. हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरु झाल्यापासून विधान परिषदेतील आणि विधान सभेतील सर्व चर्चा सर्व मिडीयातून प्रकाशित होत आहेत. या अधिवेशनामध्ये शेतक-यांच्या आत्महत्येची एक वेगळीच छाप आहे. या सदनामध्ये होणा-या सगळया चर्चा आत्महत्ये भोवतीच अधिक फिरत आहेत. या सदनामध्ये सुध्दा विदर्भात होणा-या आत्महत्येबद्दल खूप गांभीर्याने चर्चा झ ाालेली आहे. चर्चेला उत्तर देत असतांना या आठवडयाच्या अखेरीस शासनाच्या वतीने एक पॅकेज घोषित केले जाईल आणि शेतक-यांना शासनाच्या वतीने तसेच आपल्या सगळयांच्या वतीने दिलासा देऊ जेणे करुन शेतकरी आत्महत्या करणार नाही अशी घोषणा शासनातर्फे करण्यात आली होती. . त्यामुळे तशा प्रकारचे पॅकेज विधानसभेत घोषित करण्यात आलेले आहे. विधानसभेत जे पॅकेज घोषित करण्यात आलेले आहे तेच पॅकेज मी सदनाच्या वतीने विदर्भातील जनतेसाठी घोषित करीत आहे. शेतक-यांनी आतापर्यंत ज्या आत्महत्या केलेल्या आहेत त्याच्यासंदर्भात आतापर्यंत जो काही अभ्यास झालेला आहे त्याची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहे. कर्जबाजारी पणा, नापिकी किंवा कमी उत्पन्न, आजारीपण, मुलीच्या लग्नासाठी आर्थिक व्यवस्था होऊ न शकणे, शेती आनुषंगिक इतर उत्पन्नाचे साधन नसणे, शेती उत्पन्नातून जास्त नफ्यासाठी मूल्यवृध्दीची व्यवस्था नसणे ही शेतक-यांची आत्महत्येची प्रमुख कारणे आहेत. आत्महत्या थांबविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सुरुवातीस 6 जिल्हयात म्हणजे यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला, वासिम, व वर्धा या जिल्हयात पायलट बेसिसवर राबविण्यात येतील. याच 6 जिल्हयात शेतक-यांच्या आत्महत्या अधिक झालेल्या आहेत. या आत्महत्या थांबविण्यासाठी आत्महत्येशी निगडित समस्या व आवश्यक उपाययोजना करण्यासाठी आत्महत्या प्रकरणांची तात्काळ चौकशी व बाधित कुटुंबांना तात्काळ मदत करण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी, संबंधित अधिकारी, सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली एक समिती जिल्हा स्तरावर गठीत करण्यात येईल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी एक विशेष कक्ष व हेल्पलाईनची सुविधा कार्यरत केली जाईल. एकंदर पीक परिस्थिती व इतर अनुषंगिक बाबींवर लक्ष ठेऊन संभाव्य बाधित क्षेत्रात प्रबोधन, भेटी व आवश्यक कार्यवहीसाठी तत्काळ व्यवस्था करण्यात येईल. त्यासाठी महसूल यंत्रणा व कृषी खात्यातील यंत्रणेचा चांगल्या पध्दतीने वापर करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी हेल्पलाईन सुरू केली जाईल. त्या शिवाय सेवाभावी संस्थेच्या मदतीने शेतकऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात येईल. यासाठी प्रत्येक जिल्हयात एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल. म्हणजे सहा कोटी रुपयांची तरतूद या कामासाठी करण्यात येईल. कर्जबाजारीपणातून मार्ग काढण्यासाठी आत्महत्याग्रस्त जिल्हयात बहुतांशी शेतकरी D.C.C. किंवा राष्ट्रीयकृत बॅन्केचे थकबाकीदार झाल्यामुळे तिथून नवीन कर्ज मिळणे बंद झालेले आहे. त्यामुळे शेतीसाठी लागणारे भांडवल तो सावकार, व्यापारी किंवा खत विक्रेता यांच्याकडून जास्त व्याजाने उचलतो. हंगामानाने साथ दिली नाही किंवा इतर कारणांमुळे नापिकी झाली तर सावकाराकडील कर्जावरील व्याजाचा बोजा वाढत जातो व त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढते. थकबाकीपणा नाहीसा करून त्याला पुन्हा नियमित पत पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून पत उपलब्ध करून देणे हे त्याच्या शेती उत्पादन वाढीसाठी अत्यावश्यक आहे. सहकारी किंवा राष्ट्रीयकृत बँकांच्या थकबाकीसाठी शासनाकडून व्यवस्था केली जाईल व नव्याने त्या त्या शेतकऱ्यांची क्रेडिट लाईन पुन्हा सुरू करता येईल. कर्जबाजारीपणातून मार्ग काढण्यासाठी नव्याने मिळणारे कर्ज सावकाराचे देणे किंवा निविष्टा विक्रेत्याच्या देणीसाठी वापरले गेले तर पतपुरवठा पुन्हा सुरू करून सुध्दा शेती उत्पादन वाढीच्या प्रयत्नाला खीळ बसेल व शेतकरी पुन्हा थकबाकीदार होईल. म्हणून फॉर्मल क्रेडिट चॅनेलमधून पतपुरवठा पुन्हा मोठया प्रमाणात सुरू करताना शासनामार्फत खालील उपाययोजना केल्या जातील.

1. नियमबाहय सावकारी माध्यमातून देण्यात आलेले कर्ज थेट संपुष्टात आणण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी ते कर्ज परतफेड करण्याची आवश्यकता नाही.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

2. जे निविष्टा विक्रेते उधारीने व्याज लावून निविष्टांचा पुरवठा करतात, अव्याच्यासव्वा व्याज लावतात त्या उधारीवर त्या त्या जिल्हयातील D.C.C.बॅन्केच्या व्याज दराप्रमाणे त्यांना व्याज लावता येईल. त्यापेक्षा जास्त व्याज लावता येणार नाही.

3. परवानाधारक सावकारांमार्फत दिलेल्या कर्जावरसुध्दा सावकारी कायद्याप्रमाणे ठरवून दिलेला व्याजदर लागू राहील. त्यापेक्षा अधिकचे व्याजदर लावता येणार नाही.

पत पुरवठा व्यवस्था पुनरूज्जीवित करण्यासाठी 25 हजार रुपयांपर्यंत थकित झालेल्या कर्जाची पुनर्रचना केली जाईल. विदर्भामध्ये 203 कोटी रुपये मुद्दल व 61 कोटी रुपयांच्या व्याजाचा समावेश होतो. हे 61 कोटी रूपये संपूर्ण व्याज राज्य शासनामार्फत भरण्यात येईल. शेतकऱ्यांचे 25 हजार रुपयाच्या आतील सगळे व्याज राज्य शासनामार्फत भरण्यात येईल. जे मूळ कर्ज राहील त्याचे तीन हप्ते पाडले जातील. त्याला दोन वर्षाचे मोरॅटोरियम दिले जाईल. पहिल्या दोन वर्षामध्ये हप्ता असणार नाही. पुढच्या तीन वर्षात तीन हप्ते असतील. आज जे कर्ज घेतले असेल ते पाच वर्षात फेडण्याची मुभा शेतकऱ्याला उपलब्ध होईल. वरील सवलती राष्ट्रीयकृत व सहकारी बॅन्केकडून घेतलेल्या व थकबाकी झालेल्या कर्जाला लागू राहतील. त्यातून शेतकऱ्यांना असलेल्या कर्जाला हप्ते मिळतील आणि त्याचे 61 कोटी रुपये व्याज थेट सरकार आपल्या तिजोरीतून भरेल.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...........

कर्ज पुनर्रचित झालेल्या शेतकऱ्यांना पुढील हंगामात शेती उत्पादन खर्च व इतर अनुषंगिक कौटुंबिक खर्च भागविण्यासाठी 25 हजार रुपयांचे किसान क्रेडीट कार्ड बँकाच्या मार्फत पुढाकार घेऊन दिले जाईल. ज्यामुळे शेतकऱ्याला उदार ऊसनवारीवर माल घ्यावा लागणार नाही आणि सावकाराकडून कर्जही घ्यावे लागणार नाही. 25 हजार रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना क्रेडीट कार्ड दिले जाईल. पत मर्यादांतून शेतकऱ्याला आवश्यक वाटेल त्या त्या वेळी पैसे उचलून शेती व अनुषंगिक खर्च कॅश क्रेडीटमधून भागविता येईल. उचललेल्या रकमांवर उचलेल्या तारखांपासून व्याज आकारले जाईल. कर्जाची परतफेड मुदतीत केली तर 25 हजार पर्यंतचे कर्ज - कॅश क्रेडीटचे व्याज पाच टक्के राहील आणि वरच्या व्याजाची रक्कम शासनामार्फत भरली जाईल. सदर कर्जासाठी कोणत्याही प्रकारच्या कोलॅटरल सिक्युरीटीची आवश्यकता लागणार नाही. ज्याच्याकडे सिक्युरिटी द्यायला काहीही नाही अशा व्यक्तीला 25 हजार रुपयांचे क्रेडीट कार्ड मिळेल. ज्याचा व्याजाचा दर मुदतीत कर्ज फेडले तर पाच टक्के राहील. काही सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केला की, बँका सावकारांचे दुसरे रुप आहे. नाण्याच्या दुसऱ्या बाजुने त्या वागत आहेत. शेतकऱ्यांनी सहकारी बँकेतून घेतलेले अल्प, मध्यम व दीर्घ मुदत कर्जाला दामदुपटीचा नियम लागू केला जाईल जेणेकरुन शेतकऱ्याला द्यावे लागणारे व्याज मुद्दलपेक्षा अधिक असता उपयोगाचे नाही. शेतकऱ्यांनी खूप कष्ट केले तरी काही कारणांमुळे नापिकी होते आणि ते पुन्हा अडचणीत येतात. तेव्हा या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात पीक विमा योजनेखाली कापूस पिकावर द्यावे लागणाऱ्या विमा हप्त्याच्या 75 प्रिमियम शासनामार्फत भरले जाईल व इतर भूधारकांसाठी 50 टक्के हप्ता शासनामार्फत भरला जाईल. यासाठी शासनाला 25 कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचा विमा उतरविण्यासाठी या सहा जिल्ह्यांत शासन 25 कोटी रुपये खर्च करील. याचा लाभ सहा जिल्ह्यातील 10 लाख शेतकऱ्यांना होईल. राज्यात अनेक ठिकाणी स्वंयसहायता गटामार्फत झालेल्या कर्ज पुरवठ्याचा चांगला उपयोग होऊन उत्पन्न मिळणे व कर्ज परतफेड होण्याचा अनुभव लक्षात घेता शेतकऱ्यांचा स्वयंसहायता गट तयार करुन त्यांच्यामार्फत राष्ट्रीयकृत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

व खाजगी व सहकारी बँकाकडून शेती कर्ज पुरवठा वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील. सर्व शेतकऱ्यांना आवश्यक पतपुरवठा व्हावा यासाठी विविध वित्तीय संस्थांना गुंतविण्यासाठी शासनामार्फत मार्ग काढला जाईल. उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचे धोरण सरकारने स्वीकारलेले आहे. आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या सहा जिल्ह्यातील 60 हजार शेतकऱ्यांना पुढील तीन वर्षात उत्तम शेती करता यावी यासाठी जमीन सुधारणा, मूळ स्थानी जलसंधारण, सेंद्रीय शेती पध्दतीचा वापर, बियाणे, जैविक खते, जैविक औषधे, खतांचा एकात्मिक वापर यासारख्या घटकांसाठी प्रत्येक शेतकऱ्यास 25 हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाईल. या योजनेसाठी प्रत्येक वर्षी 50 कोटी रुपये व एकूण तीन वर्षात 150 कोटी रुपये खर्च करण्यात येतील. शेती संलग्न व्यवसायाला चालना देण्यासाठी शेतकऱ्यांच्या स्वयंसहायता गटाला शेती संलग्न जोडधंद्यासाठी उदा.दुग्धव्यवसाय,कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, कृषि प्रक्रिया उद्योग इ.करिता बँक कर्ज व अनुदान उपलब्ध करुन दिले जाईल. दरवर्षी तीन हजार स्वयंसहायता गटामार्फत 60 हजार शेतकऱ्यांना या सहा जिल्ह्यांत एकूण 30 कोटींची वार्षिक तरतूद करुन हे जोडधंदे उभे करण्यासाठी प्रयत्न केला जाईल व प्रत्येक स्वयंसहायता गटाला 1 लाख रुपयांपर्यंत अर्थसाह्य देण्यात येईल. विदर्भामध्ये कापसाची प्रत आणखी चांगली व्हावी म्हणून काही उपाययोजना करण्याचे शासनाने निश्चित केले आहे. कापसाच्या संयुक्त शेतीला प्रोत्साहन देणे, संयुक्त शेतीकरिता टेक्सटाईल मिल्स व जिनिंग व प्रेसिंग मिल्स यांच्याशी शेतकऱ्यांशी थेट संबंध जोडून त्यांना लागणाऱ्या उच्च प्रतीचा कापूस उत्पादनाचे प्रकल्प हाती घेण्यात येतील. या संयुक्त प्रकल्पात कापसाची उत्पादकता वाढविण्याकरिता शेतकरी, कृषी विभाग वा टेक्सटाईल मिल यांच्यात संयुक्त शेती पध्दत अवलंब करण्यास एम.ओ.यु. करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

शेतकऱ्यांच्या आत्महत्येची जी कारणे आहेत त्यापैकी मुलीचे लग्न हे सुध्दा प्रमुख कारण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नासाठी सामुदायिक विवाह योजना सुरु केली जाईल. मुलींच्या लग्नापोटी शेतकरी कर्जबाजारी होऊ नये म्हणून या योजनेला प्रोत्साहन देण्यात येईल. या योजनेकरिता प्रत्येक जिल्हयासाठी दरवर्षी 1 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात येईल. या सदनामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय पोटतिडकीने उल्लेख केला की, शेतकऱ्यांची काही रक्कम सरकारकडे आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, दिनांक 30 जून, 2004 पर्यंत सरकारकडे शेतकऱ्यांचे 769 कोटी रुपये आहेत. ही रक्कम लवकरात लवकर मिळावी अशा प्रकारची सदनामध्ये मागणी करण्यात आली. मला सांगताना आनंद होत आहे की, शासनाकडे गेल्या 20 वर्षांपासून प्रलंबित असलेली 769 कोटी रुपयांपैकी 385 कोटी रुपयांचा पहिला हप्ता शेतकऱ्यांना मार्च महिन्यापूर्वी देण्यात येईल आणि उर्वरित 385 कोटी रुपये पुढच्या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिले जातील. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक होते. चालू वर्षाची परिस्थिती पाहिली तर कापूस उत्पादक शेतकरी रोग, अतिवृष्टी व दुष्काळ अशा विविध नैसर्गिक आपत्तीत सापडला. काही ठिकाणी बी.टी.कॉटनचे उत्पादन अपेक्षेप्रमाणे आलेले नाही, त्यामुळे उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे अशा कापूस उत्पादकांना दिलासा देण्यासाठी एक विशेष बाब म्हणून एक हजार प्रती हेक्टरी आणि जास्तीतजास्त दोन हेक्टरपर्यंत क्षेत्रासाठी राज्यातील 22 लाख शेतकऱ्यांना 280 कोटी रुपयांची रोख स्वरुपात मदत करण्यात येईल. शेतीवरील खर्च कमी करुन, उत्पादन व नफा वाढविण्यासाठी सेंद्रिय तंत्रज्ञान अभियान, शेती शाळा एकात्मिकृत व्यवस्थापन राबविण्यात येईल.

स्थानिकरित्या स्वयंरोजगार निर्मितीकरिता या अभियानांतर्गत जैविक खत, जैविक औषध, बियाणे इ.उत्पादनाकरिता अनुदान उपलब्ध राहील. या अभियानांतर्गत या सहा जिल्हयांसाठी दरवर्षी प्रत्येकी 5 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील. यवतमाळ जिल्हयामध्ये आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे हे मान्य आहे. एकूण आत्महत्यांपैकी एकटया यवतमाळ जिल्हयामध्ये 27 टक्के आत्महत्या झालेल्या आहेत. या आत्महत्यांच्या कारणांचा शोध घेऊन उपाययोजना करण्यासाठी खोलवर अभ्यास करणे आवश्यक असून, त्यासाठी गोखले इन्स्टिटयुटतर्फे अभ्यास गट तयार केला जाईल. त्या अभ्यास गटामध्ये मनोवैज्ञानिक तज्ञ, सेंद्रिय शेती तंज्ज्ञ यासारख्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश असेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.... 16:25

श्री.आर.आर.पाटील....

विदर्भात मराठवाडयाच्या धर्तीवर विदर्भ पाणलोट मिशन स्थापन करण्यात येईल. या अंतर्गत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन संकल्पना राबवून, पर्जन्यधारित शेतीमध्ये स्थिरता आणण्याचे प्रयत्न केले जातील. या कार्यक्रमासाठी दरवर्षी 100 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिली जाईल. विदर्भात मराठवाडयाच्या धर्तीवर विदर्भ पाणलोट मिशन विस्थापित करण्यात येईल. यासाठी दरवर्षी 100 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येईल. ठिबक व तुषार या दोन्ही सिंचन क्षेत्राला या कार्यक्रमामध्ये प्राधान्य दिले जाईल. सहकार क्षेत्रामध्ये शेती मालावर या सहा जिल्हयांमध्ये कृषि प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना चालना मिळावी यासाठी सहकारी तत्वावर उभारण्यात येणाऱ्या प्रक्रिया संस्थांना या सहा जिल्हयांत 1:5 या प्रमाणात भाग भांडवल उपलब्ध करुन दिले जाईल. या संपूर्ण कार्यक्रमामुळे 1075 कोटी रुपयांचा बोजा सरकारवर पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आणि संयत्रण करण्यासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल आणि त्याचे मुख्यालय अमरावती येथे राहील.

नंतर श्री.सुंबरे....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ...

सभापती महोदया, थेट 1075 कोटी रूपये कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळतील. हे एक खूप चांगले पॅकेज सरकारने दिलेले आहे. तेव्हा या माध्यमातून होणारी चर्चा ही अशादायी स्वरूपात बाहेर जावी, एक चांगला संदेश जावा. आपण सगळे मिळून या शेतकऱ्यांना चांगली मदत करीत आहोत अशा पद्धतीची भावना सगळ्यांनी मिळून निर्माण करावी. इतकी थेट मदत यापूर्वी विदर्भातील शेतकऱ्याला केव्हाही झालेली नव्हती हेही मला येथे नमूद करावेसे वाटते.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदया, या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर करताना कापूस प्रक्रिया उद्योगांविषयी सांगितले की 1:5 असे भाग भांडवल सहकारी क्षेत्रात जे प्रक्रिया उद्योग येतील त्यांना दिले जाईल. परंतु सध्या सहकारी क्षेत्रामध्ये सूत गिरणी येणे आणि चालणे गेले कित्येक दिवस अवघड आहे आणि याची आपणा सर्वांनाच कल्पना आहे. तेव्हा खाजगी सूत गिरणीसाठी यामध्ये आपण काही इन्सेंटिवची योजना केली आहे काय ? दुसरे म्हणजे, सहकारी क्षेत्रामध्ये यासाठी परवानगी देण्याची पद्धत थोडीशी अराजकीय म्हणजे जो प्रथम येईल त्याला प्रथम संधी या तत्त्वावर देण्याबाबतचे काही निश्चित धोरण आपण ठेवणार आहात का? कारण सहकारी क्षेत्रामध्ये मान्यता देणे आणि भाग-भांडवल मिळणे यामध्ये पुरेसे राजकीयकरण झ ाालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आत्महत्या थांबणार नाही. जो कोणी इंटरप्रीनर आहे त्याला एक कॉंक्रीट आश्वासन द्यावे लागते की, या तारखेला आल्यानंतर अमुक तारखेला तुमचे लेटर ऑफ इंटेन मिळेल आणि या या दिवशी तुम्हाला पैसे मिळतील. तेव्हा त्या दृष्टीकोनातून माननीय उपमुख्यमंत्र्यांनी काही खुलासा करणे गरजेचे आहे असे मला वाटते. त्यासाठी मी आपल्याला चांगल्या स्पिरीटमध्ये विचारतो आहे की, खरोखरी आपल्याला हे प्रक्रिया उद्योग विदर्भामध्ये आणावयाचे असतील, कारण यवतमाळ आणि वर्धा येथे सूत गिरणी काढणे हे इतके काही सोपे नाही. मी या क्षेत्रातील आहे त्यामुळे मला हे समजते आहे. आम्ही अनेकांना यासाठी बोलावतो आहोत, वर्धमान इंडस्टीजला वगैरे बोलावतो आहोत की, तुम्ही आमच्याकडे या आम्ही तुम्हाला लागेल ते सहकार्य करू. पण कोणीही यायला तयार नाही. सन्माननीय सदस्य श्री. हिराणी साहेब येथे आहेत, त्यांना याची पूर्ण कल्पना आहे. तेव्हा या संदर्भात आपल्याला एक कॉंक्रीट अशी योजना करावी लागेल की, ज्यामध्ये कोठेही, कोठलाही राजकीय हस्तक्षेप न करता जो कोणी प्रथम येईल त्याला प्रथम संधी या तत्त्वावर येईल आणि जो या या चार गोष्टी पूर्ण

..... ZZ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

करीत असेल तर त्याला ताबडतोब संधी दिली जाईल. सहकारी तत्त्वावर तरी अशा मुळे कदाचित मिळेल. आणि खाजगी क्षेत्रामध्ये देखील काहीना काही उत्तेजना असायला पाहिजे असे माझे मत आहे. तरी या बाबत आपण खुलासा केल्यास बरे होईल.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, आपण खाजगी क्षेत्रामध्ये भांडवल देत नाही. परंतु सहकारी क्षेत्रामध्ये जो प्रथम प्रस्ताव दाखल करील त्यांना सारे राजकारण बाजूला ठेवून या भागामध्ये उद्योग वाढण्यासाठी मदत करण्याची भूमिका स्वीकारली जाईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदया, सामुहिक विवाहासाठी प्रत्येक जिल्ह्याला 1 कोटी रूपये देण्याचे आता सांगितले आहे. हा एक चांगला निर्णय आहे. पण हे पैसे आपण कसे आणि कोणत्या निकषावर कोणाला देणार आहात ? सामूहिक विवाह करणाऱ्यांना की असे विवाह आयोजित करणाऱ्यांना देणार आहात ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदया, जिल्हाधिकाऱ्यांकडे हे पैसे उपलब्ध करून दिले जातील आणि त्याची नियमावली करून दिली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एक पॅकेज जाहीर केले आहे. त्यामध्ये 675 कोटी रूपये आपण देत आहात ....

श्री. आर.आर.पाटील : 675 नाही तर 1075 कोटीचे पॅकेज आहे ..

श्री. अरविंद सावंत : त्यातील 385 कोटी रूपये त्यांचेच स्वत:चे आहेत ना ? तेव्हा आपण फार काही देता आहात अशातील भाग नाही. मात्र यातील दोन तीन मुद्दे महत्त्वाचे आहेत ते मी येथे बोलणार आहे. आपण अवैध सावकारांवर जी काही कडक कारवाई करीत आहात त्याबद्दल मी आपले मनापासून स्वागत करतो. पण त्या सावकारांपासून पुन्हा एकदा त्या गरीब शेतकऱ्याला त्रास होणार नाही याची देखील दखल वा दक्षता आपण घ्यायला पाहिजे. कारण त्यांची वसुली थांबेल असे काही आपल्याला ठामपणे सांगता येणार नाही. म्हणून या संदर्भात आपल्याला कडक धोरण अवलंबवावे लागेल. दुसऱ्या एका गोष्टीचे मला वाईट वाटते आहे. आपण यापूर्वी दोन संस्था नेमल्या होत्या. एक म्हणजे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशन सायन्स आणि दुसरी संस्था म्हणजे इंदिरा गांधी रिसर्च सेंटर. या दोन्ही संस्थांनी अहवाल दिले, त्यामध्ये त्यांनी सगळी कारणे दिली. त्या कारणांमध्ये 92 टक्के आत्महत्या या कर्जबाजारीपणामुळे.. मग त्यात बँकांचे कर्ज, मुला-मुलीचे

.... ZZ 3 ...



KBS/ MHM/ SBT/ श्री. बोर्डे नंतर --- 16:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत ....

लग्नासाठी काढलेले कर्ज वगैरे सर्व कर्जांचा समावेश आहे., थोडक्यात त्या कर्जाची परतफेड करता येत नाही यामुळेच आत्महत्या केल्याचे सिद्ध झालेले आहे. असे असतानाही आपण आता पुन्हा गोखले संस्थेला याची चौकशी करण्याचे काम देणार आहोत असे सांगितले आहे. म्हणजेच आपल्याला हे सगळे प्रलंबित घोंगडे ठेवायचे आहे. मूळ मुद्दा असा आहे की, यापूर्वी नेमलेल्या दोन्ही संस्थांनी सारे सर्वेक्षण केल्यानंतर आपल्यापुढे आणले, सिद्ध केले आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले की, 1041 आत्महत्या झाल्या आहेत आणि त्या निव्वळ शेतकऱ्यांच्या कर्जा पोटी झालेल्या आहेत. मग आता आमची अपेक्षा अशी होती... आता हे जे पॅकेज आपण दिले आहे ते सारे आयडियालिस्टीक आहे त्याबद्दल सवाद नाही. कागदावर ते फार चांगले आहे, रोमँटिक आहे अमलबजावणी साठी चांगले आहे सर्वच काही चागले जणू सोने पे सुहागा. ....

( यानंतर श्री. सरफरे ....3A 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

आणि प्रत्यक्षात याबाबत अंमलबजावणी करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी आपल्या लक्षात येतील. मूळ मुद्दा असा आहे की, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे त्यांना आपल्याला जी आर्थिक मदत घोषित करावयाची होती, ती या ठिकाणी घोषित केली नाही. 92 टक्के शेतकऱ्यांचे आत्महत्तेचे मूळ कारण यामध्ये जाहीर केले नाही ही दु:ख देणारी बाब आहे. आपण 25 हजार रुपयांचे किसान कार्ड देण्याचे जाहीर केले आहे. त्यांचा व्याजाचा दर कमी केला आहे ही स्वागतार्ह बाब आहे. तरीसुध्दा त्यांना ठरवून दिलेल्या मुदतीत त्यांनी कर्ज फेड केली नाहीतर? कारण कर्जफेड ही निसर्गावर अवलंबून रहाणार आहे. We are idealistic in paper but not realistic in implementation. मी आपणास विचारु इच्छितो की, यामध्ये शेतकऱ्यांना थेट मदत द्यायला पाहिजे ती आपण जाहीर करणार काय?

श्री. मधुकर चव्हाण : सुमारे 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. त्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये आपण तरतूद केली आहे काय? याकरिता आपण पैसा कोठून आणणार आहात? हे पॅकेज आपण रिट्रॉस्पेक्टिव्ह देणार आहात की प्रॉस्पेक्टिव्ह देणार आहात? गोखल इंस्टिटयुटचा रिपोर्ट आल्यानंतर अंमलबजावणी करणार की त्वरीत अंमलबजावणी करणार? आणि कोणत्या फंडामधून हा पैसा उपलब्ध करणार आहात? दुसरे असे की, खाजगी सावकाराचे कर्जमाफ केले आहे हे स्वागतार्ह आहे.परंतु त्याबाबत त्यांचेकडून या लोकांना दमबाजी केली जाईल अशा प्रकरणामध्ये गुन्हे दाखल करण्याचे आदेश आपण देणार काय?

डॉ. दीपक सावंत : मंत्रिमहोदयांनी जाहीर केलेले पॅकेज हे कागदावर चांगले दिसत असले तरी मूळ मुद्दा ते विसरले आहेत. आत्महत्या झाली आहे की नाही हे ठरविण्याबाबत आपण निकष लावले आहेत ते अतिशय क्लिष्ट आहेत. म्हणून हे निकष बदलणे आवश्यक आहेत. आत्महत्या होऊ नयेत अशी सर्वांचीच इच्छा आहे. परंतु त्या झाल्यातर निकष बदलण्याची आपली तयारी आहे काय?

श्री. आर. आर. पाटील : गोखले इंस्टिटयुटकडे हे काम सोपविण्यात आले. तेव्हा हे पॅकेज देतांना ढोबळ मानाने 2 इंस्टिटयुशनकडून याबाबत अहवाल घेतला आहे. त्याचा ऊहापोह मी सुरुवातीला केला आहे. यामध्ये प्रत्येक कारणांचा आणखी खोलात जाऊन अभ्यास होण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी आपण रुटवर गेले पाहिजे व माहिती घेतली पाहिजे. म्हणून त्याबाबतची उपाय योजना करीत असतांना आणखी अभ्यास करण्यामध्ये काहीही गैर नाही. जास्तीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

जास्त अभ्यास केला पाहिजे. आणि शेतकऱ्यांना अधिक फायदा झाला पाहिजे म्हणून आणखी एका इंस्टिटयुटकडे हे काम देत आहोत. यावर्षी दिल्या जाणाऱ्या या पॅकेजसाठी बजेटमध्ये तरतूद नाही असे विचारण्यात आले आहे. याकरिता काँटीजन्सी फंडामधून पैसे काढले जातील. आणि पुढील अधिवेशनात त्याला कार्योत्तर मान्यता घेतली जाईल. आणि या निर्णयाची ताबडतोब अंमलबजावणी केली जाईल. कोणत्याही मान्यतेसाठी शेतकऱ्यांची मदत थांबविली जाणार नाही. जे शेतकरी मृत पावले त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत प्रश्न उपस्थित झाला, ती देण्याबाबत दुमत आहे शंका आहे. त्या नियमात बदल केला तर त्यामध्ये गैरप्रकार होतील याबाबत शंका उपस्थित केली जात आहे.म्हणून शासन खोलात जाऊन याबाबत अभ्यास करीत आहे.

श्री. अरविंद सावंत : शासनाकडे दोन्ही इंस्टिटयुशनचे अहवाल आलेले आहेत.?

श्री. आर. आर. पाटील : अशा पध्दतीची मदत देणे योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत खोलात जाऊन अभ्यास करणे आवश्यक आहे. शासनाच्या एखाद्या धोरणामध्ये कोणत्याही चुकीच्या गोष्टीला प्रोत्साहन देणे उपयोगाचे नाही. म्हणून ज्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याची आवश्यकता आहे त्यासाठी प्रसंगी निकष बाजूला ठेवून मदत करण्याची भूमिका शासनातर्फे स्वीकारली जाईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. ज्या-ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून निश्चितपणे मदत मिळाली पाहिजे. परंतु सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी निकषाबाबत जो मुद्दा मांडला, तो बरोबर आहे. परंतु माझे नम्रपणे निवेदन आहे की, यासाठी निकष हे असलेच पाहिजेत. याचे कारण असे की, कधी-कधी एवढया भयानक गोष्टी घडतात. वयोवृध्द माता-पित्यांचा खून करुन सुध्दा पैसे मिळविण्याचे प्रयत्न केले जातात. मला माफ करा, हे आपल्याला अतिरंजित वाटेल. पण माणूस एवढया दुष्ट हेतूपर्यंत गेलेला आहे. त्यामुळे याबाबतीत निकष लावून, तपास करणे, चिकित्सा करणे ही दुर्दैवाने काळाची गरज आहे. त्यामुळे याबाबतीत निकष असले पाहिजेत असे माझे प्रामाणिक मत आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांनी जे सांगितले, त्याबद्दल हरकत नाही. समाजामध्ये जशी चांगली माणसे असतात, तसे एखाद-दुसरा वाईट माणूसही असतो आणि दुर्दैवाने त्यांच्याकडून याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला जातो पण आमचे म्हणणे असे आहे की, जे वास्तवामध्ये सिध्द झाले. शासनाने ज्या दोन संस्था नेमल्या होत्या, त्यांनी चौकशी करुन स्पेसीफीक रिपोर्ट दिलेला आहे. आपण तो रिपोर्ट पहावा, तो एवढा भयानक आहे आणि त्या रिपोर्टमध्ये या गोष्टी सिध्द झाल्यानंतर पुन्हा मागे जाणे हे स्वागतार्ह नाही. हे निषेधार्हच आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदया, दोन्ही संस्थांनी चौकशी करीत असताना, मृत्यूची कारणे शोधताना केस टू केस तपासणी केलेली नाही. तर त्यांनी सॅम्पल बेसिसवर काही केस घेऊन, त्या तपासून निष्कर्ष काढलेले आहेत.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : या उत्कृष्ट पॅकेजबद्दल शासनाचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. मला वाटते की, सर्व सभागृह शासनाचे अभिनंदन करील.

(सत्तारुढ बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी बाके वाजवून शासनाचे अभिनंदन केले.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, आपण इम्पार्शल असावयास पाहिजे.

**तालिका सभापती** : आता पॅकेज दिल्यानंतर . . . .

डॉ.दीपक सावंत : त्यांनी असे प्रपोज करणे बरोबर नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना तुम्ही दोन लाख रुपये कुठे दिले ? आमची मागणी शासनाने कुठे मान्य केली आहे ?

. . . .3 बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना दोन लाख रुपये देण्यात यावेत अशी आमची मागणी होती. सरकारने आमची मागणी कुठे पूर्ण केली आहे ? ही मागणी मान्य केली असती तर आम्ही स्वागतच केले असते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना दोन लाख रुपये दिले असते तर आम्ही स्वागतच केले असते.

**तालिका सभापती** : याठिकाणी शासनाने शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केल्यानंतर सरकारचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. येथे पार्शल आणि इम्पार्शलचा काही प्रश्न नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**तालिका सभापती** : सर्वांनी खाली बसावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, आपण सत्तारुढ पक्षातील असलात तरी, आता आपण सर्वोच्च खूर्चीवर बसलेल्या आहात. त्यामुळे . . . .

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकावे. सभापती पदाच्या खूर्चीवर जे बसलेले आहेत, त्यांना आपण अशा प्रकारे बोलू शकत नाही. कारण . . . .

(अनेक सन्माननीय सदस्यांनी एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. याठिकाणी अशासकीय विधेयकावर चर्चा सुरु आहे. याठिकाणी जे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे, त्यादृष्टीने सरकारचे अभिनंदन करणे हे आवश्यक होते आणि ज्या शेतकऱ्यांनी . . . .

श्री.आर.आर.पाटील(खाली बसून) : याबाजूनेच तसे सुचविले.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**तालिका सभापती** : कृपा करुन बारीक-बारीक गोष्टीवर कीस काढू नका.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**तालिका सभापती** : शेतकऱ्यांसाठी शासन जेवढे काही करेल, तेवढे थोडेच आहे. शासनाने अजून अधिकही काही करावे आणि ज्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्या घटना अतिशय दुर्दैवी आहेत. त्यांना सरकारने जास्तीतजास्त मदत करावी असे सांगण्यात येत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदया, आपल्या आदेशाचे पालन केले जाईल. आपण शेतकऱ्यांना जास्तीतजास्त मदत करावी अशी भावना व्यक्त केली आहे.राज्य सरकारची----

. . . .3 बी-3

असेल, नसेल तेवढी सगळी ताकद या राज्यातील शेतकऱ्यांच्या पाठिमागे उभी केली जाईल. आज बजेट नसताना वर्षाच्या शेवटी-शेवटी सुध्दा आम्ही इतकी मदत केलेली आहे. पुढच्या बजेटमध्ये आणखी भरपूर प्रमाणात मदत करण्यात येईल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हे भूषणावह नाही. मी या सदनाच्या मार्फत राज्यातील सर्व शेतकऱ्यांना विनंती करतो, आवाहन करतो की, कुणाकडे काही अडचणी असतील, कुणाचे काही संकट असेल तर जिल्हा स्तरावर जी कमिटी केलेली आहे, तिच्यापुढे येऊन त्यांनी आपल्या अडचणी मांडाव्यात.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे.. 16:45

श्री.आर.आर.पाटील (पुढे चालू...

जरी सरकार कमी पडले तरी चुकीच्या पध्दतीचा अवलंब करुन शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करु नये. म्हणून हे पॅकेज काय तर आणखी दहा पॅकेज द्यावी लागली तरी राज्यातील सगळी कामे बाजूला ठेवून ही पॅकेजेस देऊन शेतकऱ्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी उभे राहू.

श्री.अरविंद सावंत : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.आर.आर.पाटील : शेतकऱ्यांच्यासाठी आणखी पॅकेज देऊन मदत देऊ केली तर यांची काय हरकत आहे काय ? शेतकऱ्यांना मदत द्यायला नको काय ?

श्री.अरविंद सावंत : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभापती महोदया, आपले मी स्वागत करत आहे. आपण नंतर सुधारणा करुन असे म्हणाला की,ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत त्यांनासुध्दा ताबडतोब आपण मदत करावी. परंतु मंत्री महोदयांनी तो विषय डायव्हर्ट केला. शेतकऱ्यांना यापुढे वाटेल ती मदत करु, असे सांगितले गेले. परंतु ज्या शेतकऱ्यांनीय आत्महत्या केलेल्या आहेत, त्यांच्याबाबतीत सांगावे. त्यांच्या कुटुंबियांना कोणती ठोस मदत करणार आहात, ते सांगावे, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदया, या संदर्भाने दोन्ही सभागृहामध्ये चर्चा झाली. काही सन्माननीय सदस्यांची मागणी अशी आहे की, आंध्र प्रदेशच्या धर्तीवर आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करावी. याबाबत माहिती घेतली. आंध्र प्रदेशमध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपये दिले जातात. तरी देखील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याच्याबाबतीत काही शंका उपस्थित केल्या जात आहेत. आमचा याबाबतीत बारकाईने अभ्यास सुरु आहे. याबाबतीत अंतिम निर्णय झाल्यानंतर मदत वाढविण्याबाबत निश्चित विचार केला जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोादया, कोणत्या पॅकेजची घोषणा केली याची मला माहिती नाही. पण जी चर्चा चाललेली आहे त्यावरुन असे दिसते की, शेतकऱ्यांसाठी....

श्री.आर.आर.पाटील : जे सन्मानननीय सदस्यांनी ऐकलेले नाही, त्या संदर्भात त्यांनी स्पष्टीकरण मागण्यासाठी मुद्दा उपस्थित करायचा म्हटला तर ते योग्य नाही. जे उपस्थित आहेत त्यांनी स्पष्टीकरण मागणे ठीक आहे. आपण मनाचा मोठेपणा दाखवून सदस्यांना बोलण्याची संधी दिली.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : मी पुन्हा निवेदन करायला सांगत नाही. जी काही चर्चा चालू आहे त्या अनुषंगानेच मला विचारावयाचे आहे. निवेदनावर प्रश्न विचारले जातात की नाही, याबाबतीत काय नियम आहे याची मला माहिती नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना जी काही माहिती मिळालेली आहे त्यावर क्लॅरिफिकेशन त्यांना हवे असेल तर तेवढ्या पुरते त्यांनी बोलावे.

श्री.मधुकर सरपोतदार : माझा प्रश्न एकच आहे की,शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यावर सहा तास चर्चा केली. त्या संदर्भामध्ये महाराष्ट्र शासनाने जर निर्णय घेतला असेल तर तो कसा निर्णय झाला ? जेवढ्या शेतकऱ्यांच्या हत्त्या झाल्या त्यांच्या कुटुंबियांना कोणती मदत मिळणार आहे ? दुसरी गोष्ट अशी की, सावंत आयोगाचा अे.टी.आर. आलेला आहे. त्याबाबतची चर्चा केव्हा घेणार आहेत ? मी कोणावर टीका केली नाही.

श्री.मधुकर चव्हाण : मागच्या अधिवेशनामध्ये अे.टी.आर. आल्यानंतर त्यावर चर्चा करु असे सांगण्यात आले होते.

**तालिका सभापती** : सावंत आयोगाच्यासंदर्भात चर्चा करायची असेल तर त्याबाबत माननीय सभापती महोदय ठरवतील, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरविले जाईल आणि त्याबाबत निर्णय नंतर घेतला जाईल.

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी पॅकेजच्या संदर्भात विचारले. हे सभागृह संपल्यानंतर त्यांना पॅकेजबाबत मी सांगेन किंवा उद्या वर्तमान पत्रामध्ये ती माहिती येईल.

श्री.अरविंद सावंत : शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, त्यांच्या कुटुंबियांना काय मदत करणार आहात ते सांगा.

**तालिका सभापती** : ही चर्चा आता येथे संपलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी वर्तमानपत्रामध्ये माहिती येईल,ती वाचावी असे सांगितले. परंतु वर्तमानपत्रामध्ये आलेल्या माहितीवर येथे चर्चा करायची नसते,याची त्यांना माहिती असायला पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : ते शब्द मी मागे घेतो.

**तालिका सभापती** : कामकाजातून ते शब्द काढून टाकण्यात येतील.



अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : बोलले मागे घेतले, तर रेकॉर्डवर काहीच शिल्लक रहाणार नाही.

**तालिका सभापती** : आपण जे शब्द मागे घेतले, त्याबाबत मी सांगितले. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दीपक सावंत हे हिंदू विवाह विधेयकावर त्यांचे अर्धवट राहिलेले भाषण सुरु करतील.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. VII OF 2005.

( A BILL FURTHER TO AMEND THE HINDU MARRIAGE ACT, 1955 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA. )

( चर्चा पुढे चालू....)

डॉ. दीपक सावंत ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे, त्यावर आज अतिशय गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. या राज्याच्या सार्वजनिक आरोग्य मंत्री एक महिला आहेत, ही चांगली गोष्ट आहे. त्या स्वत: डॉक्टर आहेत. त्यामुळे त्यांना या सर्व विषयाची माहिती आहे. त्यामुळे त्यांनी बाकीच्या सर्व गोष्टी बाजूला ठेवाव्यात. या विधेयकाकडे केवळ हे एक अशासकीय विधेयक आहे अशा दृष्टीने न पाहता याचे कायद्यामध्ये रुपांतर करावयाचे आहे, अशा भावनेने विचार केला तर नक्कीत यातून मार्ग निघेल. महाराष्ट्र इतर राज्यांपेक्षा एक पाऊल पुढे आहे, महाराष्ट्राने लग्नापूर्वी एड्सची चाचणी करावी अशा प्रकारचा कायदा आणला अशा प्रकारचे देशामध्येच नव्हे तर जगामध्ये या राज्यांचे नांव होईल. कारण आपण कारोडो रुपये यावर खर्च करतो. फाईव्हस्टारमध्ये कॉन्फरन्स करुन हा एड्सचा प्रश्न सुटणार नाही. तर लग्नाच्यापूर्वी एड्सची चाचणी करणे ही बेसिक व आवश्यक गोष्ट आहे.(अडथळा) एड्सच्या फाईव्हस्टार संस्कृतिवर मी नंतर बोलेन. पण हा मेसेज तळागाळापर्यंत जावयाला पाहिजे. फक्त फाईव्हस्टार संस्कृतिमधूनच एड्स येत नाही तर तो तळागाळातूनसुध्दा येतो. ट्रक ड्रायव्हरमधून एड्स येतो. याची शिकार फक्त महिला होते. एखाद्याची पत्नी होते. एड्सचा प्रचार करतांना कॉण्डोमबरोबर गणपतीच्या आरतीचे पुस्तक देण्यात येते, ही देखील एक वाईट गोष्ट आहे. कुणी एखाद्या संस्थेने अशा प्रकारचा उपक्रम राबविलेला आहे. शासन सर्वांच्या धार्मिक भावना जपते तेव्हा हिंदूच्या धार्मिक भावना देखील जपव्यात. आणि एड्सचा प्रसार रोखण्यासाठी जे कॉण्डमचे वितरण करण्यात येते त्याच्याबरोबर गणपतीच्या आरतीची पुस्तके दिली जाऊ नये अशी मी या ठिकाणी सूचना करतो. हा कायदा अस्तित्वात आणावा आणि विवाहपूर्व कुंडली न बघता विवाहपूर्व रक्ताची एड्ससाठी चाचणी करुन आपण या महाराष्ट्र राज्याला एक वेगळा दिलासा द्यावा, एवढेच सांगून मी माझे दोन शब्द संपवितो, जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----

..2...

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी एक अतिशय चांगले विधेयक या सभागृहात आणलेले आहे. या पूर्वी डॉ. दीपक सावंत यांनी देखील असा आग्रह धरला होता. तसेच श्री.शिशीर शिंदे यांनी सुध्दा याबाबतीत आग्रह धरला होता. यामध्ये जो मूळ मुद्दा आहे तो कायद्यापुरता मर्यादित नाही. एकूणच सामाजिक परिस्थिती बदलत आहे. ती पाहिली तर मिडिया असू द्या.मग प्रिंट मिडिया असू द्या. किंवा इलेक्ट्रॉनिक मिडिया असू द्या. आमची पेज-3 संस्कृति वाढत चालली आहे. आम्ही विद्यार्थी अवस्थेत चित्रपट पाहात होतो. पण आता अलिकडे चित्रपट पाहणे काही जमत नाही. पण चुकून एखादे गाण्याचे संगीत चांगले वाटते किंवा त्याचा ऱ्हीदम चांगला वाटतो म्हणून ते ऐकतो.पण त्याचे चित्रीकरण जेव्हा पाहायला मिळते तेव्हा ते इतके बिभत्स असते की, बापरे ! हे असे गाणे आहे काय असे वाटते. हे सगळे पाहिल्यानंतर तरुण मुले असू द्यात. मुली असू द्यात. यामध्ये दोन प्रकार सुरु आहेत. एका बाजूला या देशात खेळाडू पुढे येत असतांना. कालपरवा टेनिससारख्या खेळामध्ये सानिया मिर्झा पुढे यायला लागली, याचा आम्हाला आनंद वाटला. पण तिच्या खेळापेक्षा तिच्या कपडयावर चर्चा व्हायला लागली, हा आणखी एक वेगळा विषय आहे. पण ती सानिया मिर्झा पटकन बोलून गेली की, विवाहपूर्व शारीरिक संबंध असायला काही हरकत नाही. तरुणांनी कुणाचे आदर्श घ्यायचे? नट-नटयांचे आदर्श घ्यायचे की, कुठेले आदर्श घ्यायचे.?(अडथळा) माझे म्हणणे ऐकून घ्या. सानिया मिर्झावर टीका करण्यासाठी मी बोलत नाही.मी जे बोलून गेलो ते गेले. शब्द हे एक शस्त्र आहे. आणि हे असे शस्त्र आहे की, ते पुन्हा मागे घेता येत नाही. थोडयावेळापूर्वी या ठिकाणी श्री. आर.आर.पाटील बोलले की, मी माझे शब्द परत घेतो. पण पहिल्यांदा ते जे बोलले ते रेकॉर्डवर आहेत. त्यानंतर मी ते शब्द परत घेतो असे त्यांनी म्हटले. पण ते दोन्हीही रेकॉर्डवर आहे.तेव्हा मी माझे शब्द मागे घेतो असे म्हटले तरी तेही रेकॉर्डवर राहणार आहे. त्यामुळे काय फरक पडतो. त्यात आपण जायला नको. काळ कसा बदलत चालला आहे हे लक्षात घ्या. आज आपण घरातून बाहेर पडतो. आज इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे.इंटरनेट घराघरात आले आहे. शासन बाहेर जाऊन वेबसाईटच्या दुकानावर धाड टाकू शकेल पण घरात इंटरनेट आहे त्याचे काय कराल? घरात ते सगळे बघता येते .बिभत्स चित्रपटसुध्दा इंटरनेटवर पाहता येतात.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

Who is going to stop it. म्हणून हा हिंदू विवाह कायदा आपण करावा. तो केलाच पाहिजे. पण संस्कृतिचा जो ऱ्हास होत आहे ते त्याचे मूळ कारण आहे. नटनटयाही आमची आदर्श माणसे आहेत. विवाहानंतर पुन्हा दुसरा विवाह करायचा. दोन-दोन विवाह करायचे. दोन्ही बायका घरी असतात. मग आम्हालाही वाटते, आपल्याला काय हरकत आहे. आपली ऐपत आहे की, नाही ते नंतर बघू. ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती आपण स्वीकारली पाहिजे. आणि मी स्वत: किती आदर्श वागतो याचा विचार केला पाहिजे. "चॅरिटी बिगिन्स ॲट होम" याचा विचार केला पाहिजे.सभापती महोदया, मी या विधेयकावर बोलणार नव्हतो. पण मला ते लागले.सभापती महोदया, ते आणखी किती पोडतिडिकेने मांडायचे? ही रक्तगट चाचणी कोण करणार ? ज्यांचे विवाह प्रपोज मॅरेज असतील ते करतील.

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

लव्ह मॅरेजेसचे काय, कॅन यू स्टॉप ईट ? आंतरजातीय विवाहाबाबत तर सोडूनच द्या, जात, पात सोडूनच द्या. पण आपली मुलगी असेल अथवा आपला मुलगा असेल, ती मुलगी कोणाच्या पेमात आहे, आता परवाच बातमी वाचायला मिळाली की, 70 वर्षाच्या म्हाताऱ्याने एका 30 वर्षाच्या मुलीशी लग्न केले. त्याचा 40 वर्षाचा मुलगा वैतागला की काय करतो माझा बाप म्हणून. पण त्याने लग्न केलं. ही कॅन मॅरिड, ही कॅन स्टॉप. समाजाची ही सर्व व्यवस्था आहे, आम्हीही त्यावेळी गॅदरिंग करीत होतो, आम्ही देखील नाटकं करीत होतो. पण आता कसं असतं, ब्ल्यु डे, रेड डे असे सगळे वेगवेगळे डेज आले. एखादया गोष्टीला आम्ही ज्यावेळी विरोधी करतो त्यावेळी "अल्लाह" मग आम्ही कुपमंडुक विचारांचे, मागास विचारांचे आहोत. परंतु विचार करीत नाही की त्याच्या मागची भूमिका असते की, आपल्या संस्कृतिच्या मुळावर हा घाव येतोय. पण हे दुर्देव या देशाचं आहे, या राज्याचं आहे. म्हणून मग दुरदर्शनवर असो, अथवा चॅनल्सवर असो आणि त्याच्याही पलिकडे केबल्स जाऊ लागले आहेत, अशी आजची परिस्थिती आहे. केबल्सवर तर ठराविक दिवशी आणि ठराविक वेळी अतिशय बिभत्स चित्रपट दाखविले जातात. आणि चक्क पालक बंद घरात ते आवडीने पाहतात. कशासाठी आपण हे सगळं सांगतो आहे? आपण सांगतो की, रक्त तपासणी हिंदू विवाह कायदयात करु या. मग हिंदू विवाह कायदयातच कशाला, काल परवा झालं न मुस्लीम मुलांशी लग्न. अशा प्रकारे सर्व धर्मांशी संबंधित असलेल्या कायदयांमध्ये बदल करावा लागेल. त्यांना एड्स झाला तरी चालेल, असं आहे काय हिंदुनाच झाला तरी चालेल आणि इतरांना व्हायला नको. कायदयात बदल करावयाचाच असेल तर सर्व धर्मांना समावेशक असा बदल करायला पाहिजे. कारण समाज हा सर्व धर्माचा, जातीचा आणि पंथांचा असतो. तो समाज जर बदलायचा असेल तर मग विवाह कुणाशी होतात हे सुध्दा पाहिले पाहिजे. त्यांच्याकडे तर पध्दतच आहे की, चार-चार, पाच-पाच लग्न करायची. वेळेचं बंधन जरी नसलं तरी मी जास्त बोलणार नाही. हिंदू विवाह कायदयाच्या संदर्भात या ठिकाणी पोटतिडीकीने विचार मांडले. पण लग्न केले, प्रपोज्ड मॅरेज केले, अथवा प्रेम विवाह असेल त्यावेळी मुलीला सांगितले की, बघ बाळा हा तुझ्या आयुष्याचा प्रश्न आहे, प्रेम कुणाशी करते याचा जरा विचार कर. मग हे झाले लग्नापर्यंत, पुढे काय, लग्नानंतर शेण खाल्लं, भांडणं झाली, झगडे झाले, 15 दिवस माहेरी गेली, मै मैके चली जाऊंगी. मग काय, कुठं बंधन आहे, बंधन केवळ कायदयाने घालून चालणार नाही, तर

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ......

बंधन हे सामाजिक, टिळक-आगरकरांचा जो वाद होता. स्वातंत्र्य पहिलं की समाजसुधारणा. तसा हा समाजसुधारणेचा विषय आहे. त्या सामाजिक सुधारणेच्या संदर्भात मी अगोदर आपलं स्वागत करतो. ठीक आहे, निदान येथून तरी सुरुवात आपण करीत आहात. अगोदर हिंदू विवाह कायदयात सुधारणा करु, त्यातून इतरांना काही तरी जाणीव होईल की, बाबा हिंदू विवाह कायदयात असा बदल झाला, सुरुवातीला आपल्याला संकुचित म्हणतील पण ते पुढे फायदयाचे होईल. म्हणून या बिलाचे स्वागत करतांना प्रथम आपण आपले आदर्श बदलले पाहिजेत. हे बदलणे कितपत खरे आहे हे मला माहिती नाही तरी सुध्दा कायदा येत असेल तर त्याचं स्वागत करु या. आमचे मित्र डॉ. दीपक सावंत वारंवार सांगत होते की, निदान या विषयाकडे गांभीर्याने पहावे, केवळ अशासकीय बिल आहे म्हणून ढकलून देऊ असे त्याकडे पाहू नये. तर खरंच जसं चॅरिटी बिगेन्स ॲट होम. अशा प्रकारे आपण हा कायदा पहिल्यांदा आपल्या राज्याने केला, गोव्याने केला असं म्हणतात पण त्याची अंमलबजावणी अजून तरी झाली नाही, गोव्याची संस्कृती आणखीन चंगळ आहे. चंगळवादामुळे हा सगळा प्रकार आहे. काल फाईव्ह स्टारबद्दल सांगितलं, तसेच बारबालाच्या संदर्भात कोर्टाने विचारले की, तूम्ही बारबाला कुठं घेऊन जाताय, त्या तर बेंगलोरला घेऊन गेले, आमचे बंगलोरवाले येथे आहेत. म्हणून या बिलाचं स्वागत करतांना अजुनही अंतर्मुख व्हावं लागेल. आपल्याकडून सुरुवात करायला हरकत नाही. की विवाहपूर्व रक्ताची चाचणी व्हायलाच पाहिजे, खासकरुन एड्सच्या संदर्भातील चाचणी व्हायलाच पाहिजे, असे सांगून या बिलाला माझा पाठिंबा व्यक्त करतो, सहमती व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

**जयहिंद, जय महाराष्ट्र.**

----------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदया, हिंदू विवाहासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी येथे अशासकीय विधेयक आणले आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, या अशासकीय विधेयकाचा एकच हेतू आहे तो म्हणजे हिंदू पध्दतीने किंवा अन्य कोणत्याही धर्माच्या पध्दतीने विवाह करण्यापूर्वी वधू व वर या दोघांची एडस चाचणी घेणे आवश्यक आहे. एडस नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले नसेल तर विवाह करण्यात येऊ नये. एडसग्रस्त व्यक्तीशी विवाह केल्यानंतर त्याचे परिणाम जन्माला येऊ घातलेल्या अपत्याला भोगावे लागतात. HIV POSITIVE I AND II असे दोन प्रकार आहेत. ज्या रुग्णांना HIV ची बाधा झालेली असते, तो एडसग्रस्त रुग्ण होत नाही. यासाठी WESTERN BLOT ही Confirmatory Test असते. त्यात जर निदर्शनास आले तर ती व्यक्ती एडसग्रस्त आहे असे समजले जाते. या टेस्ट शिवाय कोणालाही आपण एडसचा रोगी म्हणू शकत नाही. म्हणून सदर Confirmatory Test च्या प्रमाणपत्राची अट समाविष्ट केली पाहिजे असे माझे मत आहे. HIV POSITIVE आणि NEGATIVE चे प्रमाणपत्र ग्राहय धरणे बरोबर होणार नाही. त्यामुळे जी व्यक्ती WESTERN BLOT Confirmatory Test चे प्रमाणपत्र सादर करेल अशांनाच विवाह करण्यास परवानगी द्यायला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी प्रेम-विवाहाच्या वेळी काय करणार असा मुद्दा उपस्थित केला. प्रेम-विवाह केल्यानंतर तोसुध्दा रजिस्ट्रर करावा लागतो. त्यावेळीसुध्दा जी व्यक्ती WESTERN BLOT Confirmatory Test चे प्रमाणपत्र सादर करणार नाही तो पर्यंत त्यांचा विवाह नोंदणीकृत करता कामा नये. तेव्हा मी जी सूचना केली आहे, त्या सूचनेचा मंत्रिमहोदयांनी विचार करावा अशी विनंती करून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधासनसभाद्वारा निर्वाचित) : सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 7 - हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक 2005 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी एका अत्यंत महत्त्वाच्या अशा मुद्दावर अशासकीय विधेयक आणले आहे. या निमित्ताने मी दोन सूचना करणार आहे. लग्नपत्रिका जुळवण्यावर काही लोकांचा विश्वास असतो, तर काहींचा नसतो. म्हणजे हा श्रध्दा-अंधश्रध्देचा प्रश्न असू शकतो. या विधेयकाच्या माध्यमातून रक्तगट चाचणीचे प्रमाणपत्र दोन्ही बाजूंनी सादर करणे आवश्यक आहे अशी सूचना करते. कारण रक्तगटावर देखील अनेक गोष्टी अवलंबून असतात. म्हणून रक्तगटाची चाचणी होणे आवश्यक आहे. तसेच, ग्रामीण भागामध्ये प्री मेडिटरी कौन्सिलिंग होणे गरजेचे आहे. तसे केले नाही तर अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणून पूर्णपणे निरोगी असल्यासंबंधीचे प्रमाणपत्र देखील दोन्ही बाजूंनी सादर केले पाहिजे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ......

सन्माननीय सदस्यांनी विचारले होते की, लव्हमॅरेजच्या संदर्भात मग तुम्ही काय करणार? जेव्हा लग्न रजिस्टर केले जाते तेव्हा यासंदर्भातील सर्टिफिकेट कंपलसरी दाखविणे आवश्यक आहे. परंतु यामध्ये सुध्दा पळवाटा असू शकतात. ओळखीच्या डॉक्टरकडून खोटे सर्टिफिकेट सुध्दा सादर केले जाऊ शकते. जर अशा प्रकारचा गुन्हा उघडकीस आला तर जास्तीत जास्त कडक शिक्षा झाली पाहिजे यासंदर्भातील तरतूद सुध्दा या बिलात असली पाहिजे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. निलम गो-हे ( विधनसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी हे जे अशासकीय विधेयक मांडलेले आहे ते फार महत्वाचे आहे. एक शब्द सातत्याने वापरला जातो तो म्हणजे ऑर्गनायझेशन मेमरी. म्हणजे ज्या ठिकाणी आपण काम करतो त्या संस्थेचा स्वत:चा एक इतिहास असतो, आठवण असते. या विषयावर अशासकीय विधेयकाच्या अनुषंगाने वारंवार चर्चा देखील झालेली आहे. अशासकीय विधेयक मांडण्याचा हेतूच असा असतो की, आज ना उद्या अशासकीय विधेयकाचे रुपांतर हे शासकीय विधेयकात व्हावे. खेदाची गोष्ट अशी आहे की, तीच तीच अशासकीय विधेयके सन्माननीय सदस्यांना वारंवार मांडावी लागतात. शासनाने जर एकदा ठाम निणर्य घेतला की, आम्ही हे विधेयक करणारच नाही ; परंतु ही गोष्ट आपल्या धोरणात बसणारी नाही. म्हणून यावतश्चंद्र दिवाकरो. महाराष्ट्र शासन एचआयव्ही प्रतिबंधाच्या संदर्भात विवाह पूर्व तपासणीसाठी आम्ही कधीही कायदा करणार नाही, कारण असा कायदा केला तर या या कारणाला आपल्याला तोंड द्यावे लागेल असे सांगितले पाहिजे. अशी तुम्ही रॅशनली व्यवस्थित कारणमीमांसा ठेवून मांडा. म्हणजे पुढच्या वेळेपासून तीच तीच विधेयक मांडण्याचा उद्योग सदस्य करणार नाहीत, तसेच सदस्यांचा वेळही जाणार नाही. मंत्रीमहोदया, मुंदडाताई या आमच्या स्नेही आहेत. एचआयव्हीच्या संदर्भात एवढे मोठे आव्हान तयार झालेले आहे. मागच्या वेळी माजी माननीय मंत्री महोदय श्री. दिलीपराव सोपल साहेबांनी व्यवस्थित मांडणी करुन सांगितले होते की, वेळ आली तर आम्ही तसा कायदाही करु. आता आपल्या राज्यामध्ये मोठया प्रमाणात स्थलांतर होत आहे. आपल्या राज्यात एचआयव्ही बाधितांची संख्या जास्त प्रमाणात आहे. या कायद्याच्या अनुषंगाने आपण लग्नाच्या अगोदर तपासणी करण्याचे बंधण आणीत आहात परंतु ज्या समाजामध्ये एक पत्नीव्रत सांभाळणारेच नाही आणि एचआयव्ही नसलेली पत्नी घरात असली पाहिजे परंतु बाकीचे उद्योग करण्यासाठी आपण मात्र बाहेर मोकळा असा प्रकार होता कामा नये. असे जर असेल तर आपण समाजात किती लोकांची तपासणी लावणार आहोत. हे विधेयक फार महत्वाचे आहे. या विधेयकाला मला विरोध करावयाचा नाही परंतु ज्या ठिकाणी खोटी सर्टिफिकेट देणारी मोठी यंत्रणाच आहे तेथे एचआयव्ही एडस् अजिबात झालेला नाही यासंदर्भातील कागदपत्रे देण्यासाठी ठिकठिकाणी कारखाने सुरु झाले तर नवल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

डॉ. निलम गो-हे......

वाटायला नको. एचआयव्हीसाठी लोकजागृती आणि लोकप्रबोधन केले तर एचआयव्हीचा प्रश्न ब-याच अंशी सुटू शकेल. गेल्यावेळेस सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी आणलेले अशासकीय विधेयक आणि आता मंदाताई म्हात्रे यांनी आणलेले अशासकीय विधेयक या दोन विधेयकांच्या पुलावरुन बरेच पाणी वाहून गेलेले आहे. यासंदर्भात सुप्रिम कोर्टात अनेक याचिका दाखल झालेल्या आह्ेत. एचआयव्ही पॉझीटीव्ह असणा-या लोकांचे विशेषत: पुरुष वर्गाचे असे म्हणणे आहे की, आमचे रक्तगट कोणते आहे हा जसा आमचा खाजगी अधिकार आहे तसेच आमच्या रक्तामध्ये एचआयव्हीची बाधा झाली आहे की, नाही हा आमच्या प्रायव्हसीचा अधिकार आहे. त्यामुळे अशा व्यक्ती एचआयव्हीने बाधित झालेली आहे की, नाही हे कोणालाही कळता कामा नये. ज्यावेळेस ही याचिका सुप्रिम कोर्टात गेली त्यावेळेस तरी महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात बाजू मांडावयास हवी होती की, एचआयव्ही बाधित ज्या महिला होतात किंवा दोघांपैकी एक पार्टनर स्वत:च्या अज्ञानातून किंवा फसवणुकीतून दुस-यामुळे बाधित होतो त्यावेळेस त्या व्यक्तीच्या खाजगी अधिकाराचे तुम्ही काय करणार आहात? त्या व्यक्तीचे आयुष्य उध्वस्त होते ही कोणाची जबाबदारी? परंतु असे काहीही झाले नाही. म्हणून आमचा "खाजगी" मुद्याच्या संदर्भात मतभेद आहेत. माननीय अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान असतांना पंतप्रधानांच्या कार्यालयाने मिर्टींग घेतली होती त्या मिटिंगच्या वेळेस जेंडर ॲडव्हाजर देखील उपस्थित होते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..........

तेव्हा ही परीक्षा असावी की नसावी यावर समाजामध्ये सरळ सरळ दोन तट पडलेले आहेत. आपण या विषयावर सर्वसंमती करण्याची प्रक्रिया करणार आहात काय ? या अशासकीय विधेयकाचे फलित असले पाहिजे असे मला खास करुन सांगावेसे वाटते. सभापती महोदया, एच.आय.व्ही.च्या संदर्भात फार मोठे षडयंत्र असणारा सुध्दा एक ग्रुप आहे. ज्यांना सातत्याने असे वाटते की, वेश्या व्यवसायाला वैध मान्यता मिळावी. ज्या वेश्यांना एच.आय.व्ही. झालेला नाही अशा निरोगी वेश्यांनी व्यवसाय करावा असे म्हणणारे अनेक लोक आहेत. हा जो बॅकॉक पॅटर्न मांडला जात आहे त्यावर आपली भूमिका काय राहणार आहे याबाबत धोरण ठरविले जात नाही तोपर्यंत आपल्याला काही करता येणार नाही. एडस् बाधित जी मुले आहेत त्या संदर्भात आपण कोणती भूमिका घेणार आहात ? एचआचव्ही पॉझिटीव्ह असणाऱ्या माझ्या मैत्रिणी आहेत. मला येथे सांगावेसे वाटते की, तुमच्या आजुबाजुला एखाद्या ओळखीच्या व्यक्तीचा मृत्यु एचआयव्ही-एडस्ने झालेला नसेल तर तुम्ही खरेच भाग्यवान आहात असे मला वाटते. कारण माझ्या ओळखीच्या पाच-सहा व्यक्ती एडसने मृत्यु पावलेल्या आहेत. आमच्या संस्थांमध्ये काही महिला येतात त्यांना एचआयव्हीने बाधित झ ाालेल्या व्यक्तीकडून लागण झालेली आहे. त्या व्यक्ती त्या महिलांना असे म्हणतात की, नाहीतर तुला लागण झालेली आहे तेव्हा मी तुझ्याशी संबंध ठेवणार. आता तुला कोणता धोका आहे ? समाजामध्ये देखील अशा घटना घडत आहेत. तेव्हा दुर्लक्षित अशा मुद्यांवर आज किती उत्तरे मिळतील हे मला माहीत नाही. शासनाचे एडसग्रस्तांबाबत कोणते धोरण आहे हे स्पष्ट केले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मांडलेल्या अशासकीय विधेयकाचे मी स्वागत करते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते आणि माझ भाषण पूर्ण करते.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा ) अशासकीय विधेयक मांडलेले आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. याठिक्राणी आरोग्य मंत्री उपस्थित आहेत. हिंदू विवाह म्हटले की, न्याय आणि विधी विभागाच्या मंत्र्यांनी देखील उत्तर द्यावयास पाहिजे कारण हा फार व्यापक प्रश्न आहे. सभापती महोदया, अलिकडे तर आपल्या संस्कृतीने उच्चांक गाठलेला आहे. " स्त्री ही समाजाची संस्कृती आहे, राष्ट्राची प्रतिष्ठा आहे, घराण्याची इभ्रत आहे, स्त्रीच्या डोक्यावरील पदर खाली ढळवायास नको आणि ढळला तरी तो खाद्यांवर सावरला गेला पाहिजे. स्त्रीने जगावे राजहंसासाखे मान ताठ करुन, हे आता सर्व कुठे आहे ? स्त्रीने जीवन जगावे कमलाच्या फुलासारखे , पाण्यामध्ये कमलाचे फुल असते पण त्यास पाण्याचा स्पर्श होत नाही. स्त्री जीवनाशी संबंधित हे विधेयक आहे. दोन जीवांचे मीलन आहे. आजची संस्कृती कशी आहे याचे मी आपणास एक उदाहरण सांगतो. माझा एक मित्र आहे त्याच्या मुलाने एक मुलगी पसंत केली. त्याच्या वडिलांनी त्यास विरोध केला. पण तो मुलगा आपल्या निश्चयावर ठाम राहिला. तो वडिलांना म्हणाला तुम्ही माझ्यासाठी काय केले ? तेव्हा वडील त्याला म्हणाले मी तुला जन्म दिला, मी तुला शिकविले आणि त्यामुळे तू मोठ्या पदावर पोहोचला आहेस. तु माझ्याशी अशी भाषा करतोस ? त्यावर तो मुलगा वडिलांना म्हणाला, " तुम्ही तरुण अवस्थेमध्ये स्वत:चे शौक पूर्ण करीत होता म्हणून मी पैदा झालो. माझ्यावर काही उपकार केले नाहीत. आताची पिढी अशी आहे. या पिढीला वडिलांची गरज नाही, आईची गरज नाही. स्वत:च लग्न ठरवितात. सभापती महोदया, दोन जीव लग्नामध्ये एकमेकांच्या गळ्यात पुष्पहार घालतात. नंतर त्यांना समाजामध्ये पती-पत्नी म्हणून संबोधिले जाते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ D/ पूर्वी श्री.अजित.... 17:15

श्री.रमेश निकोसे....

अशावेळी त्यांची विवाहपूर्व तपासणी करण्याचे जे अशासकीय विधेयक सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी मांडले ती खरोखरच चांगली बाब आहे. ही आरोग्य खात्याला एक प्रकारची सूचना आहे. परंतु विधी व न्याय विभागाच्या सहकार्याने लग्न कसे होईल यासंदर्भात प्रयत्न केला पाहिजे. आपल्याला स्त्रीची संस्कृती जोपासणे आवश्यक आहे. स्त्री ही राष्ट्राची प्रतिष्ठा आहे, तिची इभ्रत राखणे आवश्यक आहे. जर तिचा पदर खाली आलातर अख्खी घरेच्या घरे उध्वस्त होतात. आज वर्तमानपत्रामध्ये नटयांच्या घटस्फोटासंदर्भात वाचावयास मिळते. महोदया, अशा बातम्यांमुळे स्त्रीचे धिंडवडे निघत आहेत. अशा परिस्थितीत विधी व न्याय विभागाने सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. एड्सची स्टेज मुंबईमध्ये, लखनौमध्ये, अलाहाबादमध्ये की मध्य प्रदेशमध्ये आहे हे माहीत नाही. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, मुंबईतील जुहू परिसरामध्ये रात्री 8 ते 12 वाजेपर्यंत मुली शरीरविक्री व्यवसाय करण्यासाठी रस्त्यावर उभ्या असतात. महोदया, हा काय प्रकार आहे ? त्यामुळे या मुली रस्त्यावर का येत आहेत हे प्रथम तपासण्याची आज गरज आहे. बेरोजगारीमुळे, उद्योग नसल्यामुळे शिक्षित मुलीसुध्दा रस्त्यावर उभ्या राहू लागल्या आहेत. त्यामुळे आज आई-वडिलांसमोर प्रश्न उपस्थित होतो की, आता हा संसार कसा चालेल ? महोदया, काही मुली या मजबुरीने हा व्यवसाय करतात. या विधेयकाच्या निमित्ताने विवाहपूर्व एड्सची चाचणी झाली पाहिजे. वर-वधू यांनी जर आई-वडिलांच्या सहमतीने लग्न केले असेल तर दोन्ही ठिकाणांवरुन अशा प्रकारची चाचणी करण्यासंदर्भात ठरविता येईल. परंतु आई-वडिलांच्या विरोधात जर मुलांनी कोर्टामध्ये लग्न केले असेल तर अशा परिस्थितीत ती चाचणी कितपत होऊ शकेल हा देखील एक व्यापक प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नाला सोपा प्रश्न समजू नका. एड्सची तपासणी केली म्हणून प्रश्न सुटेल असे नाही. राज्यात एड्सचे रोगी तपासण्याच्या दृष्टिकोनातून आरोग्य खात्याने तपासणी तर केलीच पाहिजे, शिवाय विधी व न्याय विभागाने मी निदर्शनास आणून दिलेल्या मुद्यांसंदर्भात सुध्दा अभ्यास करावा, एवढीच या निमित्ताने विनंती करुन, या अशासकीय विधेयकाला पाठिंबा देऊन, माझे विचार संपवितो.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, मी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांच्या मताशी सहमत आहे. ज्यावेळी हे विधेयक आणावे लागते त्यावेळी एड्सग्रस्त रुग्ण कमी कसे करता येतील यासंदर्भात शासनाने जरुर विचार केला पाहिजे. 1 डिसेंबर, 2005 रोजी ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये एड्स दिनाच्या निमित्ताने मा.आरोग्य मंत्री डॉ.विमलताई मुंदडा यांच्या माध्यमातून एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु या कार्यक्रमासाठी किती नागरिक उपस्थित होते ? महोदया, अतिशय अल्प असा प्रतिसाद या कार्यक्रमाला मिळाला. या कार्यक्रमासाठी शाळांतील विद्यार्थ्यांना आणून ठेवले होते. विद्यार्थ्यांनी टाळया वाजवाव्यात म्हणून वैशाली सामंत या गायिकेचा कार्यक्रम ठेवला गेला. महोदया, माझे म्हणणे असे आहे की, मुळात एड्स या रोगाचे समूळ निर्मूलन होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी जे सांगितले ते सत्य आहे. राज्यात 23 लाख रुग्ण एड्सग्रस्त आहेत. हे रुग्ण वाढू नयेत म्हणून सुरक्षित संबंध, कंडोमचा वापर करावा अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना केल्या जातात. परंतु महोदया, केवळ सूचना करणे हा त्यावरील उपाय नाही. मला वाटते 1 डिसेंबरचा कार्यक्रम गडकरी रंगायतनमध्ये आयोजित न करता जर तो सार्वजनिक ठिकाणी आयोजित केला असता तर बरे झाले असते.

नंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तरे ....

महिला मंडळे आहेत, एनजीओज् आहेत. त्यांच्याकडून हे व्हायला पाहिजे होते. आज आपण टीव्ही वर जाहिराती पाहतो. सह्याद्री वाहिनीवरून मराठी बातम्या आणि इतर कार्यक्रम होत असतात मात्र त्यामध्ये जाहिरात हिंदीमध्ये असते. तेव्हा या विधेयकावर बोलत असताना मला विनंती कराविशी वाटते की, या विधेयकाची आवश्यकता आहे पण त्यापेक्षाही हे विधेयक आणायलाच लागू नये असे प्रयत्न शासनाच्या माध्यमातून होण्याची नितांत आवश्यकता आहे. मघाशी या ठिकाणी म्हटले गेले की, कंडोम मिळणाऱ्या मशीन्स जागोजागी लावाव्यात, हे असे उपाय किंवा दूरदर्शवर दिसणारी चित्रे आहेत ती कमी कमी करण्याचा प्रयत्न करण्याची जास्त आवश्यकता आहे, तरी त्या दृष्टीने देखील विचार व्हावा एवढे बोलून या विधेयकाला मी समर्थन देतो. धन्यवाद.

****

...... 3जे 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी जे अशासकीय विधेयक आणले आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदया, संपूर्ण विश्व आज अशा काही अत्यंत गंभीर आजारांच्या विळख्यामध्ये सापडलेले आहे त्यातून बाहेर पडण्यासाठी आपले जे प्रयत्न चालू आहेत त्यातीलच हाही एक प्रयत्न आहे आणि एका असाध्य रोगाला काही प्रमाणात प्रतिबंध करण्याचा एक उपाय या विधेयकाच्या माध्यमातून आपल्यासमोर आज येत आहे. केवळ कायदा करून हा प्रश्न सुटेल असे मला तरी वाटत नाही. खऱ्या अर्थाने लोकांचे, समाजाचे प्रबोधन त्या बाबतीत होण्याची नितांत आवश्यकता आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी सांगितले की, राज्याचा एक कार्यक्रम ठाण्याच्या गडकरी रंगायतनमध्ये झाला. पण तो त्या विशिष्ट लोकांपुरता वा लोकांसाठी मर्यादित होता. असेच जाहीर कार्यक्रम सर्वत्र होण्याची गरज आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये, ग्रामीण भागापर्यंत ही जी जनजागृतीची मोहीम आहे ती गेली पाहिजे. त्यासाठी जे काही विविध उपक्रम आपण राबविता ते सारे राबविण्याची गरज आहे. या ठिकाणी विवाहापूर्वी प्रत्येक तरूण-तरूणीची रक्त चाचणी करण्याची तरतूद करण्याची सुधारणा या कायद्याला आणली आहे. पण याचे काही गंभीर परिणाम देखील होण्याची शक्यता आहे हे आपणास नाकारता येणार नाही. कारण आपल्यावर एका विशिष्ट संस्कृतीचा पगडा आहे. विवाह निश्चित करण्यासाठी जेव्हा गेलेल्या मुलीच्या वडिलांनी मुलाच्या वडिलांकडे त्या मुलाच्या अशा प्रकारच्या प्रमाणपत्राची मागणी केली तर साहजिकच आजची आपली संस्कृती आणि असलेली विचारधारा यांचा विचार करता त्या मुलाच्या वडिलांवरच नव्हे तर एकंदर कुटुंबियांवरच त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे, किंबहुना त्या मुलावर, त्याच्या चारित्र्यावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे शंका घेण्याचाच हा प्रकार आहे असा समज होऊ शकतो. तीच गोष्ट मुलीच्या बाबतीतही होऊ शकते. आता हे किती प्रमाणात होऊ शकेल हे मला माहीत नाही. पण ही जी मानसिकता आहे ती मानसिकता बदलण्याची गरज आहे. अर्थातच कायदा तयार झाला तर त्याचे बंधन सगळ्यांवरच येणार आहे आणि त्या कायद्याचे अनुकरण हे प्रत्येकाला करावे लागणार आहे, त्याचा निश्चितपणे परिणाम हा होणार. तेव्हा प्रथमत: यासाठी आपली, आपल्या समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे आणि त्यासाठी समाजाचे त्या दृष्टीकोनातून प्रबोधन होणे गरजेचे आहे. त्यासाठी

..... 3जे 3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

शासनाकडून काही उपाय योजना केल्या जाणे आवश्यक आहे. आता आपण एडस्‌चा विचार करतो आहोत. पण अशाच प्रकारे थॅल्सेमिया म्हणून जो असाध्य रोग आहे त्याबाबत देखील अशीच परिस्थिती आहे. आईवडील दोघांनाही हा रोग असेल तर त्यांच्यापासून होणाऱ्या अपत्याला देखील हा रोग होऊ शकतो. इतकेच काय पण दोघांपैकी एकाला जरी हा आजार मेजर असेल तर त्यांचे अपत्य थेल्सेमियाग्रस्त होऊ शकते. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

परंतु दोन पैकी एकाला मेजर आजार असेलतर त्याचे अपत्य हे थालसेमियाग्रस्त होते. ठाणे जिल्हयात 10 शिक्षकांची अपत्ये ही थालसेमियाग्रस्त आहेत. त्यांना दर महिन्याला 4 ते 6 हजार रुपये खर्च येतो, पती-पत्नींपैकी जर एकच नोकरीला असेल तर दर महिन्याला रक्ताचे शुध्दीकरण करण्यासाठी त्यांना करावा लागणारा हा खर्च विचारात घेता त्या मुलाचे वय जसजसे वाढत जाईल तसतसा हा खर्च वाढतो. एवढे करुन देखील आपला मुलगा आज आहे परंतु उद्या तो असेल की नाही याची भीती पालकांच्या मनामध्ये असते. म्हणून अशाप्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या आजारासाठी रक्ताची चाचणी होणे आवश्यक आहे एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--*-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जे अशासकीय विधेयक आणले आहे. व त्या विधेयकावर सन्माननीय सदस्य सर्वश्री डॉ. दीपक सावंत, डॉ. अजीज, रमेश निकोसे, अनंत तरे, रामनाथ मोते तसेच आपण स्वत: व माननीय सदस्या सर्वश्रीमती कांताताई नलावडे, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. हिंदू विवाह कायद्यामध्ये सुधारणा केली पाहिजे. व त्याअन्वये विवाहपूर्व रक्त तपासणी केली पाहिजे. जेणेकरुन एच.आय.व्ही. एड्स आहे की नाही हे कळू शकते. त्यामधून भविष्यात समाजाला जे दुष्परिणाम भोगावे लागतात, त्या व्यक्तीला व कुटुंबाला भोगावे लागतात. त्यासाठी आपण मार्ग काढला पाहिजे अशाप्रकारची भूमिका याठिकाणी व्यक्त करण्यात आली. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी ज्यावेळी हे विचार व्यक्त केले त्यावेळी मी सभागृहामध्ये नव्हते. महिला व बाल विकास विभागाकडून हे अशासकीय विधेयक आले आहे, व हिंदू विवाह कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी यापूर्वीचे तत्कालीन विधी व न्याय राज्यमंत्र्यांनी हे विधेयक यापूर्वी चर्चेला आणले होते, व त्यावेळी देखील अशाप्रकारची चर्चा झाली होती. एच.आय.व्ही.एड्स बाबत लोकांमध्ये जनजागृती झाली पाहिजे याबाबत माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व डॉ. अजिज यांनी विचार व्यक्त केले आहेत. माननीय सदस्य श्री. अनंत तरे व माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे व श्रीमती कांता नलावडे यांचेही विचार मी मनापासून ऐकले आहेत. सभागृहामध्ये या विषयावर झालेली चर्चा ऐकल्यानंतर एड्स हा एकप्रकारचा डिसीज नसून तो सिंड्रोम आहे असे मी आपणास सांगू इच्छिते. ज्या दिवशी यामुळे व्यक्ती बाधित होते तेव्हापासून ती समाजामध्ये नॉर्मल लाईफ जगते, अशी माणसे समाजामध्ये आहेत. हा सिंड्रोम कोणकोणत्या माध्यमातून होतो हे याठिकाणी सांगण्याची आवश्यकता नाही. .आपणास माहीत आहे की, 1986 पासून हा सिंड्रोम दृष्टोत्पत्तीस आला. तेव्हापासून 1992 पर्यंत शासनाकडून याबाबतीत समाजामध्ये जनजागृती झाली आहे. या जनजागरणासाठी एड्स कंट्रोल सोसायटी आहे, मुंबई जिल्हयासाठी असलेली एड्स कंट्रोल सोसायटी आहे, तसेच आयवर्टमार्फत जागतिक स्तरावर एड्सबाबत माहिती दिली जाते. त्यानुसार नॅशनल एड्स कंट्रोल सोसायटीमार्फत आपल्याकडे याबाबतचा उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करीत असतो. एड्सबाधित रुग्ण असतात त्यांच्याबाबतीत आपण पूर्वीपासूनच काळजी घेत आहोत. तसेच, याठिकाणी फिमेल सेक्स वर्कर्सबाबत उल्लेख केला . ती खरोखरच एकप्रकारची शोकांतिका आहे. अशाप्रकारे समाजातील महिला या गोष्टींना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा...

बळी पडतात व त्यामुळे सामाजिक प्रश्न निर्माण होतात. आपल्याकडे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एक चांगला क्रांतिकारी अशाप्रकारचा डान्स बार बंदीबाबत निर्णय घेतला. आजची तरुण पिढी कुठेतरी बहकत जाता कामा नये. समाजामध्ये असलेल्या या तरुण पिढीचे चांगले योगदान राहिले पाहिजे. त्यांना जगण्यास समर्थ बनविण्याचे ध्येय आपण स्वीकारले पाहिजे. एचआयव्ही एड्स हा रोग ज्यावेळी होतो त्यावेळी त्याचा संसर्ग समाजामध्ये पसरता कामा नये. म्हणून त्याकरिता समाजात असलेल्या फिमेल सेक्स वर्कर्स किंवा इतर सेक्स ॲक्टिव्हिटीज असतील त्याठिकाणी सुध्दा सुरक्षित लैगिक संबंध प्रस्थापित होण्यासाठी तरुणांना लैगिक शिक्षण चांगल्या पध्दतीने दिले गेले पाहिजे, त्यादृष्टीने बाळगावयाची सुरक्षितता यासाठी देखील त्यांना माहिती दिली गेली पाहिजे. त्याकरिता जनजागृती कार्यक्रम अनेक वर्षापासून राज्य शासनामार्फत चालू आहे. माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी ठाण्याला 1 डिसेंबर रोजी याबाबत झालेल्या कार्यक्रमाचा उल्लेख केला. आपण त्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होता. तो कार्यक्रम अतिशय चांगला झाला. शालेय पातळीवर शालेय शिक्षणापासून एड्स जागृतीची माहिती दिली गेली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा . . . .

कारण एखाद्या गोष्टीबद्दल हे करु नका किंवा त्याबद्दल उघडपणे बोलू नका असे सांगितले तर त्या बद्दल कुतूहलता निर्माण होते आणि मग समाजातील काही लोकांची किंवा व्यक्तींची किंवा मुलांची मानसिकता निर्माण होते की, हे नेमके काय आहे हे कळले पाहिजे. म्हणून सगळयांना या विषयाची पूर्णपणे माहिती झाली पाहिजे ही भूमिका आहे. म्हणून 1 डिसेंबरला एडस् कंट्रोल दिन साजरा होत आहे आणि तसा दिवस साजरा करण्याचा उद्देश हाच आहे की, राज्यातील सर्व लोकांपर्यंत अगदी ग्रामीण भागातील वाडया, तांडयातील, वस्तीतील लोकांपर्यंत, प्रत्येक कानाकोपऱ्यापर्यंत याची माहिती झाली पाहिजे यासाठी 1 डिसेंबर ते 15 डिसेंबरपर्यंत कार्यक्रम घेतलेला आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे . . . .

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, मघाशी सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ दिला होता. त्यामुळे त्यांना आता जे काही बोलावयाचे असेल, ते त्यांनी नंतर बोलावे अशी माझी विनंती आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी मघाशी सांगितले की, ठाणे येथे जो कार्यक्रम झाला, तो वाईट झाला आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : तसे त्यांनी कुठे म्हटलेले आहे ?

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, तसे म्हटलेले आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, त्या कार्यक्रमाच्या वेळी आपण तेथे उपस्थित होतात असेच मी म्हटलेले आहे. तेथे विद्यार्थी होते, कारण शालेय विद्यार्थ्यांना देखील याची माहिती द्यावयास पाहिजे, तेथे नागरिक सुध्दा उपस्थित होते, कॉर्पोरेशनचे लोकही उपस्थित होते. त्या कार्यक्रमामध्ये आम्ही ठरविले आणि एच.आय.व्ही.बाधित जी मुलगी आहे, आम्ही तिला स्टेजवर बसविले आणि त्या मुलीचा तेथे सत्कार केला. समाजामध्ये जेव्हा एखाद्याला आपण एच. आय. व्ही. बाधित आहोत किंवा आपल्याला एडस् झालेला आहे, आपण पॉझिटीव्ह आहोत असे समजते, तेव्हा समाजातील लोकांकडून त्या व्यक्तीला दूर सारले जाते किंवा मग आत्महत्येचे प्रमाणही वाढते. म्हणून कुठेतरी त्या व्यक्तीला सुध्दा सन्मानाने जगता आले पाहिजे आणि ज्या व्यक्तीला एडस् झाला आहे त्यांच्या मनात अपराधीपणाची भावनाही राहता कामा नये यासाठी काही भूमिका घेणे ही जशी महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे, तशी ती समाजातील लोकांचीही आहे. फक्त लोक----

. . . .3 एल-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा . . . .

जागृतीसाठी एखादा कार्यक्रम करीत असताना सर्वांना सोबत घेऊन करणे महत्वाचे आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला एडस् होतो किंवा ती व्यक्ती एच.आय.व्ही.बाधित होते, तेव्हा फक्त ॲन्टी एलट्रल व्हायरल ट्रीटमेंट देऊन चालणार नाही, परंतु आजही या रोगावर कोणतेही औषध किंवा लस उपलब्ध नाही. तर आपल्या लैंगिक वर्तणुकीत किंवा आपल्या मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. आज आपल्याला या रोगाच्या बाबतीत पूर्णपणे प्रतिबंध करणे हेच खऱ्या अर्थाने महत्वाचे आहे आणि यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. आपण काही जोखमीचे घटक सांगितले,आपण इंटरव्हेन्शनबाबत म्हणतो, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी समाजातील वेगवेगळया थरातील महिलांबाबत बरेच काम केले आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या सन्माननीय सदस्या सर्वश्री.कांताताई नलावडे, मंदाताई म्हात्रे आहेत किंवा इतरही काही महिला वर्ग असेल. यामध्ये अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. पण विवाहपूर्ण चाचणी केली म्हणजे पुढच्या काळामध्ये एच.आय.व्ही.होणार नाही असे नाही. तर यामध्ये खऱ्या अर्थाने मानसिकता महत्वाची आहे. कोण, कसा आणि कोणत्या गोष्टीला बळी पडतो हे महत्वाचे आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी बोलताना सांगितले की, आज आपण निगेटीव्ह आहोत, आपण व्हॉलंटरी टेस्ट करतो. सामान्य माणसाला सुध्दा टेस्ट करावयाच्या असतील तर प्रत्येक ठिकाणी म्हणजे ग्रामीण भागामध्ये जिल्हा स्तरावर व्हॉलंटरी डिसेजेस सेंटर्स् आणि इतर सेंटर्स् केलेले आहेत. आज आपल्याकडे जवळजवळ 113 व्हॉलंटरी सेंटर्स् आहेत. यासंदर्भात संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अगदी ग्रामीण भागामध्ये सुध्दा कौन्सिलींग करीत आहोत. तसेच पीपीटीसी सेंटर्स म्हणजे प्रिव्हेन्शन ऑफ पेरेंट टू चाईल्ड, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मोतेसाहेबांनीही याबाबत उल्लेख केलेला आहे. पूर्वीपासून आजपर्यंत आपण याबाबतीत काय ॲचीव्हमेंट केलेली आहे ? आज हे प्रमाण कमी करु शकलो का ? पूर्वी आपल्याकडे ब्लड ट्रान्समिशन मध्ये जे प्रमाण होते, ते पाहिले तर दिसून येईल की, पूर्वी 28 टक्के होते, नंतर आपण 10 टक्क्यावर आलो आणि आज हे प्रमाण 6 टक्क्यापर्यंत आणलेले आहे. एस.टी.डी.म्हणजे सेक्स्युअली ट्रान्समिटेड डिसीजेस् मध्ये 10 पटीने एडस् होण्याचे प्रमाण असते. पण आपल्या महाराष्ट्रामध्ये जवळपास सर्वच ठिकाणी 103 एस.टी.डी.क्लिनिक आहेत. तेथे आपण ट्रिटमेंट देतो. प्रिव्हेन्शन ऑफ पेरंट टू चाईल्डसाठी सुध्दा गर्भवती स्त्रीला निओनॅटल थेरेपी द्यावयाची असेल तर आपण प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये जा, प्रत्येक जिल्हयाच्या

. . . .3 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा . . . .

रुग्णालयामध्ये जा, तेथील पुस्तकांमध्ये आपण माहिती छापलेली आहे. प्रत्येक ठिकाणी आपला कार्यक्रम चांगल्याप्रमाणे सुरु आहे. आपली 13 एआरटी सेंटर्स्‌ही आहेत. म्हणून आपल्या पीपीटीसी सेंटर मधून सुध्दा आज गर्भवती मातेकडून तिच्या मुलाला होणाऱ्या एडस्‌चे जे प्रमाण आहे ते पूर्वीपेक्षा आज एक परसेंटने कमी आणले आहे म्हणजे हे प्रमाण आज .75 परसेंट झाले आहे. मुंबईत 1.2 परसेंट आहे, तेही पुढच्या काळात कसे कमी करता येईल हे पहावे लागणार आहे. म्हणजे आपण हे प्रमाण हळूहळू कमी-कमी करीत आहोत. याबाबतीत पूर्णपणे ॲचीव्हमेंट करावयाची आहे आणि ती तुमच्या सर्वांच्या सहकार्याच्या सहकार्याने होणार आहे. म्हणून यासंदर्भात लेजीस्लेटीव्ह फोरम करण्याच्यादृष्टीने कालच एडस्‌च्या विषयावरील लक्षवेधी सूचना याठिकाणी आली होती.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा (पुढे सुरु...

त्या ठिकाणी आम्ही हेच सांगितले की,विधानसभेचे सदस्य, विधान परिषदेचे सदस्य यांच्या सर्वांचा जसे संसदेमध्ये एडस् कंट्रोलचा फोरम केलेला आहे. तसा आपल्याकडेही एडस् कंट्रोलसाठी फोरम असावा, त्याप्रमाणे येणाऱ्या 15-20 दिवसामध्ये लेजिस्लेटिव्ह फोरमसुध्दा फॉर्म करु. दोन्ही सभागृहातील सदस्यांचे एच.आय.व्ही.च्याबाबतीमध्ये एक चर्चासत्रच दोन दिवसाचे ठेवू. आपल्याला असे वाटत असेल की, फाईव्ह स्ट्रार संस्कृती असल्यामुळे फाईव्ह स्टारमध्ये असे कार्यक्रम होतात. शेवटी इंटरनॅशनल प्रोग्राम घ्यावयाचा असेल तर तो फाईव्ह स्टारमध्ये घेतला जातो. परंतु शहरी भागाकडून ग्रामीण भागाकडे जो फैलाव होत आहे, तो आपल्या सर्वांनाच कमी करावयाचा आहे. ट्रक ड्रायव्हर असतील, ब्रॉन्ड्रीचे लोक असतील, मायग्रेशन असेल, या सगळया गोष्टी याला कारणीभूत आहेत. सगळयांचा उल्लेख मी करु शकत नाही. पण हे करत असतांना जी तरुण पिढी आहे, ती वाचविण्यासाठी 15 ते 49 हा वयोगट आपण घेतलेला आहे. हा 1 ते 15 डिसेंबरमध्ये पूर्णपणे कुटुंबाचा जागृती कार्यक्रम आपण घेतलेला आहे. हा जागृती कार्यक्रम जो आहे, यामधून 15 ते 49 वयोगटातील सब सेंटर पी.एच.सी.लेवलवर आणि आर.एच लेवलवर पूर्ण कार्यक्रम चालू आहेत. मग स्त्री असेल, पुरुष असेल, संपूर्णत: मुले-मुली यामध्ये घेणार आहोत. ज्यांना गरज आहे त्यांना लैंगिकतेबद्दलचे शिक्षण असेल, अव्हेरनेसचे कॅम्पेन असेल असे चालवून, या वयोगटातील मुलांना काही संदर्भ सेवा द्यायच्या असतील तर त्यांना देखील जिल्हा संदर्भ सेवा देणार आहोत. मोफत औषध पुरवठा करणार आहोत. अशाप्रकारे 1 ते 15 डिसेंबर कालावधीमध्ये ही मोहीम राबविण्याचा कार्यक्रम घेतला. एक वर्ष आपण हा कार्यक्रम घेतो. 26 जानेवारी असेल, 1 मे असेल अशा झेंडावंदनाच्या दिवशी कार्यक्रम घेतो. कोठेही एच.आय.व्ही. एड्सच्या बाबतीतील कंट्रोल करायला पाहिजे. पूर्ण प्रतिबंधात्मक कार्यक्रम करायला पाहिजे. प्रत्येकवेळेस कार्यक्रम घेत असतो. 15 ऑगस्टला मॅरोथॉन रॅलीसारखा कार्यक्रम घेत असतो. असे वेगवेगळे कार्यक्रम घेतो. मी आरोग्य विभागाच्या दृष्टीकोनातून हेच सांगते आहे की, शेवटी बाल विवाह प्रतिबंधक कायदा हा 1929 चा आहे, हुंडा प्रतिबंधक कायदा देखील आहे. आज विवाहपूर्व चाचणी करणारा कायदा करुन हा प्रश्न सुटणार नाही. समाजातील मानसिकता बदलणे, हे तुमचे-आमचे सर्वांचे काम आहे, असे माझे स्वत:चे मत आहे, आरोग्य विभागाचे मत आहे. जनजागरण करणे खऱ्या अर्थाने महत्वाचे आहे. हिंदु विवाह कायद्यामध्ये आपल्याला विचार करायचा असेल तर...माझे बोलणे पूर्ण झालेले नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : आता मंत्री महोदयांनी आपले स्वत:चे मत सांगितले तर ठीक आहे. कायदा असू नये, असे आरोग्य खात्याचे मत आहे, याचा अर्थ काय आहे ? याला माझा आक्षेप आहे.

डॉ.विमल मुंदडा : आरोग्य खात्याचे असे मत आहे की, शेवटी एच.आय.व्ही. एडस्बद्दलचे अवेअरनेस कॅम्पेन घेणे हे खऱ्याअर्थाने महत्वाचे आहेत. कायद्यामध्ये आपल्या सर्व इन्व्हॉल्व्हमेंट असल्या पाहिजेत. परंतु कायद्यामधून पळवाटा काढण्याचा प्रयत्न केला जातो. विवाहपूर्वी चाचणी केली, परंतु विवाहानंतर या गोष्टी होणार नाहीत कशावरुन ? याची गॅरंटी कोण देणार आहे ? आज कायदा गॅरंटी देऊ शकणार नाही. आपल्याला वर्तणुकीतून बदल करावा लागणार आहे, हे आरोग्य विभाग म्हणून मी सांगते. परंतु तरीही आज आरोग्य विभाग, महिला बाल विकास, विधी व न्याय विभाग या विभागाचे मिळून पत्र दिलेले आहे. कारण कायदा करावयाचा असेल तर सेंट्रल गव्हर्नमेंटला कळवावे लागेल. आणखी एक स्मरणपत्र पाठवू. विवाहपूर्व चाचणी करायची आहे की नाही, तशाप्रकारची तरतूद करता यावी, या प्रकारची शिफारस केंद्राला करु, तशा प्रकारचे आम्ही पत्र देखील देऊ. असे मी सांगते. एक स्मरणपत्र 23 मार्च 2004 ला दिलेले आहे, नंतर देखील तिन्ही डिपार्टमेंट आणि आपल्यामधील सदस्य, असे आपण एकत्र बसून बैठक घेऊ आणि केंद्र सरकारला जी शिफारस करायची आहे ती पुन्हा एकदा करु. म्हणून सनमाननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांना माझी विनंती आहे की, सरकारने याबाबतीत गांभीर्याने दखल घेतलेली आहे. एच.आय.व्ही. एडस्च्या संबंधीचा जनजागृतीचा कार्यक्रम पूर्णपणे चालू आहे. सन्माननीय सदस्यांच्यादेखील भावना त्या पध्दतीच्या आहेत. कायदा करुन काय होते, हे समोरच्या पुढच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी हे अशासकीय विधेयक मागे घ्यावे, अशी मी त्यांना विनंती करते.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, या सभागृहामध्ये सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक -7- हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधरणा) विधेयक, 2005 मांडले आहे. त्यासंदर्भामध्ये माननीय आरोग्य मंत्री महोदया श्रीमती विमलताई मुंदडा यांनी त्यांचे सविस्तर विचार या सभागृहापुढे मांडलेले आहेत. त्या एक महिला असल्यामुळे त्यांची स्वत:ची प्रामाणिक इच्छा आहे की, एड्सच्या संदर्भात या राज्यामधील पुढची पिढी या रोगापासून वाचली पाहिजे. म्हणून त्यांनी त्यासंदर्भात मार्गदर्शन केलेले आहे.तसेच या विषयाच्या संदर्भात दोन्ही सभागृहाचे मत जाणून घेण्यासाठी सगळया सन्मानीय सदस्यांचे एक चर्चा सत्र घेऊन या विधेयकाच्यादृष्टीने विचार करुन केंद्र शासनाकडे अशा प्रकाराचे विधेयक पाठविता येईल. अशा प्रकारचे आश्वासनही दिलेले आहे, त्याबद्दल मी या संपूर्ण सभागृहाच्यावतीने त्यांचे आभार मानते. अभिनंदन करते. तसेच या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या बाबतीत आपल्या भावना पोटतिडकेने मांडलेल्या आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, श्रीमती कांता नलावडे, डॉ. नीलम गो-हे, श्री. रामनाथ मोते, श्री. रमेश निकोसे डॉ. अझिज यानी आपले विचार मांडलेले आहेत. हे विधेयक मागे घेण्यापूर्वी मला या सभागृहाला सांगावयाचे आहे की, दोन्ही सभागृहामध्ये आठ-दहा वर्षापासून हे विधेयक मांडले जात आहे. एड्सचा किती मोठया प्रमाणत प्रसार होत आहे, याची जाणीव सर्व सदस्यांना आहे म्हणूनच प्रत्येक वेळी सन्मानीय सदस्यांनी या रोगाच्याप्रती आपल्या भावना पोटतिडिकेने मांडलेल्या आहेत. जरी हे अशासकीय विधेयक असले आणि सरकार ते स्वीकारणार नसले तरी कुठल्याही गोष्टीचा सातत्याने पाठपुरावा केला तर ती गोष्ट आज ना उद्या होऊ शकते या हेतुने सर्व सन्माननीय सदस्यांनी पोटतिडिकेने आपले विचार मांडलेले आहेत. म्हणून सर्व सदस्यांची मी अत्यंत आभारी आहे. तसेच सभापती महोदया, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपलेही मनापासून आभार मानते व एवढे बोलून मी हे विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: भिषक व शल्यचिकित्सक (दिवाणी व फौजदारी खटल्यांपासून मुक्त ठेवणे) विधेयक.

**L. C. BILL NO.XII OF 2005.**

**( A BILL TO PROVIDE FOR CIVIL AND CRIMINAL IMMUNITY TO PHYSICIANS AND SUREGEONS WITHDRAWING LIFE SUSTAINING TREATMENT FROM PATIENTS SUFFERING FROM TERMINAL ILLNESS. )**

डॉ. दीपक सावंत ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्यारा निर्वाचित ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 12 मृत्यूपर्यवसाची आजाराने ग्रस्त असलेल्या माणसांना जिवंत ठेवण्यासाठी करावयाचे औषधोपचार बंद करण्याबाद्दल भिषक व शल्यचिकित्सक याना दिवाणी व फौजदारी खटल्यांपासून मुक्त ठेवण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, महाराष्ट्रातील आणि मुंबईतील फिजिशिएन आणि सर्जन या डॉक्टर्संना फौजदारी आणि दिवाणी खटल्यापासून मुक्तता मिळावी यासाठी मी हे विधेयक मांडीत आहे. इच्छा मरणाच्या बाबतीत देखील मी यापूर्वी एक विधेयक मांडले होते. या सभागृहाच्या प्रथेप्रमाणे आणि परंपरेप्रमाणे ते विधेयक मागे घेण्यात आले. पण हे विधेयक थोडेसे वेगळे आहे. सभापती महोदया, वैद्यकीय शास्त्र अतिशय प्रगत झालेले आहे. वैद्यकीय शास्त्रामध्ये नवीन नवीन संशोधन होत आहेत. रोबोर्टच्या सहायाने शस्त्रक्रियेपर्यंत आपण आज मजल मारलेली आहे.व्हिडियोकॉन्फरन्सिगने आपण ऑपरेशन कारतो. असे हे विज्ञानयुग आणि वैद्यकीय क्षेत्र पुढे जात असतांना निसर्गाने ज्या काही मर्यादा घालून दिलेल्या आहेत, त्यावर आपण मात करु शकत नाही, ही वस्तुस्थिती जरी असली तरी देखील आपल्याला प्रयत्न करणे हे आवश्यक असते. सुप्रसिध्द बुध्दीबळपटू श्री. के. वेंकटेश याच्या दया मरणाच्या अर्जा नंतर हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. ---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खर्चे...

डॉ. दीपक सावंत .......

आपण हसत हसत मृत्युला कवटाळावे की मरणयातना सहन करीत मृत्यू यावा याबाबत दुमत असू शकते पण ज्यावेळी एखादा आजार असाध्य असतो त्या व्यक्तीला माहिती असते, त्याच्या नातेवाईकांनाही माहिती असते त्यावेळी उपचारांमध्ये कुठल्याही प्रकारे कसूर न करता डॉक्टर उपचार करीत असतात. त्यांना माहिती असते की, हा पेशंट तीन महिने, सहा महिने अथवा बारा महिने होतील तरी बरा होणार नाही, केवळ उपचार म्हणून डॉक्टर उपचार करतात. त्यावेळी डॉक्टर व नातेवाईक देखील हतबल होतात. प्रत्येकाची आर्थिक परिस्थिती शेवटी सारखीच असते असे नाही. अशा वेळी अनेक वेळा आपल्याला माघार घ्यावी लागते. पण कायदयात यासंदर्भात कुठलीही अशी तरतूद नसल्यामुळे डॉक्टरांना तसा निर्णय घेणे शक्य नसते म्हणून कायदयात सुधारणा करणे आवश्यक आहे. महोदया, डॉक्टर आपले काम करीत असतात तसेच नातेवाईक सुध्दा आपली बांधिलकी म्हणून काम करीत असतात की आपला रुग्ण वाचावा, हीच दोघांचीही भावना असते. पेशंटचा कृत्रिमरित्या श्वासोच्छवास चालू असतो, हृदयाची स्पंदनं चालू असतात, व्हेंटीलेटरवर जीव चालू असतो, तो व्हेंटिलेटर ऑफ केला तर तो माणूस, तो पेशंट जगणेच शक्य नसते. अशा वेळी डॉक्टरांनी निर्णय घेतला की व्हेंटिलेटर ऑफ करायचा, किंबहुना एका तासासाठी बंद ठेवावा तर त्यावेळी मात्र अडचण येऊ शकते. कारण त्यांनी घेतलेला जो निर्णय असतो त्यात पेशंट वाचावा अशीच भावना असते. परंतु हायपोक्रेटिक ओथसंबंधी डॉक्टरांनी जर निर्णय घेतला, पेशंट वाचवावयाचा अशा भावनेतून अथवा कृत्रिमरित्या तो बंद असेल, अर्थात तो बंद करता येत नाही म्हणून कुठेतरी असा निर्णय घेणे आवश्यक असते. शेवटी किती दिवस हे हृदय किंवा मेंदू चालवावयाचा यावरतीच ते अवलंबून असते. हे सर्व करीत असतांना भावनेच्या भरात नातेवाईक देखील खर्च करीत असतात, डॉक्टरही प्रयत्नांची पराकाष्ठा करतात आणि काही दिवसांनी तो पेशंट नॅचरल डेथ येऊन मरतो. पण ज्यावेळी त्याच्या उपचाराचे बिल नातेवाईक पाहतात त्यावेळी त्या पेशंटचे कुटुंब उध्वस्त होण्याच्या मार्गावर असते. हजारो, लाखो रुपये त्याच्या उपचारावर खर्च झालेले असतात आणि ते बिल दिल्याशिवाय तेथून पेशंटला हलविता येत नाही, पेशंटला बाहेर काढू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अमेरिकेत देखील अशा प्रकारची घटना घडलेली आहे. मी उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, पेरिसियानो नांवाची महिला सन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .......

1990 पासून कोमामध्ये होती. तिच्या नातेवाईकांची पुरेपूर इच्छा होती की ती जगावी. शेवटी 14 वर्षानंतर कोर्टाने निर्णय दिला आणि तिला मृत्यू देण्यात आला आणि तिची व्हेजिटेबल लाईफपासून सुटका करण्यात आली. तसेच के. व्यंकटेशच्या बाबतीत सुध्दा घडले होते. त्याच्या आईने त्याला अशा प्रकारचे मरण देण्यात यावे म्हणून अर्ज केला होता की माझ्या मुलाला मरण द्यावे. काही दिवसानंतर त्याची नॅचरल डेथ झाली. अशा प्रकारे फिजिशियन आणि सर्जन या डॉक्टरांना कायदयाच्या माध्यमातून संरक्षण असेल तर ते असा निर्णय घेऊ शकतात आणि त्यासाठीच हे अशासकीय विधेयक मी या ठिकाणी चर्चेसाठी आणले आहे. मुंबई येथील के.ई.एम. रुग्णालयातील नर्स श्रीमती अरुणा हिच्यावर बलात्कार झाला होता त्यावेळी ती सुध्दा एक वर्ष कोमामध्ये होती. परंतु ती हॉस्पिटलचीच नर्स असल्यामुळे तिची काळजी घेतली गेली. सर्वसामान्य पेशंटची अशीच काळजी घेतली जाईल हे सांगता येत नाही. म्हणून लाईफ सपोर्ट ट्रिटमेंट बंद करावयाची आहे की नाही हा यामध्ये महत्वाचा प्रश्न असतो. एक उदाहरण माझ्याच बाबतीतील मी सांगू इच्छितो. ते म्हणजे मी इलेक्शनच्या काळात नांदेडला असतांना एका पेशंटला ॲडमिट करण्यात आले. त्याला व्हेंटिलेटरवर ठेवले होते. दहा-पंधरा दिवस झाले आणि मी ज्यावेळी नांदेडहून आलो त्यावेळी मला सांगण्यात आले की, पेशंटचे व्हेंटिलेटर विथ्ड्रॉ करावयाचे की नाही असे त्या पेशंटच्या नातेवाईकांनी विचारले. त्यांनी सांगितले की, पेशंटच्या उपचाराचे बिल एवढे झाले ते आम्ही देऊ शकत नाही, परंतु अशा परिस्थितीत डॉक्टर सुध्दा व्हेंटिलेटर विथ्ड्रॉ करण्याचा निर्णय घेऊ शकत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

शेवटी चार दिवसानंतर आम्हाला व्हेंटीलेटर विड्रॉ करावा लागला. डॉक्टरांना वाटते की, आम्ही जर व्हँटीलेटर विड्रॉ केला तर उद्या आम्हाला कोणी तरी कायद्याच्या कचाटयात अडकवेल, कोर्ट कचे-याचे खेटे घालावे लागतील यासाठी आपल्याला आज डॉक्टरांना संरक्षण देण्याची गरज आहे. लाईफ सपोर्ट सिस्टीम किती दिवस चालेल याचा काही नेम नसतो. डॉक्टरांना हे माहिती असते की, व्हेंटीलेटर बंद केला तर पेंशटचा एक तासात मृत्यू होऊ शकेल. डॉक्टर सर्व पाप आपल्या माथ्यावर घेण्यास तयार असतात परंतु डॉक्टरांना कायद्याचे संरक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आपण ज्यावेळेस मृत्युपत्र तयार करतो तेव्हा आपली जमीन-जायदाद आपल्या नातेवाइकांच्या नावावर करीत असतो. कै. मधू दंडवते यांचे यासंदर्भात आपल्याला उदाहरण देता येईल. त्यांनी सांगितले होते की, मला कोणत्याही प्रकारची लाईफ सपोर्टींग ट्रिटमेंट नको आहे. माझा जर मृत्यू होणार असेल तर तो होऊ दे. त्यांनी भौतिक उपचार नाकारले होते. तशा प्रकारचे संमती पत्र एखाद्या व्यक्तीने मृत्युपूर्व म्हणजे निकोप स्थितीत दिले असेल, त्याची मानसिक स्थिती निकोप असेल अशा वेळेस केले असेल तर त्याला कायद्याने मान्यता देणे आवश्यक आहे. माणसाचा मृत्यू कोणत्या परिस्थितीत यावा हे ठरविण्याचा हक्क देखील माणसाला असणे आवश्यक आहे. कारण राईट टू लीव्ह अँड राईट टू डाय इट शूड बी दॅट पर्सन. मी माझ्या बिलामध्ये म्हटले आहे की, "मला जर गंभीर क्लेश होण्यास किंवा बुध्दीसंमत जीवन जगण्यास मी असमर्थ ठरण्यास कारणीभूत होणा-या शारीरिक आजारातून किंवा दुर्बलतेतून मी बरा होण्याची वाजवी आशा नसल्यास किंवा माझ्या शरीराची महत्वाची कार्य स्वतंत्रपणे होणे अशक्य झाल्यास, प्राकृतिक वैद्यकीय उपचार करुन घेण्यास मी याद्वारे नकार दिला असल्याचे समजण्यात यावे. तसेच माझी हृदयाची क्रिया बंद पडल्यास, संजीवन करण्याचे उपाय तीन मिनिटानंतर सोडून देण्यात यावे. तसेच अशा जीवनरक्षक पध्दतीचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यास मी असमर्थ असल्यास, वैद्यकीय किंवा शस्त्रक्रिया विषयक उपचार करुन घेण्यास नकार देण्याबाबतच्या व अशा नकाराचे परिणाम भोगण्यास तयार असण्याबाबतच्या माझ्या कायदेशीर हक्काबाबतची माझी अंतिम इच्छा म्हणून माझ्या कुटुंबियांनी व डॉक्टरांनी या प्रतिज्ञापत्राचा स्वीकार करावा ". सभापती महोदया, पतिज्ञापत्र जर अशा प्रकारचे केले असेल तर माझी अशी इच्छा आहे की, अशा वेळी संबंधित डॉक्टरांवर कोणत्याही प्रकारची

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

कायदेशीर कारवाई होऊ नये. यामध्ये जे साक्षीदार असतील ते त्या कुटुंबातील नसतील तर ते त्रयस्थ असतील. तसेच जर कोणी मुखत्यारनामा लिहून दिला असेल की, मी प्राकृत वैद्यकीय उपचार करुन घेण्यास नकार दिल्यास, मला दु:ख आणि क्लेशापासून मुक्त ठेवण्यास सांगितले असे समजावे. हे मुखत्यारपत्र 30 दिवसाच्या आत म्हणजे जीवंत असे पर्यंत कॅन्सल केले नसेल तर अशा प्रकारचा मुखत्यारनामा देखील मान्य करुन घ्यावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे. सभापती महोदया, हे बील तसे कठीण आहे परंतु आज ना उद्या, कधी तरी का होईना वाढत्या आजाराने, प्रदीर्घ आजाराने, कदाचित मेडिकल सायन्स पुढे गेले असल्यामुळे माणसाचे आयुष्यमान वाढलेले आहे. आजची कुटुंब व्यवस्था बघतांना प्रत्येक मानाने किती वर्ष जगावे तसेच म्हतारपणी त्याची काळजी घेण्यासाठी किती लोक राहतात अशा सर्व सामाजिक स्थितीचा विचार केला तर हे विधेयक या सभागृहात येणे अत्यंत आवश्यक होते. यामध्ये इच्छा मरण नाही, दयामरण नाही,

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

त्या माणसाच्या संमतीने शांत मरणाची उपाययोजना केलेली आहे. हे तुमच्या आमच्या बाबतीतसुध्दा घडू शकते. अशाप्रकारच्या संमतीपत्राची तरतूद कायद्यात केली तर डॉक्टरांची कोर्ट-कचेरीच्या कब्जातून सुटका होऊ शकेल. एवढचे नव्हे तर डॉक्टर आपली प्रॅक्टीस चांगल्या प्रकार देखील करू शकतील. मी जास्त काही बोलणार नाही. माझा विषय मंत्रिमहोदयांना समजला असेल. सभागृहाला पटला असेल. त्यांनी हे विधेयक परत घेण्यासाठी विनंती केली तरी त्यांनी त्यांच्याच कारकिर्दीत शासकीय विधेयक आणावे अशी माझी मनोमन इच्छा आहे. एवढेच नव्हे तर आपल्या कारकिर्दीत यास सुरूवात करावी अशी विनंती मी मंत्रिमहोदयांना करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (आरोग्य राज्य मंत्री) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी वैद्यकीय चिकित्सक यांना दिवाणी व फौजदारी खटल्यांपासून मुक्त ठेवणे यासंबंधीचे अशासकीय विधेयक मांडले आहे. त्याचे हे विधेयक फार कठीण असे आहे. या विधेयकासंबंधी यापूर्वी देखील सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, यापूर्वी सन 1988 साली सन्माननीय श्री.सदानंद वर्दे यांनी एक अशासकीय विधेयक आणले होते. पण त्यातील विषय वेगळा होता.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदया, यापूर्वी सभागृहामध्ये मर्सी डेथसंबंधी चर्चा झाली होती. आताचा सन्माननीय सदस्यांचा विषय हा स्वेच्छा मरणासंबंधीचा आहे. एडस, कॅन्सर या सारखे असाध्य आजार आहेत व रुग्ण शेवटच्या स्टेजवर असतील तर अशा रुग्णांना स्वेच्छामरणाची मुभा असावी अशा आशयाचे हे विधेयक आहे. या विषयाबद्दल केरळ हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. व्हॉलंटरी किंवा मर्सी डेथ संबंधी कलम 309 अन्वये खटला दाखल करण्यास हरकत नाही असा निर्णय दिलेला आहे. यासंबंधी मध्यप्रदेश व पंजाबच्या प्रकरणासंबंधी सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. सभागृहाची इच्छा असल्यास ते रुलिंग मी आपणास वाचून दाखवितो. त्यात असे नमूद केले आहे की, With reference to Constitution of India Clause 21 there is "Right to life ensuring fundamental right to citizens. So, as proposed in the bill, it is contradictory to the clause 21 of the Constitution of India. Similarly, with reference to the provisions in IPC 309 there is no violation of clause 21 of Constitution of India. सुप्रीम कोर्टाने अगदी स्पष्ट निर्णय दिलेला आहे व सुप्रीम कोर्टाचा निर्णय हा संपूर्ण देशाला लागू होतो.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे..

It applies to all the States in the country. त्यामुळे हा विषय ॲक्टमध्ये लागू करणे शक्य होणार नाही. माझी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विनंती आहे की, त्यांनी हे विधेयक मागे घ्यावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, आपण सुप्रीम कोर्टाने दिलेल्या जजमेंटचा उल्लेख केला. पण मी आपणास सांगू इच्छितो की, हॉस्पीटलमध्ये अनेक गोष्टी घडत असतात पण प्रत्येक गोष्ट तुमच्यासमोर येत नाही. आपण अननोईंगली सांगतो की, ठीक आहे पेशंट जाऊ दे. त्यावेळी अशा कोर्टकचेऱ्या होतात. The hon. Minister should read between the two lines. If you are saying that the will can be Act, it can be considered. Why? Then, there is a sanctity for will in the court. Why not to this? If somebody states in his will do not give me the life support.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदया, विल हे प्रॉपर्टीबद्दल किंवा एखाद्या वस्तूबद्दल करतो. हा माणसाच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. आपल्या संविधानात राईट टू लिव्ह हा फंडामेंटल राईट आहे. It appllies to suicide. हे खरे आहे की नेदरलँड, हॉलंड, या देशांमध्ये अशी परवानगी दिलेली आहे. अमेरिकेमध्ये फक्त एका केसमध्ये "विशेष बाब" म्हणून परवानगी दिलेली आहे. It is not an act. Our Constitution has not given that permission. आपण भारतामध्ये आहोत अमेरिकेत नाही. मृत्यू अटळ आहे यात दुमत नाही. प्रश्न असा आहे की, आपल्याला कोणालाही मारण्याचा अधिकार नाही. एडस रोगावर औषध नाही असे असूनही पण काही औषधोपचारे ती माणसे 13-13 वर्षे जगलेली आहेत. The life expectancy has increased. There is no difference of opinion.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एडस ग्रस्त रुग्ण हा चालतो -फिरतो, काही खाऊ शकतो. पण जे पेशंट बेडरिडन वर आहे त्यासंबंधी मी बोलत आहे.

श्री.रणजित कांबळे : आपण एका स्पेसिफीक केसस बद्दल बोलू शकत नाही. We cannot say about bed-ridden. Suppose, you are talking about a person

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे..........

who is about to die, who is invalid, who is brain dead. पण ज्या माणसाला समजते की, त्याला एडस झालेला आहे मग तो पण असा व्हील लिहू शकतो. अशा पेशंटवर घरचा दबाव राहील असे सुध्दा होऊ शकेल. एखाद्या व्यक्तीला कॅन्सर झाला आणि तो शेवटच्या स्टेजला आहे आणि त्याला त्रास होत आहे. त्यासाठी आपल्याकडे मॉफीनसारखे औषध आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन तसेच कोर्टाचा निर्णय लक्षात घेऊन सन्माननीय सदस्यांनी हे विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्यांना आपले विधेयक मागे घ्यावयाचे आहे का ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, मा.मंत्रिमहोदयांनी केलल्या विनंतीनुसार मी हे विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

-------------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मालकी हक्काच्या फ्लॅटस्बाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. X OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.)

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक-10, महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅटस्बाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, आज मोठया प्रमाणावर हा प्रश्न महाराष्ट्रात उभा आहे. राज्यात जवळजवळ 33 हजार सोसायटया आहेत. त्यांचे कन्व्हेन्स झालेले नाही. त्याचा परिणाम असा झाला की, एखादी आपत्ती आल्यानंतर मग पूर जरी असला तरी बिल्डींग पडण्याच्या मार्गावर असताना नवीन बिल्डींग बांधण्याचा प्रस्ताव आला तर इमारतीचे कन्व्हेंस झाले की नाही हे पाहणे आवश्यक असते, त्याशिवाय त्या इमारतीला पुढे बांधकाम करता येत नाही. त्या बिल्डींगची मालकी कोणाची आहे हे पाहणे आवश्यक आहे. ती इमारत सोसायटीच्या मालकीची असेल तर यासंदर्भातील निर्णय घेणे सोपे होते. मुंबईसह बहुतांशी शहरात अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी बिल्डर लोकांचा सुळसुळाट झालेला आहे. त्यांच्याकडे प्रचंड पैसा आहे, त्यामध्ये काळा पैसा सुध्दा आहे. त्यामुळे सर्व यंत्रणा ते खरेदी करु शकतात आणि त्यामुळे शहरांमध्ये गगनचुंबी इमारती उभ्या राहत आहेत. अशा इमारतींमध्ये हौशी लोक राहावयास जातात. सकाळी ठाणे महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील अतिक्रमणासंबधीचे प्रकरण लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सभागृहामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

चर्चेला आले होते. त्या ठिकाणच्या लोकांनी स्वत:च्या मालकीच्या जागेवर 7 माळयांची इमारत बांधली. ती इमारत त्या लोकांच्या स्वत:च्या मालकीची असताना सुध्दा महापालिकेकडून ती पाडण्यात आली. बिल्डींग पाडणारे पथक आल्यानंतर त्या इमारतीतील एका व्यक्तीने तिसऱ्या माळयावरुन, खाली उडी मारली आणि त्यामध्ये त्याला अपंगत्व आहे. तसेच इतर तीन व्यक्ती सुध्दा मृत्यूमुखी पडल्या. जर महापालिकेला ती इमारत बांधण्यास परवानगी द्यावयाची नव्हती तर महापालिकेने सुरुवातीलाच स्थगिती का दिली नाही ? वास्तविक इमारतीचे बांधकाम सुरु होण्यापूर्वी महापालिका पाहणी करीत असते. ज्यावेळी मोठया प्रमाणावर झोपडयाचे बांधकाम होते त्यावेळी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी त्याकडे दुर्लक्ष करतात. रोग शेवटच्या स्टेजला गेल्यानंतर आपण इलाज करण्यास सुरुवात करतो आणि तसाच प्रकार या इमारतींबाबत घडतो आहे. सांगली, सोलापूर, पुणे, संभाजीनगर व अन्य शहरांत प्रचंड प्रमाणावर इमारतींचे बांधकाम सुरु आहे. ज्यांना ज्यांना फ्लॅट्स् घ्यावयाचे आहेत ती मंडळी कर्ज काढून वा कसल्याही प्रकारे रक्कम उभी करुन, अशा इमारतींतील फ्लॅट खरेदी करतात. परंतु ज्यावेळी कन्व्हेंस करण्याची वेळ येते त्यावेळी त्यांची अडवणूक होते. जो बिल्डर एखादी बिल्डींग बांधतो त्या बिल्डरची कन्व्हेन्स करुन देण्याची जबाबदारी असते. परंतु बिल्डर मात्र बिल्डींगचे बांधकाम झाल्यानंतर व त्यातील फ्लॅट विकल्यानंतर तेथून निघून जातात, त्यांचा पत्ता सुध्दा ठेवत नाहीत. केवळ फ्लॅट घेणारीच मंडळी त्या ठिकाणी वास्तव्य करते. रहिवाशांसमोर कायदेशीर अडचणी निर्माण झाल्यानंतर तेथील रहिवाशी चौकशी करण्यासाठी संबंधित बिल्डरकडे जातात, त्यावेळी बिल्डर म्हणतो की, मी तुमच्या बिल्डींगचे कन्व्हेन्स कोठे केले आहे?

सभापती महोदया, नुकताच मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडल्यामुळे मुंबईतील अनेक इमारतींना धोका निर्माण झाला आहे. अनेक इमारतींच्या तळमजल्यात दोन-दोन दिवस पाणी साचले होते. ज्या ठिकाणी बिल्डींग खराब होतात त्या ठिकाणी नवीन इमारती बांधावयाच्या झाल्यास प्रथम कन्व्हेन्सबाबत चौकशी होते. त्यामुळे अशा परिस्थितीत त्या सोसायटयांना पुन्हा बिल्डरकडे जावे लागते.

नंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री.गायकवाड नंतर --- 18:10

श्री. सरपोतदार ....

परंतु कन्व्हेअन्स झाले नसेल तर ज्या बिल्डरने इमारत बांधली आहे त्याच्याकडे जावे लागते आणि मग त्याच्यासमोर भविष्यातील आपला स्वत:चा फायदा उभा राहतो. म्हणजे आज या इमारतीमध्ये 15 फ्लॅटस् आहेत आणि उद्या येथे यनवीन इमारत बांधायची झाली तर मला तेथे अतिरिक्त चटईक्षेत्र मिळू शकते आणि त्यातून मी अधिक फ्लॅटस् काढून अधिक पैसा कमावू शकतो असे सारे चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभे राहते आणि त्या प्रलोभनापाई तो प्रसंगी टीडीआर देखील विकत घेऊन त्या जागी 7-8 मजल्यांची इमारत उभी करू शकतो. त्यातून होणारा फायदा त्याने का सोडायचा ? म्हणून बिल्डरकडून इमारतीचा कन्व्हेअन्स कधीच दिला जात नाही वा देण्यामध्ये टाळाटाळ केली जाते, जास्तीत जास्त विलंबाने देण्याचा प्रयत्न केला जातो. या संदर्भात 1963चा कायदा आहे पण त्यालाही काही बंधने आहेत. त्या बंधनातून बाहेर पडण्यासाठी जी संधी पाहिजे ती मिळत नाही. त्यामुळे फ्लॅट मालक जे आहेत त्यांच्यावर परिणाम होतो. सभापती महोदया, हा जो विषय आहे हा या मुळे गंभीर बनला आहे आणि म्हणूनच हा विषय येथे मांडण्याचा मी निर्णय घेतला. खरे म्हणजे एक वर्षापूर्वीच मी हे विधेयक येथे मांडले होते परंतु प्रत्येक वेळी काही ना काही कारणांनी हे विधेयक चर्चेला येऊ शकले नाही. सुदैवाने मध्यंतरी शासनानेच या संदर्भात एक विधेयक आणले आणि आम्हाला अपेक्षित अशा बहुतेक सगळ्या तरतुदी त्यामध्ये केल्या होत्या. परंतु त्यासाठी एक नियंत्रण व्यवस्था असणारी ॲथॉरिटी, एक अधिकारी नेमला जावा अशी आमची मागणी होती. जेणे करून ज्यांना कोणाला इमारतीचे कन्व्हेअन्स करावयाचे असेल तर त्या अधिकाऱ्यामार्फत, ॲथॉरिटीमार्फत ते लगेच करता येऊ शकेल. इमारत बांधून दिल्यानंतर, सोसायटी झाल्यानंतर किती वर्षात किंवा किती महिन्यात बिल्डरने कन्व्हेअन्स करून दिले पाहिजे ही तरतूद त्या विधेयकामध्ये असायला पाहिजे होती, पण ती नसल्याने या विधेयकाद्वारे मी ती तरतूद येथे आणली आहे जेणे करून हे सगळे प्रश्न मार्गी लागू शकतील. सभापती महोदया, मुंबई शहरामध्ये हौसिंग बोर्डाच्या अनेक इमारती आहेत आणि त्या इमारती मालकी हक्काने भाडेकरूंना देण्याचा निर्णय 1980 साली झाला. त्यानंतर मी राहते तेथील एमआयजी आणि अन्य कॉलनीतील सगळे लोक माझ्याकडे आले आणि मला सांगू लागले की, अजूनही आमच्या नावावर ही इमारत होत नाही. हौसिंग बोर्ड इमारत आमच्या म्हणजे आमच्या सोसायटीच्या नावे करायला तयार नाही. आम्ही तसे करू गेलो तर अनेक समस्या उभ्या केल्या जातात. त्यासाठी किती किंमत घ्यायची आहे

..... 3टी 2 ..

श्री. सरपोतदार ....

वगैरे सांगितले जाऊ लागले. याचा अर्थ असा की, हौसिंग बोर्ड सारख शासकीय मालक देखील यामधून फायदा घ्यायला पाहतात आणि अडवणूक करून आपला फायदा कसा करून घेता येईल याचाच विचार करीत आहे. म्हणून अनेक दिवसांपासून माझ्या मनामध्ये हा विषय घोळत होता आणि अनेकदा मी आमच्या कार्यकर्त्यांमध्ये या विषयी बोललो आहे आणि त्यातूनच सारा अभ्यास करून हे विधेयक येथे मी आज सादर केले आहे. हे विधेयक मांडताना, कन्व्हेअन्सचा प्रश्न कोठे कोठे आड येतो हे पाहिले तर आपल्याला समजून येईल की, वीज बिल शिल्लक राहिले असेल, भाडे शिल्लक राहिले असेल, महापालिकेचा मालमत्ता कर शिल्लक राहिला असेल तरी या सगळ्या ठिकाणी या कन्व्हेअन्सचा संबंध येतो. प्रत्येक पावलावर ही इमारत तुमच्या मालकीची आहे काय ? आहे म्हणता तर मग त्याला आधार काय आहे ते दाखवा म्हणून सांगितले जाते. तुमच्याकडे कन्व्हेअन्स म्हणजे अभिहस्तांतरणाचे हक्क आहेत काय ? असे विचारले जाते. तेव्हा इमारतीच्या बाबतीत कोणतीही गोष्ट करावयाची म्हटली तरी सोसायटीला, फ्लॅट मालकाला हे अभिहस्तांतरणाचे हक्क असल्याशिवाय काहीही करता येत नाही, आणि मग त्यांच्या उत्साहावर विरजण पडते. काही फायदा असेल तर बरोबर जमिनीची मालकी सांगण्याचे काम बिल्डर न चुकता करतो. त्यासाठीच विशेष करून हे कन्व्हेअन्स न करण्यायचा, वेळेवर न करण्याचा वा त्यामध्ये चालढकल करून वेळ काढण्याचे काम बिल्डरकडून केले जात असते. जेणे करून उद्या त्या इमारतीवर एखाद दुसरा मजला चढवावा असे सोसायटीला वा फ्लॅट मालकांना वाटले तरी तेव्हाही हा प्रश्न उभा राहतो आणि त्यांना त्यासाठी बिल्डरकडे जावे लागते. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... 3यू 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

पण बिल्डरकडून परवानगी मिळत नाही म्हणजे स्वत:कडे प्रॉपर्टी असूनही, क्षमता असूनही, त्या सोसायटीतील सभासदांची इच्छा असूनही एक मजला वाढविता येत नाही. जर तुमच्याकडे जमिनीची मालकी असेल तर तुम्ही यासाठी महानगरपालिकेकडे जाऊन परवानगी मागू शकता. पण तशी मालकी सोसायटीकडे नसल्यामुळे या लोकांना बिल्डरकडे जावे लागते. मग तो सांगतो की, आज जमिनीचा भाव इतका आहे. तेव्हा तुम्ही मला एवढे पैसे द्या, मग मी बांधून देईन आणि मग या सगळया गोष्टी बिल्डरच्या हातात जातात. याबाबतीत 1963 च्या कायद्याप्रमाणे व्यवस्था आहे. पण त्यासाठी लागणारा विलंब, त्यासाठी अस्तित्वात असलेली यंत्रणा यादृष्टीने विचार केला पाहिजे. जर यदाकदाचित अभिहस्तांतरण झाले नाही तर या योजना दुर्लक्षित झाल्यासारख्या होतात. त्यामुळे अभिहस्तांतरण होऊ शकत नाही आणि मग जर ही योजना राबवावयाची असेल तर त्यासाठी जेवढा वेळ लागेल, तेवढा वेळ थांबण्याची तयारी असली पाहिजे. यासाठी धक्के खावे लागतात, फेऱ्या माराव्या लागतात आणि तरीही काम होत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. याबाबतीत शासनाकडेही न्याय मिळत नाही, शासनही लक्ष देत नाही. शासनाला हा इश्यु मोठा वाटत नाही. शासनाला असे वाटते की, हे लोक मालकी हक्काच्या फ्लॅटमध्ये रहातात म्हणजे ते पैसेवाले आहेत. त्यामुळे यांच्याकडे लक्ष दिले नाही तरी चालेल. झोपडपट्टीवाल्यांकडे मात्र ताबडतोब लक्ष दिले जाते. मध्यंतरी मुंबई शहरात निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या संदर्भात 29 जुलै रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक बोलविली होती. त्यावेळी या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा झाली. तेव्हा लोकांना नुकसान भरपाई देण्याचे ठरले. त्यावेळी मी अशी सूचना केली की, यावेळी केवळ झ ोपडपट्टीमध्येच पाणी शिरले असे नाही. तर ज्यांच्या पक्क्या सोसायटया आहेत, ज्यांची मालकीची घरे आहेत अशा लोकांच्या घरात सुध्दा पाणी शिरले आणि हे पाणी जवळजवळ 48 तास म्हणजे दोन दिवस लोकांच्या घरामध्ये होते आणि त्या मुळे या लोकांचे देखील मोठया प्रमाणात नुकसान झ ाालेले आहे. अशा वेळी दुकानवाले, इमारती मध्ये राहणाऱ्या लोकांच्या घरामध्ये जाऊन सर्व्हे करावा आणि त्यांचे ज्याप्रमाणात नुकसान झाले असेल त्यानुसार सर्वांना मदत द्यावी. कारण ते लोक टॅक्स भरतात आणि त्यामुळे शासनाकडे पैसे जमा होतात. त्यामुळे त्यांना नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार आहे. अशा पध्दतीने शासनाने याकडे पाहिले तर शासन म्हणून काम करण्याची पात्रता त्यांच्याकडे आहे असे समजले जाते. परदेशात अशी पध्दत आहे की, तेथील

. . . .3 यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

लोकांकडून इन्कम टॅक्स कापला जातो. पण त्या लोकांवर जर काही आपत्ती आली, तसेच त्यांच्या घरामध्ये उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसेल तर या लोकांना तेथील शासन मदत करते आणि त्यांना नोकऱ्याही उपलब्ध करुन देते. त्यानंतर पुन्हा त्यांच्याकडून इन्कम टॅक्स कापून घेतला जातो. आपल्याकडे तशी व्यवस्था आहे का ? उलट आपल्याकडे अशी स्थिती आहे की, जो टॅक्स भरतो, त्याला कोणीच विचारीत नाही. आपल्याकडे ज्या योजना राबविल्या जातात, त्या नॉन टॅक्स पेअरसाठी असतात. टॅक्स पेअरसाठी कोणत्याही सवलती किंवा योजना राबविल्या जात नाहीत. शासन हे जनताभिमुख असले पाहिजे. जनतेच्या अनेक समस्या आहेत. झोपडीमध्ये राहणारे लोक आहेत, तसेच फ्लॅटमध्ये राहणारे लोक आहेत, टोलेजंग इमारतीत राहणारे लोक आहेत. गगनचुंबी इमारतीमध्ये राहणाऱ्या लोकांची स्थिती अशी आहे की, जर एखाद्या वेळेस 20 व्या मजल्यावर आग लागली तर त्याठिकाणी ती आग विझविण्याची पुरेशी व्यवस्था आहे का ? हे महानगरपालिकेकडून पाहिले जात नाही. अग्निशमन दलाकडे जे स्नॉरकेल असते, त्यामार्फत आपण केवळ 10 व्या मजल्यापर्यंतच जाऊ शकतो. पण त्याच्या वरच्या मजल्यावर आग लागली तर ती विझविण्याच्या दृष्टीने कोणतीही व्यवस्था नसते. अशा प्रकारे ज्या गगनचुंबी इमारती बांधल्या जातात, त्याला कोणाचे आशिर्वाद असतात. आज मुंबई शहरात दीड ते दोन कोटी इतकी लोकसंख्या आहे. प्रत्यक्षात 1 कोटी 25 लाख लोकसंख्या असल्याचे सांगितले जात असेल तरी इन फॅक्ट येथील लोकसंख्या दीड कोटीच्या वर गेलेली आहे आणि पुणे, नागपूर इ.शहरांमध्येही तीच स्थिती आहे. तेव्हा या शहरातील कन्व्हेन्स्डीडचा प्रश्न मार्गी लागला पाहिजे. कारण लोक बँकेकडून, प्रॉव्हीडंट फंडातून लोन घेऊन मालकीचे घर घेतात. पण जर अभिहस्तांतरण झाले नाही तर त्या माणसाचे खूप नुकसान होते. यादृष्टीकोनातूनही याचा विचार केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ. रणदिवे..... 18:20

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

म्हणून माझी महाराष्ट्र शासनाला विनंती आहे की, कन्व्हेन्सचे बील आपण शक्य तो लवकर आणलेले आहे. ते बील माझ्याकडे आहे. ते विधेयक क्रमांक 73 आहे. या विधेयकामध्ये आपण म्हटलले आहे की, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकेबाबत, त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक हे आपण विधेयक आणलेले आहे. या संदर्भातीलच बील आहे. पण ते मी अगोदर मांडणार होतो, परंतु आपल्याकडून ते त्याच्या अगोदर आणले. परंतु मी माझे विधेयक आधीच मांडले गेलेले होते, पण ते चर्चेला येऊ शकले नाही. यावेळचे अधिवेशन तीन आठवडे चालणार आहे असे असे म्हटले जाते. परंतु तेवढे चालेल की नाही, हे माहीत नाही. नाही तर 15 दिवसाचे अधिवेशन गुंडाळून सगळे आपापल्या घरी निघून जातील. काळजी तीच आहे. तीन आठवडे अधिवेशन चालवून हे विधेयक मंजूर होणार आहे काय ? हे करतांना वृत्तपत्रामध्ये जी माहिती आलेली आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे "What is the essence of the bill. That is very important." त्यांची अशी अपेक्षा आहे की, बिल्डर लोक हे बील पास होऊ देणारच नाहीत. बिल्डर लोकांचा खूप मोठा प्रभाव या शासनावर आहे. कोणतीही गोष्ट होऊ द्यायची नसेल तर बिल्डर लोक त्यासाठी आपल्या थैल्या मोकळ्या करतात, त्यासाठी भरपूर पैसे खर्च करतात. नाही तर या इमारतींना कशी काय परवानगी मिळाली असती ? म्हाडाचे भूखंड कसे विकले गेले असते ? म्हाडाचे भूखंड हे को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांनाच विकण्याची तरतूद आहे. पण काही ठिकाणी इंडियुजल व्यक्तींना विकले जातात. हा सगळा कसा चमत्कार घडवू शकतात ? त्याचे एकमेव कारण म्हणजे त्यांना लक्ष्मी प्रसन्न होते. त्यामुळे ते कोणकोणते निर्णय घेतील, हे काही सांगू शकत नाही. ज्या संस्थांचे अभिहस्तांतरण झालेले नाही, अशा संस्था स्पेसिफिक परफॉमन्स ॲक्ट अंतर्गत न्यायालयात जाऊन बिल्डर व त्यांच्या दरम्यान सदनिकाधारक करार करुन घेऊ शकतात, अशी तरतूद आहे. पण प्रत्येकाने उठून कोर्टामध्ये जायचे, कोर्टामध्ये जाऊन खर्च करायचा, कन्व्हेन्सवर खर्च करायचा, या सगळ्या गोष्टी करणे इंडियुजल सोसायटीला शक्य होत नाही, लार्ज स्केलवर अशाप्रकारचा प्रयत्न होत नाही. यासाठी शासनाला माझी विनंती आहे की, अभिहस्तांतरणाचा कायदा आपण शक्य तो लवकर पास करुन या सगळ्या फ्लॅटधारकांना दिलासा द्यावा. त्याबाबतीत चाललेला काळाबाजार, त्याबाबतीत चाललेला विलंब, त्याबाबतीत होणारे दुर्लक्ष, त्याबाबतीत होणारी कायद्यांतर्गत दादागिरी, त्याबाबतीत चालणारे म्हाडाची किंवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू...

बिल्डर लोकांची दादागिरी ही त्वरित थांबवावी, अशी मी या निमित्ताने विनंती करतो. त्या दृष्टीकोनातून मी आज हे विधेयक मांडलेले आहे.

-

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी) : अतिशय विस्तृतपणे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबानी हा विषय मांडलेला आहे. शेवटी हे विधेयक मागे घ्यायचे आहे. परंतु अधिकाऱ्यांच्या दालनामध्ये प्रधान सचिव बसलेले आहेत. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, येथील चर्चा वांझोटी ठरु नये. माझी एक सूचना आहे की, जनहिताचे कायदे बनविण्याचे जे विषय आहेत ते व्यापक असतात म्हणून सकाळी ठेवायला पाहिजेत. कारण सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांची उपस्थिती असते. हा चर्चेचा येथे विषय नाही. माझ्या मनात आले म्हणून मी सांगितले. कारण महत्वाचे विषय आहेत. आज जवळजवळ 27 हजार गृहनिर्माण संस्था आहेत की त्यांचे कन्व्हेन्स झालेले नाही. मी अधिक वेळ न घेता, यातील दोनतीन मुद्दे फक्त मांडतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी चांगल्या पोटतिडकीने हे विधेयक मांडलेले आहे. ते विधेयक आपण पुढच्या आठवडयामध्ये आणा, त्यावर विस्तृत चर्चा करा, नाही तर आपल्याला लोकांचे शाप बाधणार आहेत. मी इमोशन होऊन बोलत नाही. 20-20, 25-25 वर्षे सहकारी सोसायट्यांचे हस्तांतरण न झाल्यामुळे अक्षरश: भिकाऱ्यासारखे एकाचा प्लॅट दुस-याने घेतला तर एन.आ.सी.साठी त्या बिल्डरला शोधावे लागते. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेचे जे कर आहेत, ते दंडात्मक कर द्यावे लागतात. पाण्याचा कर असेल, मालमत्ता कर असेल,असेसमेंट असेल हे जास्त द्यावे लागतात. पाणीपुरवठ्याचे कनेक्शन हे कंन्ट्रक्शन बांधतांना दिलेले असते. आपण सुरुवातीला सन्माननीय सदस्यांनी विधेयक मांडल्यानंतर बोलत असाल की, यासंबंधातील विधेयक पुढच्या आठवडयात आणणार आहोत, तर सगळे विषय आम्ही मांडले असते. परंतु आम्हाला बोलू द्यायचे आणि शेवटी सांगायचे की, विधेयक मागे घ्यावे. म्हणून माझी आपल्यामार्फत प्रधानसचिवांना विनंती आहे की, आपण जे विधेयक आणणार आहात त्यामध्ये त्रुटी आहेत. समजा,मी एखादी इमारत बांधली, जोपर्यन्त मी ओ.सी.घेत नाही, बी.सी.सी. घेत नाही, हस्तांतरण करत नाही, तोपर्यन्त मला दुसरीकडे बांधकाम करण्यास देता कामा नये. मला टी.डी.आर. वापरण्यास परवानगी देता कामा नये नाहीतर 10 इमारती मी बांधतो....

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

नाशिकच्या घटावर एका आजूला साबण लावून ठेवतात आणि दहा लोकांना अडवून ठेवतात. तसे सगळीकडे इमारती बांधून ठेवायच्या. पाया बांधावयाचा, इमारती उभ्या करावयाच्या आणि सगळा एफ.एस.आय. आपल्या ताब्यात ठेवायचा. सभापती महोदया, शेवटी एकच मुद्दा मांडतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. फ्लॅट घेतांना जो करार केला जातो, त्या करारामध्ये बिल्डरकडुन खूप अटी घातल्या जातात. गॅलरीची जागा माझ्या मालकीचा. लिफ्ट माझ्या मालकीची, गार्डन माझ्या मालकिचे, ओपनस्पेस माझ्या मालकीचे. टेरेस माझ्या मालकिचे. कच-याचे पिंप ठेवायचे की नाही हे मला विचारल्याशिवाय ठेवू नये. इमारतीचे हस्तांतरण होईपर्यंत तुम्हाला काही देणार नाही,असे सांगतात. एखाद्या वेळेला "ए" ने "बी" कडून फ्लॅट घेतला "सी" ने "बी" काडून फ्लॅट घेतला तर प्रत्येक वेळेला शासनाच्या नियमाप्रमाणे तो हजारो रुपये मुद्रांक शुल्क भरतो. हजारो रुपये भरुन सुध्दा तो बिल्डरच्या मेहरबानीवर तेथे राहतो. श्री. सरपोतदारदादा बोलले ते सत्य आहे. मी येथे बोलत नाही. मंत्रिमहोदय, आपल्याला बोलण्याचा माझा उद्देश नाही. पण गेले पंधरा दिवस मंत्रालयामध्ये काही अधिका-यांकडे हे बिल्डर फिरत आहेत. अशी जी बातमी आली आहे ती बरोबर आहे. आपण या बातमीचा येथे उल्लेख केलेला आहे. आम्हाला खासगीत सांगण्यात येते की, या बिलावर बोलू नका. सभापती महोदया, या बिलावर बोलू नका असे आज आम्हाला फोन येतात, ते आम्हाला सांगणारे कोण? आम्हाला कोणी विकत घेऊ शकत नाही. आम्हाला जनतेने येथे पाठविलेले आहे. हे महत्वाचे विधेयक आहे. सभापती महोदया, आपल्या माध्यमातून शासनाच्या अधिका-यांना माझी विनंती आहे की, अनेक वेळेला एखादा जनहिताचा प्रश्न आला तर तुम्ही त्याला नकार देता. पण अशा प्रकारचे विधेयक तुम्ही स्वत: होऊन आणले पाहिजे. कारण मंत्री हे पाच वर्षे असतात, दहा वर्षे असतात. म्हणून प्रशासनाने स्वत: होऊन त्या मंत्रिमहोदयांकडे अशा प्रकारचे बिल आणा म्हणून गेले पाहिजे. 27000 सोसायटयांचे हस्तांतरण झालेले नाही. बिल्डर त्या इमारतीचा टी.डी.आर. वापरतात. एफ.एस.आय. वापरतात. मी ज्या बिल्डिंगमध्ये राहतो त्या इमारतीचे उदाहरण याठिकाणी देतो. जर पाण्याचा टॅक्स एक रुपया येणार असेल तर तो साडे चौदा रुपये येतो. त्यामुळे 50 टक्के, 60 टक्के, 70 टक्के जास्त टॅक्स द्यावा लागतो. अशा प्रकारे टॅक्स द्यावा लागत असेल तर या मुंबई शहरात किंवा कुठल्याही शहरात कुणाला जगू देणार की नाही ? सभापती महोदया, मी आपला अधिक वेळ घेत नाही. कारण 73 क्रमांकाचे विधेयक

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

येणार आहे. त्यावेळेला त्या विधेयकावर आम्ही विस्तृतपणे बोलू. पण त्याही विधेयकात फार त्रुटी आहेत. या विधेयकात सांगितल्याप्रमाणे शिक्षा करा नां ? या देशात पंडित नेहरुंनी देखील सांगितले होते की, भ्रष्टाचार करणा-यांना, जनतेला छळणा-यांना फासावर द्या. अद्याप एकही भ्रष्टाचार करणारा फासावर गेलेला नाही. म्हणून राजकारणातील सगळया गोष्टी आपण बाजूला ठेवू या. सर्वसामान्य माणसासाठी, झोपडपट्टीतील माणसासाठी काही करावयाला गेलो तर

सो-कॉल्ड समाजवादाच्या नावाने श्रीमती मेधा पाटकरांसारखे अनेक लोक मोर्चे काढून त्यांना सरंक्षण द्यायला जातील. पण ते चार आणे कधी त्यांना देणार नाहीत. जुलैमध्ये मुंबईत पूर आला तेव्हा त्यांनी, त्यांची बाजू घेतली आणि उपोषणाचे नाटक केले पण त्यांना चार आणे मदत सुध्दा या श्रीमती मेधा पाटकर यांनी मिळवून दिली नाही. यांच्यासाठी मदतीला कोणी येतात कां? "धोबीका कुत्ता ना घर का नां घाटका" अशी अवस्था मध्यमवर्गीयांची, सामान्य माणसांची झालेली आहे.श्री. मधुकर सरपोतदार बोलले ते बरोबर आहे. बँका त्यांना कर्ज देत नाहीत. कर्ज द्यायचे असेल तर विचारतात की, कन्व्हेयन्स डीड झाले आहे काय ते सांगा ? हस्तांतरण झाले आहे काय ते सांगा ? आणि म्हणून सभापती महोदया, आपल्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, पुढच्या आठवडयात जे 73 क्रमांकाचे विधेयक येणार आहे. आज या ठिकाणी जी चर्चा होत आहे, त्या चर्चेचा समावेश त्या विधेयकात केला तर सर्वांनी मिळून जनतेच्या कल्याणचा कायदेमंडळात निर्णय घेतला याचा दिलासा लोकांना मिळेल. म्हणून माननीय मंत्रिमहोदयांना आणि शासनाला मला अशी विनंती करावयाची आहे की, पुढच्या आठवडयात असे एक सर्वंकष विधेयक आणा आणि आम्ही जनतेसाठी आहोत, सामान्य माणसासाठी आहोत हे दाखवून द्या. ते विधेयक आणण्याची जाबाबदारी मंत्रिमहोदय, आपण घ्यावी. या ठिकाणी श्री. सरपोतदार दादांनी जे विधेयक आणलेले आहे ते अतिशय चांगले आहे. गेले वर्षभर मी त्यांना पाहतो आहे की, ते प्रत्येक अधिवेशनामध्ये अतिशय पोटतिडिकेने बोलत असतात. खरे तर शासनाने मागील अधिवेशनातच सांगावयास पाहिजे होते की, पुढच्या अधिवेशनात अशा प्रकारचे अशासकीय विधेयक आणण्याची तुमच्यावर पाळी येणार नाही. हे कल्याणकारी राज्य असल्यामुळे ज्या ज्यामुळे जनता छळली जाते त्याची आम्ही नोंद घेतलेली आहे. त्यामुळे पुढच्या अधिवेशनात तुमच्या सूचनांसह आम्ही या संदर्भात शासकीय

..3..



SMT/ MHM/ SBT/ 18:25

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

विधेयक आणू. पण मंत्रिमहोदयांनी तसे संगितलेले नाही. पण या वेळेला मला आशा वाटते की, माननीय मंत्रिमहोदय, ते विधेयक आणतील. ते विधेयक आणतांना आज या ठिकाणी केलेल्या सूचनांचा शासनाने विचार करावा, एवढीच विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

--------

यानंतर श्री. खर्चे..

अप्रसिध्दित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के (गृहनिर्माण मंत्री) : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी विधानपरिषद विधेयक क्र. 5 - महाराष्ट्र मालकी हक्कांच्या फलॅटसबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी)(सुधारणा) विधेयक, 2005 या सदनात चर्चेसाठी आणले आहे. त्यावर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आपले विचार मांडले व सूचनाही केल्या आहेत. हे एक अत्यंत चांगले विधेयक आहे. तसेच मला या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासन आणि सभागृहातील सदस्य एका मार्गाने निघालेले आहेत, असा प्रवास मला या विधेयकावरुन जाणवतो. या ठिकाणी या विषयावरील चर्चा झाली असून त्यात अत्यंत मौलिक अशा सूचनाही सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत. या खात्याचा एक मंत्री म्हणून मला उत्तर देतांना एक वेगळा आनंद मिळतो. तो असा की या दोघांनी मांडलेल्या मुद्दयावरुन असे वाटते की, या विषयासंबंधी त्यांनी किती गाढा अभ्यास केला, त्यांचा व्यासंग किती दांडगा आहे तसेच पुर्वानुभवावरुन त्यांनी ज्या ज्या सूचना केल्या त्या अत्यंत उपयुक्त आहेत. मुंबई तसेच इतर शहरांतील इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांचा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उल्लेख केला तसेच स्वत: राहत असलेल्या इमारतीचाही उल्लेख आपल्या भाषणातून त्यांनी केला. या सर्व गोष्टींचा विचार करुन शासन याच संदर्भात पुढील आठवडयातच असे विधेयक दुरुस्तीसाठी आणणार आहे, त्यावेळी आपण त्यावर सविस्तर चर्चा करणारच आहोत. म्हणून माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी आपले विधेयक मागे घ्यावे.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्री महोदय आम्ही केलेल्या सूचनांचा गांभीर्याने विचार करणार काय, हे त्यांनी कृपया सांगावे.

श्री. दयानंद मस्के : महोदया, दोघांच्याही सूचनांचा विचार करण्यात येईल तसेच आपल्याला या बिलावर बोलण्यासाठी पूर्णपणे स्वातंत्र्य दिले जाईल. तसेच जेवढया आपल्या सूचना असतील आणि आपले गृहनिर्माण मंडळ चालावे, गृहनिर्माण संस्थांना न्याय मिळावा या सर्व बाबींचा विचार करुन त्यांचा आदर करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय महोदया, या विधेयकाचे महत्व मी खरे तर अगदी थोडक्यात सांगितले. वास्तविक यावर खूप बोलता येण्यासारखे आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी देखील आपले विचार यावर व्यक्त केले, अन्य बरेच सदस्य उपस्थित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

नसल्याने थोडक्यात चर्चा आटोपली आहे. पण यामध्ये एक गोष्ट दिलासा देणारी आहे जिचा मी सुरुवातीलाच उल्लेख केला ती म्हणजे या अधिवेशनात यासंबंधीचे विधेयक इंट्रॉडयूस झालेले आहे. त्यावर चर्चा होणारच आहे. परंतु या बिलावर चर्चा करण्यासाठी दुसरे अधिवेशन येणार नाही, नागपूरच्याच अधिवेशनात पुढील आठवडयात यावर चर्चा व्हावी, याची काळजी मंत्री महोदयांनी घ्यावी अशी माझी विनंती आहे. कारण यासंदर्भात मला एक गोष्ट माहिती आहे की, हे विधेयक मान्य होऊ नये म्हणून बाहेरुन ब-याच प्रमाणात आपल्यावर दबाव येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण हे विधेयक पास झाले तर अनेक सदनिकाधारक, गरीब व श्रीमंत देखील यांना दिलासा मिळणार आहे, त्यांच्या डोक्यावरची टांगती तलवार बाजुला होणार आहे. अशा लोकांचे जीवन सुसहय करणे हे आपल्या सर्वांचेच काम आहे. आपले राज्य हे कल्याणकारी राज्य आहे, कल्याणकारी राज्य हे सातत्याने जनतेच्या कल्याणाचाच विचार करते, तसा आपण करणार आहात यादृष्टीने काही तरी ठोस आश्वासन द्यावे, माझी विधेयक मागे घेण्यास हरकत नाही, परंतु आपण दिलेले आश्वासन रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. म्हणून याच अधिवेशनात पुढील आठवडयात यासंबंधीचे शासकीय विधेयक चर्चेसाठी शासनाकडून येईल असे आश्वासन द्यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री. दयानंद मस्के : महोदया, या विधेयकाचे गांभीर्य लक्षात घेऊन ज्या प्रकारच्या सूचना करण्यात आल्या आहेत, त्यांचा पूर्णपणे आदर करुन, त्यांचे स्वागत करुन पुढच्याच आठवडयात हे विधेयक चर्चेसाठी आणण्यात येईल.

श्री. मधूकर सरपोतदार : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी ठोस असे आश्वासन दिले त्यामुळे मी मांडलेले विधानपरिषद विधेयक क्र. क्र. 5 - महाराष्ट्र मालकी हक्कांच्या फ्लॅटस्बाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी)(सुधारणा) विधेयक, 2005 मागे घेण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले आहे.

----------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 6 वाजून 35 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 12 डिसेंबर, 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही